मनोविकास

वर्णद्वेष संपवणारा युगपुरुष

नेल्सन मंडेला

अतुल कहाते

Join Us on Telegram : @FreeMarathiBooks

Join Us on Telegram : @FreeMarathiBooks

वर्णद्वेष संपवणारा युगपुरुष
नेल्सन मंडेला

अतुल कहाते

मनोविकास
प्रकाशन

मनोविकास प्रकाशन

Nelson Mandela | Atul Kahate

नेल्सन मंडेला । अतुल कहाते

प्रकाशक | अरविंद घन:श्याम पाटकर

मनोविकास प्रकाशन

३-ए/४, शक्ती टॉवर, ६७२,

नारायण पेठ, पुणे - ४११ ०३०.

दूरध्वनी : 020-29806665

Email: manovikaspublication@gmail.com

Website: www.manovikasprakashan.com

© सर्व हक्क सुरक्षित

ISBN : 978-93-86118-42-4

नारायण पेठ, पुणे - ४११ ०३०.

दूरध्वनी : 020-29806665

Email: manovikaspublication@gmail.com

Website: www.manovikasprakashan.com

© सर्व हक्क सुरक्षित

ISBN : 978-93-86118-42-4

Table of Contents

प्रास्ताविक

वर्णद्वेषाची पाळंमुळं

मंडेलाचं बालपण

आयुष्याला कलाटणी!

विनी मंडेलाचं आगमन

चळवळीत फूट

भूमिगत क्रांतिकारी!

सशस्त्र क्रांती ते तुरुंगवास

डॉक्टर आफ्रीका

फसलेली दुसरी

बोथाचं डावपेचण

वाढवी वढ्ढकडे वाटचाल

बुथेलेझी आणि डेगान-क्लार्क यांचे उद्योग

विनी मंडेलाचा सहसतवाद!

सुटकेची नांदी

तो ऐतिहासिक क्षण!

कायदेत

दुसऱ्याचे दिवस

नियोजनाचा ऐतिहासिक क्षण

राष्ट्रपती मंडेला

राष्ट्रपतीपदाच्या मार्गाची काटेरी वाट

वैसा

राष्ट्रपती मंडेलाचं यश-अपयश

मंडेलाचं मूल्यमापन

संदर्भ

प्रास्ताविक

क्रिकेट हे माझं लहानपणापासूनचं पहिलं प्रेम होतं. क्रिकेटच्या इतिहासातही मी खूप रमायचो. क्रिकेट या खेळाची जडणघडण नक्की कशी झाली, हे समजून घेण्यात मला खूप रस वाटायचा. आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या क्रिकेटचा इतिहास समजून घेणं आणि जगभरातल्या सगळ्या प्रकारच्या क्रिकेटच्या सामन्यांची आकडेवारी जतन करणं, हा माझा छंद ध्यासात कधी बदलला हे माझंच मला समजलं नाही. क्रिकेटचा अभ्यास करताकरता मला जुन्या खेळाडूंविषयीची माहिती मिळायला लागली. त्यात दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंचाही समावेश होता. पण, या माहितीतून साधारण असं लक्षात आलं, की दक्षिण आफ्रिकेचा संघ 1970 च्या दशकापर्यंतच क्रिकेट खेळायचा. शिवाय दक्षिण आफ्रिकेनं फक्त इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझिलंड या देशांविरुद्धच क्रिकेट खेळलं असल्याची माहितीही मला मिळाली. हे असं का असावं, याविषयी मला कोडं पडलं. क्रिकेटच्या इतिहासाविषयीची काही पुस्तकं वाचल्यावर त्यामागचं कोडं थोडंफार समजायला लागलं. दक्षिण आफ्रिकेमध्ये गोऱ्या लोकांनी कृष्णवर्णीय लोकांवर खूप अन्याय केल्यामुळे दक्षिण आफ्रिकेला वर्णद्वेषी मानलं जातं आणि म्हणूनच काही ठरावीक देश वगळता इतर देशांनी दक्षिण आफ्रिकेवर बहिष्कार टाकला असल्याचं त्यातून समजलं. पण मग 1970 सालापर्यंतच दक्षिण आफ्रिकेनं क्रिकेट का खेळावं हा प्रश्न उरलाच!

क्रिकेटविषयीचं वाचन वाढलं, तसं या प्रकरणामधली गुंतागुंत आणखी उकलत गेली. दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषी धोरणांमुळे बहुतेक सगळ्या आशियाई देशांनी तिच्यावर बहिष्कार टाकला असल्याचं तर माहीत होतंच, पण नंतरच्या काळात इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझिलंड या गोऱ्या देशांनीसुद्धा त्याचीच री ओढल्याचं समजलं. यामागे दक्षिण आफ्रिकेमध्ये वाढत गेलेला वर्णद्वेष तर होताच, पण शिवाय 1960 च्या दशकात बेसिल डॉलिव्हिएरा या खेळाडूच्या संदर्भातल्या प्रकरणामुळे या सगळ्याला एकदम कलाटणीच मिळाली. डॉलिव्हिएराचा जन्म दक्षिण आफ्रिकेतला होता. तो ना धड गौरवर्णीय, ना धड कृष्णवर्णीय; म्हणजे मिश्रवर्णीय होता. म्हणजेच दक्षिण आफ्रिकेच्या दृष्टीनं तो दुय्यम दर्जाचा होता. कारण गोरी माणसं सोडून इतर सगळे लोक हीन दर्जाचे असतात, असं दक्षिण आफ्रिकेची घटनाच सांगायची. हा डॉलिव्हिएरा इंग्लंडमध्ये गेला, तिथे बऱ्यापैकी चमकला; पण तरीही त्याची दक्षिण आफ्रिकेला

जाणाऱ्या इंग्लंडच्या संघात निवड झाली नाही. साहजिकच यामागे दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषी धोरणांपुढे इंग्लंडनं सपशेल लोटांगण घालण्यासारखं आहे, असं मानून इंग्लंडमध्ये यावरून प्रचंड नाराजी पसरली. अनेक मानवतावादी लोकांनी आणि संघटनांनी ब्रिटिश सरकार, तसंच इंग्लंडचं क्रिकेट नियामक मंडळ यांच्यावर कडाडून टीका केली. प्रकरण तापलं. नेमकं तेव्हाच इंग्लिश मूळ संघात निवड झालेल्या एका खेळाडूनं आपल्या दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर जायला असमर्थता व्यक्त केली आणि त्यामुळे त्याच्या जागी डॉलिव्हिएराची निवड करण्यात आली.

ज्या डॉलिव्हिएराला त्याच्या वर्णावरून दक्षिण आफ्रिकन सरकार दुय्यम मानायचं, त्याच दक्षिण आफ्रिकेला आता डॉलिव्हिएराचं स्वागत पाहुणा म्हणून करणं भाग होतं. यावरून मोठं वादळ उठलं. दक्षिण आफ्रिकन सरकारनं आपण डॉलिव्हिएराला आपल्या देशात इंग्लिश संघाचा सदस्य म्हणून प्रवेश देणार नाही, अशा अर्थाचं विधान केलं. प्रकरण क्रिकेटच्या सीमारेषा ओलांडून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत गेलं. हा दौरा आपण रद्द करणार असल्याची धमकी दक्षिण आफ्रिकन सरकारनं दिली. इंग्लंडमध्येही कायद्याच्या भीतीनं वर्णद्वेषाचा उघडउघड पुरस्कार करणारे फारसे लोक नसले, तरी दक्षिण आफ्रिकेमधल्या आपल्या व्यावसायिक आणि गुंतवणुकीच्या संदर्भात असलेल्या हितसंबंधांना जोपासण्यासाठी डॉलिव्हिएराची संघात निवड करण्यात येऊ नये, अशी मागणी जोर धरायला लागली. पण, त्याचबरोबर मानवतावादी ब्रिटिश लोकांनी मात्र दक्षिण आफ्रिकन सरकारच्या या दबावाला बळी न पडता डॉलिव्हिएराचं संघातलं स्थान कायम ठेवावं अशी मागणी केली. प्रसंग खूप बिकट होत गेला. त्यातून मार्ग काढण्यासाठी अनेक मोठमोठ्या बैठका झाल्या. पण, शेवटी त्यातून काही मार्ग निघू शकला नाही. मानवतावादी लोकांच्या आणि संघटनांच्या दबावामुळे ब्रिटिश सरकारला नमतं घेणं भाग पडलं. आपण डॉलिव्हिएराला संघात घेणारच, असं ब्रिटिश सरकारनं दक्षिण आफ्रिकन सरकारला कळवलं. शेवटी ताणूनताणून हा विषय फाटला आणि हा दौराच रद्द झाला.

क्रिकेटच्या इतिहासातली ही प्रचंड मोठी घटना होती. इतर अनेक खेळांमध्ये दक्षिण आफ्रिकेवर आधीपासूनच बहिष्कार टाकण्यात आला होता किंवा तो टाकण्याविषयी चर्चा सुरू होती. क्रिकेटमध्येही त्याची ठिणगी या घटनेनं पडली. यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ 1970

साली इंग्लंडच्या दौऱ्यावर येणार होता. तोही दौरा रद्द झाला. एकूणच दक्षिण आफ्रिकेचं क्रिकेट आंतरराष्ट्रीय नजरेतून बंद पडलं. अर्थात, दक्षिण आफ्रिकेमधलं स्थानिक क्रिकेट सुरू राहिलं. पण त्याला इतर जगाच्या दृष्टीनं फारशी किंमत दिली जात नसे. काही दक्षिण आफ्रिकन खेळाडू इंग्लिश कौंटी क्रिकेटमध्ये चमकत राहिले. त्यातूनच माईक प्रॉक्टर, बॅरी रिचर्ड्स अशी नावं जगाला माहीत झाली. दक्षिण आफ्रिकेकडून किंवा तिच्याविरुद्ध क्रिकेट खेळायची स्वप्नं स्वप्नंच राहतील; हे ओळखून टोनी ग्रेग, ॲलन लॅम्ब, केप्लर वेसल्स असे काही खेळाडू इतर देशांकडून क्रिकेट खेळायला लागले.

2007 साली मी 'लोकसत्ता'साठी क्रिकेटविषयी एक दैनिक सदर लिहिलं होतं. त्या वेळी या सगळ्या प्रकरणांचा आणखी खोलात जाऊन अभ्यास करायची संधी मिळाली. तेव्हा 'रिबेल टूर्स' म्हणून ओळखल्या गेलेल्या काही दौऱ्यांविषयीचीही माहिती खोलात समजली. दक्षिण आफ्रिकेमध्ये फक्त गोऱ्या लोकांनाच हक्क असल्यामुळे इतर देशांनी दक्षिण आफ्रिकेवर बंदी घातल्यानंतर काही देशांच्या खेळाडूंनी पैशांच्या हव्यासाने दक्षिण आफ्रिकेचे अनधिकृत दौरे केले. अर्थातच, अधिकृत क्रिकेटच्या सामन्यांमधून या खेळाडूंची काही काळासाठी किंवा कायमस्वरूपी हकालपट्टी करण्यात आली. आपल्यापैकी क्रिकेटची आवड असलेल्या लोकांना माहीत असलेले ग्रॅहॅम गूच, माईक गॅटिंग, किम ह्यूज, जेफ बॉयकॉट, डेरेक अंडरवूड असे अनेक लोकप्रिय खेळाडू या दौऱ्यांवर गेले होते. त्यांच्यावर 3 वर्षं बंदी घालण्यात आली. वेस्टइंडीज, तसंच श्रीलंका यांचे खेळाडूसुद्धा दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर जाऊन आले. त्यांच्यावर तर आयुष्यभरासाठी बंदी घालण्यात आली. वेस्टइंडीजमधले कृष्णवर्णीय लोक अर्थातच कृष्णवर्णीयांना तुच्छ लेखणाऱ्या दक्षिण आफ्रिकेत आपल्यासारखेच कृष्णवर्णीय लोक खेळायला गेल्याची कल्पनाच सहन करू शकत नव्हते! साहजिकच, तिथे अशी प्रतिक्रिया उमटणं अगदी साहजिकच होतं. म्हणूनच, एके काळी 'प्रति व्हिव्हियन रिचर्ड्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉरेन्स रो या वेस्टइंडीयन खेळाडूची खराब होत चाललेली दृष्टी आणि त्याचा दक्षिण आफ्रिकेचा दौरा या गोष्टी त्याची कारकिर्द संपवणाऱ्या ठरल्या. या दौऱ्यावर गेलेल्या अनेक श्रीलंकन आणि वेस्टइंडीयन खेळाडूंची शोकांतिका झाली. डेव्हिड मरे हा पूर्वी भारताच्या दौऱ्यावर आलेला यष्टिरक्षक वेस्टइंडीजच्या बंडखोर खेळाडूंबरोबर दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेला होता. अगदी अलीकडच्या काळात भारताचा संघ वेस्टइंडीजच्या

साली इंग्लंडच्या दौऱ्यावर येणार होता. तोही दौरा रद्द झाला. एकूणच दक्षिण आफ्रिकेचं क्रिकेट आंतरराष्ट्रीय नजरेतून बंद पडलं. अर्थात, दक्षिण आफ्रिकेमधलं स्थानिक क्रिकेट सुरू राहिलं. पण त्याला इतर जगाच्या दृष्टीनं फारशी किंमत दिली जात नसे. काही दक्षिण आफ्रिकन खेळाडू इंग्लिश कौंटी क्रिकेटमध्ये चमकत राहिले. त्यातूनच माईक प्रॉक्टर, बॅरी रिचर्ड्स अशी नावं जगाला माहीत झाली. दक्षिण आफ्रिकेकडून किंवा तिच्याविरुद्ध क्रिकेट खेळायची स्वप्नं स्वप्नंच राहतील; हे ओळखून टोनी ग्रेग, ॲलन लॅम्ब, केप्लर वेसल्स असे काही खेळाडू इतर देशांकडून क्रिकेट खेळायला लागले.

2007 साली मी 'लोकसत्ता'साठी क्रिकेटविषयी एक दैनिक सदर लिहिलं होतं. त्या वेळी या सगळ्या प्रकरणांचा आणखी खोलात जाऊन अभ्यास करायची संधी मिळाली. तेव्हा 'रिबेल टूर्स' म्हणून ओळखल्या गेलेल्या काही दौऱ्यांविषयीचीही माहिती खोलात समजली. दक्षिण आफ्रिकेमध्ये फक्त गोऱ्या लोकांनाच हक्क असल्यामुळे इतर देशांनी दक्षिण आफ्रिकेवर बंदी घातल्यानंतर काही देशांच्या खेळाडूंनी पैशांच्या हव्यासाने दक्षिण आफ्रिकेचे अनधिकृत दौरे केले. अर्थातच, अधिकृत क्रिकेटच्या सामन्यांमधून या खेळाडूंची काही काळासाठी किंवा कायमस्वरूपी हकालपट्टी करण्यात आली. आपल्यापैकी क्रिकेटची आवड असलेल्या लोकांना माहीत असलेले ग्रॅहॅम गूच, माईक गॅटिंग, किम ह्यूज, जेफ बॉयकॉट, डेरेक अंडरवूड असे अनेक लोकप्रिय खेळाडू या दौऱ्यांवर गेले होते. त्यांच्यावर 3 वर्षं बंदी घालण्यात आली. वेस्टइंडीज, तसंच श्रीलंका यांचे खेळाडूसुद्धा दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर जाऊन आले. त्यांच्यावर तर आयुष्यभरासाठी बंदी घालण्यात आली. वेस्टइंडीजमधले कृष्णवर्णीय लोक अर्थातच कृष्णवर्णीयांना तुच्छ लेखणाऱ्या दक्षिण आफ्रिकेत आपल्यासारखेच कृष्णवर्णीय लोक खेळायला गेल्याची कल्पनाच सहन करू शकत नव्हते! साहजिकच, तिथे अशी प्रतिक्रिया उमटणं अगदी साहजिकच होतं. म्हणूनच, एके काळी 'प्रति व्हिव्हियन रिचर्ड्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉरेन्स रो या वेस्टइंडीयन खेळाडूची खराब होत चाललेली दृष्टी आणि त्याचा दक्षिण आफ्रिकेचा दौरा या गोष्टी त्याची कारकिर्द संपवणाऱ्या ठरल्या. या दौऱ्यावर गेलेल्या अनेक श्रीलंकन आणि वेस्टइंडीयन खेळाडूंची शोकांतिका झाली. डेव्हिड मरे हा पूर्वी भारताच्या दौऱ्यावर आलेला यष्टिरक्षक वेस्टइंडीजच्या बंडखोर खेळाडूंबरोबर दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेला होता. अगदी अलीकडच्या काळात भारताचा संघ वेस्टइंडीजच्या

2011 सालच्या जुलै महिन्यात मात्र नेल्सन मंडेलाच्या वाढदिवसाची बातमी बीबीसी किंवा सीएनएन चॅनेलवर बघितली आणि नव्यानं हा विषय डोक्यात घोळायला लागला. अत्यंत कृश अवस्थेत असलेला आणि आजूबाजूला काय चाललं आहे, हे समजत नसलेला मंडेला बघून नकळतच डोळ्यांच्या कडा पाणावल्या. मंडेलाच्या नाती त्याच्याकडून अक्षरश: केक कापून घेत होत्या. आपण काय करतो आहोत, हेसुद्धा मंडेलाला समजत नसावं, अशा प्रकारचे भाव त्याच्या शून्य नजरेतून जाणवत होते. मंडेलाला विस्मरणाचा त्रास आहे, त्याला 'अल्झायमर्स'नं पछाडलं आहे हे वाचलं होतं, पण ही दृश्यं बघितल्यावर मात्र खूपच वाईट वाटलं. भीमसेनजींच्या अखेरच्या काळात त्यांच्या घरी जाऊन त्यांना काही फूट अंतरावरून बघायचं भाग्य मला लाभलं होतं. भीमसेनजींचा तोच अगतिक चेहरा, तीच अगतिक आणि शून्य नजर मला आठवली. मंडेला खूप महान आहे हे माहिती आहे; पण त्यानं नक्की काय केलं आहे हे माहीत नाही, अशा परिस्थितीतून बाहेर यायचं त्याच क्षणी ठरवलं.

मंडेलाविषयी, तसंच दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषी इतिहासाविषयी यानंतर खूप वाचन केलं. त्यातून ब्रिटिशांनी इतर अनेक देशांप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेला कसं लुबाडलं, तिच्याकडून आपला फायदा कसा करून घेतला आणि नंतरही दक्षिण आफ्रिकेला नावापुरतं स्वातंत्र्य देऊन आपलं वर्चस्व कायम राहील, याकडे कसं लक्ष दिलं, हे यातून समजलं. इंग्लंडप्रमाणेच इतरही अनेक युरोपीय देशांनी निव्वळ आपल्या फायद्यासाठी दक्षिण आफ्रिकेत पूर्वीपासून सुरू असलेल्या गोऱ्या लोकांच्या वर्णद्वेषी धोरणांना कसा पाठिंबा दिला, याची ओळख झाली. नंतर, ब्रिटिश लोक आणि युरोपीय लोक यांचे वंशज म्हणजेच हे गोरे लोक, हे समजल्यावर या सगळ्याचा उलगडा झाला. देशाच्या एकंदर लोकसंख्येच्या जवळपास 80 टक्के असलेल्या कृष्णवर्णीय लोकांना आपल्याच देशात अक्षरश: गुलामांसारखं राहावं लागावं, याला काही अर्थच नव्हता. पण जवळपास 80 वर्षं स्वातंत्र्य मिळालेल्या दक्षिण आफ्रिकेत हा अन्याय सुरूच राहिला. कृष्णवर्णीय लोक, तसंच मिश्रवर्णीय लोक जन्मानंच दुय्यम दर्जाचे असतात, असं ठरवून गोऱ्या लोकांनी आपली भरभराट होईल आणि आपल्या कल्याणासाठी हे कृष्णवर्णीय लोक राबतील, यासाठीची व्यवस्था करून ठेवली होती. अर्थातच युरोपीय देश, तसंच अमेरिका यांचा या वर्णद्वेषी धोरणांना कधी उघड आणि बरेचदा छुपा पाठिंबा होता.

अशा विलक्षण कठीण परिस्थितीमध्ये नेल्सन मंडेला या युगपुरुषानं ज्या जिद्दीनं दक्षिण

आफ्रिकेमध्ये समान नागरी कायदा यावा; म्हणून प्रयत्न केले, त्याला तोड नाही. तब्बल 27 वर्षं तुरुंगात काढूनही ह्या माणसाची उमेद हरली नाही. सुरुवातीला भडक माथ्याचा आणि काही काळ हिंसक कृत्यांचं समर्थन करणारा मंडेला नंतर कसा बदलत गेला, याची कहाणी थक्क करून सोडणारी आहे. ज्या लोकांनी आपल्या आयुष्याचं जवळपास मातेरं केलं; ज्यांनी आपल्याला तुरुंगाबाहेरचं जग आपल्या ऐन उमेदीच्या काळात बघूसुद्धा दिलं नाही, त्या सगळ्या लोकांविषयी मनात कसलाही राग न बाळगणारा आणि म्हणूनच त्यांचा सूड घ्यायची भावना न बाळगणारा हा माणूस अलौकिकच आहे! कुठल्याही सर्वसामान्य माणसानं अशा परिस्थितीत अत्यंत खुनशीपणे आपल्या विरोधकांचा बदला घेण्यासाठी कंबर कसली असती. तब्बल 27 वर्षं आपल्या कुटुंबाशी, आपल्या जवळच्या लोकांशी, आपल्या देशवासीयांशी नावापुरताच संपर्क राहिलेला असूनसुद्धा, या काळात आपल्या कुटुंबाचे तीनतेरा वाजलेले असूनसुद्धा, तुरुंगाबाहेर आल्यावरही अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करावा लागूनसुद्धा मंडेलानं आपला संयम ढळू दिला नाही. गांधीजींच्या अलौकिक प्रतिभेला मनातून नमस्कार ठोकल्यावर, मंडेलाच्या बाबतीतसुद्धा हेच करावंसं वाटतं.

अर्थात, म्हणून मंडेलानं त्याच्या आयुष्यात काहीच चुका केल्या नाहीत किंवा मंडेला नेहमीच अगदी आदर्श माणसासारखा वागला, असं मात्र अजिबात नाही.

कमालीच्या विपरीत परिस्थितीमध्येसुद्धा मंडेलामधला माणूस क्वचितच झोपलेला असायचा. अत्यंत कठीण परिस्थितीमध्येसुद्धा डोकं थंड ठेवून माणसानं माणसासारखंच वागलं पाहिजे, असा धडाच मंडेलानं बहुतेक प्रसंगांमधून घालून दिला. दक्षिण आफ्रिकेमधला वर्णद्वेष संपवण्यामागे मंडेलाची भूमिका अर्थातच निर्णायक होती, पण मुळात आपण हे सगळं करू शकू यासाठीचा दांडगा आत्मविश्वास मंडेलाकडे होता; म्हणूनच हे शक्य झालं.

मंडेलाचं खासगी आयुष्य अत्यंत वादळीच होतं. त्याची तीन लग्नं झाली. त्यापैकी पहिल्या दोन लग्नांना तसा अर्थच नव्हता. कारण, पहिल्या लग्नाच्या वेळी मंडेलाचं राजकीय आणि सामाजिक आयुष्य इतकं वेगानं सुरू होतं की, वैवाहिक शांतता लाभण्याइतका वेळच मंडेलाकडे नव्हता. त्यामुळे मंडेलाच्या पहिल्या पत्नीनं त्याच्यापासून वेगळं व्हायचं ठरवलं. मंडेलाचं दुसरं लग्न अनेक कारणांमुळे वादळी ठरलं. मुळात आपल्याहून खूप कमी वय असलेल्या आणि आक्रमक असलेल्या विनीशी मंडेलानं लग्न करू नये, असं अनेक जणांचं मत

होतं. पण विनीनं मंडेलाला पार वेडंच करून सोडलं होतं. तो तिच्याकडे आकर्षित झाला होता. त्यामुळे मंडेलानं हे लग्न केलं. यामुळे नंतरच्या काळात पस्तावण्याची वेळ मंडेलावरच आली. मंडेलाच्या तुरुंगवासाच्या काळात तर विनी बेभानच झाली. तिनं चळवळीच्या नावाखाली सरळ कायदाच आपल्या हातात घेतला. अत्यंत बेदिक्कतपणे विनीनं अनेक धडकी भरवणारी कामं केली. हिंसाचाराला प्रोत्साहन देणं, खुनाच्या कटामध्ये जवळपास सहभागी असणं, असल्या घृणास्पद कामांपासून पराकोटीचा भ्रष्टाचार करणं या सगळ्या गोष्टी विनीनं केल्या. मंडेलाच्या प्रदीर्घ तुरुंगवासाच्या काळात विनी त्याच्याशी एकनिष्ठ राहिली नाही. शेवटी तुरुंगातून बाहेर आल्यावर काही काळानं विनीला घटस्फोट देण्यावाचून मंडेलासमोर दुसरा पर्यायच उरला नाही. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात मात्र प्रथमच मंडेलाला वैवाहिक सुख खऱ्या अर्थानं लाभलं. आपल्या वयाला साजेशी आणि समदु:खी ग्रेसा जेव्हा मंडेलाला भेटली, तेव्हा त्याच्या आयुष्यातलं वाळवंट अल्पकाळासाठी का होईना; पण दूर झालं. तरीही मुलं-मुली, नातवंडं यांच्यापासून मंडेलाला जवळपास कसलंच सुख लाभलं नाही. अख्ख्या देशाचं आणि जवळपास सगळ्या जगाचं दु:ख नष्ट करू शकेल, अशी क्षमता असलेला हा नेता आपल्या घरातले रोजचे प्रश्न मात्र कधीच सोडवू शकला नाही, हे त्याच्या आयुष्यातलं मोठं दुर्दैवच म्हटलं पाहिजे!

दक्षिण आफ्रिकेमधली वर्णद्वेषाच्या विरोधातली कृष्णवर्णीय लोकांची चळवळ आणि त्याच्या जोडीनं संथगतीनं पुढे चाललेलं मंडेलाचं आयुष्य हा प्रवास एखाद्या चित्रपटात बघावा तसा आहे. त्यात इतिहासातल्या कलाटण्या आहेत, तशाच मानवी स्वभावाच्या वेगवेगळ्या कंगोऱ्यांची वैशिष्ट्यंही आहेत. हिंसेशिवाय आपल्याला न्याय मिळणार नाही, असं जाहीर करून हिंसेचं उघड समर्थन करणारा मंडेला त्यात आहे. तसंच, फिडेल कॅस्ट्रोसारख्या क्रांतिकारी नेत्यांकडून आक्रमक क्रांतीची प्रेरणा घेऊन त्या मार्गावर आपल्याला जायचं आहे, असं एकीकडे सांगणारा; पण अशी क्रांती दक्षिण आफ्रिकेत घडू शकणार नाही, याची कल्पना नसणारा स्वप्नाळू मंडेलाही त्यात आहे. तर दुसरीकडे, तुरुंगात 27 वर्षं राहूनसुद्धा आपला सारासार विचार न गमावणारा मंडेलाही त्यात आहे. वयाबरोबर परिपक्व होत जाणारा आणि त्याचबरोबर कधीकधी आपल्या भावनांवरचं नियंत्रण गमावणारा मंडेलाही त्यात आहे. वक्ता म्हणून अजिबात प्रभावी नसूनसुद्धा जग जिंकणारा असा हा विलक्षण नेता आहे. समोरच्या माणसाशी कसा संवाद साधायचा याची मात्र अगदी योग्य जाण असणारा आणि म्हणूनच आपल्या

हाताखाली काम करणाऱ्या लोकांपासून ते आपल्याकडे माळ्याचं काम करणाऱ्या माणसापर्यंत सगळ्यांना दिलदारपणे जिंकून घेणारा असा हा मंडेला आहे.

सगळ्या जगात सूड, बदला, धडा शिकवणं अशी भाषा बोलली जात असताना आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा एक देश दुसऱ्याशी अशाच भाषेमध्ये बोलत असताना सोशिकपणाची आणि मानवतेची शिकवण देणारा हा मंडेला खरं म्हणजे एकोणिसाव्या शतकातलाच वाटतो, असं अनेक जण म्हणायचे. देशाचा राष्ट्रपती म्हणून काम करत असतानाही मंडेलाचं लक्ष रोजच्या कटकटींपेक्षा चांगला समाज घडवणं, लोकांमध्ये समाधानाचं वातावरण निर्माण करणं, सगळ्यांना समान संधी मिळावी म्हणून प्रयत्न करणं, अशा विधायक गोष्टींकडेच असायचं. म्हणूनच दक्षिण आफ्रिकेमधल्या गोऱ्या लोकांनाही तो कधी आपला शत्रू वाटायचा नाही. अनेक जण मंडेलाच्या सरकारवर कडाडून टीका करायचे. पण मंडेलावर मात्र कुणी कसलाच ठपका ठेवायचा नाही. माणसामाणसांमधलं नातं तुटत चाललेलं असताना, सगळे जण फक्त आपला फायदा बघून त्यानुसार अत्यंत कोत्या मनोवृत्तीनं वागत असताना मंडेलाचं मोठेपण म्हणूनच उठून दिसायचं.

माणूस माणसासारखं वागायचं विसरलेला असताना मंडेला हा युगपुरुष नव्यानं त्याची आठवण करून देण्यासाठीच जन्माला आला असावा. मला समजलेल्या मंडेलातून या गोष्टीची वारंवार जाणीव होते. मंडेलानं कृष्णवर्णीय लोकांची चळवळ यशस्वी केली यात शंकाच नाही. कित्येक शतकांपासून गोऱ्या लोकांचं दक्षिण आफ्रिकेवर असलेलं अन्यायी वर्चस्व संपुष्टात आणण्यात मंडेलानं विलक्षण मोठा हातभार लावला, याविषयीसुद्धा वादच नाही. पण, त्याहून सगळ्यात जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सगळं करत असताना आपल्या तत्त्वांना मुरड न घालता अत्यंत साधेपणानं माणसानं माणसाशी कसं वागायचं, याचा आदर्श नमुना मंडेलानं सादर केला, म्हणून मंडेलाचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. म्हणूनच, असा माणूस युगायुगांनंतर एकदाच जन्माला येतो आणि म्हणूनच आपण मंडेलाच्या कर्तृत्वासमोर नतमस्तक होतो!

एक गोष्ट सुरुवातीलाच नमूद केली पाहिजे. पुस्तकामध्ये सगळ्या ठिकाणी मंडेला यांचा उल्लेख 'तो मंडेला' असा एकेरी केला आहे. अर्थातच आपण आपल्या अनेक क्षेत्रांमधल्या 'हीरों'ना जसं आपुलकीच्या भावनेनं आणि कृत्रिमता टाळण्यासाठी एकेरी नावांनी ओळखतो, तसाच हा प्रकार आहे. त्यामुळे पुस्तकामधली भाषा सहज होते, असं माझं वैयक्तिक मत आहे.

मंडेलांविषयीचा वैयक्तिक आदर आणि त्यांच्याविषयी इतरांना असलेला आदर या सगळ्याचा मान कायम राखूनच हे शब्दप्रयोग केले आहेत.

- अतुल कहाते
Email: akahate@gmail.com

वर्णद्वेषाची पाळंमुळं

मनुष्यप्राण्याच्या जन्माच्या इतिहासामधल्या अगदी सुरुवातीच्या काही खुणा दक्षिण आफ्रिकेत सापडतात. सुमारे 35 लाख वर्षांपूर्वीच्या जीवसृष्टीचे आणि 1 लाख वर्षांपूर्वीच्या 'होमो सॅपियन्स' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या मनुष्यप्राण्याशी साधर्म्य असलेल्या सजीवांचे अवशेष तिथे आढळले आहेत. खूप पुरातन काळातल्या माणसांनी काढलेल्या जवळपास 20 हजार चित्रांनी दक्षिण आफ्रिकेतल्या अनेक गुहा नटलेल्या आहेत. शिकार, मासेमारी अशा गोष्टी करून आपलं पोट भरणाऱ्या टोळ्या या भागात पूर्वीपासूनच असाव्यात, असं यावरून दिसून येतं. नंतरच्या काळात शेळ्या-मेंढ्या, गाई-गुरं यांचं पालनपोषण करून लोक दूध, लोकर वगैरे गोष्टींच्या गरजा भागवत राहिले. या सगळ्या लोकांचा उगम 'खोशियन' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या जमातीपासून झाला असावा, असं इतिहासकार मानतात. पुढची काही शतकं आफ्रिकन लोकांच्या वस्त्या वाढत राहिल्या.

इ.स. 1400 च्या काळापासून पोर्तुगीज, तसंच डच लोकांच्या छोट्या-मोठ्या वसाहती दक्षिण आफ्रिकेत निर्माण होत गेल्या. पण युरोपीय लोकांची पहिली खरी वसाहत तिथे 1652 साली निर्माण झाली. यानंतरच्या काळात 'डच ईस्ट इंडिया कंपनी'चं व्यापारी वर्चस्व निर्माण झालं. पुढची जवळपास दीडशे वर्षं या कंपनीनं 'केप ऑफ गुड होप' या भागावर आपलं नियंत्रण प्रस्थापित केलं. युरोपीय लोकांची या भागात कायमस्वरूपी वसाहत निर्माण होऊ नये असं या कंपनीला वाटत होतं. त्यामुळे या कंपनीच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कुटुंबीयांना आपल्याबरोबर केप प्रांतात न्यायची परवानगी नसे. पण आपल्या शारीरिक इच्छा दाबू न शकलेल्या युरोपीय पुरुषांनी स्थानिक गुलाम आणि 'खोईखोई' जमातीच्या स्त्रियांशी संबंध प्रस्थापित करून पुनरुत्पादन केलं. यातून मिश्रवर्णीयांची निर्मिती झाली.

डच लोकांवरसुद्धा नेपोलियनच्या प्रस्थापित होत असलेल्या साम्राज्याची व्याप्ती वाढू नये, या हेतूनं त्याला शह देण्यासाठी ब्रिटिशांनी 1795 साली दक्षिण आफ्रिकेत प्रवेश केला. याशिवाय आशिया खंडाकडे जाणाऱ्या सागरी मार्गावर आपलं नियंत्रण असावं, असंही ब्रिटिशांच्या मनात होतं. पण ब्रिटिशांना दक्षिण आफ्रिकेत आपली वसाहत उभी करायची नव्हती. त्यामुळे ब्रिटिशांनी गुलामांच्या आयातीवर भर दिला. नंतर ब्रिटिश संसदेनं गुलामगिरीशी

संबंधित असलेल्या व्यापारावर बंदी घालायचे आदेश दिल्यावर ब्रिटिशांचा गुलामांशी संबंधित असलेला व्यापार जरा थंडावला. पण ब्रिटिश लोक आणि इतर युरोपीय देश यांच्यामधले दक्षिण आफ्रिकेवरच्या वर्चस्वाच्या संदर्भातले संघर्ष वाढत गेले. दरम्यान युरोपीय देशांचं वसाहतीकरण वाढतच राहिलं, ब्रिटिशांनी अनेक आफ्रिकन देशांवर आक्रमण केलं. वर्चस्ववादी आणि वसाहतवादी गोऱ्या लोकांनी ठिकठिकाणी 'समृद्ध समाज' विकसित करण्याच्या नावावर गोरे लोक आणि काळे लोक यांच्यात सतत फरक केला. कित्येक शतकं युरोपीय लोकांचा वसाहतवाद लवकर संपेल याची चिन्हं अजिबातच दिसत नव्हती.

दक्षिण आफ्रिकेमधून आपापल्या देशांमध्ये वाईन, लोकर, साखर यांच्यासारख्या उत्पादनांची निर्यात करणाऱ्या युरोपीय लोकांना 1860 च्या दशकात दक्षिण आफ्रिकेविषयी विलक्षण आकर्षण वाटायला लागलं. यामागची कारणं म्हणजे; त्या सुमाराला लागलेला हिऱ्यांचा शोध आणि नंतर लागलेला सोन्याच्या खाणींचा शोध ही होती. ट्रान्सव्हाल प्रांतात सोन्याचं प्रमाण खूप जास्त आहे, असं लक्षात आल्यावर तिथल्या गोऱ्या लोकांच्या संख्येचं प्रमाण आठ पटींनी वाढलं! त्यांनी लाखो स्थानिक आफ्रिकन लोकांना सतत नव्यानं शोध लागत असलेल्या खाणींच्या संदर्भातल्या कामाला जुंपलं.

नंतरच्या काळात भारतात रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नसल्यामुळे, अनेक भारतीय लोकांना शेतकाम करणं, तसंच नोकरी करणं अशा कामांसाठी दक्षिण आफ्रिकेत नेण्यात आलं. यातले बरेच भारतीय लोक तिथेच स्थायिक झाले. त्यांनी छोटी दुकानं उघडली. त्यांच्यापैकी बरेच लोक नताल प्रांतात स्थायिक झाले, तर काही जण ट्रान्सव्हालमध्येही गेले. पण ऑरेंज फ्री स्टेट नावाच्या प्रांतानं मात्र एका विशिष्ट परवान्याशिवाय भारतीय लोकांना प्रवेश द्यायला नकार दिला. या प्रांतामध्ये राहाणारे लोक म्हणजे ब्रिटिशांच्या दक्षिण आफ्रिकेमधल्या आक्रमणानंतर ठिकठिकाणांहून पळ काढून ऑरेंज फ्री स्टेटमध्ये गेलेले मूळचे डच लोक होते. त्यांना 'बोअर (ड्रेशी)' म्हणजे डच भाषेत शेतकरी असं म्हटलं जायचं. या 'बोअर' लोकांच्या पुढच्या पिढीला 'आफ्रिकानर' या नावानं ओळखलं गेलं. या बोअर लोकांना भारतीय लोकांचा खूप द्वेष वाटे. या भारतीय लोकांचा दक्षिण आफ्रिकेला अजिबात उपयोग नसल्यामुळे त्यांना परत भारतात घालवून द्यावं, असं बोअर लोकांचं मत होतं. पण त्यात त्यांना अपयश आल्यामुळे भारतीय लोकांसाठी 'आशियाई लोक' अशी नवी जमात तयार करण्यात आली.

हिरे, सोनं आणि इतर खनिजं यांच्या उद्योगांवर आपलं संपूर्ण नियंत्रण निर्माण करण्यासाठी ब्रिटिशांनी अनेक युक्त्या योजल्या. उदाहरणार्थ, हे सगळे उद्योग नीटपणे चालवायचे असतील आणि त्यातून मोठा फायदा कमवायचा असेल, तर त्यासाठी आपल्याला खूप कामगार लागतील हे ब्रिटिशांना समजलं होतं. या कामगारांनी जास्त वेतनाची मागणी करू नये, यासाठी ब्रिटिशांनी वेगवेगळे प्रयत्न केले. 1870 आणि 1880 च्या दशकांमध्ये ब्रिटिशांनी अनेक प्रांत आपल्या ताब्यात घेतले. तसंच, या प्रांतांमधल्या जमिनींवर ब्रिटिशांनी कुटिल नीतीनं आपला कब्जा केला, त्यामुळे या प्रांतांमधल्या स्थानिक लोकांना ब्रिटिशांच्या कमी वेतनावर काम करण्याच्या जाचक अटी मान्य कराव्या लागल्या.

या काळात ब्रिटिश लोक आणि बोअर लोक यांच्यामधले संबंधही बिघडले. कारण ट्रान्सव्हाल प्रांतात सोन्याचा शोध लागला होता. हा प्रांत बोअर लोकांच्या ताब्यात होता. पण खाणींमधून सोनं काढणं, तसंच ते शुद्ध करणं यासंबंधीच्या उद्योगांमध्ये ब्रिटिशांनी आपलं भांडवल गुंतवलं होतं. बोअर लोकांकडे मात्र पुरेसं भांडवल उपलब्ध नव्हतं. त्यामुळे त्यांना ही गुंतवणूक करणं शक्य नव्हतं. साहजिकच, त्यांना या उद्योगातून कसला नफा मिळवणंही शक्य नव्हतं. ब्रिटिशांनी केलेल्या गुंतवणुकीमधून त्यांना मिळालेला नफा ब्रिटिशांनी युरोप आणि अमेरिका इथे गुंतवला. बोअर लोक यामुळे भडकले. कारण आपल्याइथल्या सोन्याचा फायदा ब्रिटिश लोक कमवत असल्याचं बघून, त्यांचा रागानं अर्थातच तीळपापड होत होता. त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांवर कडक कर लादायचे प्रयत्न केले. पण सोन्याच्या खाणींचे उद्योग उभे केलेल्या ब्रिटिश उद्योजकांना या प्रकाराचा खूप राग आला आणि त्यांनी बोअर लोकांच्या या प्रयत्नांना जोरदार विरोध केला. हे प्रकरण वाढून ब्रिटिश सरकारपर्यंत पोहोचलं. त्यामुळे ब्रिटिश सरकारचं बोअर लोकांच्या विरोधातलं मतही आणखी तीव्र होत गेलं.

1899 ते 1902 या काळात ब्रिटिश लोक आणि बोअर लोक यांच्यात एक युद्ध झालं. हे युद्ध प्रामुख्यानं सोन्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या हेतूनं करण्यात आलं. बोअर लोकांच्या धोरणांमुळे आपल्याला सोन्याच्या व्यापारातून मिळू शकेल, त्याहून खूप कमी नफा मिळत असल्याचं ब्रिटिशांचं मत झालं होतं. त्यामुळे 1899 सालच्या ऑक्टोबर महिन्यात ब्रिटिश लोकांनी सोन्याचं प्रमाण जास्त असलेल्या दक्षिण आफ्रिकन भागावर आक्रमण केलं. पण बोअर लोकांना ही गोष्ट सहन झाली नाही. एका आठवड्यातच बोअर लोकांच्या 'कमांडोज' या

नावानं ओळखल्या जाणाऱ्या टोळीनं ब्रिटिशांचा अंमल असलेल्या केप आणि नताल या प्रांतांवर हल्ला चढवला. बोअर सैनिकांची संख्या ब्रिटिश सैनिकांच्या संख्येच्या दुप्पट असल्यामुळे, सुरुवातीच्या काळात बोअर लोकांनी ब्रिटिशांवर आपलं वर्चस्व निर्माण केलं. ब्रिटिशांना काहीही करून बोअर लोकांवर आणि एकूणच दक्षिण आफ्रिकेवर आपलं नियंत्रण प्रस्थापित करायचं होतं. यासाठी ब्रिटिशांना 75 हजार सैनिकांचं लष्कर पुरेसं आहे, असं आधी वाटत होतं. पण प्रत्यक्षात याच्या 6 पट सैनिकांची गरज ब्रिटिशांना भासली. तसंच, या विजयासाठी आपल्याला 1 कोटी पौंडांचा खर्च येईल, असा ब्रिटिशांचा अंदाज होता. पण त्याच्या तब्बल 20 पट खर्च सोसल्यावरच 1902 सालच्या मे महिन्यात ब्रिटिशांना विजयाची आशा दिसायला लागली.

या युद्धात 22 हजार ब्रिटिश सैनिक दगावले असले, तरी खरं म्हणजे यापैकी दोन तृतीयांश जण रोगराई किंवा आजार यांमुळेच मरण पावले. बोअर सैनिकांपैकी 7000 जण दगावले. पण ब्रिटिश सैनिकांनी सर्वसामान्य लोकांच्या वस्त्यांमध्ये जाळपोळ केल्यामुळे अनेक बोअर नागरिक मोठ्या संख्येनं मृत्युमुखी पडले. ब्रिटिशांनी आपले अत्याचार कायमच ठेवले. तसंच, बोअर लोकांच्या हत्याकांडाचं प्रमाणही वाढत गेलं. शेवटी युद्धाच्या नावाखाली अशा प्रकारे सर्वसामान्य लोकांची हत्या करण्याच्या ब्रिटिश धोरणांचा ब्रिटिश संसदेनंही निषेध केला. अखेर बोअर नेत्यांच्या काही मागण्या मान्य करून हे युद्ध थांबवायचं ठरलं.

या युद्धामध्ये अनेक बोअर लोकांना ब्रिटिशांनी पकडलं. त्यांना छळछावण्यांमध्ये कोंबण्यात आलं. तिथे त्यांचे खूप हाल करण्यात आले. जवळपास 28 हजार स्त्रिया आणि मुलं या छळछावण्यांमध्ये मृत्युमुखी पडले. या युद्धामुळे आणि त्यानंतरच्या बोअर लोकांच्या छळामुळे त्यांच्यामध्ये; म्हणजेच आता 'आफ्रिकानर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकांमध्ये रागाचा डोंब उसळला. आधी म्हटल्याप्रमाणे हे आफ्रिकानर लोक म्हणजे पूर्वी युरोपमधून आलेले डच, फ्रेंच आणि जर्मन लोक यांच्या पिढ्यांमधून दक्षिण आफ्रिकेतच जन्मलेले युरोपीय वंशाचे लोक होते. तोपर्यंत ब्रिटिशांच्या सत्तेविषयी या आफ्रिकानर लोकांच्या मनात नाराजी असली, तरी त्या नाराजीचं प्रमाण तसं सौम्यच होतं. आता मात्र, या छळामुळे ही नाराजी स्फोटक बनली.

आता केप आणि नताल या प्रांतांप्रमाणेच बोअर लोकांच्या वसाहतींवर ब्रिटिशांचं नियंत्रण आलं. पण तरीही, या प्रांतांमधल्या बोअर लोकांना स्वत:चा राज्यकारभार चालवायची

परवानगी मिळेल असं ठरलं. बोअर लोकांनी डच वंशाचे लोक वगळता इतर स्थानिक गोऱ्या आफ्रिकानर लोकांना खराब वागणूक दिली असल्याचं कारण दाखवून ब्रिटिशांनी दक्षिण आफ्रिकेवर आक्रमण केलं असलं, तरी अर्थातच त्यात तथ्य नव्हतं. म्हणूनच, गोऱ्या आफ्रिकानर लोकांचे राजकीय हक्क आपल्या दृष्टीनं महत्त्वाचे आहेत, असा ब्रिटिशांनी केलेला दावा अगदी फोल होता. या हक्कांविषयी ब्रिटिशांना अजिबात कणव नव्हती. याशिवाय कृष्णवर्णीय स्थानिक आफ्रिकन लोकांचा प्रश्नही आपलं डोकं वर काढू शकतो हे ब्रिटिश लोक, तसंच बोअर लोक अशा दोघांनाही जाणवायला लागलं. कारण ब्रिटिश-बोअर युद्धात या कृष्णवर्णीय लोकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. अशा परिस्थितीत हे युद्ध संपल्यानंतरच्या काळात हे कृष्णवर्णीय लोक आपले हक्क मागणार किंवा आपल्यासाठी समान कायदे केले पाहिजेत, अशी मागणी करणार याची ब्रिटिशांना भीती वाटत होती. म्हणूनच, ब्रिटिश लोक आणि बोअर लोक यांच्यात दक्षिण आफ्रिकेमध्ये गोऱ्या लोकांचं वर्चस्व असावं, यासाठीची सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याविषयीचा अलिखित करार झाला.

दरम्यान, एका ब्रिटिश अधिकाऱ्याला दक्षिण आफ्रिकेचं शक्य तितकं ब्रिटिशीकरण करावं असं वाटत होतं, त्यामुळे त्यानं मोठ्या प्रमाणावर ब्रिटिश लोकांना दक्षिण आफ्रिकेत येऊन स्थायिक व्हायचं आमंत्रण दिलं. यामुळे ब्रिटिश संस्कृती दक्षिण आफ्रिकेत राबवता येईल आणि तिचंच वर्चस्व निर्माण करता येईल याची त्याला कल्पना होती. त्याचबरोबर बोअर लोकांपैकी डच लोकांचं वर्चस्व कमी व्हावं; यासाठी शाळा, न्यायालयं अशा सार्वजनिक ठिकाणी डच भाषेचा वापर करण्यावर ब्रिटिशांनी बंदी घातली. पण, ब्रिटिशांच्या या प्रयत्नांना फारसं यश आलं नाही.

1910 साली 'युनियन ऑफ साऊथ आफ्रिका' ही संकल्पना प्रत्यक्षात अवतरली. म्हणजेच, ब्रिटिशांनी दक्षिण आफ्रिकेचा कारभार स्थानिक लोकांकडे नावापुरता तरी सुपूर्द केला. गोरे लोक आणि इतर वर्णीय लोक यांच्यात अगदी स्पष्टपणे भेदभाव करणं, तसंच गोऱ्या लोकांचं इतर वर्णीय लोकांवर वर्चस्व असणं या मूलभूत संकल्पनांच्या आधारांवर सगळे कायदेकानून बनवण्यात आले. या कायद्यांमागची मूलभूत संकल्पना युरोपीय वंशाच्या लोकांच्या हिताची आणि स्थानिक कृष्णवर्णीय लोकांना प्रतिकूल असलेली धोरणं राबवायची ही होती. यामुळे स्थानिक आफ्रिकन लोकांच्या, स्वत:ची जमीन आणि स्वत:चे इतर मूलभूत हक्क या सगळ्यांवर

गदा आली. अर्थात, 1948 साली अधिकृत वर्णद्वेषी धोरणं अमलात येईपर्यंत हे सगळे कायदे तितक्या अधिकृत पातळीवरचे नव्हते, पण त्यात बऱ्यापैकी स्पष्टपणा होता. फक्त 1948 सालच्या कायद्यांइतका कडकपणा त्यांच्यामध्ये नव्हता. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अधिकाधिक क्रूर पावलं उचलून गोरे लोक आणि कृष्णवर्णीय लोक यांच्यामध्ये तफावत करण्यासाठीचे कायदे करण्यात आले.

विसाव्या शतकभर गोऱ्या लोकांचं प्रमाण एकूण लोकसंख्येच्या साधारण 10-20 टक्के इतकंच होतं. शतकाच्या अखेरीला तर ते 10 टक्क्यांच्या आसपासच झालं होतं. पण तरीही, दक्षिण आफ्रिकेमधल्या अर्थकारणाची बरीचशी सूत्रं या गोऱ्या अल्पसंख्यांकांच्या हातातच असत. यामागचं एक प्रमुख कारण म्हणजे हे गोरे लोक अत्यंत कडक नियम करून आणि खूप कमी वेतन देऊन कृष्णवर्णीय लोकांना कामगार म्हणून राबवून घ्यायचे. यासाठी वेगवेगळे कायदे करण्यात आले. उदाहरणार्थ, 1911 सालच्या एका कायद्यानुसार खाणींमधल्या अत्यंत निर्बुद्ध प्रकारच्या आणि धोकादायक स्वरूपाच्या कामांसाठीच कृष्णवर्णीय लोकांना राबवण्यात आलं. तिथली इतर चांगली आणि कौशल्याची गरज असलेली कामं फक्त गोऱ्या लोकांसाठी राखीव ठेवण्यात आली. याशिवाय, या कृष्णवर्णीय लोकांना ग्रामीण भागात नोकरीसाठी अर्ज दाखल करावे लागतील, त्यांच्या हातांचे ठसे सुरक्षा म्हणून उमटवून घेण्यात येतील आणि मगच त्यांना कामावर घेतलं जाईल असं ठरलं.

शेतकरी म्हणून काम करणाऱ्या स्थानिक कृष्णवर्णीय लोकांची अवस्थाही बऱ्यापैकी दयनीयच असायची. त्यांच्याकडून पूर्वीच ब्रिटिशांनी वेगवेगळ्या नावांखाली करवसुलीसाठी प्रयत्न केले होते. अशा शेतकऱ्यांकडच्या चक्क कुत्र्यांवरही कर लावला जाई! अर्थातच, जास्तीत जास्त कृष्णवर्णीय लोकांनी शेती करण्यापेक्षा अवघड परिस्थितीत, तसंच अन्यायी कायद्यांना तोंड देत खाणींमध्ये राबावं यासाठीची ही योजना होती. पण कृष्णवर्णीय शेतकरीसुद्धा या परिस्थितीचा सामना करायला तयार होते. त्यांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाचा सामना करण्यासाठी आपल्या शेतांमधून होत असलेल्या उत्पादनांमध्ये मोठी वाढ करायचे प्रयत्न केले. त्यामुळे गोऱ्या शेतकऱ्यांच्या आव्हानाचा सामना ते यशस्वीपणे करू शकत. अर्थातच, यावर मात करण्यासाठी गोऱ्या वर्चस्ववाद्यांनी नवी शक्कल लढवली. एकूण जमिनीच्या 7 टक्के जमिनीवरच कृष्णवर्णीय लोकांचा हक्क असेल, असा अन्यायी कायदा त्यांनी संमत करून

टाकला. ही जमीन अत्यंत निकृष्ट दर्जाची असेल, याची दक्षिण आफ्रिकन सरकारनं अर्थातच काळजी घेतली. त्यामुळे वाढत्या कृष्णवर्णीय समाजाच्या गरजा भागवणं स्थानिक कृष्णवर्णीय शेतकऱ्यांना शक्य होईनासं झालं. त्यातच या नापीक जमिनीवर शक्य तितकी शेती करत राहिल्यामुळे तिचा कस गेला. कर, तसंच इतर बाबतींमधल्या अत्यंत विचित्र नियमांना तोंड द्यायची पाळी आल्यामुळे कृष्णवर्णीय लोकांच्या हालांमध्ये आणखी भर पडत गेली. त्यामुळे बऱ्याच कृष्णवर्णीय लोकांसमोर गोऱ्या लोकांची मालकी असलेली शेतं, कारखाने, खाणी अशा ठिकाणी मजुरी करण्यावाचून दुसरा पर्यायच शिल्लक राहिला नाही.

गोऱ्या लोकांच्या उद्योगांमध्ये काम करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर कृष्णवर्णीय लोकांची गरज पडत असल्यामुळे, शहरांमधलं कृष्णवर्णीय लोकांचं प्रमाण वाढत गेलं. अर्थातच, गोऱ्या वर्चस्ववाद्यांना ही गोष्ट सहन होणं शक्यच नव्हतं. त्यामुळे कृष्णवर्णीय लोकांनी शहरांमध्ये ठरावीक ठिकाणीच राहावं, यासाठी बकाल वस्त्या निर्माण करण्यात आल्या. कृष्णवर्णीय लोकांना या वस्त्यांमध्येच खोपट्यांवजा घरांमध्ये राहावं लागे. तसंच, खूप जास्त कृष्णवर्णीय लोकांनी शहरांमध्ये गर्दी करू नये, यासाठी गोऱ्या लोकांच्या सेवेसाठी आणि त्यांच्या उद्योगांमध्ये काम करण्यासाठी जेवढे कृष्णवर्णीय लोक लागतील, तेवढ्याच कृष्णवर्णीयांना शहरांमध्ये यायची परवानगी मिळावी यासाठीची धोरणं आखण्यात आली.

अर्थातच, या सगळ्या धोरणांचा स्थानिक कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांवर भीषण परिणाम झाला. त्यांना कायमस्वरूपी आणि खात्रीचा असा रोजगार उपलब्ध होईनासा झाला. सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी तात्पुरत्या नोकरीच्या शोधात त्यांना वणवण हिंडावं लागे. सतत अनिश्चित वातावरणाचा सामना करणं, अन्यायी वागणुकीला विनातक्रार तोंड देणं, मिळेल तो रोजगार निमूटपणे स्वीकारून आपलं आणि आपल्या कुटुंबाचं पोट भरायचा प्रयत्न करणं अशा चक्रामध्ये हे लोक फिरत राहायचे. अर्थात, त्यातही काही धोरणी आफ्रिकन लोक आपल्या विरोधातल्या अन्यायाशी लढण्यासाठी प्रयत्न करत राहायचे. त्यासाठी 1912 साली काही जणांनी एकत्र येऊन 'साऊथ आफ्रिकन नेटिव्ह नॅशनल काँग्रेस' या संघटनेची स्थापना केली. 1923 साली या संघटनेचं नव्यानं 'आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (एएनसी)' असं बारसं करण्यात आलं. या संघटनेच्या स्थापनेच्या वेळी त्यातल्या त्यात सुशिक्षित असलेले शेकडो कृष्णवर्णीय आफ्रिकन लोक एकत्र आले होते. अमेरिकेमधल्या कृष्णवर्णीय लोकांवरच्या

अन्यायाच्या विरोधात लढणाऱ्या बुकर टी वॉशिंग्टन या प्रसिद्ध नेत्याकडून प्रेरणा घेतलेल्या आणि अमेरिकेमध्ये शिकलेल्या एका नेत्याचाही यात समावेश होता. चळवळीला योग्य दिशा देण्यासाठी अमेरिकेमधल्या कृष्णवर्णीयांच्या गुलामगिरीच्या विरोधातल्या चळवळीकडे आपण आपला आदर्श म्हणून बघितलं पाहिजे, याची जाणीव या नेत्याला होती.

या आफ्रिकन नेत्यांचा अनधिकृत ब्रिटिश राजवटीला संपूर्ण विरोध नव्हता. ब्रिटिशांच्या सत्तेमुळे दक्षिण आफ्रिकेमध्ये अनेक चांगल्या गोष्टी घडल्या आहेत असं ते मानायचे. पण त्याचबरोबर आपल्याच देशात कृष्णवर्णीय लोकांना गोऱ्या लोकांच्या तुलनेत खूप कमी संधी उपलब्ध आहेत, या गोष्टीचा त्यांना संताप येई. सगळ्या वर्णांच्या लोकांना समान संधी उपलब्ध असाव्यात, असं त्यांचं म्हणणं होतं. यासाठी ब्रिटिशांशी चर्चा करून मार्ग काढला पाहिजे, असं एएनसीची पाळंमुळं रचणाऱ्या संस्थापक नेत्यांचं म्हणणं होतं. पण नुसतीच चर्चा करून काही निष्पन्न होणार नाही, असं इतर जणांचं मत असल्यामुळे हे इतर लोक वेगवेगळ्या मार्गांनी आपला निषेध व्यक्त करत असत. यातून काही महत्त्वाच्या घटनाही घडत.

उदाहरणार्थ, 1913 साली कृष्णवर्णीय आफ्रिकन महिलांनी कुठेही जाताना आपल्याबरोबर त्या ठिकाणी प्रवेश आहे का नाही हे ठरवणारे कागदी परवाने नेले पाहिजेत, असा नियम सरकारनं केला. तोपर्यंत फक्त कृष्णवर्णीय आफ्रिकन पुरुषांच्या बाबतीतच ही सक्ती केली जात असे. कृष्णवर्णीय आफ्रिकन महिलांना मात्र हा नियम अजिबात मान्य नव्हता. त्यामुळे त्यांनी या नियमाचा निषेध करण्यासाठी ठिकठिकाणी पोलीस स्थानकांमध्ये घुसून आपल्याला देण्यात आलेले परवाने फाडून टाकले; तसंच आपल्याला अटक करण्यात यावी अशी मागणीही केली. एके ठिकाणी तर एका मोर्च्याचं नेतृत्व करणाऱ्या महिलेनं स्वत:ला इंग्लंडचा राष्ट्रध्वज असलेल्या 'युनियन जॅक'मध्ये गुंडाळून घेतलं. तिला अटक करण्यासाठी येत असलेल्या पोलिसांना दगड, काठ्या आणि चक्क चावे या मार्गांनी इतर महिलांनी रोखलं. शेवटी अशा प्रकारच्या अनेक निदर्शनांपुढे हार मानून दक्षिण आफ्रिकन सरकारनं महिलांना परवाना बाळगण्याची सक्ती करायचा कायदा पुढची 40 वर्षं रद्द करून टाकला.

ए.एन.सी. झेंडा

दरम्यान, पहिल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर वस्तूंच्या तुडवड्यामुळे महागाई खूप वाढली. साहजिकच, सर्वसामान्य लोकांचे पगार वाढवणं दक्षिण आफ्रिकन सरकारला भाग होतं. पण ते तंगीमुळे शक्यही होत नव्हतं. यामुळे कृष्णवर्णीय लोकांचे हाल अजूनच वाढले. 1918 साली एएनसीनं ब्रिटिश राजघराण्याला साकडं घालून आपल्या देशातल्या कृष्णवर्णीय लोकांवर होत असलेल्या अत्याचारांच्या संदर्भात लक्ष घालायची विनंती केली. पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांच्या वतीनं एकूण 17 हजार कृष्णवर्णीय सैनिकांनी लढा दिला असल्याची आणि आणखी 25 हजार कृष्णवर्णीय लोकांनी ब्रिटिशांना मदत केल्याची पुस्तीही या अर्जाला जोडण्यात आली होती. पण हा दक्षिण आफ्रिकेचा अंतर्गत मामला असल्याचं सांगून ब्रिटिशांनी या भानगडीत आपण पडणार नसल्याचं जाहीर केलं.

यामुळे नाराज होऊन कृष्णवर्णीय लोकांनी वेगवेगळ्या मार्गांनी चळवळ करून आपली गाऱ्हाणी सरकारपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. 1918 साली सफाई कामगारांनी संप पुकारला. असाच प्रकार 1920 सालच्या खाण कामगारांच्या बाबतीत घडला. एकंदर 70 हजार कामगार या काळात संपावर गेले. पोलीस आणि सैनिक यांनी बंदुकीच्या नळीच्या धाकावर त्यांना कामावर परतायला भाग पाडलं, तसंच काही जणांनी त्याला नकार दिल्यावर 11 जणांना गोळ्या घालून ठार मारण्यात आलं. रशियामध्ये साम्यवादाच्या वाढत्या प्रभावामुळे कामगार चळवळी अधिक मजबूत होत असताना, त्याच धर्तीवरच्या चळवळी दक्षिण आफ्रिकेत सुरु होत असल्याची भीती भांडवलदार आणि उद्योजक मंडळींच्या मनात निर्माण झाली. या काळात दक्षिण आफ्रिकेचा पंतप्रधान असलेला जॅन स्मट्स यानं गरज पडेल तेव्हा कृष्णवर्णीय

चळवळीच्या विरोधात ताकद वापरायला पुढेमागे पाहिलं नाही. 1921 साली अशाच एका निदर्शनामध्ये पोलिसांनी गोळीबार करून फक्त दहा मिनिटांच्या काळात महिला आणि लहान मुलं यांच्यासकट 190 जणांना ठार केलं. अशा अनेक घटना घडल्या. 1920 च्या दशकात कृष्णवर्णीय लोकांच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या चळवळींमध्ये वाढ झाली. अनेक नव्या संघटना निघायला लागल्या.

आता ठरावीक भागांमध्येच राहायची आणि ये-जा करायची कृष्णवर्णीय लोकांना परवानगी असे. त्यासाठी त्यांना परवाने दिले जात. या नियमांचा त्यांनी भंग केला, तर त्यांना कडक शिक्षा केली जाई. साहजिकच, कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली. त्यांनी या नियमांविरुद्ध निदर्शनं करायचं ठरवलं. तसंच, संघटितपणे या अन्यायी कायद्यांविरुद्ध लढण्यासाठी कृष्णवर्णीय लोकांनी आपल्या संघटना बनवल्या. त्यातून कृष्णवर्णीयांच्या चळवळी उभ्या राहायची चिन्हं दिसायला लागली. साहजिकच, या चळवळींना मोडून काढण्यासाठी 1924 साली गोऱ्या लोकांनी आणखी कडक कायदे केले. त्यानुसार कुठल्याही कामगार संघटनेमध्ये कृष्णवर्णीय लोकांना सहभागी होता येणार नाही, असं सरकारनं जाहीर केलं. आपोआपच कृष्णवर्णीय लोकांना संघटित होणं अशक्य झालं. तसंच, फक्त खराब दर्जाची कामं करणं आणि त्याच प्रकारच्या आयुष्यात अडकून राहाणं एवढंच त्यांच्या हातात शिल्लक राहिलं.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकन सरकारचा वर्णद्वेषही वाढत गेला. याच सुमाराला जर्मनीमध्ये ॲडॉल्फ हिटलरच्या नाझी पक्षाचं सरकार आलं. अर्थातच, हिटलरनं ज्यू लोकांच्या विरोधात प्रचंड वर्णद्वेषी धोरणं अमलात आणली. या धोरणांचा दक्षिण आफ्रिकेमधल्या गोऱ्या वर्णद्वेषी सरकारवर खूप परिणाम झाला. आपल्या धर्तीची धोरणं आंतरराष्ट्रीय पातळीवर कुणीतरी अवलंबत असल्यामुळे दक्षिण आफ्रिकन सरकारला एक प्रकारचा आधारच वाटायला लागला. याच धर्तीवर दक्षिण आफ्रिकेत डॅनिएल मलान या अत्यंत टोकाच्या वर्णद्वेषी नेत्यानं 'पवित्र लोकांचा राष्ट्रीय पातळीवरचा पक्ष' अशा स्वरूपाचं नाव असलेल्या पक्षाची स्थापना केली. नंतर त्याचं नाव 'नॅशनल पार्टी' असं ठेवण्यात आलं. तसंच, दक्षिण आफ्रिकेतल्या साम्यवादाला विरोध करण्यासाठी हिटलरच्या संकल्पनांवर आधारित असलेल्या संघटनाही निघाल्या.

यानंतर दुसऱ्या महायुद्धातल्या दक्षिण आफ्रिकेच्या सहभागामुळे तिच्या अर्थकारणावर

1940 ते 1946 या काळात बरेच परिणाम झाले. युद्धकाळात लागणाऱ्या यंत्रसामग्रीच्या निर्मितीसाठी अनेक उद्योग सुरु झाले. तसंच, या उद्योगांमध्ये काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या तयार झाल्या. कृष्णवर्णीय लोक आणि गोरे लोक अशा दोन्ही वर्णांच्या लोकांना कामं मिळाली. पण त्यातून या दोन प्रकारच्या लोकांमध्ये नोकऱ्या मिळवण्यासाठी एक प्रकारची स्पर्धा सुरु झाली. कामाच्या शोधात सुमारे 10 लाख नागरिकांनी शहरांमध्ये स्थलांतर केलं. पण कृष्णवर्णीय लोकांना ठरावीक ठिकाणांमध्येच प्रवेश करायची, तसंच वावरायची परवानगी असल्यामुळे, यातून कायदा आणि सुव्यवस्था यांचे नवे प्रश्न निर्माण झाले. या लोकांसाठी शहरांमध्ये राहाण्यासाठी स्वतंत्र विभाग तयार करण्यात आले. त्यांना गोऱ्या लोकांच्या भागांमध्ये फिरकायचीसुद्धा परवानगी नसे. तरीही, युद्धकाळात पोलिसांवर मुळातच खूप तणाव असल्यामुळे कृष्णवर्णीय लोकांवर घातलेल्या या निर्बंधांवर सूट देण्यात आली. पण कृष्णवर्णीय लोकांच्या संख्येत सतत भर पडत गेल्यामुळे त्यांच्यासाठी राहण्याची नवी व्यवस्था करणं भाग होतं. त्यामुळे कृष्णवर्णीय लोकांच्या झोपडपट्टीवजा अनेक बकाल छोट्या वस्त्या ठिकठिकाणी उभ्या राहिल्या. अशा ठिकाणी पाणीपुरवठा आणि इतर सोयी अगदी बेताच्या असायच्या, तसंच तिथे स्वच्छतागृहंसुद्धा नसायची. नोकऱ्यांच्या उपलब्धतेमुळे या वस्त्या प्रामुख्यानं औद्योगिक केंद्रांच्या आसपास असायच्या. अशीच नंतर प्रसिद्ध झालेली 'सुवेटो' नावाची एक वस्ती होती. जवळपास 20 हजार लोकांची ही वस्ती जोहान्सबर्गजवळच्या ऑरलँडो प्रांतात उभी राहिली.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कृष्णवर्णीय लोकांच्या हक्कांसाठी झगडणाऱ्या एएनसीचं नेतृत्व आल्फ्रेड झुमा (1893-1962) याच्याकडे आलं. त्यानं वैद्यकशास्त्राचा अभ्यास पूर्ण केला होता. भारतामधल्या काँग्रेस पक्षासारख्या समविचारी पक्षांची आणि संघटनांची मदत घेऊन एएनसीनं आपला लढा पुढे न्यावा असं झुमाचं मत होतं. तसंच, सरकारनं देशाच्या राज्यघटनेमध्ये बदल करण्यासंबंधीची चळवळ करण्यापुरतेच एएनसीनं आपले प्रयत्न न करता, पूर्णपणे असहकाराचं धोरण अवलंबून सरकारला नमवायचे प्रयत्न केले पाहिजेत, असं झुमाला वाटत होतं. इतर देशांमध्ये समान नागरी हक्कांसाठी सुरु असलेल्या चळवळींबरोबर एएनसीनं आपली चळवळ जोडावी, असाही झुमाचा आग्रह होता. याच सुमाराला 1943 साली नेल्सन मंडेला, वॉल्टर सिसुलू, तसंच इतर काही तरुण नेत्यांनी एएनसीच्या तरुण संघटनेच्या निर्मितीचा

बेत रचला. त्यातून 'एएनसी यूथ लीग'ची निर्मिती झाली.

कृष्णवर्णीय कामगार संघटनांनी मोठमोठे संप पुकारणं सुरूच ठेवलं आणि पोलिसांनी ते मोठ्या प्रमाणावर मोडून काढण्यातही कसूर केली नाही. दक्षिण आफ्रिकेचा वर्णद्वेष इतक्या टोकाचा होता, की दुसऱ्या महायुद्धात युरोपमध्ये बंदिवान करण्यात आलेले आणि तिथून दक्षिण आफ्रिकेमध्ये आणण्यात आलेले युद्धकैदीसुद्धा स्थानिक कृष्णवर्णीय लोकांहून जास्त चांगल्या परिस्थितीत असायचे!

सुवेटो

1948 सालच्या निवडणुकांपूर्वी 'नॅशनल पार्टी' या पक्षानं तर अगदी उघडपणे आपल्या जाहीरनाम्यातच वर्णद्वेषी धोरणांचा उल्लेख केला. यासंबंधीची विधानं 'आपल्यासमोर दोन परस्परविरोधी मार्ग उपलब्ध आहेत... एक तर आपण सगळ्या वर्णांच्या लोकांना एकत्र यायची परवानगी देऊ शकतो किंवा वेगवेगळ्या वर्णांच्या लोकांना वेगवेगळं ठेवायचा निर्णय घेऊ शकतो... जर आपण सगळ्या धर्मांच्या लोकांना एकत्र यायची परवानगी दिली, तर गोऱ्या वर्णाच्या लोकांसाठी ही एक प्रकारची आत्महत्याच ठरेल... पण जर आपण वेगवेगळ्या वर्णांच्या लोकांमध्ये फरक केला आणि त्यांना आपापलं आयुष्य स्वतंत्रपणे जगायची परवानगी

दिली, तर वेगवेगळ्या वर्णांच्या लोकांना आपली वैशिष्ट्यं जपता येतील आणि त्यावर इतरांचं जबरदस्तीनं होणारं आक्रमण रोखता येईल... दक्षिण आफ्रिकन सरकारपुढच्या सगळ्यात महत्त्वाच्या मुद्यांपैकी एक म्हणजे गोऱ्या, तसंच गौरेतर नागरिकांच्या भल्यासाठी काम करण्याचा आहे... त्यासाठी गोऱ्या लोकांची काळजी घेणं आणि त्यांच्या हितासाठी पावलं उचलणं अत्यावश्यक आहे...' अशी होती. आपल्या प्रचारामध्ये या पक्षानं 'काळा धोका मिटवा', 'निग्रो लोकांना त्यांचं दुय्यम स्थान दाखवून द्या', 'भारतीय हमालांना देशातून हाकलून द्या' अशी भडक विधानं केली होती.

यातून वर्णद्वेषानं नव्या पातळ्या गाठल्या. भिन्नवर्णीय लोकांनी एकमेकांशी लग्न करायचं नाही असा कायदा निघाला. याशिवाय भारतीय लोकांना तर नॅशनल पार्टीनं 'परकीय लोक' ठरवून त्यांना आपल्या समाजात स्थान देता येणार नाही असा निर्णय घेतला. त्यामुळे शक्य तितक्या भारतीय लोकांना भारतात परत पाठवून द्यायचं ठरलं. या सगळ्या वर्णद्वेषी धोरणांच्या प्रचाराच्या आधारे नॅशनल पार्टीनं पुढची निवडणूक लढवली. 28 मे 1948 या दिवशी नॅशनल पार्टीनं आपल्या सहकारी पक्षाच्या साथीनं निवडणुकांमध्ये 79 जागा जिंकून आपल्या विरोधातल्या आणि सत्ताधारी 'युनायटेड पार्टी' आणि तिच्या सहकारी पक्षांना 65 जागांवर समाधान मानायला लावलं. नॅशनल पार्टीनं डी. एफ. मलान या कट्टर नेत्याच्या नेतृत्वाखाली पुढचं सरकार स्थापन केलं. सत्तेवर येताच आपण गोऱ्या लोकांच्या हक्कांसाठी सगळे प्रयत्न करणार असल्याची मलाननं ग्वाही दिली.

मलान

1939 सालापासून सत्ताधारी असलेला युनायटेड पार्टी हा पक्ष दुसऱ्या महायुद्धाच्या गोंधळात अडकला होता. निवडणूक हरल्यामुळे आता तो विरोधी पक्ष बनला. स्मट्सच्या नेतृत्वाखाली 1943 साली या पक्षानं निवडणुकांमध्ये विजय मिळवला होता, पण लवकरच या पक्षामध्ये दुफळी माजली. वर्णाविषयीची या पक्षाची धोरणं नक्की कशी आहेत, याविषयी नीटपणे काहीच सांगितलं जात नसल्याच्या निषेधार्थ काही खासदारांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला. यानंतर झालेल्या अनेक पोटनिवडणुकांमध्ये युनायटेड पार्टीला पराभवाचा सामना करावा लागला. पण तरीही, आपल्याकडून कुणीच सत्ता हिसकावून घेणं शक्य नाही, अशा समजामध्ये मशगूल राहिलेल्या युनायटेड पार्टीला 1948 साली हा मोठा धक्का सहन करावा लागला.

पूर्वी बोअर युद्धात ब्रिटिशांनी स्थानिक आफ्रिकानर लोकांवर इतके अत्याचार केलेले असताना, आपण त्यांच्या बाजूनं का लढायचं, असा प्रश्न अनेक स्थानिक गोरे लोक पहिल्या महायुद्धाच्या वेळीच विचारायचे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तर अनेक स्थानिक गोऱ्या लोकांनी परिणामांचा विचार न करता ब्रिटिशांच्या वतीनं लढायला नकार दिला. युनायटेड पार्टी मात्र, ब्रिटिशांच्या वतीनं दक्षिण आफ्रिकेनं लढलंच पाहिजे, अशा तऱ्हेचा प्रचार करत होती. पण गोऱ्या लोकांनी ब्रिटिशांचा दबाव झुगारून देऊन आपल्या हक्कांसाठी लढलं पाहिजे, असं

नॅशनल पार्टी म्हणत होती. साहजिकच, लोकांच्या मनात युनायटेड पार्टीच्या विरोधात चीड निर्माण होत गेली. त्यामुळे नॅशनल पार्टीचं पारडं 1948 सालच्या निवडणुकांमध्ये जड होत गेलं.

आता 1948 साली दक्षिण आफ्रिकेमधल्या वर्णद्वेषी म्हणजेच 'अपार्थाईड (अर्रीींहशळव)' धोरणांचा जन्म झाला. या शब्दाचा अर्थ गोऱ्या लोकांची आफ्रिकान्स भाषा, तसंच त्यांची मूळ भाषा म्हणजेच डच भाषा या भाषांमध्ये 'भेदभाव' असा केला जातो. खरं म्हणजे 1930 च्या दशकामध्ये 'अपार्थाईड' या शब्दाची निर्मिती चांगल्या अर्थानं झाली होती. स्थानिक गोऱ्या लोकांच्या संस्कृतीचं दक्षिण आफ्रिकेमध्ये बाहेरून आलेल्या ब्रिटिश लोकांच्या तुलनेत असलेलं वेगळेपण ठळकपणे दाखवण्यासाठी हा शब्द वापरला जाई. पण कालांतरानं या शब्दाला गोरे लोक आणि कृष्णवर्णीय लोक यांना जबरदस्तीनं वेगळे ठेवण्याच्या, तसंच कृष्णवर्णीय लोकांना दुय्यम वागणूक देण्याच्या अर्थानं वापरलं जायला लागलं. 1948 साली 'नॅशनल पार्टी' या पक्षाच्या सरकारनं दक्षिण आफ्रिकेमध्ये लोकांना त्यांच्या वर्णानुसार वेगळं करायची धोरणं अवलंबली. त्यानुसार लोक कुठे राहाणार, कुठल्या शाळांमध्ये शिकणार, कुठे कामाला जाणार आणि अगदी कुठे मरण पावणार यातसुद्धा फरक करण्यात येईल असं ठरलं. या वर्णद्वेषी धोरणांना 'अपार्थाईड' धोरणांवर आधारित असलेली समाजरचना, असं नाव देण्यात आलं. 1994 साली नॅशनल पार्टी या पक्षाचं सरकार सत्तेवरून दूर होईपर्यंत ही वर्णद्वेषी धोरणं टिकली.

वर्णद्वेषी धोरणं अमलात आणायची, हे तर नॅशनल पार्टीनं ठरवलं होतं, पण त्यांची अंमलबजावणी प्रत्यक्षात नक्की कशी करायची, याविषयी जरा संभ्रमाचं वातावरण होतं. देशाची आर्थिक प्रगती न रोखता वर्णद्वेषी धोरणं अमलात आणायची असा हा दुहेरी डाव होता. त्यासाठी पुढची चार दशकं नॅशनल पार्टीच्या एकापाठोपाठ एका सरकारनं आपापल्या परीनं वर्णद्वेषी धोरणं राबवायचे खूप प्रयत्न केले. दरम्यान पूर्वी दक्षिण आफ्रिकेचा पंतप्रधान असलेला स्मट्स आता विरोधी पक्षाचा नेता होता. या विरोधी पक्षालाही वर्णद्वेषी धोरणं मान्य असली, तरी अशी धोरणं अमलात आणून आपलं सरकार फार काळ टिकेल, असं वाटत नसल्यामुळे या पक्षानं आपल्या धोरणांमध्ये वर्णद्वेषाऐवजी वेगवेगळ्या वर्णांच्या लोकांना एकत्र येता येईल, अशा प्रकारची भूमिका मांडली होती. पण आपल्या अशा भूमिकेचं स्वागत लोकांनी करायच्या ऐवजी नॅशनल पार्टीच्या अत्यंत टोकाच्या वर्णद्वेषी भूमिकेला मतदारांनी पाठिंबा दिल्यामुळे स्मट्स थक्कच झाला होता. असा टोकाचा वर्णद्वेष प्रचारासाठी ठीक असला, तरी त्यात

मांडण्यात आलेली धोरणं प्रत्यक्षात अमलात आणणं जवळपास अशक्य असल्याचं स्मट्सचं म्हणणं होतं.

गोऱ्या लोकांचं वर्चस्व निर्विवादपणे अमलात आणण्यासाठी आणि कृष्णवर्णीय, तसंच इतर मिश्र किंवा भारतीय यांच्यासारख्या लोकांनी या वर्चस्वाला विरोध करू नये, यासाठी 1952 साली परवाना पद्धत लागू करण्यात आली. यामुळे देशाच्या प्रत्येक नागरिकाची नोंदणी करून, त्याला त्याच्या वर्णानुसार परवाना देण्यात आला. गोऱ्या लोकांच्या वस्तीमध्ये किंवा त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या सोयींच्या ठिकाणी इतर वर्णांच्या लोकांना प्रवेश करायचा असेल, तर त्यासाठी त्यांना आपल्याकडचा परवाना आधी सादर करावा लागे. तसंच, गोऱ्या लोकांच्या भागांमध्ये या इतर लोकांना 72 तासांच्यावर राहायची परवानगी नसे. फक्त गोऱ्या लोकांनी अशा इतर वर्णांच्या लोकांना नोकरीवर ठेवलं असेल, तरच या इतर वर्णांच्या लोकांना गोऱ्या लोकांच्या भागांमध्ये 72 तासांहून जास्त काळ थांबता येई. हा परवाना सतत जवळ बाळगावा लागे. तो नसेल, तर त्या माणसावर गुन्हा दाखल करायची पोलिसांना परवानगी असे.

प्रत्येक नागरिक कुठल्या वर्णाचा आहे, याविषयीची माहिती गोळा करून आणि कुठल्याही क्षणी कुणाविषयीही ही माहिती मिळवायची सोय करून, दक्षिण आफ्रिकन सरकारनं वर्णद्वेषी धोरणांच्या अंमलबजावणीची पाळंमुळं घातली. आता वेगवेगळी वर्णद्वेषी धोरणं राबवणं फार कठीण नव्हतं. अगदी खासगी गोष्टींपासून ते सार्वजनिकरीत्या गोऱ्या लोकांनाच लाभदायी ठरतील, अशा प्रकारचे निर्णय घेऊन सरकारनं आपला वर्णद्वेष जाहीर केला. पूर्वीपासून दोन वेगवेगळ्या वर्णांच्या लोकांना एकमेकांशी लग्न करायची परवानगी नसायचीच, पण आता तर त्यांना एकमेकांशी शारीरिक संबंध ठेवायचीही परवानगी नव्हती. असं करणं म्हणजे गुन्हा ठरेल, असं जाहीर करण्यात आलं. इथपासून ते देशातल्या कुठल्या भागात कुठल्या वर्णांचे लोक जाऊ शकतात, घर किंवा इतर मालमत्ता खरेदी करू शकतात, नोकरी करू शकतात, इतर सोयी-सुविधांचा लाभ घेऊ शकतात अशा सगळ्या प्रकारच्या गोष्टींमध्ये वर्णद्वेषी धोरणांची अंमलबजावणी करण्यात आली. सरकारला कुणाचीही मालमत्ता हिसकावून घ्यायचे अधिकार देण्यात आले.

दक्षिण आफ्रिकेनं 1910 साली आपलं स्वतंत्र अस्तित्व निर्माण केल्यापासूनच मालमत्ता आपल्या नावावर नसलेल्या कृष्णवर्णीय लोकांना मतदानाचे अधिकार नव्हते. 1936 साली

मालमत्ता असलेल्या कृष्णवर्णीय लोकांकडूनही हे हक्क काढून घेण्यात आले होते. 1951 साली कृष्णवर्णीय लोकांना कुठलीही मालमत्ता बाळगायचेच अधिकार नाहीत, अशा अर्थाचा कायदा करून, तो शहरांमध्ये राबवून घेण्यासाठी; आवश्यक असलेले कृष्णवर्णीय लोक सोडून इतर सगळ्या कृष्णवर्णीय लोकांची हकालपट्टी ग्रामीण भागांमध्ये करायचं ठरलं. कृष्णवर्णीय लोकांनी आपल्याशी संबंधित असलेले अंतर्गत वादविवाद सोडवण्यासाठी, तसंच आपल्या समस्या सोडवण्यासाठी पूर्वीपासून उभ्या केलेल्या व्यवस्था मोडीत काढण्यात आल्या.

अभ्यासकांनी वर्णद्वेषी धोरणांपैकी सगळ्यात घातक म्हणून वर्णन केलेली धोरणं शिक्षण क्षेत्राच्या संदर्भातली होती. गोऱ्या लोकांच्या मुलांना उच्च दर्जाचं शिक्षण मिळेल आणि इतर वर्णांच्या लोकांच्या मुलांना दुय्यम दर्जाचं शिक्षण मिळेल, यासाठीची व्यवस्था करण्यात आली. विशेषत: कृष्णवर्णीय मुलांना तर अगदीच साधारण दर्जाचं शिक्षण मिळेल, याकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन कायदे करण्यात आले. पूर्वी सरकारी मदतीच्या आधारावर चालणाऱ्या 'मिशन शाळा' कृष्णवर्णीय मुलांना शिकवत असत. आता अशा बहुतेक शाळांना कुलूप ठोकण्यात आलं. कृष्णवर्णीय मुलांसाठी नव्या शाळा आणि नवी महाविद्यालयं स्थापन करण्यात आली. त्यांचा दर्जा अर्थातच अत्यंत सुमार असेल, यासाठीची खबरदारी घेतली गेली. आपण दुय्यम दर्जाचे आहोत आणि आपल्याला गोऱ्या लोकांचा दर्जा गाठण्याचं स्वप्नसुद्धा बघून चालणार नाही, अशा अर्थाच्या गोष्टी या शिक्षणातून मुलामुलींवर सतत बिंबवण्यात आल्या. त्यामुळे आपल्या नशिबात अगदी ठरावीक प्रकारच्याच नोकऱ्या आहेत, हे या मुलामुलींच्या मनावर ठसायचं. त्या दृष्टीनंच आपलं शिक्षण झालं पाहिजे, असं साहजिकच ते स्वत:ला सांगत राहायचे. कुठलाही वेगळा विचार करायची किंवा खुराड्यासारख्या मर्यादित असलेल्या आपल्या संधींच्या परिघापलीकडच्या आशा बाळगायची त्यांना आशाच नसे.

कृष्णवर्णीय मुलांना अर्थातच चुकीचा इतिहास शिकवला जाई. गोऱ्या लोकांचा इतिहास कसा उज्ज्वल होता, तेच कृष्णवर्णीय लोकांपेक्षा उच्च दर्जाचे कसे आहेत, अशा अनेक गोष्टींचा भडिमार यातून केला जाई. स्थानिक कृष्णवर्णीय आफ्रिकन टोळ्यांचे पराभव, आफ्रिकन लोक चोर किंवा लुच्चे-लफंगे असतात असं मनावर बिंबवणारी उदाहरणं, वेगवेगळ्या काल्पनिक प्रसंगांमधून कृष्णवर्णीय लोकांना अजिबातच अक्कल नसते किंवा ते अत्यंत क्रूर असतात असं ठसवणं, सगळी हास्यास्पद पात्रं म्हणजे कृष्णवर्णीय लोकच असणं, अशा वेगवेगळ्या

मार्गांनी कृष्णवर्णीय मुला-मुलींवर त्यांची तथाकथित निर्बुद्धता, तसंच त्यांची हतबलता या गोष्टी ठसवल्या जात. 'डच रिफॉर्म्ड चर्च'नंही सरकारच्या या वर्णद्वेषी धोरणांना आपला पाठिंबा दिला, तसंच देवानंच माणसांना वेगवेगळ्या वर्णांमध्ये, भाषांमध्ये, देशांमध्ये विभागलं असल्याचा दावा केला. त्याचबरोबर उच्च वर्णाच्या लोकांनी इतर वर्णांच्या लोकांवर राज्य करावं आणि आपल्या उच्च वर्णातून मिळालेल्या शिकवणी त्यांना द्याव्यात असंही चर्चचं म्हणणं होतं. म्हणजेच, चांगल्या शब्दांमध्ये या चर्चनं वर्णद्वेषाला पाठिंबाच दिला होता!

अर्थातच, आपल्या आयुष्यावर इतक्या प्रकारचे भयानक प्रतिबंध घातल्याचं बघूनसुद्धा गप्प राहाणं कृष्णवर्णीय आणि मिश्रवर्णीय लोकांना शक्यच नव्हतं. त्यामुळे त्यांनी या अन्यायांविरुद्ध अनेकदा वेगवेगळ्या प्रकारे चळवळी करून पाहिल्या. दर वेळी बळाचा वापर करून सरकार या चळवळी मोडून काढे. सरकारनं पोलिसांना या संदर्भात नवनवे हक्क दिले. तरीही सरकारविरोधी चळवळी सुरूच राहिल्यावर शेवटी सरकारनं पोलिसांना कुठल्याही माणसाला कोणत्याही कारणाविना अटक करण्याचे अधिकार देऊन टाकले!

1953 आणि 1958 या दोन्ही वेळच्या निवडणुका अधिकाधिक मताधिक्यानं जिंकून नॅशनल पार्टीनं आपली पाळंमुळं आणखी भक्कम रुजवली. दक्षिण आफ्रिकेमध्ये वर्णद्वेष आणखीनच फोफावत गेला, पण या दरम्यान ब्रिटिश कॉमनवेल्थचा भाग असलेल्या; म्हणजेच पूर्वी ब्रिटिशांच्या पारतंत्र्याखाली असलेल्या आणि ब्रिटिश राणीला मानणाऱ्या अनेक आफ्रिकन, तसंच आशियाई देशांनी आता स्वातंत्र्य मिळवलं होतं. असे अनेक देश दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषाचा निषेध करायचे. याला वैतागून आपण या ब्रिटिश कॉमनवेल्थमधूनच बाहेर पडावं, असा विचार नॅशनल पार्टीनं केला आणि त्यासाठी मतदान घेऊन हे विधेयक संमत करून टाकलं. त्यामुळे आता दक्षिण आफ्रिका हा देश ब्रिटिश राणीला मानणारा कॉमनवेल्थ देश न राहाता तो प्रजासत्ताक म्हणजेच 'रिपब्लिक' झाला.

कृष्णवर्णीयांवरच्या हल्ल्याची बातमी

तरीही, अनेक आशियाई, तसंच आफ्रिकन देशांनी दक्षिण आफ्रिकेमधल्या अन्यायी, वर्णद्वेषी धोरणांचा वारंवार निषेध केला. 1960 आणि 1970 च्या दशकांमध्ये या निषेधांची धार वाढली. याचं कारण म्हणजे दक्षिण आफ्रिकेतल्या वर्णद्वेषानं आता नवं टोकच गाठलं. क्रूर मार्गांचा अवलंब करून वर्णद्वेषी धोरणं राबवणं, कृष्णवर्णीयांच्या शांततामय मार्गांनी सुरु असलेल्या चळवळी हिंसक मार्गांनी दडपून टाकणं अशा प्रकारांमध्ये वाढ झाली. शार्पव्हिलमध्ये झालेल्या एका चळवळीच्या वेळी 1960 साली 69 कृष्णवर्णीय मुलं आणि माणसं अशाच प्रकारे मरण पावली. 1966 सालच्या डिसेंबर महिन्यात संयुक्त राष्ट्रसंघानं दक्षिण आफ्रिकन सरकारच्या या वर्णद्वेषी धोरणांचा अधिकृतपणे धिक्कार केला. तरीही, दक्षिण आफ्रिकेच्या धोरणांमध्ये काहीच फरक पडला नाही. 1977 साली सुवेटो प्रांतात भडकलेल्या दंगलीमध्ये दक्षिण आफ्रिकन पोलिसांनी विलक्षण क्रूरपणे रक्तपात घडवला. यानंतर संयुक्त राष्ट्रसंघानं दक्षिण आफ्रिकेशी इतर कोणत्याही देशानं शस्त्रांचा व्यापार करू नये, असा आदेश जारी केला. तरीही, आपली वर्णद्वेषी धोरणं हा एक प्रयोग असून, आंतरराष्ट्रीय समुदायानं आपल्याला सहकार्य करावं अशा प्रकारची मागणी दक्षिण आफ्रिकन सरकार करत राहिलं.

1970 आणि 1980 या दशकांमध्ये दक्षिण आफ्रिकन सरकारचं खरं रूप आंतरराष्ट्रीय समुदायाच्या नजरेला पडलं. वर्णद्वेषी धोरणांना वेगवेगळी चांगली लेबलं चिकटवून त्यांच्यात काहीच आक्षेपार्ह नसल्याचा भास दक्षिण आफ्रिकन सरकार निर्माण करत असल्याचं चित्र अगदी

ठळकपणे समोर आलं. उगीचच वेळकाढूपणा करत आपल्या धोरणांच्या अंमलबजावणीत कसलाच बदल न करण्याच्या दक्षिण आफ्रिकन सरकारच्या खोटेपणाचं पितळ उघडं पडत गेलं. कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळींना आणखी धार चढली. या चळवळी अनेकदा हिंसकच असायच्या. आंतरराष्ट्रीय समुदायाकडून कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळींना मिळत असलेला पाठिंबा वाढत गेला. राजकारण, अर्थकारण, क्रीडा, संस्कृती अशा अनेक गोष्टींच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर दक्षिण आफ्रिकेशी असलेले संबंध तोडून टाकण्यावर इतर देशांनी भर दिला. यामुळे दक्षिण आफ्रिका एकटी पडत गेली. 1980 च्या दशकात दक्षिण आफ्रिकेत यादवी युद्ध व्हायची दाट शक्यता निर्माण झाली. वर्णद्वेष संपवणं आणि तो संपवता आला नाही, तर दक्षिण आफ्रिकेमधल्या वर्णद्वेष्ट्या सरकारला आपला कारभार नीटपणे करू न देणं, अशा योजना कृष्णवर्णीय चळवळींमधल्या लोकांनी आखल्या.

या सगळ्याचा कळस म्हणजे 1986 साली अमेरिकन काँग्रेसनं वर्णद्वेषाच्या विरोधात संमत केलेला एक ठराव, ही गोष्ट ठरली. खरं म्हणजे, अतिउजव्या विचारसरणीच्या आणि दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या वर्चस्ववादाला जवळपास उघडपणे पाठिंबा देणाऱ्या रोनाल्ड रीगन यानं वर्णद्वेषाच्या विरोधातल्या या ठरावाला संमत करायला नकार दिला होता. आपलं निर्णायक मत या ठरावाच्या विरोधात वापरून हा ठराव रद्द करण्याच्या दृष्टीनं रीगननं पावलं टाकली होती, पण अमेरिकन काँग्रेसनं रीगनचा हा डाव उद्ध्वस्त केला. अमेरिकेनं दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषाच्या विरोधात उचललेल्या या पावलांचा अगदी थेटच परिणाम झाला. अमेरिकन उद्योगपती, तसंच गुंतवणूकदार यांच्या दक्षिण आफ्रिकेमधल्या नव्या गुंतवणुकीवर बंदी घालण्यात आली. दक्षिण आफ्रिकेला शस्त्रास्त्रं, कम्प्युटर्स, तसंच इतर कुठलंही अत्याधुनिक तंत्रज्ञान अमेरिकेकडून निर्यात केलं जाणार नाही असं ठरलं. अमेरिकन कंपन्यांकडून दक्षिण आफ्रिकेला केल्या जाणाऱ्या तेलाच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली. तसंच, अमेरिका आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामधला विमानप्रवास थांबवण्यात आला. या सगळ्या धोरणांचे खूप परिणाम झाले. 1990 साली अचानकपणे दक्षिण आफ्रिकन सरकारनं वर्णद्वेषी धोरणं गुंडाळून टाकली आणि गोऱ्या, तसंच कृष्णवर्णीय लोकांना निवडणुकांमध्ये मतदान करण्याचे हक्क मिळतील असं जाहीर केलं. यानंतर 4 वर्षांनी कृष्णवर्णीयांच्या समान नागरी हक्कांसाठी आयुष्यभर झगडलेल्या, तसंच 1963 ते 1990 अशी 27 वर्षं तुरुंगात काढलेल्या नेल्सन मंडेलाची

तुरुंगातून मुक्तता करण्यात आली. 1994 साली याच मंडेलाची दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्रपतीपदी निवड करण्यात आली. अशा रीतीनं दक्षिण आफ्रिकेमधला वर्णद्वेष अधिकृतरीत्या संपुष्टात आला!

मंडेलाचं बालपण

केपटाऊनच्या पूर्वेकडे 800 मैल आणि जोहान्सबर्गच्या दक्षिणेकडे 600 मैल अंतरावर असलेला ट्रान्स्की नावाचा खूप कोपऱ्यातला एक बारीकसा; पण निसर्गसौंदर्यानं खूप नटलेला भाग आहे. तिथे नेल्सन मंडेलाचं बालपण गेलं. इथेच मंडेलानं नंतर एक घर बांधायचं ठरवलं. निवृत्तीनंतर तिथेच राहायला यायचंही त्यानं ठरवलं. त्यामागे 'माणूस ज्या ठिकाणी जन्म घेतो, तिथेच त्याचा शेवट व्हावा' अशी भावना होती.

मंडेलाचा जन्म एमवेझो नावाच्या इथून काही मैल अंतरावर असलेल्या बाशी नदीच्या काठावर वसलेल्या गावात 18 जुलै 1918 या दिवशी झाला. मंडेलाचं मूळ नाव रोलिह्लाह्ला मंडेला असं होतं. रोलिह्लाह्ला या शब्दाचा अर्थ 'झाडाची फांदी ओढणं', तसंच 'नसते उद्योग करून ठेवणारा' अशा दोन्ही प्रकारचा होतो. अर्थातच मंडेलाचं नाव ठेवताना या अर्थांपैकी दुसरा अर्थ त्याच्या आई-वडिलांना अपेक्षित असावा! मंडेलाच्या जन्माच्या काळात जगभरात खूप मोठमोठ्या घडामोडी सुरु होत्या. पहिलं महायुद्ध नुकतंच संपुष्टात येत होतं, रशियामध्ये बोल्शेव्हिक क्रांती घडत होती आणि त्याच सुमाराला दक्षिण आफ्रिकेत स्थापन झालेल्या 'आफ्रिकन नॅशनल काँग्रेस' पक्षानं आपल्यावर सत्ता गाजवणाऱ्या ब्रिटिशांना आपल्याइथल्या कृष्णवर्णीय लोकांच्या हक्कांविषयी एक निवेदन पाठवलं होतं. यामागचं कारण म्हणजे, अनेक स्थानिक कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांकडून त्यांच्या जमिनी अन्यायी कायदे करून हिसकावून घेण्यात आल्या होत्या. रोलिह्लाह्ला मंडेलाचे वडील हेंड्री मंडेला यांनासुद्धा त्याचा फटका बसला. ते खरं म्हणजे स्थानिक लोकांचे प्रमुख म्हणून काम बघायचे. पण, नंतर एका बैलाच्या चोरीच्या प्रकरणात त्यांना गुंतवून त्यांच्याकडून सगळी जमीन, गुरंढोरं वगैरे काढून घेण्यात आलं. त्यामुळे मंडेला कुटुंबानं नाईलाजानं जवळच्या कुनू नावाच्या खेड्यात स्थलांतर केलं. तिथेच पुढची काही वर्षं हे कुटुंब राहिलं. मंडेला कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अचानकपणे घसरली असली, तरी ती खायची-प्यायची भ्रांत निर्माण होईल, इतकी खराबसुद्धा नक्कीच नव्हती. तसंच, एकत्र कुटुंबपद्धतीच्या संकल्पनेनुसार सगळ्यांनी आहे ते वाटून घ्यायचं आणि त्यात समाधानी राहायचं अशा वातावरणामध्ये मंडेला कुटुंब आनंदात जगायचं.

मंडेलाचे वडील हेंड्री हा अशिक्षित माणूस असला, तरी त्याला गोऱ्या आफ्रिकन लोकांपुढे

आपण उणे आहोत, असं कधीच वाटत नसे. वडील म्हणून हेंड्रीची भूमिका कठोर असे. वेळप्रसंगी तो आपल्या मुलांना ठोकून काढायलाही कमी करत नसे. तसंच, आपल्या वडिलांचा हट्टी स्वभाव नंतर आपल्यात उतरला असं मंडेला म्हणायचा. हेंड्रीला चार बायका होत्या. नोझकेनी फॅनी ही मंडेलाची आई त्यात लग्नांच्या क्रमानुसार तिसऱ्या क्रमांकावर होती. या चौघींनाही हेंड्री समान वागणूक द्यायचा. तसंच, त्या चौघींमध्ये आपसात गुण्यागोविंदाचं वातावरण होतं. हेंड्रीचा स्थानिक परंपरा आणि प्रथा यांच्यावर खूप विश्वास होता. चार बायकांपासून हेंड्रीला एकंदर 13 मुलं झाली होती.

हेंड्रीच्या चार बायका चार वेगवेगळ्या झोपड्यांमध्ये राहायच्या. या झोपड्या एकमेकांपासून काही मैल अंतरावर होत्या. माती घट्ट करून त्यापासून बांधलेल्या या झोपडीवजा घरामधल्या साध्या खुर्च्या, तसंच त्यांच्यामधली कपाटं हे सगळं मातीपासूनच बनवलेलं असे. या झोपड्यांमध्ये पलंग किंवा टेबल नसत. जमिनीवर चटई किंवा सतरंजी अंथरून सगळे झोपायचे. गवताच्या गंजीपासून बनवलेलं छत जाड दोऱ्यांनी भिंतींना बांधलेलं असे. मक्याचं पीक घेऊन त्यावरच बहुतेक सगळी गुजराण व्हायची. घरामधली पोरंटोरं गाईगुरांना चारा खायला घालण्यात आणि बाहेर फिरवण्यात वेळ घालवायची, तर मुली घरकामात आणि स्वयंपाकात मग्न असायच्या. एकाच मोठ्या ताटलीतून सगळे जण रात्रीचं जेवण एकत्रितरीत्या घ्यायचे.

मंडेलाला आपल्या जन्म देणाऱ्या आईविषयी सगळ्यात जास्त प्रेम असलं, तरी आपल्या इतर आया; तसंच आपली इतर भावंडं यांच्याविषयीसुद्धा त्याला खूप माया होती. त्या सगळ्यांबरोबर तो अगदी सख्ख्या नात्यासारखा वागे. आपल्या इतर आयांनी आपल्याला खूप प्रेम दिल्यामुळेच नंतरच्या आयुष्यातसुद्धा आपल्याला स्त्रियांविषयी खूप आदर वाटायचा, असं मंडेलानं म्हटलं होतं. नंतरच्या आयुष्यात मंडेलाला एका पुरुषानं अनेक स्त्रियांशी संबंध ठेवणं किंवा त्यांच्याशी लग्न करणं ही प्रथा अजिबात पसंत पडत नसली, तरी अप्रत्यक्षपणे या प्रथेचा आपल्या बालपणात आपल्याला फायदा झाला, असं तो म्हणायचा. टेकड्या, तसंच मोकळी शेतं यांच्यामधून मनसोक्त भटकणं, नदीमध्ये मनमुरादपणे पोहणं, थेट गाईच्या आचळांमधूनच येणाऱ्या दुधाच्या धारेचा आस्वाद घेणं, भाजल्या जाणाऱ्या मक्याच्या दाण्यांवर तुटून पडणं अशा अनेक आनंददायी गोष्टी मंडेलानं केल्या.

त्या काळात दक्षिण आफ्रिकेत सगळीकडे ब्रिटिशांचा प्रभाव असल्यामुळे लहान मुलांना

गाजलेले ख्रिश्चन नेते, योद्धे, राजे-राण्या यांची नावं द्यायची प्रथा पडली होती. साहजिकच वेलिंग्टन, ॲडलेड, व्हिक्टोरिया अशी नावं मुलामुलींना दिली जात असत. याच प्रथेमधून एके दिवशी 7 वर्षं वय असलेल्या मंडेलाला त्याच्या शिक्षकानं 'नेल्सन' असं नाव दिलं. स्वत: मंडेलाला मात्र 'मदिबा' हे आपल्या समाजानं आपल्याला दिलेलं आणखी एक नावच जास्त आवडत असे. त्यामुळे नंतरच्या काळात दक्षिण आफ्रिकेत मंडेलाचा उल्लेख प्रेमानं 'मदिबा' असाच केला जाई.

मंडेला 9 वर्षांचा असताना त्याच्या वडिलांचं फुप्फुसांच्या विकारानं निधन झालं. या काळात निपचित पडून राहिलेल्या आणि डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यायला नकार देणाऱ्या आपल्या वडिलांकडे बघताना मंडेलाला कसंसंच होई. मृत्यूच्या तासभर आधी हट्टानं आपल्या वडिलांनी पाईपचे काही झुरके घेऊन, मगच आपला जीव समाधानानं सोडल्याचं मंडेलाला नंतरही आठवायचं. मंडेलाच्या वडिलांनी पूर्वी त्यांच्या 'थेंबू' समाजाचा राजा म्हणून निवड झालेल्या माणसाची त्या पदावर निवड होण्यात मोठी भूमिका बजावली होती. आपल्या मृत्युपूर्वी मंडेलाच्या वडिलांनी या राजाला आपल्यानंतर आपल्या मुलाचा सांभाळ करावा, अशी विनंती केली होती. त्यानुसार या राजानं मंडेलाला त्याच्या वडिलांच्या निधनानंतर आपल्याबरोबर नेलं. अर्थात, या राजाचा 'राजमहाल' हा आपल्याला अभिप्रेत असतो; तसा राजमहाल नव्हताच. पण तरीही, मंडेला आधी राहायचा त्या झोपड्यांच्या तुलनेत तो नक्कीच जास्त आधुनिक होता. या राजाकडे 'फोर्ड' गाडीसुद्धा होती! राजमहालात राजाची गाडी यायला लागली की, लोक त्याचा कसा जयजयकार करायचे, ही गोष्ट मंडेलाच्या मनावर चांगलीच ठसली.

या राजाचा मुलगा मंडेलाहून 4 वर्षांनी मोठा होता. त्याच्याशी मंडेलाची चांगली मैत्री झाली. हा मुलगा क्रिकेट, फुटबॉल, रग्बी अशांसारख्या सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये चमकायचा. मंडेलाला मात्र मुष्टियुद्ध किंवा धावण्याची शर्यत यांच्यासारख्या वैयक्तिक स्पर्धांमध्ये जास्त रस असे. इथेच मंडेलाला अभ्यासाचीही गोडी लागली. आपल्याला इंग्रजी भाषा उत्तम यावी, या दृष्टीनं मंडेलानं प्रयत्न सुरु केले. एकदा एका गोऱ्या माणसाची दुचाकी बंद पडलेली असताना त्याच्याशी मंडेला अगदी व्यवस्थितपणे इंग्रजी भाषेत संभाषण करु शकला, हे बघून मंडेलाची बहीण माबेल ही खूपच प्रभावित झाली.

मंडेलाच्या दृष्टीनं सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिथल्या सगळ्या गोरगरीब लोकांच्या अडचणी राजा कसा सोडवतो यासंबंधीच्या निरीक्षणांची होती. दूरदूरवरून प्रवास करून आणि गरिबीमुळे चक्क तंगडतोड करून अनेक लोक राजाकडे आपल्या अडचणी घेऊन यायचे. त्या सगळ्या लोकांचं म्हणणं राजा अत्यंत शांतपणे ऐकून घ्यायचा, तसंच परस्परविरोधी मतं मांडणाऱ्या लोकांना तो बोलू द्यायचा. कित्येक लोक सरळ राजाच्या तोंडावरच त्याची खूप टीका करायचे. पण तरीही राजा कुठलीही प्रतिक्रिया न देता आपला संयम बाळगून त्या लोकांना त्यांचं म्हणणं मांडू द्यायचा. त्यानंतर सगळी चर्चा आटोपली की त्यासंबंधी विचार करून राजा आपला निर्णय जाहीर करायचा. हा सगळा घटनाक्रम मंडेला अगदी कुतूहलानं बघत असे. त्यातून त्याला खूप शिकायला मिळे. कुठल्याही नेत्यानं लोकांशी कसं वागावं, सगळ्या प्रकारच्या आणि थरातल्या लोकांचं म्हणणं कसं ऐकून घ्यावं, न्यायनिवाडा करताना कुणावर अन्याय होणार नाही याची काळजी कशी घ्यावी, हे सगळं आपल्याला या प्रसंगांमधून शिकायला मिळालं, असं मंडेला नंतर म्हणाला.

नंतर दक्षिण आफ्रिकेचा राष्ट्रपती झाल्यावर आपल्या कामकाजाची पद्धत मंडेलानं अशीच ठेवली होती. त्याचं छान वर्णन करताना मंडेलानं, 'नेत्याची जबाबदारी ही शेळ्या-मेंढ्यांचा कळप हाकणाऱ्या गुराख्यासारखी असते... एखाद-दुसरी मेंढी वाट चुकली किंवा इकडे-तिकडे भटकायला लागली, तर तिला अगदी हळूवारपणे चुचकारून परत कळपात आणण्यासाठी गुराख्याला थोडेफार प्रयत्न करावे लागतात... पण सगळ्यांना एकत्र ठेवणं त्याच्या दृष्टीनं खूप महत्त्वाचं असतं', असं म्हटलं होतं. त्यामागे याच आठवणी होत्या. तसंच, बरेचदा अवघड निर्णय घेताना आपला अंतिम निर्णय म्हणजे सगळ्या लोकांनी मांडलेल्या मतांचं सारच असायचा, असंही मंडेलानं म्हणून ठेवलं होतं.

आफ्रिकेमध्ये माणसांनी एकमेकांना सांभाळून घेणं, तसंच एकमेकांशी बंधुत्वाच्या नात्यानं वागणं या गोष्टींना खूप महत्त्व दिलं जातं. त्याला 'युबण्टू' असं म्हणतात. मंडेलाला अशाच वातावरणात वाढवलं गेलं असल्यामुळे त्याच्यावरही हेच संस्कार झाले. म्हणूनच, अनेकदा याविषयी बोलताना मंडेला 'युमंटू एन्जुमुंटू एन्गाबंटू' (म्हणजे 'इतर लोकांच्या मदतीनंच कुठल्याही माणसाचं भविष्य घडू शकतं') असं म्हणत असे. लहानपणापासूनच मंडेलाला इतर माणसांमधल्या दोषांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यामधल्या गुणांकडे आणि त्यांच्यामधल्या

चांगुलपणाकडे बघायची सवय होती, असं मानलं जातं. यातला काही भाग नैसर्गिकरीत्या आला होता आणि काही भाग आपण प्रयत्नपूर्वक जोपासला, असं मंडेलाचं म्हणणं होतं. एकूणच, प्रत्येक माणसाकडे सहानुभूतीपूर्वक नजरेनंच बघितलं पाहिजे, असा चांगुलपणा मंडेलानं आयुष्यभर जपला.

मंडेला अनेक उच्चार असलेल्या 'होसा' किंवा 'खोसा' (Xhosa) नावाच्या जमातीत जन्मला, ती पूर्वी स्वतंत्र होती. पण 1848 साली हॅरी स्मिथ नावाच्या ब्रिटिश माणसानं या जमातीवर इंग्रजांचा पगडा घट्ट करून टाकला. अत्यंत एकोप्यानं राहाणाऱ्या या समाजात फूट पाडून त्यानं या लोकांवर ब्रिटिश संस्कृती लादली. यानंतर खोसा जमातीची दुरावस्था वाढतच गेली. 1910 साली दक्षिण आफ्रिकेचं संघराज्यात रूपांतर झाल्यावर खोसा लोकांवर स्थानिक गोऱ्या लोकांच्या सत्तेची अधिकृत मोहोर उमटवण्यात आली. यानंतरच्या काळात खोसा जमातीत एका वेगळ्याच प्रकारच्या संस्कृतीचं मिश्रण झालं. मूळ संस्कार खोसा जमातीचे, पण आता त्यांच्यावरचं संस्करण ब्रिटिश सत्तेचं अशा या मिश्रणातून खोसा जमातीमधले लोक पूर्वीपेक्षा जास्त शिस्तबद्ध झाले. पाश्चिमात्य विचारसणीतून झालेलं आधुनिकीकरण स्वीकारतानाच आपला जुना इतिहास विसरून चालणार नाही, असं त्यांचं मत बनत गेलं. स्वत: मंडेलाचं शिक्षणही पाश्चिमात्य संस्कृतीशी जुळणारं असलं, तरी त्याला त्याच्या वडिलधाऱ्या लोकांकडून खोसा लोकांच्या इतिहासाविषयीची, तसंच संस्कृतीविषयीची माहिती मिळत असे. त्यामुळे फक्त गोरे लोकच चांगल्या दर्जाचे असतात, अशा प्रकारचा पसरवण्यात आलेला गैरसमज मंडेलाच्या मनात रुजू शकला नाही. उलट आपल्या इतिहासामध्ये कितीतरी कृष्णवर्णीय लोकांनी महान कामगिरी करून दाखवली असल्याचं चित्र मंडेलाच्या मनावर चांगलंच ठसलं.

त्या काळात, भविष्यात राजा म्हणून जबाबदारी स्वीकारणाऱ्या मुलांची वयाच्या सोळाव्या वर्षी सुंता करायची पद्धत असे. या मुलांना 'आपण आता लहान मुलगा राहिलेलो नसून पुरुष झालो आहोत' असं वाटावं, अशी यामागची भावना असे. त्याप्रमाणे मंडेलाही इतर 25 मुलांबरोबर या समारंभासाठी ठरलेल्या ठिकाणी दाखल झाला. यानंतर पुढचं शिक्षण घेण्यासाठी मंडेलाची एका बोर्डिंग स्कूलमध्ये रवानगी झाली. मंडेलाला हे शिक्षण आवडत असलं, तरी त्याला आपल्याच देशात आपल्याला हीन वागणूक देणाऱ्या ब्रिटिश लोकांच्या

वर्चस्ववादाचा रागही येत असे. या सगळ्या गोष्टींमध्ये काहीतरी चुकत आहे, अशी भावना त्याला सतावत असे. या शाळेत सुरुवातीला मंडलाचे उच्चार, तसंच त्याची चाल या गोष्टींवरून त्याची थट्टा केली जात असे. पहिल्याच दिवशी आयुष्यात प्रथमच बूट घालून चालणाऱ्या मंडेलाला बघून सगळे फिदीफिदी हसले! तिथल्या लाकडी पृष्ठभागाच्या जमिनीवर चालताना या बुटांचा धाडधाड आवाज येई आणि बूट घालण्याचा सराव नसल्यामुळे मंडेलाला पडल्यासारखंच होई. पण, लवकरच मंडेला तिथल्या वातावरणामध्ये सरावला. नंतर काही जणांशी दीर्घकाळ टिकलेली त्याची मैत्री इथेच झाली. या शाळेमधलं अन्न निकृष्ट दर्जाचं असल्यानं मंडेला अधूनमधून वैतागे. पण, तिथे इतकं शिकायला मिळतं की त्यापुढे असल्या अडचणी म्हणजे काहीच नाहीत, अशी स्वत:ची समजूत घालून तो त्याकडे दुर्लक्ष करायचा प्रयत्न करायला शिकला. याशिवाय दारू पिऊन गोंधळ घालणं, शिव्या देणं अशा गोष्टींमध्ये वेळ घालवणं म्हणजे मूर्खपणाचं आहे, असं मतही मंडेलानं याच काळातल्या काही अनुभवांमधून बनवलं.

मंडेलाच्या पुढच्या शाळेमध्ये कृष्णवर्णीय शिक्षकांपासून गौरवर्णीय शिक्षक लांब राहायचे. एका गौरवर्णीय शिक्षकानं कृष्णवर्णीय शिक्षकांबरोबर मिसळायचा 'अपराध' केल्यावर त्याला चक्क नोकरीवरून काढून टाकण्यात आलं. या शाळेत मुलं-मुली एकाच वर्गात असले, तरी वर्गाबाहेर मुलं-मुली एकमेकांशी बोलताना जरी आढळले, तरी त्यांना शाळेतून काढून टाकलं जाई. नंतरच्या काळात रविवारी मुला-मुलींनी रात्रीचं जेवण एकत्र करायची पद्धत रुजवण्यात आली. पण, त्यामुळे अशा प्रसंगी छानछोकीनं राहाणारे आणि काटे-चमचे-सुऱ्या वापरून अगदी थाटात जेवणारे मुलगेच सगळ्यांच्या नजरेत भरायचे. सर्वसामान्य कुटुंबांतून आलेल्या आणि ब्रिटिश पद्धतीच्या भोजन पद्धतीची सवय नसलेल्या मुलांना तिथे आपल्या तथाकथित गबाळेपणाचं प्रदर्शन होऊ नये म्हणून उपाशीच राहावं लागे!

एकदा एका मुलीला मंडेलाविषयी आकर्षण वाटत होतं. तेव्हा मंडेला किती गावंढळ आहे, हे तिला दाखवून देण्यासाठी तिच्या मोठ्या बहिणीनं मुद्दामच मंडेला आणि आपली छोटी बहीण यांना एकत्र जेवायचं आमंत्रण दिलं. मंडेलाच्या ताटात चिकनचा अतिशय कडक झालेला तुकडा वाढण्यात आला. मंडेलानं खूप खटपट करून काटा-चमचा-सुरी वापरून हा चिकनचा तुकडा तोडायचा अयशस्वी प्रयत्न केला. शेवटी घामाघूम होऊन त्यानं तो तुकडा हातात घेऊन खाल्ला. अर्थातच, मंडेलावर फिदा झालेल्या मुलीची मोठी बहीण अगदी खूश

होऊन मंडेलाची त्रेधातिरपीट बघत होती!

मंडेलाच्या या गमतीजमती सुरु असताना या काळात एकीकडे ब्रिटिशांचे आपल्या खोसा जमातीवरचे अत्याचार आणि दुसरीकडे त्यांच्या शिक्षणपद्धतीमुळे आपल्यात होत असलेल्या सुधारणा अशा मिश्र भावनांनी मंडेलाला गोंधळून गेल्यासारखं होई. ब्रिटिशांचं मूल्यमापन नक्की कसं करायचं, हे त्याला समजत नसे. सगळीकडे ब्रिटिशांचं कौतुक करणाऱ्या गोष्टींचा माराच होई. ब्रिटिश मूल्यं, ब्रिटिश संस्कृती या गोष्टी सतत आदर्श म्हणून शिकवल्या जात. या संदर्भात मंडेलाचा आवडता कवी असलेल्या एमक्वॅयी यानं 1925 साली ब्रिटिश राजपुत्राच्या स्वागतासाठी लिहिलेल्या एका कवितेत सुरेख भाष्य केलं :

You sent us the truth,

denied us the truth;

You sent us the life,

deprived us of life;

You sent us the light,

we sit in the dark,

Shivering, benighted
in the bright noonday Sun.

1938 साली मंडेलाचं पदवीचं शिक्षण पूर्ण झालं आणि त्यानंतरच्या शिक्षणासाठी 'फोर्ट हेअर'ला मंडेलाची रवानगी झाली. फक्त कृष्णवर्णीय मुलांसाठी असं विद्यापीठ असणं, ही त्या काळामध्ये नवलाईची गोष्टच होती. त्यातच आणखी आश्चर्याची गोष्ट म्हणजे, काही मुलींनाही तिथे शिकण्यासाठी प्रवेश देण्यात आला होता. कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीची पाळंमुळं

या विद्यापीठातच रोवली गेली. कैझर मतान्झिमा नावाचा मंडेलाच्या एका चुलत नात्यामधला मोठा भाऊ तिथे शिकायला होता. त्याचं बोलण्या-वागण्यातलं कौशल्य बघून मंडेलानं त्याला आपला तात्पुरता गुरु मानलं. नंतरच्या काळात त्या दोघांमध्ये राजकीय वैर निर्माण झालं असलं, तरी कॉलेजच्या दिवसांमध्ये मात्र ते दोघं कायम एकत्रच असायचे. या ठिकाणी मंडेला खूप खूश होता. तिथल्या निसर्गसौंदर्यानं त्याला मोहवून टाकलं. पण, राजकीय गोष्टींमध्ये गुंतण्यापेक्षा खेळांवर त्याचा जास्त भर असे. याशिवाय नृत्य, तसंच नाटकांमध्ये काम करणं अशा गोष्टींमध्येही तो रस घेई. आपण सरकारी नोकरी करण्यासाठी आवश्यक असलेली सगळी कौशल्यं आत्मसात केली पाहिजेत, या दृष्टीनं त्याची धडपड सुरु असे. या ठिकाणी मंडेलानं प्रथमच तोंड धुण्यासाठी टूथपेस्ट आणि टूथब्रश यांचा वापर केला. यापूर्वी तो राखुंडीचा वापरच दात घासण्यासाठी करत असे. फ्लश असलेलं स्वच्छतागृहसुद्धा मंडेलानं आपल्या आयुष्यात याआधी बघितलेलं नव्हतं. साहजिकच, मंडेलाला आपण एकदम आधुनिक ठिकाणी आलो आहोत, असं वाटायला लागलं.

'फोर्ट हेअर'मध्येसुद्धा निकृष्ट दर्जाचं अन्न खावं लागतं, या गोष्टीमुळे मंडेला वैतागून गेला. कुठल्यातरी क्रीडा स्पर्धांच्या निमित्तानं मंडेलाला गोऱ्या मुलांसाठीच्या 'हॉड्स विद्यापीठात' जायची संधी मिळाली. पण अर्थातच, गोरे विद्यार्थी आणि कृष्णवर्णीय विद्यार्थी यांच्यात तिथे उघडपणे फरक केला जाई. उदाहरणार्थ, तिथल्या खानावळीत गोरे विद्यार्थी सरळ शिरून हवे ते पदार्थ विकत घेऊन खाऊ शकत. पण, कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांना मात्र खानावळीत प्रवेश करायलासुद्धा बंदी असे. त्यामुळे त्यांना पैसे गोळा करून, खानावळीच्या स्वयंपाकघरानजीकच्या चोरदरवाजातून प्रवेश करून तिथेच ऑर्डर देऊन खावं लागत असे.

पण लवकरच 'फोर्ट हेअर'मधल्या खराब अन्नामुळे मंडेलाच्या आयुष्यात एक मोठं नाट्यच निर्माण झालं. विद्यार्थ्यांच्या समितीसाठीच्या निवडणुकांमध्ये मंडेलाची इतर काही जणांबरोबर प्रतिनिधी म्हणून निवड झाली होती. पण, वैतागून त्या सगळ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले. निवडणुकीवरसुद्धा बहुसंख्य विद्यार्थ्यांनी निषेध म्हणून बहिष्कारच टाकला होता. यावर उपाय म्हणून रात्रीच्या जेवणाच्या टेबलावरच विद्यापीठाच्या अधिकाऱ्यानं फेरनिवडणूक घ्यायचं ठरवलं. कारण तिथे सगळे विद्यार्थी हजर असणार आणि तिथे निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याची कुणाची हिंमत होणार नाही, हे त्या अधिकाऱ्याला माहीत होतं. नव्यानं झालेल्या

निवडणुकीत मंडेलाची फेरनिवडणूक झाली आणि त्यानं परत एकदा आपल्या पदाचा राजीनामा दिला, तेव्हा मंडेलानं आपला निर्णय मागे घेतला नाही, तर त्याचे परिणाम गंभीर होतील असं त्याला सांगण्यात आलं. तरीही, मंडेला आपल्या निर्णयावर ठाम राहिला. तेव्हा मंडेलाची विद्यापीठातून हकालपट्टी करून, त्याला त्याच्या दुसऱ्या घरी म्हणजे स्थानिक राजाकडे पाठवण्यात आलं.

आपण आता फार काळ जगणार नाही असं वाटत असल्यामुळे आपला मुलगा, तसंच मंडेला या दोघांनी लग्न करून आपापला संसार थाटावा, असं त्या राजाचं म्हणणं होतं. पण, हे ऐकून मंडेला हादरूनच गेला. तसंच, मंडेलासाठी निवडण्यात आलेली मुलगी जाड, तसंच अनाकर्षक असल्यामुळे मंडेलाला तिच्याशी अजिबात लग्न करायचं नव्हतं. त्यामुळे राजाच्या मुलाबरोबर मंडेलानं घरातून पळ काढला आणि जोहान्सबर्गला जायचा धाडसी निर्णय घेतला. एके काळी अत्यंत शांत आणि आदर्श आयुष्य जगत असलेल्या मंडेलाच्या आयुष्यात अशा प्रकारे एकदम मोठी वादळं निर्माण झाली!

अर्थात, पळ काढून जाणं सोपं नव्हतं. राजाला कशावरून तरी आपला मुलगा आणि मंडेला हे दोघं पळून जाणार आहेत, याची जाणीव झाली होती. त्यामुळे त्यानं या दोघांवर जवळपास पाळतच ठेवली होती. त्यातून कशीबशी सुटका करून घेऊन हे दोघं पळून जाण्यासाठीच्या तयारीत गुंतले. पण, लवकरच पैशांचा प्रश्न उभा राहिला. जोहान्सबर्गला जायचं, तर त्यासाठीचं तिकीट काढायला पैसे कुठून आणायचे? त्यावर या दोघांनी सरळ राजाकडचे दोन उत्तम दर्जाचे बैल एका माणसाला विकून त्याच्याकडून पैसे घेतले. या पैशांचा वापर करून जोहान्सबर्गला जाणारी आगगाडी पकडण्यासाठी या दोघांनी एक मोटार भाड्यानं घेतली. पण, रेल्वे स्थानकावर पोहोचल्यावर त्यांची निराशाच झाली. कारण राजानं अशा वर्णनाची दोन मुलं तिकीट मागायला आली, तर त्यांना पकडून आपल्या हवाली करावं, अशा सूचना स्टेशनमास्तरला देऊन ठेवल्या होत्या. या कचाट्यातून कशीबशी आपली सुटका करून घेत या दोघांनी परत आपल्या मोटारीत येऊन 50 मैल अंतरावरचं पुढचं रेल्वेस्थानक गाठलं. तिथून त्यांना जोहान्सबर्गच्या दिशेनं जाणारी आगगाडी मिळाली. पण, त्या काळच्या नियमांनुसार ही गाडी फक्त क्वीन्सटाऊन या स्थानकापर्यंतच जात असे. तिथून खूप खटपटी केल्यावरच या दोघांना जोहान्सबर्गला पोहोचणं शक्य झालं! वाटेतसुद्धा त्यांना अटक होण्यासारखे आणखी

1-2 प्रसंग ओढवले; पण त्यातूनही ते कसेबसे बचावले.

या अनुभवांमधूनच मंडेलाच्या वादळी कारकिर्दीची जडणघडण होणार हे त्याला तरी कुठे माहीत होतं?

आयुष्याला कलाटणी!

1941 सालच्या एप्रिल महिन्यात आपल्या मानलेल्या भावाबरोबर 22 वर्षं वयाच्या मंडेलानं जोहान्सबर्गचा रस्ता धरला. दक्षिण आफ्रिकेतल्या खेड्यापाड्यांमधून जोहान्सबर्गमध्ये नशीब काढण्यासाठी गरीब कृष्णवर्णीय तरुण सतत यायचे. कुठलं ना कुठलं काम आपल्याला मिळेल, अशी आशा त्यांना वाटत असे. कृष्णवर्णीय लोकांच्या मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या शहरीकरणाला गोऱ्या लोकांचा खूप विरोध होता. त्यांच्यामुळे शहरी वातावरण खराब होतं, असं ते म्हणायचे. त्यातून त्यांनी, गोरे आणि कृष्णवर्णीय लोक यांना पूर्णपणे वेगळं ठेवावं, असं मत व्यक्त केलं. यालाच 'अपार्थाईड' व्यवस्था म्हणून ओळखलं जायचं. जोहान्सबर्गमध्ये सोन्याच्या खाणीत काम करावं, असं मंडेला आणि त्याचा मानलेला भाऊ यांना वाटत होतं. तिथे काम करणाऱ्या लोकांनाही काळे आणि गोरे अशा दोन गटांमध्ये विभागण्यात आलं होतं आणि त्यांना एकमेकांमध्ये मिसळायची अजिबात परवानगी नसे. अशाच एका ठिकाणी मंडेलाला रात्रपाळीचा रखवालदार म्हणून काम मिळालं. त्या ठिकाणच्या कामगारांनी आपल्याला दिल्या जात असलेल्या खराब वागणुकीमुळे 1946 साली एक उठाव घडवून आणला. मंडेला त्यामधल्या राजकारणात सहभागी झाला नसला, तरी त्याला या सगळ्या घटना जवळून बघायला मिळाल्या. आपण आपल्या जमातीच्या राजाच्या घरातून त्याच्या मुलासोबत पळून आल्याचं मंडेलानं एकदा मोठ्या अभिमानानं सांगताच, त्या खाणीतल्या अधिकाऱ्यानं मंडेलाला कामावरून ताबडतोब काढून टाकलं आणि त्याची परत घरी रवानगी करायचं ठरवलं.

या काळात आणखी एक थरारक प्रसंग उद्भवला. मंडेलाला आपल्या तात्पुरत्या खोलीतून आपला मुक्काम हलवून दुसरीकडे आसरा शोधण्यासाठी जायचं होतं. त्यासाठी त्यानं आपलं सामानसुमान आवरलं आणि आपली मोठी ट्रंक घेऊन तो आपल्या खोलीबाहेर आला. तिथून आपल्या मित्राच्या नव्या घरी ती मोठी ट्रंक नेत असताना तिथल्या रखवालदारानं अचानकपणे मंडेलाला अडवलं आणि आपल्याला या ट्रंकेची पाहणी करायचं असल्याचं सांगितलं. त्या रखवालदारानं अगदी बारकाईनं या ट्रंकेची झडती घेतल्यावर त्यात त्याला मंडेलाच्या कपड्यांमध्ये तळाशी एक गोळ्या भरलेलं रिव्हॉल्व्हर सापडलं! साहजिकच, त्या रखवालदारानं

मंडेलाला आपल्या घरी राहायला बोलावणाऱ्या त्या मित्राला अटक करवली! आपल्यामुळे आपल्या मित्रावर हा प्रसंग विनाकारण उलटला असल्याचं बघून मंडेलाला खूप वाईट वाटलं. हे रिव्हॉल्व्हर आपल्याला आपल्या वडिलांनी दिलं होतं आणि ते जवळ बाळगण्यात आपला कसलाच घातक हेतू नव्हता, अशी साक्ष मंडेलानं दुसऱ्या दिवशी दिली. नशिबानं त्यावर संबंधित अधिकाऱ्यांचा विश्वास बसल्यामुळे मंडेलाच्या मित्राची सुटका झाली!

पण, नशिबानं मंडेलाच्या एका नात्यातल्या माणसानं, घराचे व्यवहार करणाऱ्या वॉल्टर सिसुलू नावाच्या कृष्णवर्णीय दलालाशी मंडेलाची ओळख करून दिली. हा सिसुलू नंतर मंडेलाच्या आयुष्यात आणि दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावणार होता.

सिसुलूच्या आईला तिच्या गोऱ्या नवऱ्यानं सोडून दिलं होतं. 28 वर्षं वयाच्या सिसुलूमध्ये भलतीच ऊर्जा आहे, असं त्याच्याशी संबंधित असलेल्या सगळ्या लोकांना वाटत असे. मंडेला आणि सिसुलू या दोघांनाही एकमेकांना भेटल्यावर परस्परांविषयी आदर वाटायला लागला. सिसुलूची बौद्धिक क्षमता खूप जास्त आहे असं लक्षात आल्यामुळे, मंडेलानं त्याला आपला गुरु म्हणून मान द्यायला सुरुवात केली. मंडेलाला वकिलीशी संबंधित कामांमध्ये रस असल्यामुळे सिसुलू त्याला वकिलीचं काम करणाऱ्या एका कंपनीत घेऊन गेला. तिथे मंडेलाला कारकुनीचं काम मिळालं. तिथल्या मालकानं मंडेलाला त्या काळात खूप जास्त मानली जाईल; अशी 50 पौंडांची रक्कम आगाऊ पगार म्हणून दिली, तसंच एक छानसा सूट घालायला दिला. कृष्णवर्णीय लोकांचे खटले चालवणारा वकील म्हणून काम करायचा सल्ला मंडेलाला देत असतानाच, त्या मालकानं राजकारणात पडू नकोस, असाही इशारा त्याला दिला. अर्थातच, मंडेलानं त्याचा सल्ला नंतर ऐकला नाही. तेव्हा 40 वर्षांनंतर हा मालक त्याच्या मुलीबरोबर मंडेलाला तुरुंगात भेटायला गेला आणि विनोदानं ‘तू माझं न ऐकल्यामुळे काय झालं ते बघ’ असं म्हणालासुद्धा!

सिसुलू

या कार्यालयात एक कट्टर विचारसरणी असलेला आणि गोऱ्यांच्या विरोधात बोलणारा एक कृष्णवर्णीय वकील काम करत असे. त्याच्यापासून दूर राहायचा सल्ला मंडेलाला त्या कार्यालयाच्या मालकानं दिला. कारण हा कृष्णवर्णीय वकील गोऱ्या लोकांच्या विरोधात उघडपणे बोलत असे, तसंच गोऱ्या लोकांनी कृष्णवर्णीयांना दिलेल्या अन्यायी वागणुकीविषयी तो अत्यंत त्वेषानं आपली मतं मांडत असे. पण तरीही, मंडेलाची या कृष्णवर्णीय वकिलाशी चांगली ओळख झालीच. या नेत्यानं मंडेलाला साम्यवादी चळवळीमध्ये आपल्याबरोबर सामील व्हायला सांगितलं, पण आपल्या वकिलीशी संबंधित असलेल्या परीक्षांच्या अभ्यासात मंडेला पार गुंतलेला असल्यामुळे, त्यानं आपल्याला सध्या तरी हे काम जमणार नसल्याचं सांगितलं. मंडेला इथे काम करत असताना बरोबर काही गोरी लोकंसुद्धा कामाला असायची. उदाहरणार्थ, तिथे कारकुनीसारखं, तसंच इतर बिनमहत्त्वाचं काम करणाऱ्या दोन गोऱ्या सेक्रेटरीज होत्या, त्यांनी मंडेलाला त्या ठिकाणचा चहा गोऱ्या लोकांनी वेगळ्या कपांनी प्यायचा असतो, असं सांगितलं. पण मंडेलाचा हा कट्टर वकील मित्र जाणूनबुजून याकडे दुर्लक्ष करून, गोरे लोक ज्या कपांमधून चहा प्यायचे; त्याच कपामधून चहा प्यायला. मंडेलानं मात्र उगीच तमाशा नको

म्हणून आपल्याला चहा नको असल्याचं सांगितलं.

अशा प्रकारे एका अर्थानं या गोऱ्या सेक्रेटरीज मंडेला आणि त्याच्या मित्रासारख्या कृष्णवर्णीय लोकांच्या हाताखाली काम करत असल्या, तरी गोऱ्या लोकांच्या वर्चस्ववादामुळे अत्यंत हास्यास्पद; पण तितक्याच अपमानास्पद घटना अनेकदा घडायच्या. उदाहरणार्थ, एकदा मंडेला एका सेक्रेटरीला एक 'डिक्टेशन' देत असताना त्यांच्या कार्यालयात एक गोरा माणूस आपल्या केसच्या संदर्भातलं काम घेऊन शिरला. त्याबरोबर आपण एका कृष्णवर्णीय माणसाकडून सूचना घेत असल्याचं, त्या गोऱ्या माणसाला दाखवणं त्या सेक्रेटरीला सहनच झालं नाही. त्यामुळे तिनं चक्क आपल्या पर्समधून एक नाणं काढून मंडेलाला 'नेल्सन, माझ्यासाठी त्या शेजारच्या दुकानातून शॅम्पू आण बरं', असं सांगितलं! त्याबरोबर मंडेला गुपचूप तिथून बाहेर पडला आणि त्यानं त्या सेक्रेटरीसाठी शॅम्पू आणला!

मंडेला गरीब लोकांच्या झोपडपट्टीवजा बकाल वसाहतीमध्ये राहायचा. तिथे वीज नसल्यामुळे त्या भागाला 'अंधारं शहर' म्हणून ओळखलं जाई. गोऱ्या लोकांच्या स्वच्छ आणि समृद्धतेनं नटलेल्या वसाहतींच्या तुलनेत हा भाग म्हणजे नुसती गटारगंगाच होती. सगळीकडे भीषण दारिद्र्य, अस्वच्छता, गोंगाट यांचं वातावरण असे. स्वत: मंडेला अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये दिवस काढत असल्यामुळे, बसच्या तिकिटाचे पैसे वाचवण्यासाठी तो दिवसभरात तब्बल 12 मैलांची तंगडतोड करत असे! एका मित्रानं मंडेलाला आपला जुना सूट घालायला दिला. त्याला पडलेल्या भोकांना ठिगळं लावून आणि इतर डागडुजी करून मंडेलानं हा सूट पुढची 5 वर्षं दररोज वापरला! कित्येक दिवस मंडेला उपाशीपोटीच झोपे.

यातून मार्ग काढत मंडेलानं आपली राहायची जागा काही काळानं बदलली आणि 1943 साली त्यानं कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण करायचा निर्णय घेतला. मंडेला ज्या विद्यापीठात शिकायचा, तिथले काही प्राध्यापक कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांना शिकवताना भेदभाव करत नसले, तरी इतर काही जण मात्र 'कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांची हे शिक्षण घ्यायची अजिबात लायकी नसते' असं उघडपणे म्हणत. या विद्यापीठात मंडेलानं 6 वर्षं काढली. तिथे तो सर्वसाधारण विद्यार्थी म्हणून ओळखला जाई, तसंच राजकारणापासून पूर्ण लांब असे. एकाच वेळी शिक्षण आणि नोकरी या गोष्टी न झेपल्यामुळे मंडेलाला आपली कायद्याची पदवी न घेताच या विद्यापीठाला रामराम ठोकावा लागला.

वकील मंडेला

या विद्यापीठातल्या वास्तव्यात मंडेलाला अनेकदा अत्यंत कटू वर्णद्वेषी अनुभवांना तोंड द्यावं लागलं. एकदा ग्रंथालयात मंडेला पुस्तक घेऊन वाचायला म्हणून एका खुर्चीवर बसायला गेला, तर जवळ बसलेला गोरा विद्यार्थी अगदी तातडीनं उठून तिथून निघून गेला. एकदा मंडेला आपल्या गोऱ्या मित्रांबरोबर एका उपाहारगृहामध्ये प्रवेश करत असताना, त्यांना मंडेलामुळे तिथे प्रवेश नाकारण्यात आला. तसंच, फक्त गोऱ्या लोकांसाठीच राखीव असलेल्या एका ट्रॅममध्ये मंडेला त्याच्या मित्रांबरोबर शिरायचा प्रयत्न करत असताना, तिथल्या कंडक्टरनं त्या सगळ्यांना हाकलून दिलं आणि त्यांच्यावर खटला भरला! पण या सगळ्याचा मंडेलानं आपल्या विचारांवर आणि वागणुकीवर विपरीत परिणाम होऊ दिला नाही.

यानंतर मंडेला सिसुलूच्या घरी राहायला गेला. तिथेच आपल्याहून 4 वर्षं कमी वय असलेल्या इव्हलिन मेस या सिसुलूच्या चुलत नात्यातल्या बहिणीशी मंडेलाचे सूर जुळले. 1944 साली मंडेलानं इव्हलिनशी लग्न केलं. इव्हलिन अगदी तान्हुली असताना तिच्या खाणकामगार असलेल्या वडिलांचं निधन झालं होतं. त्यानंतर इव्हलिनचं वय 12 वर्षांचं असताना तिच्या आईचाही मृत्यू झाला. मोठेपणी नर्सकामाचं प्रशिक्षण घेऊन त्या प्रकारचं काम धरायचा इव्हलिन प्रयत्न करत होती. सुरुवातीला इव्हलिननं मंडेलाला चांगली साथ दिली. लग्न झाल्यावर एका वर्षानंतर इव्हलिनच्या पोटी थेंबी नावाच्या मुलाचा जन्म झाला. लवकरच आपल्या स्वतंत्र घरात राहायला गेलेल्या मंडेला कुटुंबाचं घर म्हणजे काडेपेटीच्या

डबीसारखी रचना असावी तशा प्रकारचं एक खोपटंच होतं. घरात वीज नव्हती. तसंच, स्नानगृह किंवा शौचालय यांचा पत्ता नव्हता. त्यामुळे सार्वजनिक व्यवस्थेवरच त्यांना अवलंबून राहावं लागे. लवकरच इव्हलिनच्या पोटी जन्म झालेली एक मुलगी काही महिन्यांमध्येच दगावली. मंडेला इव्हलिनला घरकामात खूप मदत करायचा, तसंच त्याच्या शिस्तशीर स्वभावामुळे आणि सवयींमुळे इव्हलिनला त्याचा फारसा त्रास होत नसे.

या दरम्यान 1943 सालच्या ऑगस्ट महिन्यात मंडेलाची योगायोगानं राजकारणाशी जवळून ओळख झाली. सार्वजनिक बस वाहतूक व्यवस्थेचं भाडं थोडं वाढल्यामुळे 10 हजार कृष्णवर्णीय लोकांनी या बसेसवर बहिष्कार घातला. 9 दिवस ही सेवा बंद राहिली. त्यानंतर सरकारनं नमतं घेऊन या बस वाहतूक व्यवस्थेचं भाडं पहिल्यासारखं केलं. सिसुलू आणि इतर समविचारी लोकांबरोबर मंडेलानं कृष्णवर्णीय लोकांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या 'आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (एएनसी)' पक्षाच्या युवा विभागाची संघटना उभी केली. गोऱ्या लोकांच्या वर्चस्ववादाच्या विरोधात लढा देण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली असली, तरी हिंसा किंवा इतर कट्टर पावलं उचलण्याला तेव्हा मंडेलाचा विरोध होता.

विन्स्टन चर्चिलला दुसऱ्या महायुद्धात मदत केलेल्या जॅन स्मट्स नावाच्या दक्षिण आफ्रिकन पंतप्रधानानं गोऱ्या व्यावसायिकांच्या हिताची पावलं उचलून कृष्णवर्णीय लोकांच्या हालांमध्ये भर टाकली. यामुळे कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीचा विखार वाढला. 1946 साली कामगार संघटनेच्या एका उठावाच्या वेळी स्मट्सनं तो मोडून काढण्यासाठी पोलिसी बळाचा वापर केला. त्यात अनेक कामगार जखमी झाले आणि काही जण मृत्युमुखी पडले. सरकारच्या या कारवाईचं उच्चपदस्थ गोऱ्यांनी समर्थनच केलं. पोलिसांची कारवाई कृष्णवर्णीयांविरुद्ध, तसंच साम्यवादाच्या वाढत्या धोक्याच्या विरोधातलीसुद्धा होती, असं त्यांचं मत होतं. यानंतर स्मट्सनं आणखी एक कारवाई केली. त्यामध्ये भारतातून दक्षिण आफ्रिकेत स्थलांतरित झालेल्या भारतीय लोकांवर अत्याचार करण्यात आले होते.

1860 च्या दशकापासून भारतामधून सुमारे 3 लाख लोक दक्षिण आफ्रिकेमधला नताल प्रांत, तसंच इतर भागांमध्ये स्थलांतरित झाले होते. त्यांनी सुरुवातीला कामगार म्हणून काम केलं. त्यानंतर त्यांच्यामधले बरेच जण व्यावसायिक बनले. 1946 साली स्मट्स सरकारनं भारतीय लोकांना कुणीही जमिनी विकू नयेत, असा कायदा काढला. त्यावर भारतीय लोकांनी

गांधीजींच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शांततामय चळवळ करायचा प्रयत्न केला. सरकारनं चळवळ करणाऱ्या सुमारे 2000 लोकांना तुरुंगात टाकलं. भारतीय लोकांच्या दक्षिण आफ्रिकेतल्या या चळवळीनं मंडेलाला खूप प्रभावित केलं. एकत्र येऊन शांततामय मार्गानं त्यांची चळवळ सुरु असताना एएनसी मात्र गोऱ्या वर्चस्ववादाच्या विरोधात अजिबात हालचाल करत नाही, हे बघून मंडेलाला खूप वाईट वाटत असे. या काळात भारताचा स्वातंत्र्यलढा सुरु असल्यामुळे भारतीय लोकांचं लक्ष मोठ्या प्रमाणावर तिकडे वळलं असलं, तरी काही भारतीयांनी एएनसीच्या लढ्यामध्येही सहभागी व्हायचं ठरवलं. त्या काळात भारतीयांना एएनसीच्या लढ्यात थेटपणे सहभागी करून घ्यायला मंडेलाचा विरोध होता. कारण साम्यवादी विचारसरणीचे लोक किंवा भारतीय लोक एएनसीची सूत्रं आपल्या हाती घेतील आणि या चळवळीची दिशा बदलून टाकतील, अशी भीती मंडेलाला वाटत होती. आफ्रिकन राष्ट्रीयत्वाचा म्हणजेच गोऱ्यांच्या विरोधातल्या वर्णद्वेषाचा मुद्दा यात मागे पडेल, अशी शक्यता मंडेलाला जाणवत होती.

इव्हलिनशी विवाह

1946 सालची कामगार चळवळ, तसंच भारतीयांचा निषेध या दोन्ही गोष्टींमध्ये सरकारचाच विजय झाला. यामुळे मंडेलाची साफ निराशा झाली. पण, 1947 सालच्या ऑगस्ट महिन्यात भारताचा स्वातंत्र्यलढा यशस्वी झाल्यामुळे दक्षिण आफ्रिकन नेत्यांना नवं बळ मिळालं.

पूर्वीपासूनच पंडित जवाहरलाल नेहरूंचा कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीला पाठिंबा होता. त्यामुळे भारतात आपलं सरकार स्थापन केल्यावर नेहरूंनी गोऱ्या वर्चस्ववादी दक्षिण आफ्रिकन सरकारशी असहकाराची भूमिका घ्यायचं धाडस दाखवलं, तेव्हा मंडेला प्रचंड खूश झाला.

1948 सालच्या दक्षिण आफ्रिकेमधल्या निवडणुकीनंतर डॉक्टर डॅनिएल मलान हा 'नॅशनल पार्टी'चा नेता सत्तेवर आला. मलान हा कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीचा कट्टर विरोधक होता. त्यानं आपल्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये 'कृष्णवर्णीय लोकांचा उच्छाद' संपवायचं वचन आपल्या जनतेला दिलं होतं. मलानला संसदेमध्ये फक्त 8 मतांच्या आधारे बहुमत मिळालेलं असल्यामुळे तो कुठलंही टोकाचं पाऊल उचलणार नाही, असं बहुतेक जणांचं मत होतं. मंडेलाला मलानची निवड झाल्यामुळे निराशा आली असली, तरी स्मट्सची फेरनिवड होण्यानं परिस्थितीमध्ये कोणता चांगला बदल झाला नसता, याची त्याला जाणीव होती. पण तरीही, मलानच्या मनसुब्यांची मंडेलाला पुरेशी जाणीव झाली नव्हती, हे नक्की. कारण पुढची 40 वर्षं एकामागून एका सरकारनं मलानची धोरणं खूप जोरानं पुढे नेली आणि दक्षिण आफ्रिकेमधल्या कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीला मोठमोठी खिंडारं पाडली.

मलानच्या कारकीर्दीमध्ये काय होणार आहे, याची चुणूक मंडेलाला लवकरच बघायला मिळाली. 1949 सालच्या जानेवारी महिन्यात सरकारनं भडकावल्यामुळे रस्त्यांवर उतरलेल्या गोऱ्या आणि झुलू लोकांनी डर्बनमध्ये मोठी दंगल घडवून आणली. त्यात 142 लोक मरण पावले. लवकरच मलाननं 'अपार्थाईड'शी संबंधित असलेले; म्हणजेच वर्णद्वेषी कायदे करायला सुरुवात केली. त्यानुसार प्रत्येक नागरिकाला त्याच्या वर्णानुसार 'काळा' किंवा 'गोरा' अशा वर्गांमध्ये विभागायचं ठरलं. या दोन गटांमधल्या लोकांच्या वस्त्या वेगवेगळ्या करायच्या, असा नियम करण्यात आला. आंतरवर्णीय विवाहांवर बंदी घालण्यात आली. यामुळे भडकून मंडेला, तसंच इतर काही युवक नेते यांनी एएनसीच्या प्रमुखाकडे या सगळ्या प्रकारांच्या विरोधात, भारतात ब्रिटिशांच्या विरोधात झालेल्या शांततामय चळवळींवर आधारित असलेली चळवळ सुरु करायचा आग्रह धरला. पण, यामुळे मलान सरकार एएनसीला चिरडून टाकेल, असं मत व्यक्त करून एएनसीच्या प्रमुखानं असं करायला नकार दिला. याला प्रत्युत्तर म्हणून एएनसीच्या पुढच्या राष्ट्रीय बैठकीदरम्यान मंडेला आणि त्याचे सहकारी यांनी एएनसीच्या प्रमुखाच्या विरोधात अविश्वास ठराव दाखल करून तो संमत करून घेतला.

1950 साली मंडेलाची एएनसीमधल्या तरुणांच्या संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली. अजूनही दक्षिण आफ्रिकेमधल्या कृष्णवर्णीय लोकांनी आपला लढा स्वत:च्या जोरावर लढला पाहिजे आणि त्यात साम्यवादी, तसंच भारतीय लोकांना थारा देता कामा नये, असंच मंडेलाचं मत होतं; पण हळूहळू ते बदलत गेलं. साम्यवादी लोकांना आपल्या चळवळीमध्ये स्थान मिळावं, असं त्याला काही काळानं वाटायला लागलं. पण, साम्यवादी लोकांच्या विचारसरणीपेक्षा त्यांच्या आपल्या कामावरच्या श्रद्धेपोटी आणि योजनाबद्धतेमुळे मंडेला त्यांना महत्त्व द्यायचा. यादरम्यान मंडेलाचं वाचनही प्रगल्भ होत गेलं. इतिहास, राजकारण, चळवळी या सगळ्या गोष्टींसंबंधी वाचतानाच मंडेलानं बर्ट्रांड रसेल आणि इतर लोकांचं तत्त्वज्ञानही आत्मसात करायचा प्रयत्न केला. गांधीजी आणि नेहरू यांच्या कामगिरीनंसुद्धा मंडेलावर खूप प्रभाव पडला. मंडेलानं कार्ल मार्क्सचं लिखाण पूर्णपणे वाचलं नसलं, तरी मार्क्सवादी विचारसरणीचा त्याला आधार वाटत असे. जगभरातल्या स्वातंत्र्य चळवळींना सोव्हिएत युनियननं दिलेल्या पाठिंब्यामुळे मंडेला हरखून गेला. वर्चस्ववादी देशांच्या विरोधातली त्याची मानसिकता आणखीनच तीव्र होत गेली. त्यामुळेच आपण आपल्यामधल्या प्रखर राष्ट्रीयत्वाच्या संकल्पनेला मागे ठेवावं आणि आपल्या चळवळीला पाठिंबा देणाऱ्या साम्यवादी, तसंच भारतीय लोकांना आपल्या कामात सहभागी करून घ्यावं, असं मंडेलाचं मत बनत गेलं.

पत्नीसह मलान

या काळात मंडेला मोटार चालवायला शिकला होता. त्या संदर्भातल्या एका प्रसंगानं मंडेलाच्या मनात चीड निर्माण केली. मंडेलाला अजून मोटार चांगली चालवता येत नसल्यामुळे तो सांभाळूनच निघाला होता. त्याच्या समोर दोन गोरी मुलं सायकलींवर निघाली होती. बऱ्यापैकी सावधपणे गाडी चालवूनसुद्धा मंडेलाच्या मोटारीची त्या दोघांपैकी एकाच्या सायकलीला धडक बसलीच. घाबरून मंडेला आपल्या गाडीतून उतरला आणि सायकलवरून खाली पडलेल्या गोऱ्या मुलाला उचलायला गेला. तेवढ्यात एक ट्रक चालवणारा गोरा माणूस तिथे आपला ट्रक थांबवून अगदी तातडीनं उतरला आणि त्यानं त्या गोऱ्या मुलाला उचलून घेतलं आणि जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये नेलं. मंडेलाचा काळा हात त्या गोऱ्या मुलाला लागू नये; यासाठी त्या गोऱ्या माणसाची धडपड सुरू होती! हा अनुभव मंडेलाला चांगलाच बोचला.

यानंतर मंडेलाच्या गाडीतलं पेट्रोल एकदा अचानकपणे संपलं, त्यामुळे मंडेला जवळच्या वस्तीत गेला आणि तिथल्या एका घराचं दार वाजवून त्यानं तिथल्या गोऱ्या स्त्रीला आपल्याला पेट्रोल देण्याविषयी विचारलं. पण, मंडेलाचा काळा रंग बघून पेट्रोल असूनसुद्धा त्या स्त्रीनं धाडकन दार लावून घेतलं. नाइलाजानं त्या स्त्रीच्या शेतकरी नवऱ्याला गाठून मंडेलानं आपल्याला आपल्या गोऱ्या साहेबाच्या मोटारीसाठी पेट्रोल हवं असल्याची बतावणी करताच त्याला पेट्रोल मिळालं!

अशा रितीनं वेगवेगळे अनुभव घेताघेता अगदी सर्वसामान्य कृष्णवर्णीय तरुण म्हणून आपलं आयुष्य शांतपणे जगणारा मंडेला आता राजकारणामध्ये चांगल्याच वेगानं ओढला गेला. लग्नाच्या धमकीमुळे घर सोडून जोहान्सबर्गला पळून जाण्यानं आपलं आयुष्य इतक्या मोठ्या प्रमाणावर बदलून जाईल, याची स्वत: मंडेलालासुद्धा कल्पना नसावी! पण प्रत्यक्षात मात्र तसंच घडलं आणि मंडेलाच्या वादळी आयुष्याला सुरुवात झाली.

विनी मंडेलाचं आगमन

मंडेला आता राजकारण आणि एएनसीचं काम या गोष्टींमध्ये वेगानं गुरफटत गेला. 1951 सालच्या डिसेंबर महिन्यात एएनसीची वार्षिक परिषद ब्लोमफौंटेन शहरात भरली. खरं म्हणजे, ही परिषद खूप ऐतिहासिक ठरली असली, तरी तेव्हा तिची जगानं म्हणावी तशी दखल घेतली नाही. या परिषदेत अनेक वक्त्यांनी मलानच्या अन्यायी सरकारच्या विरोधातल्या चळवळीची धार आणखी तीव्र करण्यासंबंधीचा आपला निर्धार जाहीर केला. 26 जून 1952 या दिवशी या चळवळीला सुरुवात करायचं ठरलं. त्याआधी चार दिवस मंडेला डर्बन शहरात गेला आणि 10 हजार लोकांसमोर त्यानं एक भाषण केलं. मंडेलाची भाषणं इतर लोकांसारखी भावनाप्रधान कधीच नसायची. त्यात एक प्रकारचा तटस्थपणा होता. पण आपल्या भाषणांमध्ये सगळे मुद्दे उतरतील याची काळजी तो घेत असे. 26 जूनला जोहान्सबर्ग शहराच्या शेजारच्या गावात मंडेला इतर कार्यकर्त्यांसह दाखल झाला. तिथे प्रवेशाची परवानगी नसलेल्या एका भागात इतर काही कार्यकर्ते चालत गेले. तिथे या लोकांची वाट बघत असलेल्या पोलिसांनी या सगळ्यांना अटक करून त्यांची रवानगी तुरुंगात केली. मंडेला त्या लोकांमध्ये नव्हता. त्याच रात्री 11 वाजता जमावबंदीचा आदेश मोडून मंडेला आणि त्याचा एक सहकारी एका मोर्च्यामध्ये निरीक्षक म्हणून सहभागी झाले. पण, पोलिसांनी त्यांनाही अटक करायचा निर्णय घेतला. त्यामुळे मंडेलाला दोन रात्री तुरुंगात काढाव्या लागल्या. तिथे एका कैद्याला तुरुंगातल्या अधिकाऱ्यानं लाथा मारून मारून त्याचा पाय मोडला होता. हे बघून मंडेलाला कसंसंच झालं. तुरुंगामधल्या एकूण परिस्थितीमुळे मंडेलाला उबग आली, तसंच पोलिसांनी आपल्या शेजारीच दोन कैदी आपले छुपे हेर म्हणून नेमले असल्याची गोष्टही मंडेलाच्या लक्षात आली.

26 जून 1952 या दिवशी सुरु झालेल्या निदर्शनांनी व्यापक रूप धारण केलं. पुढच्या 5 महिन्यांच्या काळात सुमारे 8000 लोकांनी देशभरात गोऱ्या लोकांच्या वस्तीत जायचा प्रयत्न करणं, फक्त गोऱ्यांसाठी राखीव असलेल्या मार्गानं रेल्वेमध्ये प्रवेश करणं, जमावबंदी मोडणं अशा अनेक गोष्टी शांततामय मार्गांनी करून स्वत:ला अटक करवून घेतली. या निदर्शनांच्या आयोजनामागे मंडेलाचा मोठा हात होता. कृष्णवर्णीय लोकांच्या वस्त्यांमध्ये जाऊन मंडेलानं घरोघरी मोठ्या प्रमाणावर यासंबंधीचं प्रबोधन केलं होतं. राष्ट्रीय पातळीवरचं एखादं आंदोलन

यशस्वी करायचं असेल, तर त्यासाठी या गोष्टी आवश्यक आहेत, याची मंडेलाला या प्रसंगानं जवळून ओळख झाली. इतर नेत्यांनी राष्ट्रीय पातळीवर एखादी गोष्ट ठरवायची आणि प्रत्यक्षात सर्वसामान्य लोकांनी आणि कार्यकर्त्यांनी मात्र ती गोष्ट पसंत नसल्यामुळे त्या आंदोलनाला पाठिंबा द्यायचा नाही, असं घडू नये म्हणून काय केलं पाहिजे, हे मंडेलानं या काळात प्रत्यक्षात अनुभवलं. तुरुंगात रवानगी केली जाणं ही गोष्ट म्हणजे आपला अपमान नसून उलट कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीमध्ये सहभागी झाल्याबद्दलचं ते मानचिन्हच आहे, अशा रितीनं लोक त्याकडे बघायला लागले. साहजिकच, तुरुंगात जावं लागायची भीती कृष्णवर्णीय लोकांना वाटेनाशी झाली. यामुळे आंदोलनाची व्याप्ती एवढी वाढेल याची कल्पना नसलेलं सरकार खडबडून जागं झालं. विरोधी पक्षांच्या मदतीनं हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी सरकारनं पावलं उचलली, तसंच एएनसीशी चर्चा करण्यासाठी काही खासदारांनाही सरकारनं पाठवलं. तेव्हा पुढच्या निवडणुकीमध्ये विजय मिळाला, तर नवं सरकार वर्णद्वेषी नियम आणि कायदे रद्द करून टाकेल, असं आश्वासन आपल्याला हवं असल्याचं एएनसीनं सांगितलं. त्याला सरकारच्या वतीनं चर्चेसाठी धाडण्यात आलेल्या खासदारांनी नकार देताच बोलणी तिथेच फिस्कटली.

1952 सालच्या जुलै महिन्यात पोलिसांनी कृष्णवर्णीय नेते, तसंच त्यांच्या चळवळींना पाठिंबा देणारे भारतीय नेते यांच्या घरांवर आणि कार्यालयांवर धाडी टाकून, त्यांच्याकडची तथाकथित कटकारस्थानांविषयीची कागदपत्रं जप्त केली. त्यात पोलिसांच्या हाती फारसं काही लागलंच नाही. सुरुवातीला पोलीस अगदी मित्रत्वाच्या नात्यानं आपल्याशी वागतात असं या कार्यकर्त्यांना वाटलं असलं, तरी लवकरच पोलिसांनी आक्रमक भूमिका घेऊन मंडेलासकट इतर अनेक कृष्णवर्णीय नेत्यांवर साम्यवादाला उचलून धरल्याच्या आरोपावरून खटला भरला. दरम्यान मंडेलाची स्थानिक प्रांतामधल्या एएनसीचा प्रमुख म्हणून निवड झाली असली, तरी सरकारनं एएनसीच्या पदाधिकाऱ्यांवर बंदी घातल्यामुळे मंडेलाच्या या पदाला सरकारच्या दृष्टीनं काही अर्थ उरला नाही.

दरम्यान 1952 सालच्या ऑक्टोबर महिन्यात कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीमध्ये भाग घेणाऱ्या डझनावारी लोकांची पोर्ट एलिझाबेथ आणि ईस्ट लंडन भागांमध्ये हिंसक प्रकारांती हत्या झाली. पण, सरकारी अत्याचारांमुळेच या लोकांचा मृत्यू झाला, असं सिद्ध करणं खूप कठीण असल्यामुळे उलट कृष्णवर्णीय लोकांची चळवळच आता शांततामय मार्ग सोडून हिंसक

मार्गानं पुढे चालली असल्याचं चित्र रंगवण्यात सरकारला यश आलं. तातडीनं सरकारनं निदर्शनं करणाऱ्या लोकांविरुद्ध कठोर कायदे केले. ते मोडणाऱ्यांना 3 वर्षं तुरुंगवास, तसंच चाबकानं फोडून काढणं अशा शिक्षा दिल्या जातील, असं सांगण्यात आलं. सरकार अचानकपणे इतकी टोकाची भूमिका घेईल, असं एएनसीच्या पदाधिकाऱ्यांना वाटलंच नव्हतं. शेवटी 1952 सालच्या अखेरीला ही चळवळ थांबवायचं एएनसीनं ठरवलं. यासंबंधीचं मूल्यमापन करताना मंडेलानं आपल्याला यातून मिळालेला आत्मविश्वास सगळ्यात महत्त्वाचा असल्याचं सांगितलं. ही चळवळ प्रचंड मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरली नसली, तरी आपण कृष्णवर्णीय लोकांना आणि त्यांच्याविषयी सहानुभूती असलेल्या काही गोऱ्या लोकांनासुद्धा संघटित करू शकतो, ही भावना खूप दिलासा देणारी असल्याचं मंडेलाचं मत झालं. याचा भविष्यात आपल्याला खूप उपयोग होऊ शकतो याची खूणगाठ मंडेलानं मनाशी बांधली, तसंच काही ठरावीक शहरांमध्ये या चळवळीचा एएनसीलाही फायदा झाला हे नक्की. कारण त्या ठिकाणी एएनसीच्या सदस्य संख्येमध्ये हजारोंनी भर पडली. अर्थात, त्याची व्यापकता म्हणावी तशी नव्हती. अगदी मोजक्या ठिकाणीच हे दृश्य बघायला मिळालं होतं.

कृष्णवर्णीय स्त्रियांची चळवळ

या दरम्यान मंडेलाच्या वैयक्तिक आयुष्यातलं चित्र वरवर बरं दिसत असलं, तरी त्यात चरे पडले होते. इव्हलिननं मंडेलाचं घर व्यवस्थित चालू ठेवलं असलं, तरी मंडेलाच्या राजकीय चळवळींमध्ये सामील होण्याला तिचा विरोध होता. मंडेलाशी लग्न करताना तो विद्यार्थी होता

आणि त्यानंतरच्या काळात तो एखाद्या सर्वसामान्य माणसासारखी नोकरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवेल असं तिला वाटायचं. पण, आता मंडेलाची कारकीर्द पूर्णपणे बदलली होती. इव्हलिन अत्यंत धार्मिक मतांची होती. ती सतत बायबलचं वाचन करे. कदाचित मंडेलाच्या राजकीय वादळांमधून घरात निर्माण होत असलेल्या ताणाचा निचरा करण्यासाठी ती असं करत असावी. घरामधलं वातावरण एकदम तणावपूर्ण झालं होतं. मंडेलाला भेटायला येणारे त्याचे सहकारी साहजिकच लपूनछपून पहाटे किंवा रात्री उशिरा यायचे. आपलं पोट भरण्यासाठी मंडेला एकीकडे वकिली करायचा, तर दुसरीकडे आपल्या चळवळीच्या कामांसाठी शांततामय मार्गांनी का होईना; पण सरकारी नियम तोडण्यासाठी लोकांना उद्युक्त करायचा. असं अगदी परस्परविरोधी आयुष्य मंडेलाला जगणं भाग पडलं.

1952 साली ऑलिव्हर तांबो नावाच्या सहकाऱ्याच्या साथीत मंडेलानं स्वत:चा वकिली व्यवसाय उभं करायचं ठरवलं. लवकरच एएनसीच्या सगळ्या कायदेशीर गोष्टींची जबाबदारी या जोडगोळीवरच आली. त्याचबरोबर इतर अनेक कृष्णवर्णीय लोकांनीसुद्धा मंडेला-तांबो यांच्या वकिली व्यवसायाचा फायदा करून घ्यायचं ठरवलं. मंडेला आणि तांबो यांची काम करायची पद्धतसुद्धा वेगवेगळी होती. सगळा कागदपत्रांचा कारभार तांबो सांभाळायचा. कायद्याच्या दृष्टीनं काय योग्य-अयोग्य आहे आणि कुठल्या खटल्यामध्ये कायद्याचा कसा वापर केला पाहिजे, या सगळ्या गोष्टींमध्ये महत्त्वाची भूमिका तांबोची असायची. याउलट न्यायालयामध्ये खटला सुरु झाला की, आपल्या अशिलाच्यावतीनं तो अत्यंत नाट्यमय प्रकारानं चालवायची जबाबदारी मंडेलाची असे. मंडेलाच्या खटल्यांमध्ये वादविवाद करण्याच्या पद्धतीला वैतागून काही वकिलांनी त्याविषयी नाराजीसुद्धा व्यक्त केली होती! वर्णद्वेषी नियमांचं मंडेला जाणूनबुजून उल्लंघन करायचा. उदाहरणार्थ, न्यायालयामध्ये फक्त गोऱ्या लोकांसाठी प्रवेश करण्यासाठीच्या दारातून मंडेला एकदा आत शिरत असताना तिथल्या एका कृष्णवर्णीय कारकुनानं मंडेलाला थांबवलं आणि हे प्रवेशद्वार फक्त गोऱ्या लोकांसाठी असल्याचं त्याला सांगितलं. त्यावर मंडेलानं 'मग तुझं इथे काय काम आहे रे?' असं विचारून निरुत्तर करून टाकलं!

वेगवेगळ्या खटल्यांमध्ये कृष्णवर्णीय लोकांना साक्ष देण्यासाठी किंवा त्यांची उलट तपासणी करण्यासाठी बोलवत असताना, त्यांच्या नावामागे आदरानं 'मिस्टर' किंवा 'मिसेस'

अशी उपाधी लावली जात नसे. फक्त गोऱ्या लोकांसाठीच हा 'मान' राखून ठेवलेला असे. पण मंडेलानं कृष्णवर्णीय लोकांनाही अशाच पद्धतीनं बोलवायला सुरुवात केली. तसंच, उदारमतवादी गोऱ्या वकिलांशी बोलून त्यांनासुद्धा कृष्णवर्णीय लोकांशी अशाच प्रकारे बोलायची विनंती मंडेलानं केली. त्या वकिलांनी ती विनंती मान्य करताच न्यायालयामध्ये एकच खळबळ माजली. एकीकडे कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळींमध्ये सहभागी होऊन सरकारी नियम तोडणारा माणूस दुसरीकडे वकिली कसा काय करु शकतो, असं म्हणून काही वकिलांनी मंडेलाच्या वकिलीची सनद रद्द करायची मागणी केली. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, दोन गोऱ्या वकिलांनी या खटल्यामध्ये मंडेलाची बाजू लढवली! न्यायाधीशानं मंडेलाच्या बाजूनं निकाल दिला, तेव्हा कृष्णवर्णीय लोकांना अर्थातच खूप आनंद झाला.

मंडेला मुद्दामच अनेक गमतीजमती करे. एकदा एका कृष्णवर्णीय महिलेनं ती घरकाम करत असलेल्या घरातल्या मालकिणीचे कपडे चोरले असल्याच्या आरोपावरून तिच्यावर खटला भरण्यात आला. त्या कृष्णवर्णीय महिलेची बाजू मंडेलानं मांडली. न्यायालयात साक्षीदारांची उलटतपासणी सुरु असताना मंडेलानं त्या चोरलेल्या कपड्यांपैकी असलेली चड्डी आपल्या पेन्सिलच्या टोकावर उचलली. ती चड्डी तशीच नाचवत मंडेला साक्ष द्यायला उभ्या असलेल्या मालकीणबाईजवळ गेला आणि त्यानं तिला 'मॅडम ही तुमचीच चड्डी आहे का?' असं विचारलं. साहजिकच, अत्यंत लज्जित झालेल्या त्या मालकिणीनं मंडेलाच्या प्रश्नाला नकारार्थी उत्तर दिलं आणि त्यामुळे चोरीचं हे प्रकरण खोटं असल्याचा निकाल न्यायाधीशाला तिथेच द्यावा लागला!

1953 साली जोहान्सबर्गमधल्या गोऱ्या लोकांच्या वसाहतींनजीकच्या सोफियाटाऊन नावाच्या कृष्णवर्णीय लोकांच्या वस्तीच्या संदर्भात एक खळबळ माजली. सरकारनं कृष्णवर्णीय लोकांची ही वस्ती हटवून गावाबाहेर न्यायचे बेत आखले. हे समजताच मंडेला इतर लोकांबरोबर तिथे या गोष्टीचा निषेध करण्यासाठी दाखल झाला. जोहान्सबर्गपासून 4 मैल अंतरावर असलेली ही वस्ती पूर्वीपासूनच कृष्णवर्णीय लोकांची होती. मुळात ही जागा गोऱ्या लोकांसाठी राखून ठेवण्यात आल्याचं जाहीर करण्यात आलं होतं. तसंच, तिथे गोऱ्या लोकांसाठी घरंही बांधण्यात आली होती. पण, त्या ठिकाणीच मोठ्या प्रमाणावर केरकचरा जमा केला जात असल्यामुळे, गोऱ्या लोकांनी तिथे राहायला नकार दिला. साहजिकच, ही

जागा आता 'दुय्यम' कृष्णवर्णीय लोकांना देण्यात आली. त्यामुळे 1923 साली नवे वर्णद्वेषी कायदे अमलात येण्यापूर्वी कृष्णवर्णीय लोकांना या भागामध्ये जमीन किंवा घर विकत घ्यायची परवानगी मिळत असे. नंतर जोहान्सबर्गचं मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण होत गेल्यावर सोफियाटाऊनमध्ये कृष्णवर्णीय कामगारांच्या वस्त्या वाढत गेल्या. हा भाग अत्यंत बकाल, अडचणींचा आणि अस्वच्छ असला, तरी कृष्णवर्णीय लोक तिथं नाईलाजानं राहात असत. पण, आता इथून कृष्णवर्णीय लोकांना हटवून दुसऱ्या भागांमध्ये वर्णानुसार लोकांची राहायची व्यवस्था केली जाईल, असं सरकारनं जाहीर केलं. कारण सोफियाटाऊनमध्ये सरकारला दुसरं काहीतरी उभं करायचं होतं.

मंडेलानं इतर कृष्णवर्णीय नेत्यांप्रमाणे सोफियाटाऊनचा मुद्दा लावून धरला, पण तिथे भाषण करता करता मंडेला वाहवत गेला आणि त्यानं बंदोबस्तासाठी जमलेल्या पोलिसांकडे बोट दाखवून 'हे आपले शत्रू आहेत' असं जमलेल्या लोकांना सांगितलं. तसंच, आपल्याला आता दीर्घकाळ शांततामय मार्गानं चळवळ करणं जमणार नसल्याचा उल्लेखही मंडेलानं केला. त्यामुळे एएनसीच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी मंडेलाची चांगली कानउघडणी केली. त्यामुळे मंडेलानं परत एकदा शांततामय मार्गानं सरकारच्या दडपशाहीच्या विरोधात आंदोलन करायचा प्रयत्न केला, पण तो पूर्णपणे निष्फळ ठरला. यातून आपल्यापुढे फक्त सशस्त्र क्रांतीचाच मार्ग उरला आहे, अशी मंडेलाची खात्री होत गेली. यामागची भूमिका आपल्या आत्मचरित्रात मंडेलानं स्पष्ट केली आहे. मंडेलाचा गांधीजींच्या शांततामय आणि अहिंसेच्या मार्गावर चालणाऱ्या चळवळीला पूर्ण पाठिंबा असला, तरी गांधीजींच्या चळवळीला ब्रिटिशांनी फार क्रूरपणे विरोध केला नसल्याचं मंडेलाचं म्हणणं होतं. म्हणूनच गांधीजींची चळवळ अहिंसेच्या मार्गानं चालू शकली, असं मंडेलाला वाटत होतं. दक्षिण आफ्रिकन सरकार मात्र आपल्या अहिंसेच्या मार्गावर सुरू असलेल्या चळवळीला अजिबात दाद देणार नाही आणि स्वत: मोठ्या प्रमाणावर हिंसा करून ही चळवळ दडपून टाकेल, अशी मंडेलाची खात्री होत गेली. म्हणूनच शेवटी अहिंसेचा मार्ग सोडून मंडेलानं सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारायचं ठरवलं. त्यामुळे आता एएनसीनं आखून दिलेल्या चौकटींमध्ये काम करून आणि हिंसात्मक मार्ग टाळून, मंडेलानं आपल्या चळवळीचं कामकाज चालवलं असलं, तरी आपल्या भाषणांमधून मंडेला आपली आक्रमकता दाखवून द्यायचा. त्यामुळे सरकारची आपल्याकडे वक्रदृष्टी फिरेल, अशी भीती एएनसीला वारंवार

जाणवायची.

तांबो आणि मंडेला

काही काळानंतर मंडेला आणि इतर सहकारी यांनी कृष्णवर्णीय लोकांच्या स्वातंत्र्याविषयीचा एक मसूदा तयार केला. त्यात दक्षिण आफ्रिकन सरकारला कृष्णवर्णीय लोकांचे मूलभूत हक्क नाकारायचा, तसंच त्यांना दुय्यम दर्जाची हीन वागणूक देण्याचा कुठलाही अधिकार नसल्याचं म्हटलं होतं. 26 जून 1955 या दिवशी या मसुद्याविषयी चर्चा करण्यासाठी देशभर पसरलेल्या एएनसीच्या प्रतिनिधींची एक बैठक भरली. मंडेलाला या बैठकीला हजर राहण्याची परवानगी नव्हती. 1955 सालच्या डिसेंबर महिन्यात एएनसीच्या वार्षिक सभेमध्ये या मसुद्याविषयी चर्चा करण्यात आली.

दरम्यान दक्षिण आफ्रिकन सरकारनं वर्णद्वेषी धोरणं शाळा-महाविद्यालयं इथेसुद्धा राबवली. सगळीकडे गोऱ्या आणि कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांना वेगळं करण्यात आलं. त्यामुळे चिडून एएनसीच्या पदाधिकाऱ्यांनी कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांनी शाळेतच जाऊ नये असा निर्णय घेतला. त्यासाठी शाळांवर बहिष्कार टाकायचं ठरलं; पण हा निर्णय घेणं सोपं असलं, तरी प्रत्यक्षात अमलात आणणं अवघड असल्याचं मत मंडेलानं व्यक्त केलं. तसंच, जो निर्णय आपण पाळू शकत नाही, तो मुळात घेऊच नये असं त्याचं म्हणणं होतं. एएनसीनं स्वत:च कृष्णवर्णीय मुलांसाठी शाळा सुरु करायचा प्रयत्न केला, पण पोलिसांनी त्यांच्या मार्गात अनेक अडथळे आणले. साहजिकच, या कृष्णवर्णीय मुलांचे पालक हैराण झाले. आपल्या मुलांचं या गोंधळात खूप नुकसान होत असल्याची भावना त्यांना खात होती. शेवटी एएनसीला माघार

घेणं भाग पडलं. शाळांवर बहिष्कार टाकायचा निर्णय एएनसीला रद्द करावा लागला. अर्थातच, एएनसीसाठी ही मोठी मानहानी होती. तसंच, मंडेलाचं म्हणणं खरं होतं हे या प्रसंगानं सिद्ध झालं. मंडेला पूर्वी ज्या महाविद्यालयांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये शिकला, तिथलं मोकळं वातावरण बंद करून सरकारनं तिथेसुद्धा वर्णद्वेषी धोरणं राबवायचं ठरवलं. या धोरणांमुळे लहान मुलं आणि तरुण लोक यांना शिकताना मिळणारे वेगवेगळे अनुभव मिळणार नाहीत, तसंच त्यांचं शिक्षण खऱ्या अर्थानं पूर्ण होणार नाही, असं मंडेलाचं मत झालं आणि ते खरं ठरलं.

या दरम्यान कृष्णवर्णीय नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना सरकार मोठ्या प्रमाणावर अटक करणार असल्याची बातमी पसरली. त्यात काही तथ्य नाही असं काही जण म्हणत असले, तरी सरकारनं त्यादृष्टीनं पावलं उचलली. 5 डिसेंबर 1956 च्या पहाटे मंडेलाला तीन गोऱ्या पोलिसांच्या जोरात दार ठोठावण्यानं जाग आली. मंडेलाच्या घराची तपासणी करायची आणि त्याला अटक करायची परवानगी आपल्याकडे असल्याचं पोलिसांनी सांगितलं. मंडेलावर सरकारच्या विरोधात घातक कट रचण्याचा आरोप ठेवण्यात आला होता. पुढच्या दहा दिवसांमध्ये एएनसीच्या 155 नेत्यांना अशाच प्रकारे याच आरोपांखाली अटक करण्यात आली. मंडेलाला या अटकेमुळे आश्चर्य वाटलं नसलं, तरी त्यातून सुरु झालेला खटला तब्बल पाच वर्षं चालल्यामुळे त्याच्या वकिलीत, तसंच एकूण आयुष्यात एक मोठा अडथळाच निर्माण झाला हे नक्की. सगळ्या आरोपींना जामिनावर मुक्त करून त्यांच्यावरच्या खटल्याची सुनावणी 1957 सालच्या जानेवारी महिन्यात सुरु होईल, असं सांगण्यात आलं. पण जामिनावर सुटका होऊनसुद्धा आरोपींच्या मागची कटकट काही कमी झाली नाही. उलट या लांबलचक खटल्यामुळे त्यांना ना धड मुक्तपणे जगता यायचं; ना धड काही काम नीटपणे करता यायचं.

सोफियाटाऊन

या दरम्यान मंडेलाच्या वैवाहिक आयुष्याची पुरती वाट लागली. हा खटला सुरु असताना मंडेला अर्थातच घरी राहू शकत नसे. एकदा तो बऱ्याच दिवसांनी आपल्या घरी परतला, तर इव्हलिन घर सोडून निघून गेली असल्याचं त्याच्या लक्षात आलं. आधीपासूनच त्यांचे संबंध खूप बिघडत चाललेले असल्यामुळे मंडेलाला या गोष्टीचं फार आश्चर्य वाटलं नाही; पण आता आपल्या तीन मुलांचं काय होणार, याची काळजी मात्र त्याला भेडसावायला लागली. दरम्यान मंडेला काही स्त्रियांबरोबर दिसत असल्यामुळे त्यांच्यापैकी कुणाशी मंडेलाचे प्रेमसंबंध प्रस्थापित होतात का, असं त्याच्या मित्रांना वाटायला लागलं, पण मंडेलाचं मन मात्र त्याच्याहून 16 वर्षांनी तरुण असलेल्या 22 वर्षं वयाच्या विनी नॉमझॅमो मदिकिझेला या सामाजिक कार्यकर्तीनं जिंकलं.

लहानपणी विनी अत्यंत दुराग्रही आणि बंडखोर प्रवृत्तीची होती. आपल्या भावंडांशी ती सतत भांडे. त्यांनी वापरलेले कपडेच आपल्याला घालायला मिळतात, त्यांचीच खेळणी आणि त्यांच्याच इतर वस्तू आपल्याला वापरायला मिळतात, या सगळ्या गोष्टींचा विनीला खूप राग येई. पण, अभ्यासात मात्र विनीचं अजिबात दुर्लक्ष होत नसे. 1953 साली सामाजिक कार्याशी संबंधित असलेले अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळवण्यासाठी विनी जोहान्सबर्गमध्ये दाखल झाली. आपल्या भावाबरोबर तिथे विनी काही राजकीय स्वरूपाच्या बैठकांना जात असली, तरी ती स्वत: राजकारणापासून पूर्णपणे लांब राहायची. एकदा काही कामासाठी ती न्यायालयामध्ये गेलेली असताना नेल्सन मंडेलाची उंच मूर्ती चालत येताना तिला दिसली. तसंच, मंडेलानं तिथे प्रवेश करताच लोकांनी त्याच्या नावाच्या घोषणा दिल्याचंही विनीनं पाहिलं. काही काळानंतर त्या दोघांची ओळख झाली. विनीला बघताच मंडेला तिच्याकडे आकृष्ट झाला आणि काही कारणं सांगून त्यानं तिला आपल्याबरोबर जेवायला बाहेर यायचं आमंत्रण दिलं. लवकरच दोघं एकमेकांच्या प्रेमात पडले.

राजकारणामध्ये अशा प्रकारे खूप मोठ्या प्रमाणावर गुंतत चाललेला, धोकादायक आयुष्य जगणारा आणि कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळींना पुढे न्यायची स्वप्नं बघणारा मंडेला आता विनीकडेही आकर्षित झाला. नेल्सन मंडेला आणि विनी मंडेला यांच्या आयुष्यामधली

वेडीवाकडी वळणं किती भयानक आणि नाट्यमय असतील, याची तेव्हा कुणाला कल्पनाही नसेल. विनीशी मंडेलानं लग्न करू नये, असा सल्ला देणाऱ्या लोकांनाही याचा तेव्हा अंदाज आला नसेल. पण भविष्यात काय होणार आहे हे माहीत असतं, तर मंडेलानं तरी हे पाऊल कशाला उचललं असतं?

चळवळीत फूट

नेल्सन मंडेलाशी लग्न करायचा निर्णय विनीनं घेताच तिच्या कुटुंबात खळबळ माजली. एक तर मंडेला वयानं तिच्याहून खूप मोठा होता आणि दुसरं म्हणजे त्याचं आयुष्य इतकं वादळी असताना त्यात आपण कशाला पडायचं असा त्यांचा प्रश्न होता. मंडेला सतत तुरुंगाच्या आत-बाहेर करणार आणि त्या गदारोळात विनीचीही फरफट होणार, असं विनीच्या घरच्या मंडळींना वाटत होतं. पण, हे सगळं न जुमानता 1958 सालच्या जून महिन्यात एव्हलिनला घटस्फोट दिलेल्या नेल्सन मंडेलाशी विनीनं लग्न केलं. यानंतर आपल्यावर चालवल्या जात असलेल्या खटल्याच्या सुनावणीला मंडेला विनीचा हात हातात घेऊन अगदी ऐटीनं हजर राहात असे. त्यामुळे मंडेला हा एक आरोपी नसून, उलट एखादा 'हीरो' असावा, असाच त्याचा थाट दिसत असे. त्यामुळे दररोज मंडेलाच्या आगमनाची सगळे लोक वाट बघायला लागले!

पण, लवकरच आपल्या पुढ्यात काय वाढून ठेवलं आहे, याची विनीला कल्पना आली. नेल्सन मंडेलाची खूप इच्छा असूनही तो आपल्याला वेळ देऊ शकत नाही, हे काही दिवसांमध्येच तिच्या लक्षात आलं. मंडेलाचा सगळा वेळ राजकारण, समाजकारण, चळवळ, त्याचा खटला या गोष्टींमध्येच जात असे. साहजिकच, नववधू असलेल्या विनीकडे लक्ष द्यायला त्याच्याकडे फारसा वेळच नसे. विनीच्या अपेक्षांची त्याला फारशी फिकीर नसे. त्यातून मार्ग काढण्यासाठी विनीनं स्वत:च राजकारणामध्ये उतरायचं ठरवलं. आपल्या नवऱ्याच्या मोठ्या नावापुढे आपलं नाव अगदी पूर्णपणे झाकोळून जाणं तिला मान्य नव्हतं. त्यामुळे विनीनं स्त्रियांच्या प्रश्नांशी संबंधित असलेल्या चळवळींमध्ये सहभागी व्हायचं ठरवलं. लवकरच ती या संदर्भातल्या बैठकांना हजेरी लावायला लागली आणि आपली मतं हिरिरीनं मांडायला लागली.

एका प्रकरणामध्ये विनीनं कायदा मोडला असल्याच्या कारणावरून, एक पोलीस चौकशीसाठी घरी आलेला असताना विनीनं त्याच्यावर हात उगारला. हे पाहून थक्क झालेला मंडेलाचा एक सहकारी त्याला म्हणाला. 'तू एका कार्यकर्तीशीच लग्न केलं आहेस, तेव्हा असं होणारच.' त्यावर मंडेलाचं उत्तर 'आय हॅव मॅरिड ट्रबल' असं होतं! नंतर आपण तुरुंगात जाण्यासाठी कपडे घालत असताना, हा पोलीस आपल्या बेडरूममध्ये आल्यामुळे आणि आपल्यावर जबरदस्ती करायचा प्रयत्न करत असल्यामुळे आपण त्याला मारल्याचं स्पष्टीकरण

विनीनं दिलं. त्या पोलिसानं विनीवर या प्रकरणातही खटला दाखल केला. त्या खटल्याच्या सुनावणीत विनीनं अत्यंत निर्भयपणे आणि कुणाची भीडभाड न ठेवता अत्यंत स्पष्टपणे साक्ष दिली. हे पाहून सगळे लोक तिच्या बिनधास्तपणामुळे आणि धैर्यामुळे अवाक् झाले होते. न्यायाधीशानंही विनीवरचे आरोप रद्द करून टाकले.

विनीशी विवाहबद्ध

नेल्सन मंडेलाशी लग्न झाल्यावर चार महिन्यांच्या काळातच विनीला दिवस गेले. त्याच सुमाराला जोहान्सबर्गमध्ये सुरु असलेल्या एका सार्वजनिक मोर्च्यामध्ये आपण सहभागी होणार असल्याचं मंडेलाला सांगून विनीनं त्याला मोठा धक्काच दिला. विनीनं असं करु नये म्हणून तिची समजूत घालायचा मंडेलानं खूप प्रयत्न केला, पण विनी आपल्या निर्णयावर ठाम होती. पोलिसांनी या मोर्च्यामध्ये सहभागी झालेल्या इतर हजारो महिलांबरोबर विनीलाही पकडलं आणि त्या सगळ्यांची तुरुंगात रवानगी केली. मंडेलानं विनीसाठी जामीन मिळवून तिची सुटका केली, पण एकूणच मंडेलानं विनीशी लग्न करायला नको होतं, असं मत त्याचे अनेक सहकारी व्यक्त करायला लागले. मंडेलाच्या चळवळीत विनीची मदत होण्याऐवजी तिचा अडथळाच जास्त होत असल्याची भावना वाढली. पण, मंडेला आणि विनी या दोघांच्या वेगळेपणामुळे त्यांची जोडी लोकांच्या चर्चेचा विषय बनली आणि त्याचा दक्षिण आफ्रिकेमधल्या वर्णद्वेषाच्या विरोधातल्या लढ्यामध्ये उपयोगच झाला. मंडेला एकदम शांत आणि कुठलीही नाट्यमयता न आणता बोलणारा आणि त्याच्या जोडीला एकदम आक्रमक रुप धारण करणारी विनी ही जोडी सर्वसामान्य लोकांना आवडायला लागली.

या दरम्यान एएनसीच्या नेत्यांमध्ये गंभीर मतभेद निर्माण झाले. हा लढा फक्त कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांचा असून; त्यात साम्यवादी किंवा भारतीय, तसंच इतर कुठल्या धर्माच्या/ वर्णाच्या/ विचारसरणीच्या लोकांना सहभागी करून घेतलं जाऊ नये, असं एएनसीमधला युवा वर्ग म्हणत होता. गंमत म्हणजे, स्वत: मंडेलाचं मत काही वर्षांपूर्वी असंच होतं, पण अनुभवातून मंडेलाला या मतामधला फोलपणा समजला होता. साहजिकच, या चळवळीचं रूप खऱ्या अर्थानं व्यापक व्हायचं असेल, तर त्यात वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांना सामावून घेतलं पाहिजे, असं मंडेलाचं मत झालं होतं. म्हणूनच, तो आपल्या जुन्या विचारसरणीला फाटा देऊन सगळ्यांना बरोबर न्यायच्या प्रयत्नात होता. मंडेलाच्या विरोधात सुरु असलेल्या खटल्याच्या काळात या बंडखोर लोकांनी आपल्या विचारांना आणखी प्रखर रूप द्यायचा प्रयत्न केला. या दरम्यान 1957 सालच्या अखेरीला मंडेलाच्या काही सहकाऱ्यांवरचे आरोप सरकारनं मागे घेतले. मंडेलाच्या आधीच्या आक्रमक भाषणांमुळे सरकारनं त्याच्याविषयीची आपली कडक भूमिका मात्र बदलली नाही. मंडेला आणि इतर आरोपी यांच्याविरुद्ध पुरेसा पुरावा असल्यामुळे, हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणीसाठी नेता येईल, असं या खटल्याचा न्यायनिवाडा करणाऱ्या न्यायाधीशाला वाटलं. त्यामुळे आपली सुटका व्हायच्या मंडेलाच्या आशा मावळल्या आणि उलट आपली आता तुरुंगात रवानगी होईल, याची त्याला खात्री वाटायला लागली.

दरम्यान एएनसीच्या बंडखोर लोकांनी 'आफ्रिकानिस्ट' नावाचं नियतकालिक सुरु केलं. त्यातून साम्यवाद, मार्क्सवाद, सर्वसमावेशकतेच्या धोरणांनुसार चालवली जाणारी वर्णद्वेषाच्या विरोधातली चळवळ या सगळ्या गोष्टींवर विखारी शब्दांमध्ये टीका केली जात असे. अर्थातच, दक्षिण आफ्रिकेमधल्या गोऱ्या लोकांना हे आयतं कोलीतच मिळालं. वर्णद्वेषाचा पुरस्कार करणाऱ्या वर्तमानपत्रांमध्ये या नियतकालिकामध्ये प्रकाशित होत असलेला भडक स्वरूपाचा मजकूर पुन:प्रकाशित केला जात असे. या बंडखोर आफ्रिकावादी लोकांनी मंडेलावरही खूप टीका केली. तो कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीपेक्षा साम्यवादी, तसंच गोऱ्या लोकांशी आपले संबंध चांगले ठेवण्यालाच जास्त महत्त्व देतो, असं ते म्हणायला लागले. हा संघर्ष वाढत गेला. एएनसीच्या एका बैठकीत मंडेला आणि इतर नेते यांच्या अनुपस्थितीत बंडखोर आफ्रिकावादी लोकांनी त्यांच्यावर खूप टीका केली. तसंच, यानंतर एएनसीनं आयोजित केलेल्या गोऱ्या लोकांच्या निषेधासाठीच्या एका मोर्च्यामध्ये बंडखोर आफ्रिकावादी लोक

सहभागी झालेच नाहीत. त्यामुळे या मोर्च्याचा पुरता फज्जा उडाला. शेवटी एएनसीला आपल्या संघटनेतून आफ्रिकावादी संघटनेचा नेता आणि त्याचे अनुयायी या सगळ्यांना हाकलून द्यावं लागलं, पण त्या नेत्यानं आपण नवी संघटना उभी करत असल्याचं आणि आपणच एएनसीचे रक्षणकर्ते असल्याचं जाहीर केलं. हे एएनसी आणि मंडेला यांच्यापुढचं मोठं आव्हानच होतं. या घटनाक्रमाबद्दल नंतरच्या काळात बोलताना मंडेलानं आपल्याला एएनसीचे अशा प्रकारे दोन तुकडे पडणार, याची कल्पना असल्याचं नमूद केलं. या गोष्टीला आपला इलाज नाही हेही आपल्या लक्षात आलं होतं, असं मत मंडेलानं व्यक्त केलं. पण त्याचबरोबर, आफ्रिकावादी लोकांना एएनसीमधून घालवून देण्यात संबंधित लोकांनी जरा घाईच केली, असंही मंडेलाचं मत पडलं.

आनंदी दिवस

1959 सालच्या एप्रिल महिन्यात आफ्रिकावादी लोकांनी आपला 'पॅन आफ्रिकानिस्ट काँग्रेस (पीएसी)' नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केल्याची घोषणा केली. इतर काही

आफ्रिकन देशांमध्येसुद्धा त्या सुमाराला कृष्णवर्णीयांचा गोऱ्या लोकांच्या विरोधात वर्णद्वेष संपवण्यासंबंधीचा लढा सुरु होता. त्या सगळ्या लोकांना आपले समविचारी मानून, या पक्षानं आपलं कामकाज चालवायचं ठरवलं. साम्यवादाच्या जवळ असलेल्या एएनसीला पर्यायी संघटना उभी राहात असल्याचं अर्थातच अमेरिका आणि युरोप इथल्या परंपरावादी (कॉंझर्व्हेटिव्ह) विचारसरणीच्या लोकांनी स्वागत केलं. दरम्यान, या दोन तुकड्यांना एकत्र करून परत एकदा एएनसीला आपल्या जुन्या ताकदीनिशी उभं करता येईल, अशी आशा मंडेलाला वाटत होती. त्यासाठी तो प्रयत्नही करत होता. कारण पीएसीनं आपल्या जाहीरनाम्यात 'आफ्रिकन लोक आपल्या इतर गटांना अजिबात स्थान देणार नाहीत' असं अत्यंत भडक आणि बेजबाबदारपणाचं वाक्य टाकलं होतं. यामुळे कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीकडे सहानुभूतीपूर्वक नजरेनं बघणारे अनेक चांगले लोक दुखावले जातील, याची मंडेलाला भीती वाटत होती. मंडेलानं पीएसीकडून एएनसीला असलेल्या धोक्याचं पुरतं मूल्यमापन केलं नाही, हे मात्र खरं. कारण काही काळातच एएनसीची ताकद घटत चालली असल्याचं आणि गोऱ्या वर्णद्वेषी लोकांच्या ताकदीमध्ये भर पडत चालल्याचं दिसायला लागलं.

आपल्या मुलासह मंडेला

आपल्या चळवळीला नवं रूप देण्यासाठी एएनसीनं प्रयत्न करून पाहिले. वर्णद्वेषी लोकांकडून वस्तू विकत घ्यायच्या नाहीत, असं त्यांनी ठरवलं. तसंच, आफ्रिकावादी लोकांच्या प्रभावाखाली असलेल्या एका कंपनीनं बनवलेल्या सिगारेट्सवर एएनसीनं बहिष्कार टाकला. कृष्णवर्णीय शेतमजुरांच्या खराब अवस्थेच्या विरोधात एएनसीनं बटाटे खरेदीवरही बहिष्कार टाकला. यातल्या काही गोष्टींना लोकांकडून चांगला प्रतिसाद येत असल्याचं पाहून मंडेलाचा हुरूप जरा वाढला. या दरम्यान 1958 सालच्या सप्टेंबर महिन्यात डॉक्टर हेंड्रिक व्हरवर्ड नावाचा कट्टर वर्णद्वेषी माणूस दक्षिण आफ्रिकेच्या पंतप्रधानपदी आल्यावर कृष्णवर्णीयांच्या विरोधातल्या कारवायांना ऊत येणार असल्याचं भाकीत मंडेलानं केलं. यानंतर प्रत्येक नागरिकाला त्याच्या वर्णानुसार एक परवाना दिला जाणं आणि त्या परवान्याच्या आधारावर त्या नागरिकाला कुठे प्रवेश मिळेल किंवा नाही, तसंच सर्वसामान्य आयुष्यातल्या अनेक सोयीसुविधांपैकी कोणकोणत्या गोष्टींसाठीची परवानगी मिळेल किंवा नाही, असं ठरवलं जाण्याला एएनसीनं विरोध करायचं ठरवलं. पण, एएनसीकडून सगळी लोकप्रियता आपल्याकडे खेचून घेण्यासाठी उत्सुक असलेल्या पीएसीनं त्याआधीच या परवाना पद्धतीच्या विरोधात आक्रमक चळवळ सुरू करायचा बेत जाहीर करून टाकला. साहजिकच, मंडेला वैतागून गेला. एक तर आपल्या योजनेवर अशा प्रकारे डल्ला मारण्यात आलेला बघून त्याला राग आला होता, पण चुकीच्या पद्धतीनं हे आंदोलन करून, पीएसी मोठा प्रश्न निर्माण करणार असल्याचीही त्याला खात्री वाटत होती.

1960 हे 'आफ्रिकेचं वर्ष' असेल, असं काही पत्रकारांनी आधीच जाहीर करून टाकलं होतं. कारण ब्रिटिश, तसंच फ्रेंच वसाहतवादी लोक अनेक दशकांपासून आपलं वर्चस्व स्थापन केलेल्या आफ्रिकन देशांमधून गाशा गुंडाळत होते. पण अर्थातच, याचा फायदा उठवून आता जगावर आपलं साम्राज्य स्थापन करण्यासाठी धडपडत असलेली अमेरिका या आफ्रिकन देशांच्या नेत्यांना सोव्हिएत युनियनच्या विरोधात लढण्यासाठी आपल्या बाजूनं वळवून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत होती. इंग्लंडमध्ये कॉंझर्व्हेटिव्ह पक्षाचं सरकार होतं. ब्रिटिश पंतप्रधान हॅरॉल्ड मॅकमिलन याला बदलत्या परिस्थितीत आपण आफ्रिकन देशांशी कसे संबंध ठेवायला हवेत, याची चाचपणी करायची असल्यामुळे त्यानं आफ्रिकन देशांचा दौरा करायचं ठरवलं. मॅकमिलननं दक्षिण आफ्रिकेतल्या वर्णद्वेषी सरकारच्या बाजूनं किंवा

त्या संदर्भातल्या धोरणांची प्रशंसा करण्याच्या हेतूनं कोणतंही विधान करू नये, असा इशारा देणारं एक पत्र दक्षिण आफ्रिकेमधल्या चार कृष्णवर्णीय नेत्यांनी त्याला पाठवलं. ते लंडनच्या 'ऑब्झर्व्हर' या वर्तमानपत्रात छापूनही आलं. मॅकमिलननं आपल्या दौऱ्याची सुरुवात घाना देशापासून केली. नंतर तो नायजेरिया, ऱ्होडेशिया (आताचा झिम्बाब्वे), न्यासालँड या देशांमध्ये जाऊन दक्षिण आफ्रिकेत आला. तिथली परिस्थिती बघून मॅकमिलनला कडक वर्णद्वेषी कायदे करून सरकार मूर्खपणा करत आहे असं वाटलं. कारण गोरे लोक आणि कृष्णवर्णीय लोक यांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत इतकी मोठी तफावत आहे की, कुठलंही वर्णद्वेषी धोरण न राबवताच गोऱ्या लोकांना आपलं वर्चस्व गाजवणं शक्य आहे, असं मॅकमिलनचं मत बनलं.

दक्षिण आफ्रिकेच्या संसदेसमोरचं मॅकमिलनचं भाषण अत्यंत महत्त्वाचं असणार याची जाणीव असलेल्या त्याच्या सल्लागारांनी त्या भाषणात अनेक वेळा बदल केले. मॅकमिलननं एकही चुकीचं वाक्य उच्चारू नये, याची पूर्ण खबरदारी घेण्यात आली. मॅकमिलननं त्याप्रमाणे समतोल सांभाळत भाषण केलं. त्यात इंग्लंड वर्णद्वेषी धोरणांना पाठिंबा देत नसल्याचं मत मॅकमिलननं अप्रत्यक्षरीत्या मांडून कृष्णवर्णीय लोकांना खूश केलं. या संदर्भातली एक गंमत म्हणजे मॅकमिलन या तणावामुळे इतका गडबडून गेला की, ऐन वेळी भाषणाच्या आधी त्याला अचानकपणे लघुशंकेला जावं लागलं! मॅकमिलननं आपल्यालाही भेटावं अशी अनेक कृष्णवर्णीय नेत्यांची इच्छा होती. पण गोऱ्या दक्षिण आफ्रिकन सरकारनं अर्थातच हे सगळे प्रयत्न हाणून पाडले.

दरम्यान, परवाना पद्धतीच्या विरोधातलं एएनसीचं आंदोलन सुरू व्हायला 10 दिवसांचा अवधी असताना, पीएसीनं आपलं त्याच संदर्भातलं आंदोलन अचानकपणे सुरू केलं. लोकांनी आपापले वर्णद्वेषी परवाने घरीच ठेवावेत आणि त्यामुळे त्यांना पोलिसांनी पकडलं, तर लोकांनी कुठल्याही प्रकारचा विरोध न करता, तसंच दंड न भरता किंवा जामीन न मागता तुरुंगात भरती व्हावं, असं आवाहन पीएसीनं केलं. सगळं करून झाल्यावर या आंदोलनात एएनसीचाही सहभाग असावा, असं मत पीएसीनं मांडलं. पण, हे आंदोलन साफ फसणार आणि मुळात आपल्या आंदोलनातली हवा काढून घेण्यासाठीचा हा एक प्रयत्न आहे, असं एएनसीच्या नेत्यांना वाटत असल्यामुळे त्यांनी या संधिसाधू आंदोलनातून बाहेर राहायचा निर्णय घेतला.

शार्पव्हिलचं प्रकरण

पीएसीचं आंदोलन सुरू झालं. कृष्णवर्णीय लोक पोलीसचौक्यांच्या बाहेर येऊन आपल्याला अटक करायची मागणी करायला लागले. त्यामुळे बिथरलेल्या आणि गोंधळलेल्या पोलिसांनी केपटाऊनमध्ये आणि शार्पव्हिलमध्ये केलेल्या गोळीबारात अनुक्रमे 2 आणि 67 लोक ठार झाले. यामुळे जगभर खळबळ माजली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेनं या घटनेबद्दल दक्षिण आफ्रिकन सरकारला जबाबदार धरलं. अमेरिकेच्या 'परराष्ट्र मंत्रालया'नं या घटनेचा निषेध केला. या घटनांमुळे आपल्यावर हल्ले होऊ शकतात, असं वाटून दक्षिण आफ्रिकेतल्या अनेक गोऱ्या लोकांनी शस्त्रं विकत घ्यायचा किंवा सरळ दुसऱ्या देशामध्ये स्थलांतरित व्हायचे प्रयत्न करायचा निर्णय घेतला. या घटनाक्रमामुळे पीएसीची लोकप्रियता अचानक वाढली. पण तरीही, मंडेलाला त्यात फारसा दम नाही, असं वाटत होतं. ही लोकप्रियता पीएसीची नसून, पोलिसांच्या अत्याचारांच्या विरोधातली आहे, असं त्याचं मत होतं. दरम्यान, अनेक कृष्णवर्णीय लोक आता अगदी उघडपणे पीएसीचं शौर्यगीत गात होते :

We the black people

Are crying out for our land

Which was taken by crooks.

They should leave it alone.

हळूहळू पीएसीच्या नेत्यांनी धाडसी निर्णय घेऊन आपल्यावर मात केली असल्याची जाणीव मंडेला आणि एएनसीचे इतर नेते यांना झाली. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी आणि आपला ढासळणारा बुरूज सावरण्यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. त्यातून एएनसीच्या नेत्यांनी आपापले परवाने जाहीरपणे जाळून टाकावेत आणि आपल्या आंदोलनाची तुतारी फुंकावी असं ठरलं. तसंच, शार्पव्हिलमधल्या पोलिसांच्या क्रूर कृत्यांच्या विरोधात एक दिवस बंद पुकारून, कामगारांनी घरीच बसावं यासाठीचं आवाहन करायचंही ठरलं. परवाने जाळायच्या कार्यक्रमाला साम्यवाद्यांचा विरोध होता. कारण याला सरकार आक्रमक उत्तर देईल आणि परिस्थिती चिघळेल, अशी भीती त्यांना वाटत होती. पण, आता अशा प्रकारच्या हालचाली केल्याशिवाय गत्यंतर नाही, असं म्हणून एएनसीच्या नेत्यांनी आपला कार्यक्रम पुढे न्यायचं ठरवलं. या आंदोलनानंतर सरकारचा कणखरपणा कमी होत असल्याची पहिली चिन्हं दिसायला लागली. एएनसीच्या नेत्यांनी आपापले परवाने जाळल्यावर, परवाने आपल्याबरोबर न आणलेल्या लोकांना अटक करायची कारवाई आपण थांबवत असल्याचं जाहीर केलं. आता आंदोलनाची सूत्रं पीएसीकडून आपल्या हातात आली असल्याची मंडेलाला खात्री वाटत होती.

अशा रितीनं वर्णद्वेषाच्या विरोधात लढणाऱ्या एएनसीचेच दोन तुकडे पडल्यामुळे मंडेलाचं काम अवघड झालं. कधी पीएसी एएनसीवर मात करायची, तर कधी एएनसी वरचढ ठरायची. यात नुकसान अर्थातच कृष्णवर्णीयांचंच होत होतं. वर्णद्वेषी दक्षिण आफ्रिकेच्या दृष्टीनं ही आनंदाची बातमीच होती. त्यामुळे एकसंध एएनसीच्या विरोधात जुलमी कारवाया करण्यापेक्षा एएनसी आणि पीएसी यांना एकमेकांशी झुंजवत ठेवण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरु झाले. ही सगळी डोकेदुखी कशी दूर करायची हा प्रश्न मंडेला आणि एएनसीचे इतर नेते यांना सोडवणं भाग होतं!

भूमिगत क्रांतिकारी!

पीएसीच्या कारवायांमुळे कृष्णवर्णीयांच्या चळवळीत पडलेली फूट वाढत होती. एएनसीची काळजी यामुळे वाढत होती. मंडेलाही चिंतेतच होता. 30 मार्च 1960 या दिवशी पीएसीनं केपटाऊन या आपल्या ताकदीच्या भागात बंद पुकारला. तो मोडून काढण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर केला. त्याच्या निषेधार्थ 30 हजार कृष्णवर्णीय कामगारांनी एक शांततामय मोर्चा उत्स्फूर्तपणे काढला. याचं नेतृत्व फक्त 23 वर्षं वय असलेल्या एका प्रभावी तरुणानं केलं होतं. मोर्चा मुख्य ठिकाणी पोहोचताच त्याची न्यायनिवाडा खात्याच्या मंत्र्याशी चर्चा घडवून आणण्यात येईल, असं पोलिसांनी आश्वासन दिल्यामुळे हा मोर्चा थांबला. पण, प्रत्यक्षात या तरुणाची फसवणूक करून पोलिसांनी त्याला 9 महिने कैदेत टाकलं! तसं झालं नसतं, तर इथेच हे आंदोलन प्रचंड वेगानं पेटून त्याचं क्रांतीमध्ये रुपांतर झालं असतं, असं काही जणांचं म्हणणं आहे. कारण हे आंदोलन थांबवण्यासाठी पोलिसांपुढे बळाचा वापर करण्यावाचून दुसरा पर्यायच नव्हता आणि अशा परिस्थितीत शार्पव्हिलच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्यांदा असा प्रकार घडल्यावर अख्खा देशच पेटला असता.

पण पोलिसांनी चलाखीनं संचारबंदी लागू करून, पीएसी; तसंच एएनसी यांच्या 2000 लोकांना आपल्या ताब्यात घेऊन टाकलं. मंडेला आणि इतर काही कार्यकर्ते यांनी अटकेला सामोरं जायचं, पण इतर काही कार्यकर्त्यांनी भूमिगत व्हायचं, असा एएनसीचा आधीपासूनच डाव ठरलेला होता. त्यानुसार मंडेलाला अटक झाली. अत्यंत कुबट आणि घाणेरड्या जागेत इतर 50 लोकांबरोबर मंडेलाला रात्रभर डांबून ठेवण्यात आलं. तिथे फक्त उभं राहाण्यापुरती जागा होती. खाणंपिणं किंवा अंथरूण-पांघरूण यांचा अर्थातच प्रश्नच नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी या लोकांना साधारण 18 चौरस फूट इतक्या आकाराच्या खोलीत ठेवण्यात आलं. तिथे जमिनीलाच एक भोक पाडण्यात आलेलं होतं. तोच तिथला मलमूत्र विसर्जित करायचा एकमेव मार्ग होता! तसंच, तिथल्या तुरुंग अधिकाऱ्याच्या मनात येईल, तेव्हाच तो 'फ्लश' करत असे. अन्नच काय; पण प्यायचं पाणीसुद्धा दुपारी 3 वाजेपर्यंत उपलब्ध नव्हतं.

दरम्यान, सरकारनं आपल्या विरोधातलं आंदोलन भलतंच वाढत चाललं असल्याचं लक्षात घेऊन, आक्रमक व्हायचं ठरवलं. विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन एएनसी, तसंच पीएसी या

दोन्ही संघटनांवर बंदी घालण्यात आली. पुढची 30 वर्षं ही बंदी टिकली! दरम्यान, 9 एप्रिल 1960 या दिवशी एका सभेत दक्षिण आफ्रिकेचा पंतप्रधान डॉक्टर व्हरवर्ड याच्यावर एका गोऱ्या शेतकऱ्यानं गोळी मारून त्याला जखमी केलं. त्यामुळे आधीच प्रचंड अफरातफरीचं वातावरण असलेल्या दक्षिण आफ्रिकेत अजूनच गोंधळ निर्माण झाला, पण हे वातावरण फार काळ टिकलं नाही. व्हरवर्ड आपल्या दुखापतींमधून पूर्ण बरा झाला आणि त्यानं आणखी टोकाची भूमिका घ्यायला सुरुवात केली. या दरम्यान आपापले परवाने भावनांच्या भरात जाळून टाकलेल्या लोकांना पश्चात्ताप व्हायला लागला. कारण या परवान्यांशिवाय त्यांना आपली पेन्शन, रेशन, बँका किंवा पोस्ट ऑफिसमध्ये गुंतवलेले पैसे यातल्या कुठल्याच सुविधा मिळेनाशा झाल्या. त्यामुळे अनेकांनी नव्यानं परवाने मिळवण्यासाठी अर्ज दाखल केले!

शार्पव्हिलमध्ये सुरु झालेलं आंदोलन क्रांतीचं रूप धारण न करता बारगळत असल्याची एएनसी, तसंच पीएसी या दोन्ही संघटनांना जाणीव झाली. दक्षिण आफ्रिकेमधलं वर्णद्वेषाचं वातावरण इतक्या सहजपणे मोडून काढणं शक्य नाही, हे त्यांना पुरेपूर पटलं. आपल्यापुढचा मार्ग प्रदीर्घ आणि अनेक अडचणींनी भरलेला आहे हे त्यांना नीट समजलं. मंडेला आणि इतर लोक यांच्यावरचा जुना खटला चालूच होता! त्यामुळे मंडेला दिवसा न्यायालयात, रात्री तुरुंगात आणि शनिवार-रविवारी आपल्या वकिलीच्या कार्यालयात असा विचित्र अवस्थेत होता. या दरम्यान मंडेला आणि त्याच्या तीसेक सहकाऱ्यांतर्फे खटला चालवणाऱ्या वकिलांनी संचारबंदीची स्थिती असताना आपल्याला हा खटला चालवणं शक्य नसल्याचं सांगून टाकलं. त्यामुळे हा खटला चालवायची जबाबदारी मंडेला आणि त्या तीस लोकांपैकी वकील असलेला दुसरा एक माणूस यांच्यावर येऊन पडली. पण, 1960 सालच्या ऑगस्ट महिन्यात संचारबंदी हटवण्यात आल्यामुळे मूळ वकील परतले. तेव्हा मंडेलाच्या साक्षीची वेळ आली होती.

आपल्या साक्षीच्या वेळी अत्यंत प्रभावी ठरलेल्या बचावामध्ये मंडेलानं आपली पूर्वीची आफ्रिकावादाची आणि आताची सर्वसमावेशक भूमिका मांडली. आपण अहिंसेच्या मार्गावर चालू इच्छितो, असं मंडेलानं सांगितलं. तसंच, आपल्याला कुठलीही क्रांती घाईनं घडवून आणायची नसून, एएनसीला लोकांनी योग्य वेगानं पाठिंबा देत देत दक्षिण आफ्रिकेत समानतेचं राज्य आणायचं असल्याचं मतही मंडेलानं व्यक्त केलं. हंगेरी, चीन, तसंच रशिया यांसारख्या देशांमध्ये असतो, तसा वर्गहीन समाज आपल्याला घडवायचा आहे, असं सांगून त्याचबरोबर

काहीही केलं तरी देशात कामगार, शेतकरी, दुकानदार, बुद्धिवादी असे वर्ग पडणारच, याची जाणीव असल्याचं मत मंडेलानं व्यक्त केलं. कुठल्याही प्रकारच्या अन्यायी वर्चस्ववादाच्या आपण संपूर्ण विरोधात असल्याचं मंडेलानं जाहीर केलं. याचबरोबर आपला भांडवलशाहीलाही विरोध असला, तरी भांडवलशाही आणि वर्चस्ववाद यांचा परस्परसंबंध असतो का, हे आपल्याला अजून पूर्णपणे कळलं नसल्याचं मंडेलानं मोकळेपणानं मान्य केलं. दक्षिण आफ्रिकन सरकार अगदी उघडपणे जहाल फॅसिस्ट मतप्रणालीकडे झुकत असल्याचा आरोप मंडेलानं केला. हजारो आफ्रिकन लोकांना ठार मारायला हे सरकार मागेपुढे पाहणार नाही, असं सांगून निदान शार्पव्हिलच्या घटनेमुळे सरकार काही धडा शिकलं असेल, अशी आपल्याला आशा वाटते असं मंडेलानं सांगितलं. देशातल्या, तसंच देशाबाहेरच्या शक्ती सरकारला या चुकीच्या मार्गावरून योग्य मार्गावर नेण्यासाठी प्रयत्न करतील, असा आशावादही मंडेलानं प्रकट केला.

याच खटल्याच्या दरम्यान विरोधी पक्षाच्या वकिलानं मंडेलाला तो साम्यवादी विचारसरणीचा आहे का, असं विचारलं. त्यावर 'साम्यवादी म्हणजे नक्की कुणाला म्हणायचं यावर ते अवलंबून आहे... जर कम्युनिस्ट पक्षाचा सदस्य असणं; तसंच मार्क्स, एंगल्स, लेनिन, स्टॅलिन यांच्या विचारसरणीनुसार वागणं आणि पक्षाचा आदेश नेहमी मानणं म्हणजे साम्यवादी असा अर्थ असेल तर मी तसा नाही...' असं मंडेलानं उत्तर दिलं. पण मंडेला पूर्णपणे साम्यवादी विचारसरणीनं भारून गेला होता, असं त्याचे अनेक जवळचे सहकारी मानायचे. गुप्तपणे त्यानं कम्युनिस्ट पक्षाचं सदस्यत्व स्वीकारलं असावं, अशीही काही जणांची समजूत होती. तसंच, सरकारनं एएनसीवर बंदी घातल्यामुळे मंडेला साम्यवादाच्या आणखी जवळ आला. साम्यवाद्यांवरही अशाच प्रकारची बंदी घातलेली असल्यामुळे या दोन्ही संघटना भूमिगत राहून आपलं काम करायला लागल्या.

देशातली परिस्थिती गंभीर होत चाललेली पाहून ऑलिव्हर तांबो या मंडेलाच्या जुन्या सहकाऱ्यानं आपला मुक्काम घानामध्ये हलवला. तिथून तो एएनसीचं कामकाज गुप्तपणे चालवायला लागला. याचा मंडेलाला राजकीयदृष्ट्या खूप फायदा झाला. पण त्याचबरोबर, याच तांबोबरोबर मंडेलाची वकिली संयुक्तपणे सुरू असल्यामुळे आता त्या कामाची सगळी जबाबदारी मंडेलावर आली. पण, लवकरच राजकीय परिस्थितीमुळे स्वत: मंडेलावर भूमिगत

व्हायची वेळ आली आणि त्यानं आपला वकिली व्यवसाय कायमचाच गुंडाळून टाकला.

ब्रिटिशांच्या वर्णद्वेषाच्या विरोधातल्या हस्तक्षेपांमुळे वर्णद्वेषी दक्षिण आफ्रिकन सरकार वैतागून गेलं होतं. त्यामुळे आपण ब्रिटिश 'कॉमनवेल्थ'च्या बाहेर पडावं, असं सरकारला वाटत होतं. 1960 साली दक्षिण आफ्रिकेचा पंतप्रधान व्हरवूड यानं आधी ठरलं होतं, त्यानुसार फक्त गोऱ्या लोकांसाठी असलेल्या एका मतदानामध्ये 'दक्षिण आफ्रिकेला प्रजासत्ताक म्हणून घोषित केलं जावं का?' असा प्रश्न विचारला. 8.50 लाख लोकांनी त्याचं होकारात्मक उत्तर दिलं, तर 7.75 लोकांनी नकारात्मक उत्तर दिलं. त्यामुळे अगदी अल्पमतानं हा प्रश्न निकालात निघाला. अर्थात, म्हणून देशाच्या कारभारामध्ये किंवा लोकांच्या परिस्थितीत कसलाही फरक पडणार नाही, अशी खात्री मंडेलाला वाटत होती.

दरम्यान, मंडेलाची वैयक्तिक परिस्थिती अगदी खराब झाली होती. एएनसीवरच्या बंदीमुळे अनेक सहकारी आणि कार्यकर्ते निष्क्रिय तरी झाले होते किंवा भूमिगत होते. मंडेला कफल्लक झाला होता. सततच्या अस्थिर वातावरणामुळे मंडेला कुटुंबातही कधीच सुख-शांती हे नसायचं. अधूनमधून मंडेला भूमिगत असायचा. छान दाढी केलेला चेहरा आणि मधोमध भांग पाडलेलं त्याचं डोकं, असा अगदी व्यवस्थित राहाणारा मंडेला आता दाढी-मिश्या वाढवायचा. त्याचे डोळेही खोल गेले होते. तरीही, मंडेलानं आशा सोडली नव्हती. सगळ्या वर्णांच्या लोकांची एक बैठक बोलवायचे बेत मंडेला आणि त्याच्या सहकाऱ्यांनी 1960 सालच्या अखेरीला आखले. पोलिसांच्या धाडीमुळे थोडेफार बेत फिस्कटले असले, तरी भूमिगत राहून मंडेला आणि त्याच्या सहकाऱ्यांनी देशामध्ये इतरत्र फिरून या बैठकीसाठी लोकांना आमंत्रित करायचे खूप प्रयत्न केले. खरं म्हणजे, या बैठकीला कधी नव्हे ते एएनसी आणि पीएसी एकत्र यायची दाट शक्यता होती. पण, नंतर मंडेलालाच कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीचा नेता ठरवायच्या कल्पनेतून हा सगळा खटाटोप चालू असल्याचा आरोप करून, पीएसीनं यात सहभागी न व्हायचा निर्णय घेतला. 22 मार्च 1961 या दिवशी नताल प्रांताच्या एका गावात होणाऱ्या या परिषदेचा वास सरकारला लागलाच. त्यामुळे सरकारनं धाडी टाकून अनेक नेत्यांना अटक केली. तरीही ही परिषद ठरल्याप्रमाणे पार पडली.

मंडेला पारंपारिक वेषात

या परिषदेला वेगवेगळ्या 145 संघटनांचे एकंदर 1400 प्रतिनिधी जमले. परिषदेवर एएनसीचं वर्चस्व असल्याचं अगदी स्पष्टपणे दिसून येत होतं. अत्यंत यशस्वी ठरलेल्या या परिषदेचं वर्णन 'न्यूयॉर्क टाईम्स'नं 'दक्षिण आफ्रिकेत भरलेली कृष्णवर्णीय लोकांची आजवरची सगळ्यात मोठी परिषद' असं केलं. योगायोगाची गोष्ट म्हणजे, मंडेलावर सरकारनं घातलेली बंदी नेमकी या परिषदेच्या आधी संपली होती. तसंच, मंडेलावर सुरु असलेल्या खटल्यामध्येसुद्धा काही काळ स्थगिती आली होती. त्यामुळे या परिषदेच्या शेवटच्या सत्रात अगदी नाट्यमयरीत्या सूट घातलेला आणि छोटी दाढी वाढवलेला मंडेला भाषण द्यायला हजर झाला, तेव्हा एकदम सनसनाटीचं वातावरण पसरलं! 1952 सालानंतर मंडेलाचं हे पहिलंच जाहीर भाषण होतं. उपस्थितांनी मंडेलाचं जोरदार स्वागत केलं. आपल्या भाषणात मंडेलानं परत एकदा गोऱ्या वर्णद्वेषाच्या आणि वर्चस्ववादाच्या विरोधात सगळ्या प्रकारच्या लोकांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसंच, ही परिषद त्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाची असल्याचं मतही मंडेलानं मांडलं.

या परिषदेमध्ये सरकारला सगळ्या लोकांची भूमिका समजून घेण्यासाठी एक चर्चासत्र आयोजित करण्यासाठी सांगावं, असा ठराव संमत करण्यात आला. सरकारनं याला नकार दिला, तर 31 मे 1961 या दिवसापासून आंदोलन सुरु करायचा निर्णय घेण्यात आला. अशा जाहीर आंदोलनांवर सरकारनं बंदी घातली असली, तरी घरबसल्या हे आंदोलन सुरु करण्यापासून सरकार मंडेलाला रोखू शकणार नव्हतं. हे जाहीर करून जितक्या नाट्यमयरीत्या

आणि अचानकपणे मंडेला या परिषदेमध्ये अवतरला होता, तितक्याच अनपेक्षितपणे तो तिथून गायब झाला. यानंतर तब्बल 29 वर्षं मंडेला दक्षिण आफ्रिकेमध्ये कुठल्याच जाहीर कार्यक्रमात सहभागी होऊ शकणार नव्हता!

दरम्यान, काही दिवसांनी मंडेला आणि त्याचे सहकारी यांच्यावर चालवला जाणारा खटला पूर्णपणे संपायच्या आतच अचानकपणे न्यायाधीशांनी आरोपींवरचे आरोप सिद्ध होत नसल्याचा निकाल जाहीर केला. त्यामुळे मंडेला आणि त्याचे सहकारी आनंदानं बेभान झाले. सगळ्यांनी मंडेलाला आपल्या खांद्यांवर उचलून घेतलं आणि जल्लोष केला! पण, या न्यायाधीशांनी आपल्या सदसद्विवेकबुद्धीशी प्रामाणिक राहून हा निर्णय घेतला असला, तरी सरकार मात्र त्यामुळे प्रचंड भडकणार आणि कुठल्या ना कुठल्या मार्गानं आपल्या वाटेत परत खूप अडचणी निर्माण करणार, याची मंडेलाला जाणीव होती. त्यामुळे आपण भूमिगत व्हायचं, असं त्यानं ठरवलं. भूमिगत राहून मंडेलानं आपलं काम सुरू ठेवलं. दरम्यान इथून पुढची चळवळ अधिक रक्तरंजित असायला हवी, असं काही आक्रमक नेत्यांचं म्हणणं असलं, तरी मंडेलानं मात्र आपण शांततापूर्ण मार्गानंच पुढे जात राहिलं पाहिजे, असा आग्रह धरला.

दक्षिण आफ्रिकेच्या प्रजासत्ताक दिनी संप आयोजित करायचं एएनसीनं ठरवलं. सरकारनं या सगळ्या चळवळींचा लागेल तेवढी ताकद वापरून बीमोड करायचं ठरवलं होतं. त्यामुळे संप आणि निदर्शनं सुरू झाल्यावर सरकारनं रणगाडे, हेलिकॉप्टर्स अशा गोष्टींचा पोलिसी आणि लष्करी मदतीच्या जोडीनं वापर केला. एएनसीला पाठिंबा मिळू नये; म्हणून पीएसीनं सरकारची बाजू घेत लोकांना संप न करायचं आणि नेहमीप्रमाणे कामावर जायचं आवाहन केलं. या संपाला जनतेनं जोरदार पाठिंबा दिला, पण भूमिगत झालेल्या मंडेलाला त्याविषयी फार माहिती मिळाली नाही. एका दिवसाच्या संपानंतर तो मागे घ्यायचा निर्णय त्यानं जाहीर केल्यामुळे सरकारनं या संदर्भात आपलाच विजय झाल्याची तुतारी फुंकली.

या काळात प्रथमच मंडेलानं जाहीरपणे शांततामय आंदोलनांचा काळ संपुष्टात आल्याचं आणि इथून पुढे आपल्याला सशस्त्र क्रांती घडवून आणण्याशिवाय दुसरा मार्ग समोर दिसत नसल्याचं मत मांडायला सुरुवात केली. एएनसीच्या एका बैठकीत मंडेलानं या संदर्भात आपले विचार मांडले. एएनसीमधल्या काही लोकांनी मंडेलाला विरोध केला, पण त्याचं म्हणणं काही काळानंतर मान्य केलं. त्यानंतर मंडेलानं आपले विचार आपल्या मिश्रवर्णीय, गोऱ्या, तसंच

भारतीय वंशाच्या लोकांसमोर मांडले. त्यांच्यापैकी गांधीजींच्या अहिंसेच्या वाटेवर चालायचा निर्धार केलेल्या भारतीय लोकांनी मंडेलाच्या हिंसक मार्गानं चळवळ पुढे न्यायच्या कल्पनेला सगळ्यात जास्त विरोध केला. हिंसेच्या मार्गावर जाण्यापेक्षा एएनसीनं आपलं राजकीय सामर्थ्य वाढवण्यासाठीच्या चळवळीवर भर दिला पाहिजे, असं मत त्यांनी मांडलं. नंतरच्या काळात हे मत अगदी बरोबर ठरल्याची कबुली मंडेलानं दिली. शेवटी मंडेलाच्या नेतृत्वाखाली 'Umkhonto we Sizwe (एमके)' (याचा अर्थ 'Spear of the Nation') नावाची एक आक्रमक संघटना उभी करायची आणि तिचं कामकाज एएनसीच्या कामापासून वेगळं ठेवायचं, असा निर्णय घेण्यात आला.

या घटनेमुळे अचानकपणे मंडेला लढवय्या क्रांतिकारी झाला. शांततामय मार्गानं चळवळ करणारा नेता, अशी मंडेलाची असलेली प्रतिमा रातोरात बदलली. 26 जून हा आपला 'स्वातंत्र्य दिन' असल्याचं जाहीर करून, मंडेलानं आपण आता सरकारला आपलं कामकाज चालवणं अशक्य करणार असल्याची घोषणा केली. सरकारनं लगेच मंडेलाच्या अटकेसाठी वॉरंट जारी केला, पण आता आपण पूर्वीसारखे शांततामय मार्गानं सरकारच्या हाती स्वत:हून लागणार नसल्याचं मंडेलानं सांगितलं. आपल्याच देशात आपल्याला परका असल्यासारखं राहावं लागणं, गरिबी आणि इतर अनेक अडचणी सोसाव्या लागणं, आपल्या लाडक्या कुटुंबापासून दूर राहावं लागणं, आपला व्यवसाय बंद करावा लागणं हे सगळं सहन करायला आपण तयार असल्याचं मंडेलानं जाहीर केलं. पहिले काही आठवडे मंडेलानं जोहान्सबर्गमधल्या काही भारतीय लोकांच्या घरी लपून काढले. एएनसीच्या गुप्त बैठकांना तो अधूनमधून हजेरी लावत असे. बहुतेक वेळा मंडेला ड्रायव्हरचा वेष घालून वावरे. व्यायाम करायला म्हणून बाहेर पळायला जाणं शक्य नसल्यामुळे दररोज पहाटे 4.30 वाजता मंडेला जागीच 'पळायचा व्यायाम' करे! या काळात मंडेलानं प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाचन केलं. विशेषत: युद्ध, गनिमी काव्यानं लढणं अशा गोष्टींशी संबंधित असलेलं वाचन मंडेला मोठ्या प्रमाणावर करत असे. स्वातंत्र्यासाठी ठिकठिकाणी घडलेल्या क्रांतिकारी चळवळींविषयी जाणून घ्यायला तो खूप उत्सुक असे.

एक साधासुधा तरुण ते चळवळीत भाग घेणारा धडपड्या तरुण, असा प्रवास केलेला मंडेला आता चक्क क्रांतिकारी लोकांप्रमाणे वेगवेगळी धाडसं करत होता. भूमिगत राहून आपली चळवळ चालवायची स्वप्नं बघत होता. तो हिंसेचंही समर्थन करत होता. हा प्रवास

आपल्याला वर्णद्वेषाच्या समाप्तीकडे लवकरच घेऊन जाईल, असा स्वप्नाळू आशावाद तो बाळगून होता, पण लवकरच हे सगळं प्रकरण वाटतं तितकं सोपं किंवा सरळ नाही, याची मंडेलाला जाणीव होणार होती!

सशस्त्र क्रांती ते तुरुंगवास

मंडेलानं आक्रमक धोरण स्वीकारून वर्णद्वेषाच्या विरोधात लढायचं ठरवलं, त्या काळात जगभरात अनेक क्रांतिकारी लोकांचा लढा यशस्वी ठरायची चिन्हं दिसत होती. कदाचित त्यामुळेसुद्धा मंडेलाला हातात शस्त्रं घ्यावी, असं वाटलं असावं. चीनमध्ये माओ, अल्जेरियामध्ये बेन बेला, क्युबामध्ये फिडेल कॅस्ट्रो अशा अनेक लोकांनी प्रस्थापितांविरुद्ध जोरदार लढा देऊन बाजी मारली होती. अनेक आफ्रिकन देशांमध्येही क्रांतीचे वारे वाहत होते. मंडेलानं त्या सगळ्यांविषयी जाणून घ्यायची खूप धडपड केली. मंडेला आणि त्याचे सहकारी यांच्यावर सगळ्यात मोठा परिणाम क्युबामधल्या क्रांतीनं घडवला. फिडेल कॅस्ट्रो, चे गुव्हेरा आणि त्यांच्या बोटीमधून वाचलेले मूठभर साथीदार या लोकांनी जेमतेम दीड वर्षाच्या काळात तब्बल 10 हजार जणांची गनिमी काव्यानं लढणारी सेना कशी उभी केली आणि क्युबामधल्या बतिस्ता सरकारला कसं नामोहरम केलं, याची कहाणी वाचून ते सगळे थक्क झाले. आपणही दक्षिण आफ्रिकेत असा थरारक उठाव घडवून आणू शकतो, असा विश्वास मंडेला आणि त्याचे सहकारी यांना वाटायला लागला. कॅस्ट्रोविषयी मंडेलाच्या मनात प्रचंड आदराची भावना निर्माण झाली.

नाईलाजानं एका फ्लॅटमध्ये बंदिस्त वातावरणात भूमिगत राहायची सवय नसलेला मंडेला या काळात आपले सहकारी, तसंच आपलं कुटुंब यांच्या आठवणीनं भावनाविवश व्हायचा. विशेषत: विनीचं नाव निघताच त्याच्या डोळ्यांमध्ये अश्रूच उभे राहायचे. अधूनमधून विनी खूप खटपट करून मंडेलाला भेटायला यायची. पण अर्थातच, सरकारचं तिच्यावरही बारकाईनं लक्ष असल्यामुळे अनेक मार्ग बदलून आणि पोलिसांना गाफील ठेवूनच हे शक्य असे. अधूनमधून मंडेलाविषयी संशय व्यक्त करणारी माणसं आढळली की, त्यांना मंडेलाचा ठावाठिकाणा लागू नये; म्हणून त्याला दुसरीकडे नेलं जाई. मंडेला गायब असल्याविषयी वर्तमानपत्रांमध्ये वारंवार छापून येत असल्यामुळे, तसंच त्या बातम्यांमध्ये मंडेलाचं छायाचित्र छापलेलं असल्यामुळे काही जणांना त्याच्याबद्दल समजे.

आपल्या आक्रमक हालचालींना मूर्त रूप देण्यासाठी मंडेला काही लोकांना आपल्या संघटनेच्या कामात सहभागी करून घ्यायच्या धडपडीतसुद्धा गुंतलेला असे. कम्युनिस्ट पक्षाकडे अशा प्रकारचे घातपात करू शकणारे लोक होते. त्यांना मंडेलानं आपल्या टोळीत सहभागी

करून घेतलं, पण या सगळ्या लोकांना हत्यारं वापरायचं अगदी जुजबी ज्ञान होतं. तसंच, त्यांच्यापैकी कुणाकडे साधं पिस्तुलसुद्धा नव्हतं! त्यामुळे आक्रमक संघटना बांधायचे सुरुवातीचे सगळे प्रयत्न तरी अगदी बालिश स्वरूपाचेच होते. मंडेलानं या दरम्यान आपला मुक्काम जरा आरामशीर जागेत हलवला. तिथे तो आधीप्रमाणे कोंडल्यासारख्या अवस्थेत नसे. त्याला जरा इकडेतिकडे फिरायला मोकळीक मिळाली. पण तरीही, दक्षिण आफ्रिकेमधला 'मोस्ट वॉंटेड' असूनसुद्धा मंडेलाला त्याचं म्हणावं तितकं गांभीर्य नसे. तो अनेक धोके पत्करे.

या संदर्भातलं एक भाष्य अगदी सुंदर आहे. आपण सरकारला फसवून भूमिगत राहू शकतो आणि तरीही यशस्वीपणे सरकारच्या विरोधात कट रचू शकतो, या गोष्टीची अनेकदा भूमिगत नेत्यांना धुंद चढते, असं म्हटलं जातं. त्यातून आपल्याला कुणी हात लावू शकणार नाही किंवा आपण कधीच पकडले जाऊ शकणार नाही, असा फाजील आत्मविश्वास या नेत्यांमध्ये निर्माण होतो. तसंच, या सगळ्या गोष्टी करत असताना अधिकाधिक धाडसं करायची, तसंच सगळ्यांना थक्क करून सोडण्यासारख्या कारवाया करायची एक वेगळीच नशा त्या नेत्यांमध्ये निर्माण होते. त्यामुळे ते कमालीची साहसं करायला लागतात. या फाजील आत्मविश्वासामुळेच त्यांचा एके दिवशी घात होतो.

भूमिगत असताना वेषांतर करून मंडेला दक्षिण आफ्रिकेत सगळीकडे फिरला. सर्वसामान्य लोकांकडून मिळणारा पाठिंबा त्याला प्रत्यक्ष अनुभवायचा असे. हळूहळू मंडेलाच्या 'एमके' संघटनेनं विध्वंसी कारवाया करायला सुरुवात केली. प्रारंभी या कारवाया आपण केल्या असल्याचं या संघटनेनं नाकारलं. पण तरीही, गोऱ्या लोकांवर हिंसक कारवाया सुरू झाल्यावर गोऱ्या वर्चस्ववाद्यांचा या कारवाया ठेचून काढायचा निर्धार अजूनच पक्का होत गेला. वर्णद्वेषी भावना आणखी तीव्र झाल्या. त्यामुळे त्या सुमाराला झालेल्या निवडणुकांमध्ये वर्णद्वेषाच्या बाबतीत सगळ्यात कट्टर भूमिका घेणारा 'नॅशनलिस्ट पार्टी' पक्ष प्रथमच अगदी स्पष्ट बहुमतानं निवडून आला.

नोबेल पुरस्कार विजेता लुथुली (उजवीकडे)

16 डिसेंबर हा दिवस 1838 सालच्या घटनांमुळे दक्षिण आफ्रिकेत प्रसिद्ध आहे. कारण त्या दिवशी आफ्रिकन लोकांनी आपल्यावर वर्चस्व गाजवू पाहाणाऱ्या झुलू लोकांवर हिंसक कारवाया केल्या होत्या. हा मुहूर्त साधून, 16 डिसेंबर 1961 या दिवशी एमकेनं जोहान्सबर्ग, पोर्ट एलिझाबेथ आणि डर्बन या शहरांमध्ये स्फोट घडवून आणले. या स्फोटांची तीव्रता अगदी कमी असली, तरी त्यामुळे एमकेचं नाव पसरायला मदत झाली. आदल्या रात्री एमके संघटनेविषयीची माहिती देणारी पत्रकं एएनसीनं वाटली होती. पण, पोलिसांनी त्यांचा ठावठिकाणा लावून ती फाडून टाकली होती. त्यामुळे या घटनांनंतर एमकेला अपेक्षित होती, तशी प्रसिद्धी मिळाली नाही. पण तरीही, मंडेला खुशीत होता. गोऱ्या वर्णद्वेषी लोकांना आता आपल्यावर हल्ला करू शकेल, अशी संघटना तयार झाल्याचं समजल्यामुळे त्यांच्या तोंडचं पाणी पळेल, असं मंडेलाला वाटत होतं.

या स्फोटांमुळे एएनसी मात्र चांगलीच गोत्यात आली. कारण त्याच्या फक्त सहा दिवस आधी आल्बर्ट लुथुली या एएनसीच्या अध्यक्षाला शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार मिळाला होता! पण लुथुली ऑस्लोमधून हा पुरस्कार घेऊन सुखरूप घरी पोहोचल्याची खात्री करूनच एमकेनं आपले स्फोट घडवले होते. तसंच, एमके आणि एएनसी यांचा काहीही संबंध नाही अशी प्रतिमा निर्माण करण्यासाठीही मंडेलानं कंबर कसली होती. अर्थातच, लुथुलीला मिळालेल्या पुरस्कारामुळे दक्षिण आफ्रिकेतल्या एएनसीच्या लढ्याचं चित्र जगासमोर आलं असल्याचा

मंडेलाला खूप आनंद झाला होता. दरम्यान, आपण बॉम्बस्फोट घडवण्यापेक्षा गनिमी काव्यानं लढलं पाहिजे, असं मंडेलाला वाटायला लागलं. यामागे फार काही विचार वगैरे नव्हता. पण, आपल्या क्रांतीचं पुढचं पाऊल या मार्गानं जास्त चांगलं पडेल, असं वाटल्यामुळे हा निर्णय मंडेलानं घेतला होता.

या दरम्यान मंडेलानं आपल्या लढ्यासाठी इतर आफ्रिकन देशांची मदत घ्यावी, असं एएनसीच्या इतर नेत्यांना वाटायला लागलं. त्यामुळे 1962 सालच्या फेब्रुवारी महिन्यात इथिओपियामध्ये होणाऱ्या एका आफ्रिकन परिषदेमध्ये मंडेलानं भाषण करावं आणि आपल्या कामाविषयी माहिती द्यावी असं ठरलं. आपल्या 43 वर्षांच्या आयुष्यात मंडेलानं आपल्या मायदेशाच्या बाहेर पाऊलच टाकलं नव्हतं. त्यामुळे या कल्पनेला मंडेलानं एकदम उत्साहानं पाठिंबा दिला खरा; पण प्रत्यक्षात हा प्रकार त्याला वाटत होता त्याहून खूप कठीण ठरला. 10 जानेवारी 1962 या दिवशी मंडेलानं विनीचा निरोप घेतला आणि तेव्हा ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असलेल्या बोटस्वानामध्ये तो दाखल झाला. तिथे पोहोचताच एका सिंहिणीला वाटेत रस्ता ओलांडताना बघून मंडेला हरखूनच गेला. त्याला हा देश फार आवडला. हा देश अजूनही ब्रिटिश साम्राज्याचा भाग होता. मंडेला बोटस्वानामध्ये आला असल्याचं ब्रिटिश अधिकाऱ्यांना समजलं, पण कृष्णवर्णीय क्रांतिकारी लोकांना तिथे आसरा द्यायची प्रथा असल्यामुळे ब्रिटिशांनी ही गोष्ट आपल्यापुरती ठेवली. त्यानंतर बोटस्वानामधला इमिग्रेशन अधिकारी हाच त्या देशातला सुरक्षाप्रमुख असल्याचं बघून मंडेलाला जोरदार धक्का बसला. याच माणसानं मंडेलाला दक्षिण आफ्रिकन सरकारच्या कचाट्यातून वाचण्यासाठी एक सुरक्षित ठिकाण सांगितलं, तेव्हा मंडेलाला हा माणूस आपल्याला नक्कीच दक्षिण आफ्रिकन सरकारच्या हवाली करणार याची खात्री पटली. पण, त्याच माणसानं पूर्वी ऑलिव्हर तांबोला मदत केली असल्याचं समजताच मंडेलानं सुटकेचा नि:श्वास सोडला.

काही दिवसांनी मंडेला एका छोट्या विमानातून टांझानियाला गेला. हे विमान वाटेत एका पर्वताला धडकतच होतं. साहजिकच, विमानात बसलेला मंडेला आणि इतर लोक यांच्या तोंडचं पाणी काही काळ पळालं! तिथून मंडेला टांझानिया आणि इथिओपिया इथे गेला. इथिओपियामध्ये आफ्रिकन देशांच्या भरलेल्या एका परिषदेत मंडेलानं अचानक प्रवेश करून एक प्रभावी भाषण केलं. पण, मंडेलाच्या आधी पीएसीच्या नेत्यानं केलेलं भाषण जास्त

प्रभावी ठरलं. कारण हा नेता आक्रमक आणि फक्त कृष्णवर्णीयांच्या बाजूची भाषा बोलत होता. मंडेलानं पूर्वीप्रमाणेच सर्वसमावेशक चळवळीविषयीच्या संकल्पना मांडल्या होत्या. त्या उपस्थित असलेल्या नेत्यांना तितक्याशा भावल्या नाहीत. तसंच, लुथुलीला मिळालेला नोबेल पुरस्कार हा गोऱ्या लोकांच्या विरोधातलं आंदोलन बोथट करण्याच्या मोबदल्यात मिळालेलं बक्षीस असल्याचंही काही लोक बोलून दाखवत होते. अर्थातच, यात काही तथ्य नसलं, तरी पीएसीच्या तुलनेत एएनसीचा प्रभाव कमी झाल्याचं जाणवत होतं. मंडेलाला त्याच्या उरलेल्या दौऱ्यातही हे सगळीकडे दिसून आलं. पीएसीची आक्रमकता आणि सर्वसमावेशक धोरणं गुंडाळून टाकून पीएसीनं हाती घेतलेला कृष्णवर्णीय लोकांच्या स्वत:च्या चळवळीचा एककलमी कार्यक्रमच इतर कृष्णवर्णीय आफ्रिकन नेत्यांना भावत असल्याचं मंडेलाला अगदी स्पष्टपणे आढळून आलं.

आफ्रिकन देशांच्या दौऱ्यानंतर मंडेलानं 10 दिवसांसाठी लंडनला जायचा धाडसी निर्णय घेतला. लंडनला मंडेलाचं विमान उतरताच तिथल्या इमिग्रेशन अधिकाऱ्यानं मंडेलाला त्याच्या लंडन दौऱ्याचं कारण विचारलं. तेव्हा मंडेलानं आफ्रिकेमधल्या राजकारणाशी संबंधित असलेल्या संकल्पनांचा प्रवास कसा घडला, याविषयी आपण एक पुस्तक लिहीत असल्याचं खोटंच सांगितलं. त्या कामाशी संबंधित असलेलं संशोधन करण्यासाठी आपल्याला लंडनमधली ग्रंथालयं, तसंच वस्तूसंग्रहालयं यांना भेट द्यायची असल्याचं मंडेलानं त्या अधिकाऱ्याला खोटंच सांगितलं. त्या अधिकाऱ्याला सत्यपरिस्थिती माहीत होती! पण तरीही, त्यानं मंडेलाला लंडनमध्ये प्रवेश करायची परवानगी दिली. लंडनमध्ये मंडेलाबरोबर आलेल्या तांबोनं मंडेलाची काही महत्त्वाच्या लोकांशी ओळख करून दिली. उदाहरणार्थ, 'द ऑब्झर्व्हर' या वर्तमानपत्राच्या आफ्रिका विभागाशी संबंधित असलेल्या पत्रकारांशी मंडेलाची चर्चा झाली. त्या पत्रकारांनी मंडेलाला दक्षिण आफ्रिकेत परतून अटक करून घेण्यापेक्षा अमेरिकेच्या वॉशिंग्टन शहरात जावं आणि तिथून आपली चळवळ चालवावी, असा सल्ला दिला. पण, मंडेलानं मात्र त्याला नकार देत आपल्याला आपल्या लोकांमध्ये राहूनच ही चळवळ चालवायची असल्याचं सांगितलं.

1962 सालच्या जून महिन्यात मंडेला परत एकदा इथिओपियामध्ये दाखल झाला. पुढचे 6 महिने एमके संघटनेचं कामकाज प्रभावीपणे चालवण्यासाठी मंडेलाला तिथे लष्करी प्रशिक्षण

घ्यायचं होतं. प्रथमच मंडेलानं स्वयंचलित रायफल, तसंच पिस्तूल ही शस्त्रं वापरून बघितली. बॉम्ब तयार करणं, लपूनछपून गनिमी काव्यानं लढणं या सगळ्या गोष्टी तो शिकला. या दरम्यान कृष्णवर्णीय लोकांची चळवळ ठेचून काढण्यासाठी दक्षिण आफ्रिकन सरकारचे प्रयत्न खूपच जोरात सुरू होते. जवळपास दररोज एकदा तरी पोलीस विनी मंडेलाच्या घरी जाऊन तिला 'नेल्सन मंडेला कुठे आहे?' असं विचारायचे. जुलै महिन्यात दक्षिण आफ्रिकन संसदेनं संमत केलेल्या एका अचाट विधेयकामुळे अगदी साधे गुन्हे करणाऱ्या लोकांनासुद्धा मृत्युदंडाची शिक्षा द्यायचे अधिकार न्यायालयांना देण्यात आले. पोलिससुद्धा अधिकाधिक आक्रमक धोरण स्वीकारत होते. यामुळे 1963 साली आपण मोठ्या प्रमाणावर उठाव घडवून आणणार, असं पीएसीनं जाहीर केलं. त्यामुळे आपणही लवकरच या संग्रामात उतरलं पाहिजे, असं एमकेच्या लोकांना वाटत होतं. त्यासाठी मंडेलानं लवकर दक्षिण आफ्रिकेत परतावं, असा निरोप त्याला तारेनं पाठवण्यात आला. त्यानुसार मंडेला दक्षिण आफ्रिकेत परतला.

एमकेच्या लोकांबरोबर डावीकडून दुसरा मंडेला

अगदी थोडा काळ विनी आणि मुलं यांच्याबरोबर घालवल्यावर मंडेला परत आपल्या कामाला लागला. बहुतेक सगळ्या आफ्रिकन नेत्यांना आपल्या सर्वसमावेशक धोरणांमध्ये रस नसल्याचं सांगून, मंडेलानं एएनसीला आपल्या धोरणांमध्ये महत्त्वाचे बदल करायची गरज असल्याचं सांगितलं. त्यावर सिसुलूनं अनुकूलता दाखवत इतर अल्पसंख्यांकांच्या आशांवर

आपण पाणी फेरत नाही ना, याची काळजी घ्यायला सांगितलं. दरम्यान पीएसीनं मंडेलाच्या बदलत्या विचारसरणीविषयी अफवा पसरवून तो आता पीएसीमध्ये आला असल्याचं सांगायला सुरुवात केली होती. या संदर्भात नतालमध्ये जाऊन लुथुलीला सत्यपरिस्थिती समजावून सांगावी, असं मंडेलाला वाटत होतं. लुथुलीनं मंडेलाची भेट घेतली. इतर आफ्रिकन नेत्यांचं म्हणणं आपण ऐकलं असून, त्यानुसार एएनसीनंही आक्रमक धोरण स्वीकारलं पाहिजे, असं मंडेलानं लुथुलीला सांगितलं. तसं केलं नाही, तर इतर आफ्रिकन देश एएनसीला मदत करायच्या ऐवजी पीएसीला मदत करतील, असा इशारा मंडेलानं लुथुलीला दिला.

यानंतर एमके संघटनेमधल्या आपल्या सहकाऱ्यांना मंडेला एखाद्या कमांडरच्या आवेशातच भेटला. त्यानं गनिमी काव्यानं लढणाऱ्या नेत्यांसारखी दाढी वाढवली होती आणि खाकी पोषाख घातला होता. तसंच, आपल्या सहकाऱ्यांचं स्वागत त्यानं अरब नेत्यांसारखं 'सलाम' अशा शब्दानं केलं. त्या संध्याकाळी आपल्या या पोषाखातच मंडेला एका पार्टीला हजर राहिला. हे खूप धोक्याचं होतं. कारण तिथे कित्येक अनोळखी; पण मंडेलाच्या मागावर असलेले लोक असायची दाट शक्यता होती. दुसऱ्या दिवशी म्हणजे 5 ऑगस्ट 1962 च्या रविवारच्या दुपारी मंडेला नेहमीप्रमाणे आपला वाहनचालकाचा पांढरा पोषाख घालून डर्बनकडे जायला निघाला. काही काळानंतर त्यांच्या मोटारीला पोलिसांच्या एका मोटारीनं मागे टाकलं. तसंच, पोलिसांच्या आणखी दोन गाड्या मंडेलाच्या गाडीचा पाठलाग करायला लागल्या. मंडेलाच्या गाडीची कोंडी करून तिला थांबायला भाग पाडण्यात आलं. मंडेलानं घाईघाईनं आपल्याकडची गन आणि आपली वही या गोष्टी गाडीच्या पुढच्या सीटखाली लपवायचा प्रयत्न केला. एका पोलिसानं मंडेलाची उलटतपासणी सुरु केली, तेव्हा उडी मारून तिथून पळून जायचा विचार मंडेलाच्या मनात येऊन गेला, पण तो भाग नीट माहीत नसल्यामुळे मंडेलानं तसं करायचं टाळलं.

पोलिसांनी मंडेला आणि त्याचा सहकारी यांना पकडून तुरुंगाच्या वेगवेगळ्या बराकींमध्ये डांबलं. याच गावात 17 महिन्यांपूर्वी आपलं भाषण करून भूमिगत झालेला मंडेला अशा रितीनं दक्षिण आफ्रिकन सरकारच्या तावडीत सापडला! मंडेलाच्या ठावठिकाणाविषयी पोलिसांना नक्की कुणी माहिती दिली, याविषयी अनेक तर्कवितर्क मांडण्यात आले. त्यात साम्यवादी लोकांपासून अमेरिकेच्या 'सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी (सीआयए)' या गुप्तचर संस्थेपर्यंत

अनेकांची नावं घेण्यात आली. अमेरिकेला दक्षिण आफ्रिकेमधल्या युरेनियमची गरज होती. त्याच्या बदल्यात अमेरिकेनं सीआयएची मदत दक्षिण आफ्रिकन सरकारला पुरवून हे कृत्य करवून घेतलं, असं काही जणांचं म्हणणं होतं.

मंडेलावरचा खटला

मंडेलाला अटक होणं हे त्याला स्वत:ला किंवा एएनसीमधल्या कुणाला अजिबातच अनपेक्षित नव्हतं, पण मंडेला दक्षिण आफ्रिकेत परतल्यावर इतक्या वेगानं हे घडेल याची मात्र त्यांना कल्पना नव्हती. एएनसीनं मंडेलाच्या समर्थनार्थ लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहानुभूतीचं वातावरण निर्माण करायचा प्रयत्न केला. याशिवाय मंडेलाला हळूच तुरुंगातून बाहेर काढण्याचे दोन बेतसुद्धा रचण्यात आले. त्यातल्या पहिल्या बेतानुसार मंडेलाला केसांचा टोप आणि दाढी अशा वेषात न्यायालयाच्या एका खोलीतून बनावट किल्लीचा वापर करून निसटायला मदत करायची, असं ठरलं. दुसरा बेत तुरुंग अधिकाऱ्याला 6000 पौंडांची लाच देऊन मंडेलाला तिथून बाहेर काढायचा होता. पण, त्याआधीच सरकारनं हा खटला प्रिटोरिया प्रांतात हलवायचं ठरवल्यामुळे, हे सगळे बेत रद्द करण्यावाचून संबंधित मंडळींपुढे दुसरा मार्गच उरला नाही. प्रिटोरियाच्या तुरुंगात मंडेलाची भेट अटक करण्यात आलेल्या सिसुलूशी झाली. 6 वर्षांच्या कैदेची शिक्षा झालेल्या सिसुलूला काही काळानंतर जामिनावर सोडण्यात आलं, तेव्हा सिसुलूनं त्याचा फायदा घेऊन भूमिगत होत जामिनाचा गैरवापर केला.

दरम्यान, 22 ऑक्टोबर 1962 या दिवसापासून आपल्यावर चालवण्यात आलेल्या खटल्यामध्ये मंडेला सगळ्यांना प्रभावित करून सोडणाऱ्या पद्धतीनं आपली बाजू मांडत होता.

मंडेलाचं बोलणं संपल्यावर त्याच्या विरोधात खटला चालवणारा वकील त्याच्याजवळ आला. मंडेलाचा हात हातात घेऊन त्या वकिलानं खासगीत मंडेलाला 'माझ्या आयुष्यात प्रथमच मी जे करतो आहे त्याची मला खूप घृणा वाटते आहे... न्यायालयासमोर तुला तुरुंगवासाची शिक्षा द्यावी, असं मी सांगणं म्हणजे अत्यंत खराब काम आहे...' असं सांगितलं. नंतर मंडेलाची बाजू मांडायची वेळ आली, तेव्हा न्यायाधीशानं मंडेलाला कुणाकुणाला साक्षीदार म्हणून बोलवायचं आहे, असं विचारलं. तेव्हा मंडेलानं 'कुणालाच नाही' असं म्हणून न्यायालयात हजर असलेल्या सगळ्यांना जोराचा धक्का दिला. त्याऐवजी मंडेलानं आपली बाजू एका भाषणस्वरूपी साक्षीत मांडली.

खचाखच भरलेल्या न्यायालयासमोर मंडेलानं आपल्या बालपणी आपल्यावर अत्यंत साधेपणाचे आणि समतेचे संस्कार झाले असल्याचं सांगितलं. आपल्याला लहानपणी कुणीही गरीब-श्रीमंत, गोरा-काळा असे भेदभाव करू नयेत आणि एका माणसानं दुसऱ्या माणसावर अत्याचार करू नयेत, असं सांगण्यात आल्याचा उल्लेख केला. पण, प्रत्यक्षात आपल्या देशामधलं चित्र खूपच वेगळं आणि खराब असल्यामुळे आपण आणि आपले सहकारी त्यात बदल घडवून आणण्यासाठी खूप प्रयत्न करत असल्याचं मंडेलानं सांगितलं. बर्ट्रांड रसेलचा हवाला देत मंडेलानं विवेकबुद्धी जपणं आणि कायदा पाळणं यांच्यातल्या नेहमीच्या द्वंद्वाविषयी भाष्य केलं. रसेलनं अण्वस्त्रांना विरोध केल्यामुळे त्याला तुरुंगवास झाला होता, याची आठवण मंडेलानं काढली. त्याच धर्तीवर दक्षिण आफ्रिकेत आपण घडवून आणलेल्या शांततामय चळवळींना सरकारनं हिंसक उत्तर दिल्याचा उल्लेख मंडेलानं केला.

आपल्या मुद्यांचा शेवट अत्यंत प्रभावशाली पद्धतीनं करताना मंडेलानं, 'इतिहासच मला न्याय देईल... मी निरपराध असून, ज्या गुन्हेगारांना या न्यायालयासमोर उभं करायला हवं होतं ते सरकारमध्ये आहेत...' असं सांगत सगळं न्यायालय जिंकून घेतलं! अत्यंत प्रगल्भपणे आणि कुठलाही आततायी प्रकार न करता, मंडेलानं आपल्या क्रांतीविषयी अगदी उघडपणे न्यायालयाला जाणीव करून दिली होती. अर्थातच, दक्षिण आफ्रिकन सरकारला मंडेलाचं हे भाष्य सगळ्या लोकांपर्यंत पोहोचू देणं अजिबातच परवडण्यासारखं नव्हतं. त्यातून सरकारच्या विरोधात मोठा उठाव घडून यायची दाट शक्यता होती. त्यामुळे सेन्सॉरशिपचे नियम लादून मंडेलाचं सगळं वक्तव्य दडपून टाकण्यात आलं. नंतरच्या काळात दक्षिण आफ्रिकेमधली

परिस्थिती बदलल्यावरच इतिहासकारांना मंडेलाच्या या भाषणरूपी साक्षीची माहिती मिळाली. 7 नोव्हेंबर 1962 या दिवशी न्यायालयानं मंडेलाला 5 वर्षं तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली. कुठल्याही राजकीय गुन्ह्यासाठी आजवर इतकी मोठी शिक्षा कुणालाच झाली नसल्याचं विधान मंडेलानं केलं. अशा रितीनं गनिमी युद्ध करायची मंडेलाची खुमखुमी सरकारनं लगेचच जिरवून टाकली, असं अनेक जण म्हणायला लागले.

मंडेलाच्या क्रांतिकारी स्वप्नांचा फुगा अशा रितीनं एकदम जमिनीवर आला. मंडेलाला फिडेल कॅस्ट्रो आणि चे गुव्हेरा यांच्या पावलांवर पाऊल टाकून दक्षिण आफ्रिकेमध्ये सशस्त्र क्रांती घडवून आणायची होती, पण आपल्याच बेफिकिरीमुळे मंडेला दक्षिण आफ्रिकेच्या पोलिसांच्या हातात सापडला. मंडेलापासून आपल्याला असलेला धोका लक्षात घेऊन सरकार त्याला तुरुंगात अडकवणार याविषयी कुणालाच शंका वाटत नव्हती, पण त्यानंतर पुढे मंडेलाच्या नशीबात काय वाढून ठेवलं आहे, हे त्याला स्वत:लाही माहीत नव्हतं.

रॉबन आयलंड

क्रांती घडवून दक्षिण आफ्रिकेतला वर्णद्वेष संपुष्टात आणायचे नेल्सन मंडेलाचे मनसुबे उधळले गेल्यावर त्याची प्रिटोरियामधल्या तुरुंगात रवानगी झाली. आता इथून पुढे मंडेलाची वाटचाल कशी होते, याविषयी अनेक जणांना कुतूहल वाटत होतं. मंडेलाची राजकीय कारकीर्द संपुष्टात आली असल्याचं मत बहुतेक जण व्यक्त करत होते. तुरुंगात मंडेलावर खूप जास्त बंधनं घालण्यात आली. त्याला पुस्तकं वाचायची परवानगी नव्हती, तसंच त्याला खूप कमी लोकांना भेटायची परवानगी होती. त्याचा अपमान करण्यासाठी त्याला इतर कैद्यांसारखी चड्डी घालायला सांगण्यात आलं. त्यासंबंधी त्यानं तक्रार करताच त्याला एकट्याला वेगळ्या खोलीत ठेवण्यात आलं.

प्रिटोरियाच्या तुरुंगात 6 महिने काढल्यावर मंडेलाला रॉबन आयलंड इथल्या तुरुंगात ठेवण्यात आलं. या तुरुंगात नेताना इतर तीन राजकीय कैद्यांबरोबर मंडेलाला एकत्र हातकड्या घालण्यात आल्या. त्या चौघांना खिडकी नसलेल्या एका कुबट गाडीतून आधी केपटाऊनला नेण्यात आलं. तिथे एका जुन्या बोटीकडे त्यांना नेण्यात आलं. एका भोकासारख्या जागेखाली त्यांना एकच हातकडी घातलेल्या अवस्थेत उभं करण्यात आलं. त्यानंतर वरच्या भोकातून काही लोकांनी मंडेला आणि इतर तिघं यांच्यावर लघुशंका केली! त्यानंतर त्यांना रॉबन आयलंडच्या कुप्रसिद्ध तुरुंगात नेण्यात आलं. दक्षिण आफ्रिकेच्या मुख्य भूमीपासून 8 मैल अंतरावर असलेल्या या बेटाच्या आजूबाजूला भयानक गार पाणी असलेला समुद्र आहे, त्यामुळे या तुरुंगातून पळ काढायचा विचारसुद्धा कैदी करत नाहीत. अर्थात, अलीकडच्या काळात मात्र या ठिकाणचे सुंदर समुद्रकिनारे, निसर्गसौंदर्य इत्यादी गोष्टींमुळे हे एक पर्यटनस्थळसुद्धा बनलं आहे.

या ठिकाणच्या तुरुंगात राजकीय कैद्यांना आणून त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले जात. शार्पव्हिलच्या घटनेनंतर दक्षिण आफ्रिकन सरकारनं या प्रकारांमध्ये खूप वाढ केली होती. त्यामुळे मंडेलाचीही अशीच गत होणार असं सगळ्यांना वाटत होतं. मंडेलानं मात्र 'आपण इतरांशी कसे वागतो, त्याच प्रकारे इतर जण आपल्याशी वागतात' अशा तत्त्वानुसार वागायचं ठरवलं होतं, पण याची सुरुवात मात्र अत्यंत नाट्यमय प्रसंगांनी झाली. मंडेला आणि त्याच्याबरोबरच्या इतर तीन कैद्यांना तिथल्या हिटलरसारख्या अधिकाऱ्यानं ते गुरंढोरं

असल्यासारखं पळायला सांगितलं. त्याबरोबर मंडेला मुद्दामच त्या तिघांच्या पुढे गेला आणि पळण्याऐवजी हळूहळू चालायला लागला. त्यावर भडकून त्या अधिकाऱ्यानं मंडेलाला 'मी तुला मारून टाकीन' अशी धमकी दिली.

आपल्या बराकीत पोहोचल्यावर या कैद्यांना तिथे पाणीच पाणी असल्याचं लक्षात आलं. तसंच, आणखी दोन अधिकारी तिथे आले. त्यांच्यापैकी एकानं सगळ्यात गरीब दिसणाऱ्या कैद्याला 'तुझे केस फारच लांब आहेत रे', असं ओरडून सांगितलं. तेव्हा मध्ये पडून मंडेलानं 'हे पाहा, आमचे केस इथल्या नियमांनुसारच आहेत' असं म्हटलं. साहजिकच, भडकलेल्या अधिकाऱ्यानं पुढे सरसावून मंडेलाला जोरदार फटका मारायचा प्रयत्न सुरु करताच, मंडेलानं त्याला शांतपणे 'जर तू मला मारहाण केलीस, तर मी तुला या देशाच्या सर्वोच्च न्यायालयात खेचेन... त्यानंतर तुझी अवस्था चर्चमधल्या एखाद्या उंदरासारखी असेल...' असं सांगितलं. खरं म्हणजे, मनातून मंडेला आपल्याला जोरदार मारहाण व्हायच्या भीतीनं खूप हादरला होता, पण त्यानं तसं जाणवू दिलं नाही. त्या अधिकाऱ्यानं आपल्या धमक्या सुरु ठेवल्या असल्या, तरी तो थरथरत असल्याचं मंडेलानं पाहिलं आणि त्यामुळे मंडेलाला धीर आला. शेवटी ते दोन अधिकारी तिथून निघून गेले. पण, लवकरच दुसरा एक अधिकारी मंडेलासाठी विनीकडून एक निरोप घेऊन आला. तसंच, तो नियमितपणे मंडेलाला सिगारेट्स आणि सँडविचेसही आणून द्यायचा. काही आठवड्यांनी मंडेलाला परत एकदा प्रिटोरियामध्ये नेण्यात आलं. यामागचं अधिकृत कारण म्हणजे, पीएसीचे कैदेत असलेले लोक मंडेलाला ठार करायचा प्रयत्न करत असल्याचं देण्यात आलं, तरी त्यात अजिबात तथ्य नव्हतं.

या दरम्यान सिसुलू, तसंच एएनसीचे इतर नेते यांना पकडण्यासाठी सरकारनं जोरदार प्रयत्न सुरु केले होते. त्यामुळे बिथरलेल्या या नेत्यांनी भूमिगत होऊन सरकारच्या विरोधात हिंसक कारवाया सुरु केल्या. रेडिओवरून भाषण करून आपण दक्षिण आफ्रिकेतच भूमिगत झालेलो असून, सरकारच्या विरोधात लढणार असल्याचं सिसुलूनं जाहीर केलं. पण, 1963 सालच्या जुलै महिन्यात एएनसीच्या तीन प्रमुख नेत्यांना पोलिसांनी शोधून काढलं आणि अटक केली. तसंच, त्यांच्याकडून सरकारच्या विरोधात घातपात घडवून आणण्यासंबंधीच्या बेतांची खूप कागदपत्रंही मिळाली. त्यातली अनेक कागदपत्रं मंडेलाच्या हस्ताक्षरामधली होती. म्हणजेच, या गोंधळात इतरांप्रमाणेच आधीच तुरुंगात असलेल्या मंडेलाच्या बाबतीतलेही बरेच पुरावे

सरकारच्या हाती लागले होते. त्यामुळे मंडेलावर इतरांप्रमाणेच नव्यानं खटले भरले जाणार होते. या खटल्यांचं गांभीर्य मात्र खूपच जास्त असल्यामुळे या प्रकरणात सगळ्या आरोपींना फाशीची शिक्षासुद्धा होऊ शकते, असा इशारा वकिलांनी दिला.

रॉबन आयलंडचा तुरुंग

1963 सालच्या ऑक्टोबर महिन्यात सर्वोच्च न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरु झाली. लोकांना त्याविषयी खूप कुतूहल होतं. त्यासाठी तुरुंगातून मंडेलाला हजेरी लावावी लागे. तुरुंगात राहून मंडेला किती कृश झाला आहे, हे बघून अनेक जणांना प्रचंड धक्का बसला. या खटल्याचा निकाल न्यायालयापेक्षा न्यायालयाच्या बाहेरच जास्त लागणार असं लोक म्हणत होते. कारण मंडेलासारख्या माणसाला फाशीची शिक्षा द्यावी का, यासंदर्भात दक्षिण आफ्रिकन न्यायाधीशानं कोणताही निर्णय घ्यायच्या आधी अनेक परदेशी सरकारांनी दक्षिण आफ्रिकन सरकारवर दबाव टाकला असता हे नक्की. त्यामुळे या सगळ्या प्रकरणाविषयी इतर देशांचं काय मत आहे, हे तपासण्यासाठी दक्षिण आफ्रिकन सरकारनं चाचपणी सुरु केली. या दरम्यान 11 ऑक्टोबर 1963 या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघानं एक सनसनाटी पसरवणारी घोषणा केली. त्यानुसार संमत झालेल्या एका ठरावाद्वारे दक्षिण आफ्रिकेचा अपवाद वगळता, इतर सगळ्या देशांनी आपापल्याकडच्या राजकीय कैद्यांना बंदिमुक्त करायचा निर्णय घेतला. साहजिकच, अशा परिस्थितीत दक्षिण आफ्रिकन सरकारला मंडेलासारख्या नेत्याला फासावर लटकवायचा निर्णय घेणं अवघडच होतं.

दरम्यान मंडेला आणि त्याचे सहकारी यांच्यावरच्या खटल्यामध्ये सरकारची बाजू सांभाळणाऱ्या वकिलानं मंडेलावर जोरदार आरोप केले. त्यांच्या समर्थनार्थ त्यानं अनेक साक्षीदारांना बोलावलं. त्यांनी मंडेलाच्या कारवायांविषयी तपशीलानं माहिती पुरवली. तसंच, पोलिसांच्या हाती लागलेल्या एएनसीच्या कागदपत्रांमध्ये एएनसीच्या सगळ्या गुपितांचा पर्दाफाश झाला. सगळी माहिती अगदी उघडपणे न्यायालयासमोर आली. त्यातला सगळ्यात धोकादायक भाग म्हणजे मंडेलाच्या हस्ताक्षरात असलेला 62 पानांचा ऐवज. त्यात मंडेलानं साम्यवादाची भरपूर स्तुती केली होती, तसंच कम्युनिस्ट पक्षाचं सरकार दक्षिण आफ्रिकेत सत्तेवर आलं, तर कुणाला कसलीच अडचण किंवा कमतरता जाणवणार नाही, असं विधानही त्यात होतं. म्हणजेच, मंडेला अगदी उघडपणे साम्यवादाचा पुरस्कार करत होता आणि याचाच दुसरा अर्थ सगळ्या साम्यवादी शक्तींचा मंडेलाच्या चळवळींना पाठिंबा होता. याशिवाय पूर्वी मंडेलाचा सहकारी म्हणून काम केलेला एक जण आता मंडेलाच्या विरोधात साक्ष देण्यासाठी उभा राहिला. मंडेला आणि एमके संघटना यांचं काय नातं आहे, हे त्यानं अगदी विस्तारानं सांगितलं. या सगळ्या घटनाक्रमानंतर मंडेला, तसंच सिसुलू यांना फाशी व्हायची किमान 50 टक्के शक्यता असल्याचं संबंधित विषयांमधले तज्ज्ञ म्हणायला लागले.

नंतरच्या काळात मंडेलाची साक्ष त्याच्या तुरुंगाच्या खोलीतूनच घेतली जाई. अशाच परिस्थितीत मंडेलानं आपली बाजू मांडताना 4 तासांचं भाषण केलं. त्यात बालपण, तरुणपण, आयुष्य, राजकीय विचारसरणी, राष्ट्रीयत्वाची संकल्पना, वर्णद्वेषाला विरोध, सर्वसमावेशक भूमिका या आपल्या सगळ्या गोष्टींविषयी मंडेला बोलला. आपण एमके संघटनेचं नेतृत्व करत असून, हिंसक भूमिका घ्यायच्या बेतात असल्याचं मंडेलानं मान्य केलं. पण, त्यामागचं एकमेव कारण म्हणजे आपण अहिंसात्मक चळवळ करून थकून गेलो असल्याचं आणि त्यातून काहीही निष्पन्न होत नसल्याचं आपल्या लक्षात आल्याचं मंडेलानं सांगितलं. आपला साम्यवादाला असलेला पाठिंबा हा चर्चिलचा स्टॅलिनबरोबर असलेल्या नात्यासारखा असल्याचं मत मंडेलानं प्रकट केलं, तसंच फक्त साम्यवादी लोकच कृष्णवर्णीय लोकांना गोऱ्या लोकांच्या दर्जासारखी समान वागणूक देत असल्याचं सांगायला मंडेला विसरला नाही. आपल्याला मार्क्सवादानं भारून टाकलेलं असलं, तरी आपण स्वत: साम्यवादी नसल्याचं मंडेलानं सांगितलं. कृष्णवर्णीय लोकांना मिळत असलेल्या अपमानास्पद आणि घृणास्पद वागणुकीमुळे त्यांचं किती नुकसान

होतं आणि त्यामुळे सामाजिक पातळीवर कृष्णवर्णीयांची कुटुंबव्यवस्थाच धोक्यात आल्याचं मत त्यानं व्यक्त केलं. कृष्णवर्णीय लोकांना फक्त समानतेची वागणूक हवी असताना त्यांना ती का दिली जात नाही, असा सवाल त्यानं केला.

आपल्या भाषणाचा शेवट मंडेलानं अत्यंत नाट्यमयरीत्या केला. त्यात तो, 'माझं आयुष्य मी आफ्रिकन लोकांच्या लढ्यासाठी दिलेलं आहे... गोऱ्यांच्या वर्चस्ववादाच्या विरोधात मी लढलो आहे... कृष्णवर्णीयांच्या वर्चस्ववादाशीही मी झगडलो आहे... मला लोकशाही तंत्रावर चालणारी मुक्त समाजव्यवस्था हवी आहे... त्यात समाजातल्या सगळ्या गटांमधल्या आणि स्तरांमधल्या लोकांना समान संधी असेल... सगळे जण एकोप्यानं राहातील...', असं म्हणाला. त्यानंतर मंडेलानं छोटासा पॉझ घेऊन, 'हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून तिथपर्यंत जायचं माझं स्वप्न आहे...', असं सांगितलं. शेवटी आपला आवाज अगदी खालच्या पट्टीवर नेत मंडेलानं आपल्या भाषणाची भैरवी 'पण गरज पडली तर त्यासाठी मी मरणाला सामोरं जायलाही तयार आहे...', अशा शब्दांमध्ये केली.

मंडेलाच्या आयुष्यातलं हे निर्विवादपणे सगळ्यात प्रभावी भाषण होतं. आता मंडेला हा फक्त एएनसीचा नेता नसून, वर्णद्वेषाच्या विरोधात लढणाऱ्या सगळ्या लोकांचा नेता झाला होता. जगभरात सगळीकडे वर्णद्वेषाच्या विरोधात लढणाऱ्या लोकांच्या भावनाच मंडेलानं आपल्या भाषणातून व्यक्त केल्या होत्या. त्यामुळे या सगळ्या लोकांमध्ये आपल्याला आपला सूर सापडल्याची भावना निर्माण झाली. इतर अनेक आफ्रिकन देशांबरोबरच इंग्लंडनंही मंडेलाला पाठिंबा दिल्यावर स्वत: मंडेलाचाच त्यावर विश्वास बसेना. ब्रिटिश सरकारनं मंडेलाला फाशी दिली जाऊ नये, यासाठी दक्षिण आफ्रिकन सरकारवर दबाव टाकायला सुरुवात केली. मंडेलाला फासावर लटकवण्यात आलं, तर तो अनेकांचं स्फूर्तिस्थान बनेल आणि त्यामुळे दक्षिण आफ्रिकन सरकार गोत्यात येईल, असं मत काही जणांनी व्यक्त केलं. मंडेलापाठोपाठ त्याच्या इतर सहकाऱ्यांवरच्या आरोपांची सुनावणी झाली. त्यानंतर आपण 3 आठवड्यांनी खटल्याचा निकाल जाहीर करणार असल्याचं न्यायाधीशानं सांगितलं. शेवटी 12 जून 1964 या दिवशी मंडेला आणि त्याच्या प्रमुख सहकाऱ्यांना जन्मठेपेची शिक्षा देत असल्याचं जाहीर करण्यात आलं. ब्रिटिश, तसंच अमेरिकन सरकारांनी ही शिक्षा जन्मठेपेहून कमी करण्यासाठी दक्षिण आफ्रिकन सरकारवर दबाव टाकायचा विचार केला; पण त्यातून उलट

आणखी गुंतागुंत निर्माण होईल, असं वाटून त्यांनी तो बेत रद्द केला.

पूर्वी दोन वेळा मंडेलाला तुरुंगवास झालेला असला, तरी या वेळची परिस्थिती वेगळी होती. वयाच्या 46 व्या वर्षी अंगात खूप धमक असलेल्या मंडेलाला आता आपलं उर्वरित आयुष्य तुरुंगाच्या कोठडीत काढावं लागणार, अशी दाट शक्यता निर्माण झाली होती. मंडेला आणि त्याचे 6 सहकारी यांना लवकरच रॉबन आयलंडच्या तुरुंगात पाठवण्यात आलं. त्या 6 सहकाऱ्यांना हातकड्या आणि साखळदंड यांनी जखडून टाकण्यात आलं असलं, तरी मंडेलाला मात्र मोकळं ठेवण्यात आलं. पूर्वीच्या मानानं रॉबन आयलंडचा तुरुंग ही आणखीनच भयाण जागा झाली होती. वर्णद्वेषानं तिथे थैमानच घातलं होतं. कैद्यांना मारणं आणि त्यांच्यावर अत्याचार करणं, यांचं प्रमाण आणखी वाढलं होतं. आता तर राजकीय कैद्यांनाही गंभीर दुखापती होतील, इतकी मारहाण केली जाई. आधीप्रमाणेच कपड्यांवरून वाद घालत मंडेलानं आपला नवा डाव सुरु केला. मंडेलाला इतरांच्या मानानं जरा बरी वागणूक मिळे. त्याला काही पुस्तकं घेण्याची परवानगी मिळाली, तसंच लिखाणासाठी त्याला टेबल-खुर्ची उपलब्ध करून देण्यात आली. त्यानंतर तिथल्याच दुसऱ्या स्वतंत्र कोठड्यांमध्ये या सगळ्या कैद्यांची रवानगी करण्यात आली. पुढची 18 वर्षं मंडेलानं याच 8 फूट लांब आणि 7 फूट रुंद जागेच्या कोठडीत काढली! तिथे त्याला झोपण्यासाठी एक सतरंजीवजा गादी आणि जाडंभरडं ब्लँकेट या गोष्टी पुरवण्यात आल्या.

जन्मठेपेची शिक्षा झाली असली, तरी मंडेला आणि त्याचे सहकारी साधारण 5-10 वर्षांची शिक्षा भोगून सुटतील असं बहुतेक जणांना वाटत होतं. पण, प्रत्यक्षातलं चित्र वेगळंच होतं. रेडिओ, वर्तमानपत्र असल्या गोष्टी तर तिथे नव्हत्याच, पण 6 महिन्यांमध्ये जास्तीत जास्त 500 शब्दांचं एक पत्र पाठवायची आणि तशाच प्रकारचं एकच पत्र स्वीकारायची कैद्यांना परवानगी असे. कैद्यांना खूप त्रास व्हावा, या हेतूनं त्यांचा दिनक्रम मुद्दामच अत्यंत अवघड असे. सकाळी 5.30 ला उठून थंड पाण्यानं दाढी आणि आंघोळ करण्यानं दिवसाची सुरुवात होई. मक्याच्या दाण्यांचा कसला तरी पातळसर रस्सा आणि मक्याच्या दाण्यांपासून बनवलेला एक जाडाभरडा पदार्थ अशा किळसवाण्या अन्नावर सगळ्यांना आपलं पोट भरावं लागे. दुपारपर्यंत थंडीचा सामना करत कैद्यांना खडी फोडण्याचं काम करावं लागे. हे काम सुरु असताना कुणी एक शब्दसुद्धा बोललेलं चालत नसे. त्यानंतर नकोसं वाटणारं अन्न खाऊन झाल्यावर या

कैद्यांना परत 4 तास हेच काम करावं लागे. त्यानंतर थंडगार पाण्यानं त्यांना चेहरा धुवायची परवानगी असे. त्यानंतर परत कसलं तरी घाणेरडं जेवण त्यांना मिळे. कैदी आपसांत बोलत नाहीत ना, तसंच कुणी काही वाचत किंवा लिहीत नाही ना, यावर देखरेख करण्यासाठी पहारेकरी कैद्यांच्या कोठड्यांसमोरून चकरा मारत असे. 40 वॅट्सचा एक दिवा कोठडीत जेमतेम दिसण्यातका प्रकाश पुरवे.

या सगळ्यातून येणारा एकाकीपणा ही गोष्ट मंडेलाला सगळ्यात भयानक वाटे. कुणाशीही बोलता न येणं, इतकंच काय पण दुसऱ्या माणसाचं दर्शनसुद्धा दुर्मीळ असणं, ही गोष्ट किती भयानक असते, याची आपल्याला जाणीव झाल्याचं मत मंडेलानं व्यक्त केलं. आठवडेच्या आठवडे कित्येकदा नुसतं गप्प बसून एकट्यानंच काढायचे, ही गोष्ट त्याला अजिबात सहन होत नसे. त्यामुळे मन सैरभैर होऊन तुरुंगातल्या खोलीत येणारे किडेसुद्धा आपले वाटावेत अशी भयानक परिस्थिती मंडेलावर ओढवत असे. त्यामुळे एकदा तर मंडेलाच्या खोलीत शिरलेल्या झुरळाशी गप्पा माराव्यात, असा मोह वाटेपर्यंत मंडेलाची मजल गेली होती!

मंडेलाची खोली

1965 सालच्या जानेवारी महिन्यात कैद्यांचं खडी फोडण्याचं काम अजूनच अवघड करण्यात आलं. आता नुसती खडी न फोडता त्यामधला चुना दिसेपर्यंत ती फोडावी लागे. त्यानंतर त्यामधला चुना फावड्याचा वापर करून वेगळा गोळा करावा लागे. थंडीच्या दिवसांमधला

असह्य गारठा, तसंच उन्हाळ्याच्या दिवसांमधला जीवघेणा उकाडा या दोन्हींपासून कैद्यांची अजिबात सुटका होत नसे. अतिप्रखर सूर्यकिरणांमुळे काही कैद्यांना थोडं अंधत्व आलं. मंडेलाची नजर तर फारच खराब झाली. त्यामुळे तुरुंगवासानंतरच्या काळातही मंडेलाला वाचताना अडचणी येत.

अनेक वर्षं अशा परिस्थितीत काढल्यावर 1970 सालच्या जानेवारी महिन्यात मंडेलानं सगळ्या कैद्यांच्या वतीनं तुरुंगात आपल्याला मिळत असलेल्या अमानवी वागणुकीची तक्रार करणारं एक पत्र संबंधित अधिकाऱ्याला लिहिलं, पण त्याची दखल घ्यायचं सोडून, सरकारनं कैद्यांची परिस्थिती आणखी भीषण करण्यासाठी एका अत्यंत क्रूर माणसाला तितक्याच क्रूर साथीदारांसह तुरुंगाची जबाबदारी सांभाळण्यासाठी पाठवून दिलं. या नव्या लोकांच्या दहशतवादाला कंटाळून काही कैद्यांनी निषेध म्हणून उपोषण सुरु केलं, तेव्हा या नव्या अधिकाऱ्यानं सगळ्या कैद्यांना आपापल्या अंगावरचे सगळे कपडे उतरवून हात वर करून उभं राहायला सांगितलं. अत्यंत कडाक्याच्या थंडीत नाईलाजानं सगळे कैदी अशा लाजिरवाण्या परिस्थितीत उभे असताना हा अधिकारी एकेका कोठडीत जायचा आणि तिथली झडती घ्यायच्या नावाखाली त्यांना त्रास द्यायचा. हे सहन न होऊन एक कैदी बेशुद्ध पडला. दुसरा कैदी हमसून रडला. त्यांना शेजारच्या कोठडीत हा क्रूर अधिकारी आणि त्याचे सहकारी कैद्याला मारहाण करतानाचे आणि त्या कैद्यांचं गुप्तांग जोरात पिरगाळून त्यांना मरणप्राय वेदना देत असल्याचे आवाज यायचे! एका कैद्याला हा अपमान सहन न होऊन, त्यानं प्रतिकार करायचा प्रयत्न केला, तेव्हा त्याला खूप मारहाण करण्यात आली आणि त्यातून झालेला रक्तस्राव त्यालाच साफ करायची आज्ञा देण्यात आली. या सगळ्या घटनाक्रमामुळे व्यथित होऊन मंडेलानं लपूनछपून एक संदेश आपल्या मित्रांकडे पाठवला. त्यामुळे या प्रकाराची चौकशी करण्यासाठी तीन जणांना नेमण्यात आलं. त्यांच्यासमोर अत्यंत धीरोदात्तपणे आणि चातुर्यानं आपली बाजू मांडून मंडेलानं या क्रूर माणसांची बदली करवून घेतली. नंतरच्या काळात तुरुंगातून सुटका करून घेण्यासाठी एकदोन धाडसी बेत आखायचेही प्रयत्न झाले, पण त्यांच्यामधला धोका लक्षात घेऊन वेळीच मंडेला आणि इतर जण यांनी ते थांबवले.

फाशीची शिक्षा टळली असली, तरी रॉबन आयलंडचा हा तुरुंगवास भयानकच होता. मंडेला आणि त्याचे सहकैदी या सगळ्यांच्या सहनशीलतेचा अंत बघणारीच ही परिस्थिती होती,

पण त्यामुळे मंडेला खचून गेला नाही. उलट, आपल्या विरोधातल्या या अन्यायाशी लढायची ताकद त्यानं स्वत:मध्ये निर्माण केली. एक ना एक दिवस आपण हे चित्र बदलून टाकू, असा आत्मविश्वास तो निर्माण करत राहिला. तरीही, त्याच्या नजरेसमोर अंध:कारच होता. त्यात आणखी एक गोष्ट त्याला सतत अस्वस्थ करत होती...

घरातली दु:खं

रॉबन आयलंडमधल्या तुरुंगात मंडेला अत्यंत धैर्यानं सगळ्या अडचणींना सामोरा जात होता. आपल्याबरोबरच्या कैद्यांचा तो आधारस्तंभच बनला होता. पण, आपल्या वैयक्तिक आयुष्यातल्या अडचणींमुळे मात्र मंडेला दुसरीकडे पार खचून गेला होता. आधीच आपल्या पहिल्या लग्नामधून मंडेलाला कसलंच सुख मिळालं नव्हतं. पहिली पत्नी आणि तिच्यापासून झालेली मुलं यांच्यापासून तो पार दुरावला होता, पण आता वादळी आयुष्य आणि त्यानंतरचा प्रदीर्घ तुरुंगवास यांच्यामुळे विनी आणि तिच्यापासून झालेली मुलं यांच्याशी मंडेलाचं असलेलं नातंसुद्धा अत्यंत कटू होत गेलं. मंडेलाला नेहमीच आपल्या मुलांकडून खूप जास्त अपेक्षा असत. पण, तुरुंगवासामुळे मंडेलाचं आपल्या मुलांशी असलेलं नातं जवळपास तुटलंच. त्यांना बघायची दुर्मीळ संधी मिळायची, तेव्हा मंडेलाला त्यांना स्पर्शसुद्धा करता यायचा नाही, अशी विचित्र परिस्थिती असे.

या तुरुंगवासाच्या काळात मंडेलाला दोन मोठे धक्के बसले. पहिल्यांदा त्याची बहीण त्याच्या आईला भेटायला म्हणून तिथे घेऊन आली. वय झालेली, अशक्त, आजारी आई समुद्राचा अवघड प्रवास करून तुरुंगापर्यंत पोहोचू शकेल का नाही, याची मंडेलाला खात्री वाटत नव्हती. हा प्रवास तिनं कसाबसा पूर्ण केला खरा; पण त्यानंतर काही आठवडे उलटून गेल्यावर ती दगावल्याची तार मंडेलाला मिळाली. ते ऐकताच आपण आयुष्यभर तिची काहीच काळजी घेतली नाही, या भावनेनं मंडेलाला अतिशय दु:ख झालं. आपल्या पहिल्या लग्नातल्या थेंबी या मोठ्या मुलानं आपल्याशी आता काहीच संपर्क ठेवला नाही, याचं मंडेलाला खूप वाईट वाटे. सुरुवातीला थेंबीला आपल्या वडिलांचा खूप अभिमान होता. पण, आपल्या आई-वडिलांचा घटस्फोट झाल्याचं कळताच थेंबी भडकला. त्यानं मंडेलाशी कसलेच संबंध ठेवले नाहीत. मंडेलाला ही गोष्ट कायम बोचत राही. दिशाहीन झालेल्या थेंबीनं वयाच्या विशीच्या आतच केपटाऊनमधल्या एका दुकानदाराच्या मुलीशी लग्न केलं आणि त्याला पटापट दोन मुलीसुद्धा झाल्या. त्यांच्यापैकी धाकटी मुलगी फक्त 6 महिन्यांची असताना एका मोटार अपघातात थेंबीचं निधन झालं. ही बातमी समजताच मंडेलाचं दु:ख अनावर झालं. कितीतरी वेळ काहीही न खातापिता तो नुसता पडूनच राहिला.

या परिस्थितीत मंडेलाला विनीची आणखी जास्त आठवण यायला लागली. विनीची अवस्था खराबच होती. मंडेला तुरुंगात असल्यामुळे नक्की काय करावं, याविषयी तिच्या मनात गोंधळ असायचा. 1964 सालच्या ऑगस्ट महिन्यात विनी पहिल्यांदाच मंडेलाला भेटायला आली. पण, अर्धा तास लांबून ओरडून बोलण्याशिवाय या जोडप्याला दुसरं काही करणं शक्य नव्हतं. एवढंच नव्हे, तर त्यांचं बोलणं तुरुंगातले अधिकारी ऐकत होते आणि काही दगाफटका व्हायला नको, म्हणून त्या दोघांपैकी कुणी काही संशयास्पद बोलत आहे असं वाटत असेल, तर हे अधिकारी त्याविषयीचं स्पष्टीकरण मागत होते. विनीपासूनच्या शारीरिक दुराव्यामुळे मंडेला व्यथित झाला होता. विनीवर तर पोलिसांचा सतत गुप्त पहाराच असे. तिला कुठलीही राजकीय कारवाई करता येऊ नये यासाठी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तिच्या बारीकसारीक हालचालींवर पोलिसांची नजर असे. तिची मुलं जोहान्सबर्गमध्ये शिकायला होती. तिथे जायला विनीला परवानगी नव्हती. त्यामुळे नंतर विनीच्या मुलांना परदेशीच धाडण्यात आलं.

मुलींसह विनी

मंडेलाला पहिल्यांदा भेटल्यावर तब्बल दोन वर्षांनी कडेकोट बंदोबस्तामध्ये विनीला परत एकदा त्याला भेटता आलं. काचेतून बोलून दोघांना एकमेकांच्या भेटीचं समाधान मानावं लागलं. नंतर विनीवर जाणूनबुजून आरोप ठेवून सरकारनं तिच्या नाकीनऊ आणले.

त्यामुळे विनीची सामाजिक कार्यकर्ती म्हणून असलेली नोकरी गेली. विनी चिडखोर झाली. तिच्यावर सरकारनं राजकीय बंदी घातली. पण तरीही, विनीनं एएनसीसाठी लपूनछपून काम केलं. पोलिसांना हे समजताच तिच्याभोवती खबरे पेरून त्यांनी पाश आवळला. सगळे पुरावे जमवल्यावर पोलिसांनी विनीला 1969 सालच्या मे महिन्यात अटक करून तुरुंगात टाकलं. 200 दिवस विनीला आंघोळीविना 10 फूट लांब आणि 5 फूट रुंद अशा कोठडीमध्ये काढावे लागले. भुकेनं आता आपण बेशुद्ध पडू, असं वाटल्यावरच खाता येईल; अशा अत्यंत खराब दर्जाचं अन्न तिला मिळे. 1969 सालच्या डिसेंबर महिन्यात विनीवरच्या खटल्याची सुनावणी सुरु झाली. त्यातून फारसं काही निष्पन्न न झाल्यामुळे नाईलाजानं पोलिसांना तिची सुटका करावी लागली. पण, लगेचच 1970 सालच्या जून महिन्यात इतर काही आरोपांखाली विनीला परत एकदा तुरुंगात टाकण्यात आलं. कुपोषणामुळे विनीला हिरड्यांमधून रक्तस्राव होणं, तसंच चक्कर आणि मग फीट्स येणं, असले आजार जडले होते. या खटल्यातसुद्धा दम नसल्यामुळे विनीची परत एकदा निर्दोष मुक्तता झाली.

विनीच्या तुरुंगवासाच्या काळात मंडेलाला प्रचंड दु:ख व्हायचं. आपल्याहूनही भीषण अवस्थेत ती दिवस काढत आहे, हे ऐकल्यावर त्याला काय करावं हे समजतच नव्हतं! विनीच्या राजकीय सहभागावर सरकारनं परत एकदा 5 वर्षांसाठी बंदी घातली. विनीला दम्याच्या खोकल्याचा त्रास जडला. तसंच, तिचा रक्तदाब खूप वाढला. पोलिसांनी विनीला त्रास देणं बंद केलं नाही. एकदा तिच्या घराचं दार त्यांनी तोडून टाकलं, तसंच तिच्या घराच्या खिडक्यांवर विटा आणि दगड मारून तिला हैराण केलं. काही गोऱ्या लोकांनी विनीला मदत करायचा प्रयत्न केला, पण सरकारनं त्यांच्यावरही सूडबुद्धीने कारवाई केली. तसंच, विनीच्या स्वभावात होत असलेल्या प्रचंड टोकाच्या बदलांनीसुद्धा हे गोरे लोक हैराण होत असत. कित्येकदा मंडेलाच्या आता विनीबरोबर राहात असलेल्या मुली शाळेतून घरी आल्या की त्यांना घराला कुलूप दिसे. त्यानंतर आपल्या आईला अटक झाली आहे का, असं शेजारीपाजारी विचारण्याची वेळ त्यांच्यावर येई.

आक्रमक विनी

1969 साली दक्षिण आफ्रिकेत 'ब्लॅक कॉंशियसनेस मूव्हमेंट' (कृष्णवर्णीय लोकांची अस्मिता) या नावानं एक आक्रमक चळवळ करणारी संघटना सुरु झाली. ही संघटना लवकरच महत्त्वाची भूमिका अदा करेल, अशी बातमी विनीनं मंडेलापर्यंत पोहोचवली. ही संघटना पूर्वी एएनसीपुढे पीएसीनं निर्माण केलेल्या आव्हानासारखं आव्हान निर्माण करेल, अशी चिन्हं दिसत होती. पण त्याचबरोबर, या संघटनेमुळे दक्षिण आफ्रिकेमधल्या कृष्णवर्णीयांच्या चळवळीमध्ये निर्माण झालेली पोकळी भरून निघेल, असा विनी मंडेलाला विश्वास वाटत होता. इतर सगळे लोक गप्प असताना आणि सगळ्या चळवळी थंडावलेल्या असताना ही चळवळ सुरु होणं विनीला आश्वासक वाटलं. या चळवळीमागचं दुसरं कारण म्हणजे, अमेरिकेमध्येसुद्धा या सुमाराला कृष्णवर्णीयांची आक्रमक चळवळ सुरु झाली होती. स्टॉक्ली कारमायकेल, एल्ड्रिज क्लीव्हर, जॉर्ज जॅकसन अशा आक्रमक कृष्णवर्णीयांनी अमेरिकेमधल्या वर्णद्वेषाच्या विरोधात हिंसात्मक कारवाया सुरु केल्या होत्या. त्यामुळे अशा चळवळींचे वारे वाहातच होते. ते दक्षिण आफ्रिकेत येऊन पोहोचले.

जून 1976 सालच्या एका घटनेमुळे दक्षिण आफ्रिकेमधली परिस्थिती एकदम पेटली. इतिहासामध्ये हा घटनाक्रम 'सुवेटोचं बंड' किंवा '16 जून' या नावानं ओळखला जातो. याची पार्श्वभूमी म्हणजे सरकारनं सुवेटो ('साऊथ-वेस्टर्न टाऊनशिप्स') प्रांतात सगळीकडे मूळ

स्वरूपात डच भाषेवर आधारलेल्या 'आफ्रिकान्स' भाषेमध्ये शाळांमधला सगळा अभ्यासक्रम शिकवला जाईल, असं फर्मान काढलं. ही भाषा म्हणजे गोऱ्या लोकांच्या वर्णद्वेषी धोरणांचं एक प्रतीक मानलं जाई. तसंच, अचानकपणे विद्यार्थ्यांना विषय समजून घेण्यापेक्षा ही भाषा समजून घेण्याकडे आपलं लक्ष वळवावं लागलं. साहजिकच, सरकारच्या या विचित्र निर्णयाच्या विरोधात आंदोलनं सुरु झाली. 30 एप्रिल 1976 या दिवशी सुवेटोमधल्या 'ओरलँडो' नावाच्या एका शाळेतल्या विद्यार्थ्यांनी याच्या विरोधात संप पुकारला. त्याचे पडसाद इतर शाळांमध्ये उमटले आणि अनेक ठिकाणी विद्यार्थी शाळेत जाईनासे झाले. तसंच, त्यांनी आपली एक संघटना उभी केली आणि 16 जून या दिवशी सरकारच्या विरोधात एक निषेध मोर्चा काढायचं ठरवलं. त्या सकाळी हजारो कृष्णवर्णीय विद्यार्थी 'ओरलँडो स्टेडियम'च्या दिशेनं चालत गेले. या मोर्च्याला 'ब्लॅक कॉंशियसनेस मूव्हमेंट' संघटनेचा पाठिंबा होता. पण, आपल्या वाटेमध्ये पोलिसांनी अडथळे निर्माण केले असल्याचं लक्षात येताच, या मोर्च्याचं नेतृत्व करणाऱ्या मुलानं विद्यार्थ्यांना गोंधळ न घालता दुसऱ्या मार्गानं चालत येण्यास सांगितले. त्यानुसार जवळपास 3000 ते 10000 विद्यार्थी ओरलँडो शाळेच्या जवळच्या परिसरात जमले. तेवढ्यात एका पोलिसानं गोळी झाडल्यामुळे मुलं घाबरली आणि बिथरली. काहींनी पोलिसांवर दगडफेक केली. पोलिसांनी आणखी गोळ्या झाडल्या. त्यात 13 वर्षं वयाचा एक मुलगा ठार झाला. त्यामुळे या मोर्च्याचं रूपांतर दंगलीत झालं. त्याच दिवशी दोन गोऱ्या लोकांसकट एकूण 200-600 लोक पोलिसांच्या गोळीबारात ठार झाले. जखमी झालेल्या मुलांवर उपचार करण्यासाठी घाईघाईनं डॉक्टरांना पाचारण करण्यात आलं. पण, त्याविषयीची माहिती देण्यावर सरकारनं बंदी घातली. सरकारनं या दंगलीत फक्त 23 विद्यार्थी ठार झाल्याची दिलेली माहिती दिशाभूल करणारी होती, यात कुणालाच शंका वाटली नाही. शिवाय हजारो इतर लोक जखमीसुद्धा झाले हे सगळ्यांना माहीत होतं. हळूहळू ही दंगल केप प्रांतामधल्या इतर भागांमध्येही पसरली.

सुवेटोचं बंड

सरकारनं या दंगलींमागे एएनसी, पीएसी आणि साम्यवादी लोक यांचा हात असल्याचा आरोप केला. खरं म्हणजे, यामागचे सूत्रधार 'ब्लॅक कॉंशियसनेस मूव्हमेंट' तसंच, शालेय विद्यार्थ्यांचे नेते हेच होते. पण, सरकारच्या आरोपांमुळे एएनसी, तसंच पीएसी यांना फुकटच प्रसिद्धी मिळाली! या सगळ्या घटनाक्रमाचे अख्ख्या जगात शार्पव्हिलच्या घटनाक्रमाहूनही जास्त मोठे पडसाद उमटले. नेल्सन मंडेलापर्यंत कुठल्याच बातम्या पोहोचत नसल्यामुळे ऑगस्ट महिन्यापर्यंत त्याला यातलं काहीच माहीत नव्हतं. पण, त्यानंतर 'ब्लॅक कॉंशियसनेस मूव्हमेंट'च्या पूर्वीपासून अटकेत असलेल्या आणि हालहाल करण्यात आलेल्या काही आरोपींना दक्षिण आफ्रिकन सरकारनं 'रॉबन आयलंड'च्या तुरुंगात भरती केल्यावर मंडेलाला याविषयी प्रथमच समजलं. सुरुवातीला मंडेला आणि त्याचे सहकारी यांना असं काही घडू शकतं, या गोष्टीवर विश्वासच बसेना. पण, लवकरच त्यांना सत्य परिस्थिती समजली आणि त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

एकीकडे या नव्या लोकांनी कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीची डगमगती धुरा आपल्या खांद्यांवर घेतली असल्याचा मंडेलाला खूप आनंद होत होता. पण, दुसरीकडे फक्त हिंसेच्या आधारावर ही चळवळ पुढे चालू राहू शकणार नाही याची मंडेला, तसंच त्याचे समवयस्क सहकारी यांना जाणीव होती. आता या नव्या लोकांना एएनसीच्या प्रवाहात सहभागी करून घेणं भाग होतं. कारण तसं झालं नसतं, तर आणखी एक वेगळीच चळवळ उभी राहूनही उपयोग झाला नसता. दक्षिण आफ्रिकन सरकारच्या दृष्टीनं अशा प्रकारे दुफळी माजलेल्या चळवळींना मोडून काढणं खूप सोपं झालं असतं. नव्या पिढीमधल्या या आक्रमक नेत्यांशी आपण आक्रमकतेनं वागून किंवा त्यांना आव्हान देऊन उपयोग नाही, हे मंडेलाच्या अनुभवी मनाला लगेचच समजलं. त्यामुळे त्यानं आपल्या सहकाऱ्यांची मदत घेऊन आक्रमक युवा क्रांतिकाऱ्यांना आपल्या बाजूनं वळवण्यासाठी आंजारून-गोंजारून त्यांचं मतपरिवर्तन घडवायला सुरुवात केली. यासाठी या युवा क्रांतिकारी लोकांच्या चळवळीचं आपल्याला खूप महत्त्व वाटत असल्याचं सांगून, मंडेलानं या चळवळीचा आवाका वाढवणं गरजेचं असल्याचं मत त्यांच्या मनावर बिंबवलं. मंडेलाची ही पद्धत खूपच प्रभावी होती. त्यामुळे आपण कधी आणि कसे त्याच्या म्हणण्याकडे आकर्षित झालो, हे आपल्याला समजलंसुद्धा नाही, असं त्याच्याबरोबर तुरुंगात असलेल्या 'ब्लॅक कॉंशियसनेस मूव्हमेंट'च्या लोकांनी नमूद केलं. त्यातला आणखी कठीण भाग म्हणजे तुरुंगामधली सगळी सेन्सॉरशिप सांभाळत आणि तिथल्या अधिकाऱ्यांच्या नकळत मंडेलानं हे काम करावं, यात त्याचं कौशल्य दिसून येतं.

अर्थात, हे काम सोपं नव्हतं. यापैकी अनेक लोकांना त्यांच्या आई-वडिलांनी मंडेलाबद्दलचं अतिरंजित चित्र रेखाटून वाढवलं होतं. मंडेलाला झालेल्या तुरुंगवासाचा उल्लेख करून त्याच्यासारखं आयुष्य न जगण्याचा सल्ला त्यांना मिळाला होता. पण, प्रत्यक्षात मंडेलाला भेटल्यावर या लोकांचं मत साफ बदललं. हे तरुण, आक्रमक लोक काहीही करून तुरुंगातल्या अधिकाऱ्यांना भडकवायचा प्रयत्न करायचे. तसंच, 'जशास तसं' अशा कायद्यानं वागायचा ते प्रयत्न करायचे. त्यामुळे तुरुंगातले अधिकारी या तरुण लोकांच्या बाबतीत जास्तच क्रूरपणानं वागत. त्यावर मंडेला आणि त्याचे सहकारी यांनी या तरुणांना जरा सबुरीनं विचार करायचा आणि आपली पातळी सोडून खालच्या पातळीवर जाऊन न वागायचा सल्ला दिला. ते करणं या भडक माथ्याच्या तरुणांना सुरुवातीला अर्थातच खूप जड गेलं. तसंच, हा सल्ला साफ

चुकीचा असल्याची त्यांची भावना झाली. पण, कालांतरानं त्यांचं मतपरिवर्तन झालं. हे अनुभवी लोक आपल्याला योग्य असाच सल्ला देत असल्याची त्यांची खात्री झाली. इतकंच नव्हे; तर आपल्यावर लक्ष ठेवणाऱ्या लोकांपैकी अनेक जण आपल्यासारखेच आहेत आणि ते फक्त आपल्याला नेमून दिलेलं काम करतात, एवढाच काय तो फरक आहे, असंही त्यांच्या लक्षात आलं. त्यामुळे कट्टर वैरी असलेले हे लोक हळूहळू कैद्यांचे मित्र बनायची किमया घडली. आपल्यावर लक्ष ठेवणाऱ्या लोकांपैकी बरेचसे लोक अशिक्षित आणि अनाथ असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. तसंच, आपण तुरुंगात का आलो आहोत, हे समजून घेण्याचं त्यांच्यामध्ये कुतूहल असतं ही गोष्टसुद्धा या बंडखोर तरुणांना समजली. त्यामुळे हे आपुलकीचं नातं आणखी वाढलं.

या दरम्यान विनी मंडेलाच्या कृष्णवर्णीयांच्या चळवळीला असलेल्या पाठिंब्यामुळे दक्षिण आफ्रिकन पोलीस वैतागून गेले होते. शेवटी 1977 सालच्या मे महिन्यात विनीला पकडून पोलिसांनी ऑरेंज फ्री स्टेट राज्यात; म्हणजेच तिच्या मूळ घरापासून सुमारे 250 मैल अंतरावर असलेल्या ब्रँडफर्ट नावाच्या गावात अत्यंत गलिच्छ वस्तीतल्या एका घरात आणून सोडलं. कृष्णवर्णीय लोकांच्या त्या वस्तीमध्ये पाणी, हीटर्स अशा गोष्टींची कमतरता असे. त्या भागातले कृष्णवर्णीय लोक जी भाषा बोलायचे, तिचा विनीला गंधही नव्हता. त्या घरामध्ये सगळीकडे घाण होती, घराला खिडक्या नव्हत्या, आणि त्या घराला स्वतंत्र स्वच्छतागृह नव्हतं. तिथेही पोलिसांनी तिच्यावर सतत पाळत ठेवली आणि विनीला एका वेळी एकापेक्षा जास्त माणसांना भेटायची परवानगी दिली नाही. अशा ठिकाणी विनी आणि तिची तेव्हा 16 वर्षं वय असलेली एक मुलगी तब्बल 7 वर्षं राहिले. पण, त्यामुळे विनीच्या मनातली जिद्द अजिबात कमी झाली नाही. विनीच्या शेजारपाजारी पोलिसांनी दहशतीचं वातावरण निर्माण केलं होतं. विनीच्या फार जवळ जायचं नाही किंवा तिच्याशी मैत्रिपूर्ण संबंध प्रस्थापित करायचे नाहीत, असं पोलिसांनी सगळ्यांना सांगून ठेवलं होतं. विनीला एकटं पाडायचं आणि तिच्यावर सतत दबावाचं वातावरण निर्माण करायचं, असा पोलिसांचा हेतू होता. त्यामुळे विनीची लढाऊ वृत्ती दबली जाईल, असा त्यांचा अंदाज होता. एकदा तर विनी एका शेजाऱ्याशी बोलत असताना तिथे चिकन विकणारा एक माणूस आला आणि त्याच वेळी त्या विक्रेत्यानं विनीला चिकन विकत घेणार का, असं विचारलं. लगेचच दबा धरून बसलेल्या पोलिसांनी तिथे धाव घेऊन विनीवर 'घोळका करून गोंधळ माजवायचा प्रयत्न केल्याचे' आरोप केले!

लवकरच विनीनं तिथल्या स्थानिक प्रश्नांवरून अधिकारी वर्ग आणि पोलीस यांना बेजार करून सोडलं. एएनसीचं प्रतीक समजल्या जाणाऱ्या काळ्या, हिरव्या आणि पिवळ्या रंगांचे भडक कपडे घालून ती आपण बंडखोरच आहोत, असं दाखवून देई. विनीला अशा प्रकारे नजरेकैदेत ठेवल्यामुळे ती दुर्लक्षित राहील, असा सरकारचा असलेला अंदाज साफ चुकीचा ठरला. 1977 ते 1979 या काळात विनी ही दक्षिण आफ्रिकेमधल्या सगळ्यात लोकप्रिय असलेल्या राजकीय कार्यकर्त्यांच्या यादीत वरून दुसऱ्या क्रमांकावर राहिली. एका डॉक्टरशी विनीचे या काळात मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित झाल्यावर अचानकपणे एका 'अपघातात' हा डॉक्टर मारला गेला. अर्थातच, लोकांना यात घातपात झाला असल्याची दाट शक्यता वाटत होती. अर्थातच, विनीच्या संदर्भातल्या या घडामोडी मंडेलाला दुरूनच समजायच्या. आपण विनीच्या अशा अवघड काळामध्ये तिच्यापासून खूप लांब असण्याविषयी, तसंच तिच्या परिस्थितीत कसलीही सुधारणा करण्याविषयी काहीच करू शकत नाही, याचं त्याला खूप वाईट वाटायचं. 1976 सालापासून नेल्सन मंडेलाला विनी आणि आपली मुलं घातपातामध्ये ठार झाल्याची खराब स्वप्नं पडायची, त्यामुळे तो वारंवार अत्यंत बेचैन अवस्थेत असायचा.

विनीची जनमानसातली प्रतिमा अत्यंत आदर्श आणि धीरगंभीर स्त्रीची असली तरी प्रत्यक्षात मात्र वेगळीच परिस्थिती उद्भवली होती. वारंवार झालेला तुरुंगवास, तिथला छळ आणि ब्रँडफर्टमध्ये जवळपास नजरकैदेसारख्या अवस्थेत ठेवलं जाणं, या गोष्टींमुळे विनीच्या मनावर घण घातल्यासारखं दडपण आलं होतं. त्यातून बाहेर पडण्यासाठी विनी विचित्रपणे वागायची. गोऱ्या लोकांच्या दुकानात जाऊन आपल्या लोकप्रियतेविषयी ती बडबड करायची. कधीकधी अचानकपणे ती हिंसक व्हायची. तसंच, ती आता खूप दारूसुद्धा प्यायला लागली. ब्रँडफर्टच्या महापौराचं इतर उद्योगांप्रमाणेच दारूचं एक दुकान होतं. त्या दुकानातून ती महिन्याला साधारणपणे 3000 रँड्स किंमतीची दारू विकत घेत असे. आपली वाढती लोकप्रियता आणि सरकार, तसंच पोलीस यांच्याविरुद्ध मनात साचलेला राग या गोष्टींमुळे आपण काहीही केलं आणि कसंही वागलो तरी चालतं, असं तिला वाटायला लागलं.

झेनी

या दरम्यान विनी आणि नेल्सन मंडेला यांच्या झेनी या सगळ्यात मोठ्या मुलीचं लग्न स्वाझी देशाच्या राजपुत्राशी ठरल्याचा मंडेलाला खूप आनंद झाला. फक्त झेनीनं आपलं शिक्षण पूर्ण करूनच हे लग्न करावं, असा त्याचा सल्ला होता. तेव्हा झेनीचं वय 18 वर्षांचं होतं. झेनीचं लग्न झाल्यानंतर ती स्वाझी राजकन्या झाली. त्यामुळे मंडेलाची मुलगी म्हणून त्याला भेटायला न येता ती आपल्या अधिकृत दर्जाचा वापर करून तिथे आली. साहजिकच, इतरांना मंडेलाला लांबून भेटावं लागायचं, तसं तिच्या बाबतीत घडलं नाही. मंडेला त्यामुळे तिला चक्क मिठी मारू शकला. तब्बल दोन दशकांच्या काळानंतर आपल्या कुटुंबामधल्या एखाद्या माणसाला मंडेला अशा प्रकारे जवळ घेऊ शकल्यावर त्याच्या भावना कशा असतील, याची आपण फक्त कल्पनाच करू शकतो! झेनीला तेव्हा मुलगीसुद्धा झाली होती. साहजिकच, मंडेला आपल्या नातीला मांडीवरच घेऊन बसला.

झिंड्झी

मंडेलाची दुसरी मुलगी झिंड्झी मात्र आपल्या आईसारखीच एकदम भडक माथ्याची होती. आपल्याला लेखिका व्हायचं आहे, असं तिनं मंडेलाला कळवताच त्याला खूप आनंद झाला होता. 1978 साली तिनं लिहिलेल्या एका कवितासंग्रहाला अमेरिकेमध्ये 1000 डॉलर्सचं बक्षीस मिळालं. त्यानंतर आपण आपल्या कुटुंबाचं चरित्रच लिहिणार असल्याचं तिनं मंडेलाला कळवलं. पण, मंडेलाला ही गोष्ट मात्र फारशी पसंत पडली नाही. आपल्या खासगी गोष्टी लोकांसमोर जाहीरपणे मांडायची संकल्पना त्याला पसंत नव्हती. झिंड्झी आपल्या आईजवळ राहात नसे. अत्यंत विचित्र आयुष्य वाट्याला आल्यामुळे तिला नैराश्यानं घेरलं. तिच्या अभ्यासावर याचा परिणाम व्हायला लागला. तिला मानसोपचारतज्ज्ञाकडे जाणं भाग पडलं. मंडेलानं पत्रांमधून तिला धीर द्यायचा खूप प्रयत्न केला. आपल्या आयुष्यात जितक्या अडचणी येतील आणि जितकी दु:खं येतील, ते सगळं आपण आपलं मन एकदम कठोर करून सहन करू शकतो, असं मंडेला तिला सांगायचा. त्यामुळे या अडचणींचं आणि दु:खांचं रूपांतर विजयामध्ये होतं, असंही मंडेला झिंड्झीला कळवायचा. पण, झिंड्झीमध्ये तिच्या वडिलांइतका धीरोदात्तपणा नव्हता. तिचं शिक्षण थांबलं. तिचं लिखाणही खुंटलं. सटरफटर कामं करणाऱ्या एका माणसाच्या प्रेमात ती पडली. त्यातून तिला एक मुलगीसुद्धा झाली. त्यानंतर झिंड्झीला मारहाण करणाऱ्या दुसऱ्या एका प्रियकरापासून तिला एक मुलगा झाला. मंडेलाच्या पहिल्या

लग्नातून जन्मलेल्या मुलांची अवस्था फार चांगली नव्हती. मोठा मुलगा तर गायबच होता. त्याच्या शिक्षणाचा पत्ता नव्हता. दुसरी मुलगी अगदीच अबोल आणि एकाकी होती.

या सगळ्या गोष्टी मंडेलाला त्याच्या तुरुंगवासात प्रचंड दु:खी करायच्या. आपल्या कुटुंबातल्या कुणालाच आपण सुख देऊ शकलो नाही, तसंच जेव्हा त्यांना आपली गरज होती, तेव्हा त्यांना वेळ देऊ शकलो नाही, याचं त्याला खूप वाईट वाटत असे. त्याचं मन त्याला सतत आतून खात असे. आपल्याशी खूप चांगलं वागलेल्या आणि आपल्यावर जवळपास उपकार केलेल्या अनेक लोकांसाठी आपण जवळपास कृतघ्न असल्यासारखाच व्यवहार केला, असं मानून तो दु:खी होत असे.

एकीकडे तुरुंगातून बाहेर कसं यायचं आणि तोपर्यंत तुरुंगातूनच वर्णद्वेषाच्या विरोधातला लढा कसा सुरु ठेवायचा, या काळजीत मंडेला असायचा. दुसरीकडे आपल्या जवळच्या लोकांच्या बाबतीत आपण काहीच करु शकत नसल्याचं आणि त्यांना कसलंच सुख देऊ शकत नसल्याचं दु:ख त्याला सतत खायचं. विनीचा विचित्रपणाही वाढत चालला होता. एकूणच, मंडेलाची मानसिक अवस्था या सगळ्यामुळे कशी झाली असेल, याची कल्पनासुद्धा करवत नाही!

बोथाचं राजकारण

एकीकडे कौटुंबिक पातळीवर प्रचंड काळजी आणि दु:ख यांचा सामना करत असताना, दुसरीकडे मंडेलाचं नाव आंतरराष्ट्रीत पातळीवर आता खूप प्रसिद्ध व्हायला लागलं होतं. 1979 साली 'आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या सामंजस्यासाठी'चा 'नेहरू पुरस्कार' मंडेलाला देण्यात आला. त्याचा स्वीकार करायला आणि मंडेलाचं त्या पुरस्काराच्या निमित्तानं लिहिलेलं भाषण वाचायला त्याचा एक सहकारी भारतात आला होता. मंडेलाला नेहरूंच्या संकल्पनांनी किती भारून टाकलं होतं, याची आठवण त्या सहकाऱ्यानं काढली. तसंच, 'कुठल्याही तुरुंगात नेहरू किंवा मंडेला यांच्यासारख्या माणसांची जिद्द मोडायची ताकद नसते, कारण त्यांचं कणखर मन हीच त्यांची ताकद असते', असं भाष्य त्यानं केलं.

कृष्णवर्णीयांच्या चळवळीकडे आता पाश्चिमात्य देशसुद्धा जास्त आपुलकीच्या भावनेनं बघत होते. त्यातच 1977 सालच्या सप्टेंबर महिन्यात 'ब्लॅक कॉंशियसनेस मूव्हमेंट' या चळवळीचा नेता स्टीव्ह बाईको याचा खूप छळ करून दक्षिण आफ्रिकन सरकारनं त्याची हत्या घडवून आणली. यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या विरोधातलं आंतरराष्ट्रीय वातावरण भलतंच तापलं. इतिहासात पहिल्यांदाच संयुक्त राष्ट्रसंघानं दक्षिण आफ्रिकेला कुठल्याही देशानं शस्त्रास्त्रं विकण्यावर बंदी घातली. अमेरिकन सरकार तर भलतंच गरम झालं. संयुक्त राष्ट्रसंघाचा अमेरिकन प्रतिनिधी पहिल्यांदाच कृष्णवर्णीय होता. त्यानं दक्षिण आफ्रिकन सरकारच अनधिकृत असल्याचं भाष्य केलं, तर अमेरिकन उपराष्ट्रपती वॉल्टर मोंडल यानं 'आपला बचाव करण्यासाठी अमेरिका धावून येईल, अशा भ्रमात दक्षिण आफ्रिकन सरकारनं अजिबात राहू नये', असा इशारा दिला. इंग्लंडनंही दक्षिण आफ्रिकन सरकारच्या वर्णद्वेषी धोरणाच्या विरोधातली आपली भूमिका आणखी कणखर केली. या दरम्यान दक्षिण आफ्रिकन सरकारमध्येसुद्धा भ्रष्टाचार आणि इतर गोंधळ यांच्यामुळे अस्थिरतेचं वातावरण निर्माण झालं आणि त्याचा शेवट व्हॉर्स्टर या पंतप्रधानाच्या राजीनाम्यात झाला.

व्हॉर्स्टरच्या जागी पी डब्ल्यू बोथा याची दक्षिण आफ्रिकेच्या पंतप्रधानपदी निवड झाली. बोथानं एकदम निर्णायक भूमिका स्वीकारली. त्यानं स्थानिक व्यावसायिक मंडळी, तसंच कृष्णवर्णीय मध्यमवर्ग अशा दोन्ही प्रकारच्या गटांमधल्या लोकांना खूश करण्यासाठीची पावलं

उचलली. शहरांमध्ये कृष्णवर्णीय लोकांना आता घरं भाड्यानं घ्यायची परवानगी मिळाली. कृष्णवर्णीय कामगारांच्या संघटनांना बोथानं कायदेशीर मान्यता दिली. पण तरीही, हे बदल पुरेसे नाहीत, असं मत अमेरिकेनं व्यक्त केलं. बोथानं एकीकडे ही चांगली पावलं उचलली असली, तरी त्याचबरोबर दुसरीकडे त्यानं दक्षिण आफ्रिकेचं लष्कर अत्यंत मजबूत करण्यावरही भर दिला. मॅग्नस मलान या आपल्या संरक्षण विभागाच्या प्रमुखाच्या मदतीनं साम्यवाद ठेचून काढायचा बोथानं निर्धार केला होता. त्यासाठी बोथाला या लष्करी ताकदीची गरज भासत होती. लवकरच शस्त्रास्त्रांच्या वाढत्या उद्योगालाही यामुळे पाठबळ मिळालं. मंडेलाचा मात्र बोथाच्या चांगुलपणावर अजिबातच विश्वास नव्हता. कृष्णवर्णीय लोक दक्षिण आफ्रिकेत बहुसंख्य असताना त्यांच्या भल्यासाठी जुजबी उपाय करून काही साध्य होणार नाही, असं मंडेलाचं मत होतं. कृष्णवर्णीय लोकांना देशाच्या संसदेत प्रतिनिधित्व मिळवून देण्याविषयी बोथानं अवाक्षरही उच्चारलं नसल्याकडे मंडेलानं सगळ्यांचं लक्ष वेधलं.

बोथा

1980 सालच्या मार्च महिन्यात जोहान्सबर्गमधून प्रकाशित होणाऱ्या 'संडे पोस्ट' या नियतकालिकाचा संपादक असलेल्या माणसानं मंडेलाची तुरुंगातून सुटका व्हावी, यासाठी न्यायालयात एक याचिका दाखल केली. अचानकपणे या मागणीनं व्यापक रूप धारण केलं. काही गोरे लोकसुद्धा आपल्या गाड्यांवर 'मंडेलाची सुटका करा' असा मजकूर लिहिलेले स्टिकर्स लावायला लागले. पण, पोलीस खात्याचा कारभार सांभाळणाऱ्या मंत्र्यानं मात्र मंडेला

साम्यवादी असल्याचा पुनरुच्चार करत, मंडेलाची तुरुंगातून सुटका व्हायची शक्यता फेटाळून लावली. पंतप्रधान बोथानंसुद्धा 'मार्क्सवादी' मंडेलाला तुरुंगातच ठेवलं जाईल, असं ठणकावून सांगितलं. मंडेला साम्यवादी आहे, हे सिद्ध करण्यासाठी नव्यानं प्रयत्न सुरु झाले. मंडेलाची भाषणं, त्याचं लिखाण, त्याची जप्त करण्यात आलेली कागदपत्रं यांचा त्यासाठी आधार घेण्यात आला. पण तरीही, मंडेलाच्या सुटकेची मागणी जोर धरत होती. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेनं मंडेलाच्या सुटकेचा आग्रह धरला.

या घडामोडी सुरु असताना एएनसीनं पूर्वीपेक्षा आक्रमक धोरण स्वीकारायचं; पण सर्वसामान्य नागरिकांना कुठलाही त्रास होणार नाही, याची काळजी घेऊन हिंसा घडवून आणायची, असं ठरवलं होतं. त्यानुसार 1980 सालच्या जून महिन्यात तेलनिर्मिती करणाऱ्या तीन उद्योगांच्या ठिकाणी एएनसीनं बॉम्बस्फोट घडवून आणले. आसपासच्या 50 मैल परिसरात या स्फोटांच्या आगीचे लोळ दिसत होते. आता अशा प्रकारचे हल्ले देशात क्रांती घडवून आणणार, असं मत एका वर्तमानपत्रानं व्यक्त केलं. मंडेलाचाही अशा हल्ल्यांना पाठिंबा होता. पण, बोथा मात्र अशा प्रकारच्या हल्ल्यांना परतवून लावायच्या निर्धारामुळे तयारच होता. एएनसीला चांगला धडा शिकवण्यासाठी तो बेत आखत होता. एएनसीचे पंख फक्त दक्षिण आफ्रिकेतच फडफडतात असं नाही, तर इतर काही देशांमध्येसुद्धा एएनसीनं आपलं जाळं विणलं आहे, अशी माहिती बोथाला मिळाली होती. परदेशांमधल्या एएनसीच्या ताकदीला ठेचून काढण्यासाठी म्हणून 1981 सालच्या जानेवारी महिन्यात बोथानं आपलं सैन्य मोझांबिकमध्ये घुसवलं आणि तिथल्या एएनसीच्या 13 लोकांना ठार केलं. त्या वर्षीच्या एप्रिल महिन्यात होऊ घातलेल्या निवडणुका नजरेसमोर ठेवूनच बोथानं हे पाऊल उचललं असल्याचं भाष्य मंडेलानं केलं. आपली सत्ता अबाधित राखण्यासाठी बोथानं एका स्वतंत्र देशाच्या सीमेचं उल्लंघन करावं आणि त्या देशात आसरा घेतलेल्या नि:शस्त्र लोकांना ठार करावं, याचा मंडेलानं निषेध केला.

सरकारच्या विरोधात होत असलेले हल्ले आणि त्याला सरकारनं आणखी क्रूरपणे दिलेलं प्रत्युत्तर हे सगळं वाढतच गेलं. त्या चार वर्षांच्या काळात दक्षिण आफ्रिकेत एकंदर 112 हल्ले आणि बॉम्बस्फोट झाले. देशाच्या इतिहासामध्ये एवढ्या कमी काळात इतकी हिंसा त्यापूर्वी कधीच झाली नव्हती. याचं रूपांतर नक्कीच क्रांतिकारी किंवा यादवी युद्धात होणार, असं अभ्यासक म्हणायला लागले. यामागे दुसरं एक कारण होतं. साम्यवादी सोव्हिएत युनियनच्या

अमेरिकेशी सुरु असलेल्या शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर बोथाला पाश्चिमात्य देश आपल्यापैकीच एक मानत होते. याउलट साम्यवादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंडेलाकडे तो खलनायक असावा, या दृष्टीनं उजव्या विचारसरणीचे हे पाश्चिमात्य देश बघत होते. साहजिकच, त्यांनी बोथाला पाठिंबा आणि मंडेलाला विरोध अशी दुहेरी नीती अवलंबली. 1979 साली इंग्लंडमध्ये मार्गारेट थॅचर सत्तेवर आली. तिचा नवरा दक्षिण आफ्रिकेमधल्या प्रभावशाली गोऱ्या लोकांशी हितसंबंध जपणारा होता. त्यामुळे आणि आपल्या मूळ विचारसरणीमुळे थॅचरनं दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषाकडे दुर्लक्ष करून, गोऱ्या लोकांना पाठिंबा द्यायचं ठरवलं. सगळीकडे भांडवलशाहीचं वार वाहावं, असं तिला वाटायचं. त्यामुळे एएनसी तिच्या दृष्टीनं 'साम्यवादी दहशतवादी'च होते. यानंतर अमेरिकेमध्ये रोनाल्ड रीगन राष्ट्रपती झाला. रीगन हासुद्धा अत्यंत कट्टर उजव्या विचारसरणीचा आणि कृष्णवर्णीयांच्या प्रश्नांशी अजिबात देणंघेणं नसल्यासारखं वागण्यासाठी कुप्रसिद्ध होता. साहजिकच, त्याला दक्षिण आफ्रिकेमधला अन्याय अजिबातच दिसत नव्हता. त्यानंही बोथाच्या वर्णद्वेषी आणि आक्रमक धोरणांना पाठिंबा दिला.

इतर आफ्रिकन देशांकडून आपल्या चळवळीला पाठिंबा मिळवण्याच्या खटपटीत असलेल्या एएनसीच्या पदरी निराशाच आली. या देशांमध्ये सतत अस्थिर वातावरण असे. वारंवार तिथे उलथापालथी घडून सरकार बदले. तसंच, सतत चळवळी, दंगली सुरु असत. त्यामुळे या देशांना आपल्या देशांतर्गत प्रश्नांनीच बेजार करून सोडलं होतं. दोन दशकांच्या काळात तब्बल 28 देशांमध्ये 50 सरकारं उलथून टाकण्यात आली होती. त्यांच्यापैकी काही ठिकाणी मानवी हक्क म्हणजे काय, असा प्रश्न पडावा, अशा प्रकारे कामकाज चालवणारे हुकूमशहा देशाची पूर्णपणे वाट लावत होते. युगांडामधला इदी अमीन हे त्याचं एक गाजलेलं उदाहरण आहे. साहजिकच, बहुतेक सगळ्या कृष्णवर्णीय आफ्रिकन देशांना कसलंही भवितव्य नाही, असा समज सगळीकडे पसरला. साहजिकच, आफ्रिकेमधल्या वर्चस्ववादी गोऱ्या लोकांना आपणच नीटपणे सत्ता चालवू शकतो, असा भ्रम पसरवण्यात आणखी यश आलं.

स्वत: मंडेलाला अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांच्यामध्ये दीर्घकाळापासून सुरु असलेलं शीतयुद्ध फार काळ टिकणार नाही, असं वाटत होतं. पण, त्याच दरम्यान अँगोला आणि मोझांबिक या देशांमध्ये साम्यवादी लोकांचं सरकार आल्यामुळे शेजारच्या दक्षिण आफ्रिकेचं या देशांशी असलेलं नातं बिघडण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली. लवकरच अँगोलामध्ये

साम्यवादी शक्ती आणि साम्राज्यवादी अमेरिका, तसंच तिच्या साथीला आलेली दक्षिण आफ्रिका यांनी धाव घेतली. त्यामुळे तिथे भीषण युद्ध सुरु झालं. या सगळ्यातून अमेरिकेच्या विरोधातलं मंडेलाचं मत आणखीनच घट्ट होत गेलं. विशेषत: सीआयए ही अमेरिकेची गुप्तचर संघटना अमेरिकेच्या वर्चस्ववादाचा प्रसार करण्यासाठी कुठल्याही थराला जाते आणि घातपात घडवून आणणं, पैसे चारणं, खून करवणं अशा वेगवेगळ्या गोष्टी करून, लोकशाही मार्गांनी निवडून आलेलं सरकारसुद्धा उलथवून टाकते, याचा मंडेलाला खूप राग येई. अमेरिका हीच जगामधली सगळ्यात मोठी दहशतवादी शक्ती आहे, याविषयी त्याच्या मनात अजिबात शंका उरली नाही.

1982 सालच्या मार्च महिन्यात मंडेलाला तुरुंगवासाची शिक्षा भोगायची सुरुवात होऊन जवळपास दोन दशकांचा काळ उलटून गेला होता. या काळात पाश्चिमात्य जग उजव्या विचारसरणीकडून डाव्या विचारसरणीकडे गेलेलं आणि तिथून परत एकदा थॅचर आणि रीगन यांच्या काळात उजव्या विचारसरणीकडे झुकलेलं मंडेलानं पाहिलं होतं. बहुतेक सगळ्यांनी दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषाचा निषेध केला असला, तरी एएनसीला महत्त्व देणं किंवा मंडेला, तसंच त्याच्या सहकाऱ्यांची तुरुंगातून मुक्तता करणं, यासाठी काहीच केलं नव्हतं. रशियन, पूर्व जर्मन आणि इतर साम्यवादी देश एएनसीला मदत करत होते. त्यांच्यावरच सगळं भविष्य अवलंबून आहे, असं मंडेलाला अधूनमधून वाटायचं. यादरम्यान 1980 साली झिम्बाब्वेमध्ये क्रांती झाली आणि तिथेसुद्धा गोऱ्यांचं प्रदीर्घ काळ असलेलं वर्चस्व संपुष्टात आलं. आता फक्त दक्षिण आफ्रिका आणि तिचा शेजारी असलेला नामीबिया इथेच वर्णद्वेषाचा नायनाट होणं बाकी होतं.

1982 सालच्या एप्रिल महिन्यात रॉबन आयलंड तुरुंगाचा अधिकारी मंडेलाच्या बराकीत आला आणि त्यानं मंडेलाला घाईघाईनं त्याचं सामानसुमान आवरायला सांगितलं. मंडेलाची रवानगी दुसरीकडे केली जात असल्याचं त्याला सांगण्यात आलं. घाई तर इतकी होती की, मंडेलानं कसंबसं आपलं सामान आवरलं. त्याला आपल्या सहकैद्यांचा नीटपणे निरोपसुद्धा घेता आला नाही. मंडेलाबरोबरच सिसुलू आणि इतर दोघं जण यांना बोटीनं केपटाऊनला नेण्यात आलं. केपटाऊनला पोहोचल्यानंतर एका पिंजऱ्यावजा जाळीच्या ट्रकमधून त्यांना 'पोल्समूर' नावाच्या तुरुंगात नेण्यात आलं. बाहेरून बहारदार दिसणाऱ्या या तुरुंगाच्या आतलं वातावरण

इतर तुरुंगांप्रमाणेच कोंदट, कुबट होतं. या तुरुंगाच्या वरच्या मजल्यावर मंडेला आणि इतर तिघं यांना नेण्यात आलं. तिथे एका खोलीत चार खाटा आणि एक बाथरूम अशी व्यवस्था होती. आता मंडेला इथे राहाणार होता.

नव्या तुरुंगातली व्यवस्था रॉबन आयलंडच्या तुरुंगापेक्षा खूपच चांगली होती. इथली वागणूक चांगली तर असायचीच, पण शिवाय इथे मंडेला आणि त्याच्या सहकाऱ्यांना चांगलं अन्न मिळायचं. तसंच, त्यांना वर्तमानपत्रं, नियतकालिकं, अगदी 'टाईम' हे साप्ताहिक वगैरे सगळं वाचायला मिळायचं. इथेच आयुष्यात पहिल्यांदाच मंडेलानं टीव्ही, एफ एम रेडिओ, व्हीडिओ प्लेअर अशा उपकरणांचा वापर केला. मंडेलाला वाचन आणि लिखाण करण्यासाठी एक स्वतंत्र खोलीसुद्धा देण्यात आली होती. रॉबन आयलंडच्या तुरुंगात हे पंचतारांकित हॉटेल असावं, असंच मंडेलाला वाटत होतं! पण तरीही, आपल्या इतर सहकाऱ्यांपासून दूर असल्यामुळे आणि निसर्गाशी जवळपास कसलाच संबंध येत नसल्यामुळे मंडेलाला इथे उदास वाटायचं. विनी त्याला भेटायला आली, तेव्हा या तुरुंगाची रचना आणि तिथल्या सुखसोयी बघून तिला खूप समाधान वाटलं खरं, पण मंडेला मात्र पूर्वीपेक्षा उदास आहे, हे बघून तिला थोडी निराशाही जाणवली.

आपल्याला इथे का आणण्यात आलं आहे, हे मंडेला आणि त्याच्या तीन सहकाऱ्यांना सुरुवातीला समजत नव्हतं, पण लवकरच यामागचा दक्षिण आफ्रिकन सरकारचा हेतू त्यांच्या लक्षात आला. रॉबन आयलंडमध्ये मंडेला आणि त्याचे हे तीन वरिष्ठ सहकारी इतर राजकीय कैद्यांच्या सहवासात असल्यामुळे या कैद्यांना त्यांच्याकडून मार्गदर्शन लाभत असे. त्यामुळे तुरुंगातच आपल्या विरोधात अनेक लोक संघटित होत असल्याची आणि त्यांना मंडेलाचं समर्थ नेतृत्व लाभत असल्याची भीती दक्षिण आफ्रिकन सरकारला लागून राहिली होती. त्यामुळे या वरिष्ठ नेत्यांना कनिष्ठ कार्यकर्त्यांपासून तोडायचा हा डाव सरकारनं आखला होता.

1982 साली मंडेला नव्या तुरुंगात आलेला असताना दक्षिण आफ्रिकेचा पंतप्रधान बोथा यानं एक नवाच डाव रचला. भारतीय वंशाचे लोक, तसंच मिश्रवर्णीय लोक यांना स्वत:चे स्वतंत्र संसदपटू निवडायचे अधिकार द्यायचा आपण विचार करत असल्याचं बोथानं जाहीर केलं. पण कळस म्हणजे, कृष्णवर्णीय लोकांना मात्र हे हक्क मिळणार नाहीत असं त्यानं सांगितलं! बोथाचा हेतू अगदी स्पष्ट होता. वेगवेगळ्या कारणांमुळे एकत्र आलेल्या गौरेतर समाजाचे त्याला

तुकडे पाडायचे होते. कृष्णवर्णीय, भारतीय, तसंच मिश्रवर्णीय लोक या सगळ्यांमध्ये बोथाला फूट पाडायची होती. पण प्रत्यक्षात एकदम भलतंच वेगळं प्रकरण उद्भवलं. सगळ्या वर्णांच्या लोकांना प्रतिनिधित्व मिळालं पाहिजे, अशा मागणीनं जोर पकडला. एएनसी ही मागणी करण्यात आघाडीवर होती. इतकी वर्षं मिश्रवर्णीय लोक कुठलीच टोकाची भूमिका घेत नसत. पण, गोऱ्या लोकांचं सरकार असल्यामुळे त्यांच्या विरोधात जायचा धोका पत्करायला नको; म्हणून ते सरकारचं म्हणणं निमूटपणे मान्य करत असत, पण आता मात्र अचानकपणे मिश्रवर्णीय लोकांनी कृष्णवर्णीय लोकांना अनुकूल अशी भूमिका घेऊन सगळ्यांना धक्काच दिला. त्यांनी सरकारच्या गौरेतर लोकांमध्ये फूट पाडण्याच्या धोरणाला विरोध करून उलट सगळ्यांना समान हक्क देणारी व्यवस्था असली पाहिजे, यासाठी आंदोलन सुरु केलं. यासाठी एएनसीच्या साथीत 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट (युडीएफ)' नावाची एक संघटनासुद्धा सुरु करण्यात आली.

दरम्यान सरकारनं गोरे, भारतीय आणि मिश्रवर्णीय यांनाच संसदेत स्थान देण्यासाठी, तसंच त्यांच्यासाठीच सगळे कायदेकानून बनवण्यासाठी जय्यत तयारी केली. या संदर्भातलं विधेयक 1983 सालच्या नोव्हेंबर महिन्यात मतदानासाठी मांडण्यात आलं. अर्थातच, या विधेयकावर मत द्यायचा अधिकार फक्त गोऱ्यांनाच होता. काही मोजक्या गोऱ्या व्यावसायिकांनी या विधेयकाला विरोध केला, पण इतर बहुतेकांनी या विधेयकाला पाठिंबा दिला. तथाकथित मान्यवर वर्तमानपत्रांनीसुद्धा सरकारची बाजू उचलून धरली. शेवटी 76 टक्के मतदारांनी या विधेयकाच्या बाजूनं मतदान करून ते मंजूर केलं. बोथाच्या दृष्टीनं हा मोठा विजय होता. यानंतर लवकरच मोझांबिकच्या राष्ट्रपतीबरोबर एक शांतता करार करून बोथानं दुसरा विजय मिळवला. कारण एएनसीच्या दृष्टीनं मोझांबिक हा देश आपलं बस्तान बसवायला आणि लपून राहायला चांगला होता.

या सगळ्या बातम्यांमुळे मंडेला अर्थातच निराश झाला. आपण वर्णद्वेष संपवत असल्याचं जगाला भासवून प्रत्यक्षात त्याची व्याप्ती खूप जास्त करायचे बोथाचे प्रयत्न सुरु आहेत, याची मंडेलाला जाणीव होती. कृष्णवर्णीय लोक आणि भारतीय, तसंच मिश्रवर्णीय लोक यांच्यात आता फूट पडणार; शिवाय ती वाढत जाणार याविषयी मंडेलाला कुठलीच शंका वाटत नव्हती. 1984 साली बोथानं सार्वत्रिक निवडणुका घ्यायचा निर्णय जाहीर केला. पण मिश्रवर्णीय मतदारांपैकी फक्त 31 टक्के लोकांनी आणि भारतीयांपैकी फक्त 20 टक्के मतदारांनी मतदान

करून या पद्धतीला आपला पाठिंबा नसल्याचं दाखवून दिलं. युडीएफच्या कार्यकर्त्यांना त्रास देणं, अटक करणं, त्यांची हत्या करणं असले अनेक प्रकार सरकारनं सुरू केले. पण, त्यामुळे खचून न जाता; उलट युडीएफच्या कार्यकर्त्यांची जिद्द वाढत गेली. सरकारच्या विरोधातली आंदोलनं वाढतच गेली. मंडेलाची तुरुंगातून मुक्तता करावी, या मागणीनंही जोर धरला. आपल्या नेहमीच्या चातुर्यानं बोथानं यासंदर्भातही एक चाल रचली. जर मंडेला आपण हिंसात्मक मार्गांचा त्याग करत असल्याचं मान्य करत असेल, तर आपण त्याला तुरुंगातून सोडायला तयार असल्याचं बोथानं जाहीर केलं. 31 जानेवारी 1985 या दिवशी बोथानं हे विधान दक्षिण आफ्रिकेच्या संसदेपुढेसुद्धा केलं. मंडेलाकडून यासंदर्भात उत्तर मागण्यात आलं.

मंडेलानं खूप विचार करून लिहिलेल्या उत्तरात बोथाचा हा प्रस्ताव आपल्याला अमान्य असल्याचं सांगितलं. त्याचबरोबर कृष्णवर्णीयांच्या चळवळीमध्ये फूट पडत असल्याच्या बातम्या खोट्या असून, आपण सगळे एकत्र काम करत असल्याचा उल्लेखही मंडेलानं केला. आपल्याला स्वातंत्र्य देण्याआधी बोथानं वर्णद्वेष संपवावा, लोकांमध्ये फूट पाडायचे प्रयत्न बंद करावेत, जनतेविरुद्ध चालवलेला हिंसाचार बंद करावा; मग आपणही हिंसेचा पुरस्कार करणार नाही, असं मंडेलानं म्हटलं होतं. एका स्टेडियममध्ये मंडेलाचं हे पत्र त्याच्या मुलीनं जाहीररीत्या वाचून दाखवलं. त्यात 'जोपर्यंत आपल्या देशामधली जनताच स्वतंत्र होत नाही, तोपर्यंत बोथा आपल्याला कसल्या स्वातंत्र्याची लालूच दाखवतो आहे?', असा सवाल मंडेलानं केला होता. दोन दशकांच्या काळात प्रथमच मंडेलाचे शब्द लोकांच्या कानांवर अप्रत्यक्षरीत्या का होईना; पण पडत होते. एएनसी आणि युडीएफ या संघटनांवरचा मंडेलाचा विश्वास त्यातून प्रकट होत होता. हे सगळं ऐकून उपस्थित असलेले लोक बेभान झाले. कित्येकांच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू ओघळत होते.

मंडेलाच्या सुटकेची मागणी आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढतच गेली. दक्षिण आफ्रिकेमधला हिंसाचारही वाढत राहिला. बोथाचे कपटी डाव सुरूच होते. मंडेलाला कोंडीत पकडण्यासाठी तो धडपडत होता. खोटं चित्र लोकांसमोर उभं करायचा प्रयत्न तो करत होता, पण मंडेलानं आपलं डोकं शांत ठेवून या परिस्थितीचा सामना करायचं ठरवलं होतं. आपली सुटका व्हावी, असं मंडेलाला अर्थातच वाटत होतं. पण, या सुटकेच्या बदल्यात आपल्या वर्णद्वेष संपवण्याच्या मूळ हेतूचा बळी द्यायची मंडेलाची तयारी नव्हती. म्हणूनच, हे प्रकरण आता पुढे कोणत्या मार्गावर

जाणार याविषयी सगळ्यांनाच कुतूहल वाटत होतं.

यादवी युद्धाकडे वाटचाल

बोथाची कटकारस्थानं आणि त्याला मंडेलानं दाद न देणं, अशा परिस्थितीत पुढच्या काळात हिंसाचार वाढत गेला. 1985 सालच्या मार्च महिन्यात शार्पव्हिलच्या पंचविसाव्या स्मृतिदिनी हिंसाचारानं नवी पातळी गाठली. पोलिसांनी 19 निदर्शकांना गोळ्या घालून ठार केलं. साहजिकच, इथून पुढे हिंसाचारात वाढ व्हायची दाट शक्यता असल्याचा इशारा एएनसीच्या वरिष्ठांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिला. कृष्णवर्णीय पोलिसांनी आता आपल्याला गोळ्या झाडायचे आदेश देणाऱ्या जुलमी गोऱ्यांवरच गोळीबार करावा, असं आवाहन करण्यात आलं. पण तरीही, गोऱ्या लोकांच्या आदेशांनुसार वागणाऱ्या कृष्णवर्णीय पोलिसांवर कृष्णवर्णीय निदर्शक हल्ले करायला लागले. अर्थात, कित्येकदा यामागे सरकारचा हात असे. उदाहरणार्थ, 1985 साली एका कृष्णवर्णीय तरुणीवर दगडांचा वर्षाव करून नंतर तिला जिवंत जाळण्याचा आरोप एएनसीवर ठेवण्यात आला. पण, काही वर्षांनंतर हा उद्योग दक्षिण आफ्रिकन सरकारनंच केला असल्याचा आणि त्याचा आळ एएनसीवर आणल्याचा गुप्त ठेवण्यात आलेला पुरावा अभ्यासकांच्या हाती लागला. अशा प्रकारे सरकारनं कित्येक कृष्णवर्णीय लोकांची हत्या केली किंवा करवून घेतली आणि त्याचं खापर कृष्णवर्णीय लोकांवरच फोडलं.

1985 सालच्या जून महिन्यात परिस्थिती अजूनच बिघडली. काही भागांमध्ये तर हिंसाचारानं नुसतं थैमान घातलं. तिथे स्थैर्य नावाची गोष्टच नसे. सतत हाणामारी, खूनखराबा, दंगल, गोंधळ अशा गोष्टी सुरू असत. जोहान्सबर्गचा परिसर तर जवळपास यादवी युद्धाच्या सावटाखालीच आला. कित्येक कृष्णवर्णीय पोलिसांवर आपलं घरदार सोडून तात्पुरत्या स्वरूपाच्या तंबूवजा घरांमध्ये आश्रय घ्यायची पाळी आली. शस्त्रास्त्रं जवळ बाळगल्याशिवाय कुणाला आपलं घर सोडणंसुद्धा शक्य होईना. 20 जुलैला सरकारनं आणीबाणी जाहीर केली. पोलिसांना कुठल्याही कारणावरून कुणालाही अटक करायचे किंवा वेळप्रसंगी सरळ गोळ्या घालायचे आदेश देण्यात आले. पण, त्यामुळे परिस्थितीमध्ये कसलीच सुधारणा झाली नाही. कृष्णवर्णीय लोकांची ही चळवळ सरकारच्या नियंत्रणाबाहेर गेली असल्याचं चित्र निर्माण झालं. आता आपलाच विजय होणार अशी कार्यकर्त्यांना खात्री वाटत होती. सरकार बचावात्मक भूमिकेकडे झुकत चाललं होतं.

या सगळ्या घटनांची दृश्यं पाश्चिमात्य देशांमध्ये टीव्ही आणि वर्तमानपत्रं यांच्यामध्ये सातत्यानं झळकत असत. त्यामुळे बोथाच्या हातात दक्षिण आफ्रिकेची सूत्रं आहेत आणि तो सगळ्या कारभारावर व्यवस्थितपणे नियंत्रण ठेवतो आहे, असं कुणालाच वाटेना. त्यातच वर्णद्वेषाच्या विरोधातले गुंतवणूकदार बहुराष्ट्रीय बँकांना दक्षिण आफ्रिकेमध्ये कसलेच आर्थिक व्यवहार करू नका, असं सांगायला लागले. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडायला लागला. तोपर्यंत सलग दोन वर्षं दक्षिण आफ्रिकन सरकारनं सारासार विचार न करता अशा बँकांकडून अल्पमुदतीची कर्जं मोठ्या प्रमाणावर घेऊन ठेवली होती. त्यातली काही कर्जं तर खूप मोठी होती. उदाहरणार्थ, अमेरिकेतल्या न्यूयॉर्कच्या 'चेस मॅनहॅटन' बँकेनं दक्षिण आफ्रिकन सरकारला 50 कोटी डॉलर्स उधार दिले होते. पूर्वीपासूनच ही बँक वर्णद्वेषाचा पुरस्कार करत असे. शार्पव्हिलचा नरसंहार झाल्यावर या बँकेनं दक्षिण आफ्रिकन सरकारला मोठी मदत केली होती! पण 31 जुलै 1985 या दिवशी बँकेनं दक्षिण आफ्रिकन सरकारला दिलेल्या कर्जांच्या मुदतीत यापुढे वाढ करायची नाही, असा निर्णय घेतला. अर्थातच, अमेरिकेमध्ये लोकांनी दक्षिण आफ्रिकेच्या परिस्थितीच्या संदर्भात केलेल्या निषेधांमुळे बँकेला हे पाऊल टाकणं भाग पडलं. या निर्णयामुळे दक्षिण आफ्रिकन सरकारची चांगलीच पंचाईत झाली. कारण पूर्वी घेतलेली कर्जं आता त्या कर्जांची मुदत संपताच फेडणं भाग होतं. इतर बँकांनीसुद्धा 'चेस मॅनहॅटन' बँकेचीच री ओढली. त्यामुळे दक्षिण आफ्रिकन सरकारपुढच्या अडचणी वाढत गेल्या. 'रँड' या दक्षिण आफ्रिकेच्या चलनाच्या ताकदीविषयी गुंतवणूकदारांच्या मनात शंका निर्माण झाल्या आणि त्यामुळे या चलनाचा दर घसरत गेला. दक्षिण आफ्रिकन मध्यवर्ती बँकेला मध्यस्थी करणं भाग पडलं. स्वीस आणि जर्मन बँकांकडून खूप जास्त व्याजदरानं कर्जं घेऊन या अवघड परिस्थितीतून मार्ग काढायचा प्रयत्न करण्यात आला.

मंडेलाला या सगळ्या बातम्या समजल्यावर त्याला भलताच आनंद झाला. पण, अशा प्रकारे बँका दक्षिण आफ्रिकन सरकारवर दबाव आणतील, या गोष्टीची त्याला अजिबातच अपेक्षा नव्हती. यातूनच एएनसी आणि इतर संघटनांच्या चळवळींचा आंतरराष्ट्रीय पातळीवर किती दबदबा निर्माण झाला होता, हे दिसून येतं असं मंडेलाचं मत पडलं. या घटनाक्रमामुळे गांगरून गेलेल्या बोथानं बँकांना आश्वस्त करण्यासाठी खूप धडपड केली. आपण वर्णद्वेषी

भूमिकेमध्ये थोडेफार बदल करू, तसंच मंडेलाच्या सुटकेसाठीचे प्रयत्न सुरू करू, असं सरकारच्यावतीनं सांगण्यात आलं. पण, काही काळानंतर बोथानं केलेल्या भाषणात एकदम पलटवार केलं. आपल्या सरकारच्या विरोधात सुरू असलेल्या अतिरेकी कारवाया थांबल्या पाहिजेत, असं सांगून त्यानं या कारवाया करणाऱ्यांना देशद्रोही ठरवलं. मंडेला साम्यवादी असल्यामुळे त्याची मुक्तता करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याची घोषणा त्यानं केली. तसंच, आपल्या सहनशक्तीचा अंत बघायचा कुणी प्रयत्न करू नये, असा इशाराही दिला. मंडेलानं सुटका झाल्यावर कोणत्याही हिंसक किंवा दहशतवादी कारवाया करणार नाही; याची ग्वाही दिली, तरच त्याला तुरुंगातून सोडण्यात येईल, असं बोथानं परत एकदा जाहीर केलं. मंडेलानं अर्थातच आपली सुटका झाली, तर ती पूर्णपणे बिनशर्तच असली पाहिजे, असं आधीच सांगितलं होतं.

1985 सालच्या ऑगस्ट महिन्याच्या मध्यावर करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणामध्ये दक्षिण आफ्रिकेमधल्या कृष्णवर्णीयांपैकी 70 टक्के आणि गोऱ्या लोकांपैकी 30 टक्के लोकांना देशात यादवी युद्ध होणार याची खात्री वाटत असल्याचं दिसून आलं. पण अजूनही, जर कृष्णवर्णीय लोक आणि गोरे लोक यांच्यात समझोता झाला आणि त्यांचं संयुक्त सरकार आलं, तर देशाची परिस्थिती सावरू शकते, असं बहुसंख्यांना वाटत होतं. 90 टक्के कृष्णवर्णीयांना मंडेलाची विनाअट सुटका झाली पाहिजे, असं वाटत होतं. पण, 57 टक्के गोऱ्या लोकांना कोणत्याही परिस्थितीत मंडेलाची सुटका होता कामा नये, असं वाटत होतं. काही जणांना तर लवकरच बोथा आणि मंडेला यांच्यामध्ये सत्ता विभागली जाईल, असंही वाटत होतं. एकूण सगळी परिस्थिती अत्यंत बेभरवशाची झाली होती. आपल्या पुढ्यात काय वाढून ठेवलं आहे, याविषयी दक्षिण आफ्रिकेच्या जनतेला अजिबात कल्पना नव्हती. सगळं चित्र अत्यंत अंधूक दिसत होतं.

मंडेलाची दहशतवादी म्हणून प्रतिमा निर्माण करण्यासाठी सरकारनं खूप धडपड केली. बोथानं मंडेलाची सुटका होणार नाही, असं जाहीरपणे सांगितल्यावर 'वॉशिंग्टन टाईम्स' या उजव्या विचारसरणीच्या अमेरिकन वर्तमानपत्राचे दोन बातमीदार मंडेलाची मुलाखत घ्यायला आले. लोकांना सशस्त्र लढा द्यायला सांगण्यावाचून आपल्यासमोर दुसरा कुठलाच पर्याय नसल्याचा मुद्दा मंडेलानं त्यांना नीट समजावून सांगितला. दुष्टांच्या विरोधात शस्त्राचा वापर केला पाहिजे, असं ख्रिश्चन धर्मसुद्धा सांगतो, याचा दाखला मंडेलानं दिला. अमेरिकेमध्ये

लोकशाहीची पाळंमुळं घट्ट रुजलेली असल्यामुळे तिथे कदाचित हा मुद्दा नीटपणे समजणार नाही, असं मंडेलानं त्यांना ठासून सांगितलं. तसंच, कृष्णवर्णीय दक्षिण आफ्रिकन लोकांना कसलेच मूलभूत हक्क नसताना मध्ययुगीन काळातल्या एखाद्या जुनाट सरकारनं जुलूम करावेत, अशा परिस्थितीला सामोरं जावं लागतं, याची आठवणही मंडेलानं करून दिली. मंडेलानं आपले हे सगळे मुद्दे अत्यंत तर्कशुद्धरीत्या मांडले होते आणि त्यामागचं स्पष्टीकरणही त्यानं अगदी नीटपणे दिलं होतं. पण, दक्षिण आफ्रिकन सरकारच्या दलालांसारखं काम करणाऱ्या या बातमीदारांनी मंडेलाच्या सगळ्या विधानांचा चुकीचा अर्थ लावून त्याला भरपूर फोडणी दिली. 'मंडेला लोकांना हिंसा करा असं सांगतो' असं म्हणत, त्यांनी मंडेलाची चक्क 'दहशतवादी माणूस' म्हणून संबोधना केली! तसंच, हिंसा सोडून दुसरा मार्गच या माणसाला ठाऊक नसल्याचा दावाही त्यांनी केला.

मंडेलाची सुटका व्हावी; यासाठी एक मान्यवर धर्मगुरू मंडेलाच्या तुरुंगाकडे एक मोर्चा घेऊन जाणार होता. पण, त्याआधीच त्या धर्मगुरूला अटक करण्यात आली. त्यामुळे देश पेटला आणि नव्यानं दंगली उसळल्या. यामुळे पाश्चिमात्य गुंतवणूकदार आणखी बिथरले. त्यांनी वेगानं आपली गुंतवणूक काढून घ्यायला सुरुवात केली. जोहान्सबर्गचा शेअरबाजार कोसळला. रँड या चलनानं नवा नीचांक गाठला. एका वर्षात ब्रिटिश पौंडाच्या तुलनेत रँडचं मूल्य निम्म्याहून कमी झालं! मंडेलाची तुरुंगातून सुटका झाली, तरच परिस्थितीत सुधारणा होऊ शकते, असं अनेक शेअरदलालसुद्धा म्हणायला लागले. ही मोठी विचित्र परिस्थिती होती. कारण भांडवलशाहीचं समर्थन करणाऱ्या आणि उजव्या विचारसरणीला आदर्श मानणाऱ्या लोकांनी एका तथाकथित साम्यवादी माणसाची सुटका झाल्याशिवाय आपल्या देशाची खैर नाही असं मानावं, हा त्यांच्या दृष्टीनं मोठा दैवदुर्विलासच होता! दक्षिण आफ्रिकेच्या अर्थव्यवस्थेला घरघर लागली. प्रचंड मोठ्या प्रमाणावर समस्या निर्माण व्हायला लागल्या.

अमेरिका आणि युरोप इथल्या वर्णद्वेषाच्या विरोधातली मतं असलेल्या संघटनांनी आणि लोकांनी वर्णद्वेषी दक्षिण आफ्रिकेवर आर्थिक बंधनं टाकली जावीत, अशा मागण्या सुरू केल्या. या लोकांनी अमेरिकेमधल्या निवृत्तीवेतन योजनांद्वारे दक्षिण आफ्रिकेत गुंतवलेले पैसे काढून घेतले जावेत, यासाठीसुद्धा प्रयत्न सुरू केले. पण, अमेरिकन आणि ब्रिटिश सरकारं मात्र ढिम्मपणे सगळा कारभार बघत राहिली. आपण काय भूमिका घ्यावी, या बाबतीत अमेरिकन राष्ट्रपती

रीगन यानं ब्रिटिश पंतप्रधान थॅचर हिला सल्ला विचारला. थॅचरची स्वत:ची या बाबतीतली काही आग्रही मतं होती. मुक्त अर्थव्यवस्थेविषयी थॅचरला खूप प्रेम असल्यामुळे वर्णद्वेषापेक्षा दक्षिण आफ्रिकेमधल्या या मुक्त अर्थव्यवस्थेला जपलं पाहिजे, असं तिचं मत होतं. याशिवाय इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामधल्या पूर्वीच्या कराराचा परिणाम म्हणून सुमारे 10 लाख गोऱ्या दक्षिण आफ्रिकन लोकांकडे ब्रिटिश पासपोर्ट्स होते. जर दक्षिण आफ्रिकेमधली परिस्थिती आणखी बिघडली, तर हे सगळे लोक आपला देश सोडून इंग्लंडमध्ये राहायला येतील, अशी भीतीसुद्धा थॅचरला वाटत होती. एएनसी, तसंच इतर कृष्णवर्णीय लोकांच्या साम्यवादाच्या धोक्याविषयी थॅचरचे सल्लागार तिला सतत घाबरवत असायचे. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेवर अधिकृतरीत्या निर्बंध घालण्यापेक्षा आपण बोथाशी वैयक्तिक पातळीवर चर्चा करावी असं तिनं ठरवलं.

बोथा आणि थॅचर यांची पूर्वीपासूनची ओळख होती. 1970 च्या दशकाच्या सुरुवातीला थॅचर इंग्लंडची शिक्षणमंत्री आणि बोथा दक्षिण आफ्रिकेचा संरक्षणमंत्री असताना त्यांची भेट झाली होती. आता 1984 सालच्या जून महिन्यात आपापल्या देशांच्या सर्वोच्चपदी हे नेते असताना, त्यांची परत एकदा भेट झाली. बोथाचं म्हणणं ऐकून घेतल्यावर थॅचरनं त्याला मंडेलाची तुरुंगातून सुटका करणं, कृष्णवर्णीय लोकांना त्यांच्या राहत्या घरातून बाहेर काढायचे प्रकार थांबवणं आणि दक्षिण आफ्रिकेच्या शेजारच्या देशांमध्ये घातपाताच्या कारवाया करायचे प्रकार थांबवणं, या सगळ्या गोष्टी करायला सांगितलं. पण, बोथानं हे सगळं फारसं मनावर घेतलं नाही. तसंच, मंडेला साम्यवादी आहे, ही गोष्ट थॅचरच्या मनावर ठसवण्यात तो चांगला यशस्वी ठरला.

1985 सालच्या सप्टेंबर महिन्यात बोथानं दक्षिण आफ्रिकेत आणीबाणी लागू केल्यावर थॅचर जरा बिथरली. त्यानंतर पुढच्याच महिन्यात कॉमनवेल्थच्या एका परिषदेमध्ये थॅचरवर अवघड परिस्थिती ओढवली. या बैठकीत अनेक सदस्य देश दक्षिण आफ्रिकेच्या बाबतीत इंग्लंडनं कडक भूमिका घ्यावी, तसंच दक्षिण आफ्रिकेवर कडक निर्बंध घालावेत, अशा मागण्या करणार याची थॅचरला कल्पना होती. त्यामुळे या नेत्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देता आपलंच घोडं पुढे दामटायचा निर्णय तिनं घेतला. साहजिकच, इतर तीन डझन राष्ट्रप्रमुखांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून थॅचरनं दक्षिण आफ्रिकेच्या विरोधातल्या सगळ्या मागण्या अमान्य

करून टाकल्या. फक्त काही 'मान्यवर' लोकांनी दक्षिण आफ्रिकेला भेट द्यावी, असं तिनं सुचवलं. अगदी नाईलाजानं बोथानं या गोष्टीला कुरकूर करत मान्यता दिली.

ठरल्याप्रमाणे एकंदर 7 जणांची एक टीम दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आली. त्यात इंग्लंडच्या टांकसाळीचा माजी प्रमुख, ऑस्ट्रेलियाचा माजी पंतप्रधान, नायजेरियाचा माजी राष्ट्रपती असे लोक होते. या लोकांनी दक्षिण आफ्रिकेत गेल्यावर, मंडेलाला तुरुंगात जाऊन भेटायचंच असं ठरवलं होतं. आता मंडेलाची लोकप्रियता आणखीनच वाढली होती. जगभरात दररोज मंडेलाविषयी वेगवेगळ्या माध्यमांमधून बातम्या छापून येत असत. या सगळ्याची जाणीव असलेला मंडेला अत्यंत धीरगंभीरपणे वागे. कधीही तो आपल्या भावनांचा उद्रेक होऊ देत नसे. आततायी प्रतिक्रिया देणं तो नेहमी टाळे. मंडेला इतका स्थितप्रज्ञासारखा वागायचा की, त्याला 'तुला आत्ताच्या आत्ता तुरुंगवासातून मुक्त करण्यात येत आहे', असं संबंधित अधिकाऱ्यानं सांगितलं असतं, तर अजिबात उत्तेजित न होता मंडेलानं 'आणखी एका तासानं सोडा; म्हणजे मला माझं सामान आवरता येईल', असं उत्तर अत्यंत शांतपणे दिलं असतं, असं म्हटलं जाई! या माणसावरून जगभरात प्रचंड खळबळ माजली आहे, असं त्याच्याकडे बघून कुणालाच वाटलं नसतं, असंही लोक म्हणायचे.

या दरम्यान मंडेलाची एकूण प्रकृती ठीकठाक दिसत असली, तरी 1985 सालच्या एका नेहमीच्या वैद्यकीय तपासणीच्या दरम्यान मंडेलाच्या वृषणांचा आकार वाढल्याचं डॉक्टरांच्या लक्षात आलं. खरं म्हणजे वयाची साठी गाठलेल्या लोकांमध्ये हा प्रकार आढळणं ही खूपच सामान्य गोष्ट मानली जाते. पण, मंडेलाच्या बाबतीत हा प्रकार घडलेला असल्यामुळे डॉक्टर्स एकदम घाबरून गेले. यावर शस्त्रक्रिया करणं तर गरजेचं होतं, पण त्या शस्त्रक्रियेदरम्यान काही घडलं, तर त्याचे परिणाम भयानक होतील, याची त्यांना जाणीव होती. तुरुंगाच्या प्रमुख अधिकाऱ्यानं तर 'मंडेलाला काही झालं, तर यादवी युद्ध सुरू होईल', अशा शब्दांमध्ये डॉक्टरांना तंबी दिली. त्यामुळे आणखी काही तज्ज्ञ डॉक्टरांना त्यांच्या सल्ल्यासाठी बोलवण्यात आलं. एक डॉक्टर तर स्वित्झर्लंडहून आला! त्या सगळ्या डॉक्टरांनी मंडेलावरची शस्त्रक्रिया आवश्यक असल्याचा पुनरुच्चार केला.

या शस्त्रक्रियेसाठी आदल्या दिवशी मंडेलाला नेण्यात आलेल्या रुग्णालयाच्या ठिकाणी विनी विमानानं पोहोचली. योगायोगानं त्याच विमानाच्या प्रथमश्रेणी कक्षातून दक्षिण

आफ्रिकेचा कायदामंत्रीसुद्धा प्रवास करत होता. त्यानं विनीची भेट घेऊन तिला सगळं काही ठीकठाक होईल, असा दिलासा दिला. त्यानंतर बराच वेळ विनी प्रथमश्रेणी कक्षात जाऊन त्याच्याशी चर्चा करत बसली. मंडेलावरची शस्त्रक्रिया ठीकठाक झाली. पण, त्याच सुमाराला मंडेलाच्या या 'आजारामुळे' त्याला तुरुंगातून सोडून देण्याचा निर्णय सरकारनं घेतला असल्याची अफवा पसरली. त्यामुळे तुरुंगाबाहेर त्याच्या समर्थकांची मोठी गर्दी जमली. ही संधी साधून जोहान्सबर्गच्या 'संडे टाईम्स' या वर्तमानपत्रानं राष्ट्रपती बोथाला मंडेलाला वैद्यकीय उपचारांसाठी परदेशी पाठवून द्यावं, असं आवाहन केलं. असं न होऊ देता मंडेलाचं दक्षिण आफ्रिकेतच निधन झालं, तर कहर होईल आणि महाभयानक गोंधळाचं वातावरण निर्माण होईल, असा इशाराही लेखकानं दिला.

शस्त्रक्रियेनंतर मंडेलाला वरच्या मजल्यावरच्या त्याच्या आधीच्या जागेत न नेता त्याची तळमजल्यावरच सोय करून देण्यात आली. इथे मंडेलाला तीन मोठ्या खोल्या देण्यात आल्या. त्यामधली एक खोली लिखाण-वाचन करण्यासाठी, दुसरी व्यायाम करण्यासाठी आणि तिसरी आराम करण्यासाठी अशी ही व्यवस्था होती. पण पूर्वीप्रमाणेच निसर्गाचं दर्शनसुद्धा होऊ नये, असा कुबटपणा आणि कोंदटपणा तिथे भरलेला होता. शेजारच्या बराकींमध्ये कोंबण्यात आलेले सर्वसामान्य कैदी मंडेलावर खिडकीतून उगीचच आरडाओरडा करायचे. त्यानंतर तुरुंगातले अधिकारी पडदा सरकवून हा प्रकार थांबवायचे. आपल्या तब्बल दोन तपांच्या तुरुंगवासात प्रथमच मंडेला एकटा पडला.

दक्षिण आफ्रिकेत सुरु असलेल्या महाभयानक हिंसाचाराच्या बातम्या मंडेलापर्यंत नियमितपणे पोहोचत असत. त्या ऐकून मंडेला खूप काळजीत पडायचा. परिस्थिती हाताबाहेर चालली आहे, असं त्याचं मत झालं. आता चर्चेची वेळ आली आहे, असं त्याला वाटायचं. तसं झालं नाही आणि हिंसेचाच वापर केला, तर लवकरच महाभयानक परिस्थिती बघायला मिळेल, असं तो म्हणायला लागला. शांततामय मार्गानंच यातून मार्ग काढला पाहिजे, असं तो त्याला भेटायला येणाऱ्या लोकांना सुचवत असे. इथून पुढे रक्तरंजित क्रांती घडवून आणायचे प्रयत्न थांबवले पाहिजेत, असं त्याचं मत बनलं. पण त्याचबरोबर, एएनसीच्या लोकांना आणि विशेषत: तरुण पिढीला मात्र हे विचार पटणार नाहीत, याचीसुद्धा मंडेलाला जाणीव होती. त्यामुळे या तरुण पिढीला आपल्याबरोबर कसं न्यायचं, हा मोठा प्रश्न त्याच्यापुढे होता. ही

नवी पिढी उलट आपल्यालाच गप्प करेल आणि तिला अभिप्रेत असलेल्या मार्गानं हिंसा चालूच ठेवेल, असंही मंडेलाला वाटायचं. पण त्याचबरोबर, दक्षिण आफ्रिकन सरकारला आता मऊ धोरण स्वीकारल्याशिवाय दुसरा पर्याय नजरेसमोर येत नसल्याची खात्रीसुद्धा मंडेलाला वाटायला लागली होती. त्यामुळे सरकारच शांततामय मार्गानं चर्चा घडवून आणण्यासाठी उत्सुक असेल, असं त्याला वाटायला लागलं.

मंडेलाची सुटका तर केली पाहिजे; पण त्याचबरोबर आपला वरचष्माही कायम ठेवला पाहिजे, अशा दुहेरी कात्रीत सापडलेला बोथा आता काय पाऊल टाकतो, हे बघणं आंतरराष्ट्रीय समुदायाच्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं. कारण बोथानं परिस्थितीच्या गांभीर्याचं महत्त्व वेळीच ओळखलं नाही, तर दक्षिण आफ्रिकेमध्ये पुरता अनागोंदी कारभार माजेल, याची अनेक जणांना जाण होती. दक्षिण आफ्रिकेत यादवी युद्ध सुरू झालं, तर त्याचे परिणाम भीषण होतील हे बोथा आणि मंडेला या दोघांनाही माहीत होतं. ही कोंडी कशी फुटणार हा महत्त्वाचा प्रश्न अजूनही अनुत्तरितच होता!

बुथेलेझी आणि रीगन-थॅचर यांचे उद्योग

बोथा आणि मंडेला यांच्या परस्परविरोधी भूमिका बघता दक्षिण आफ्रिकेमधला वर्णद्वेषाचा प्रश्न कसा सुटणार हे समजत नव्हतं. या दरम्यान मार्गारेट थॅचरनं सुचवल्याप्रमाणे 7 लोकांचं एक शिष्टमंडळ दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यावर आलं. या लोकांना सरकारनं सगळीकडे दडपशाहीचं वातावरण निर्माण केल्याचं चित्र आढळलं. तसंच, पोलिसांचा अतिरेक होत असल्याची कित्येक उदाहरणंही त्यांना सापडली. त्यामुळे बोथावरचा दबाव वाढला. आपण फार काळ ही आक्रमकता टिकवू शकणार नाही, असं बोथाला जाणवत होतंच. त्यानं आणीबाणी हटवली. मंडेलाची सुटका करायचा विचार त्याच्या मनात घोंघावत होता. दरम्यान सगळ्या नागरिकांवर लादण्यात आलेली परवाना पद्धतही बोथानं रद्द केली. या निर्णयाचं अमेरिकेनं मोठं स्वागत केलं. या 7 लोकांच्या शिष्टमंडळानं मंडेलाची तुरुंगात जाऊन भेट घेतली. मंडेलाचा कमालीचा शांतपणा बघून ते थक्क झाले. मंडेला अत्यंत चिडचिडा आणि मनात राग खदखदत असलेला माणूस असेल, अशी त्यांची कल्पना होती, पण मंडेला इतक्या समंजसपणे आणि कुठलाही द्वेष न बाळगल्यासारखा वागत-बोलत होता की, या लोकांचा त्यावर विश्वासच बसेना. मंडेलानं त्या सगळ्यांना जिंकून घेतलं. मंडेला साम्यवादी किंवा अत्यंत कट्टर विचारसरणीचा आहे, असले सगळे भ्रम तिथल्या तिथे नष्ट झाले. याशिवाय मंडेलाचा आत्मविश्वास, तसंच त्याची जगातल्या घडामोडींविषयीची जाण या मंडळींच्या अपेक्षेपेक्षा जास्त होती. मंडेलाची विनोदबुद्धीसुद्धा त्यांना सुखावत होती. बोलताबोलता मंडेलानं माजी ऑस्ट्रेलियन पंतप्रधानाला 'डॉन ब्रॅडमन (हा क्रिकेटपटू) अजून जिवंत आहे का?' असं विचारलं, तेव्हा मंडेलाला हा विषयसुद्धा माहीत आहे, हे ऐकून सगळे थक्क झाले.

या शिष्टमंडळानं दक्षिण आफ्रिकेमधली परिस्थिती भीषण असल्याचा निष्कर्ष काढला. दोन्ही बाजूंकडून होत असलेला हिंसाचार सर्वसामान्य परिस्थितीच्या कित्येक पटींनी भयानक आहे, असं त्यांचं मत पडलं. दक्षिण आफ्रिकन सरकारला देश चालवूच द्यायचा नाही; यासाठी अनुकूल परिस्थिती बनवायचे एएनसीचे प्रयत्न यशस्वी ठरले असल्याचं मत या शिष्टमंडळानं मांडलं. दरम्यान, सरकारनं राजकीय कैद्यांना सोडायची तयारी दाखवली आणि त्याच्या मोबदल्यात एएनसीनं हिंसाचार थांबवावा, असं आवाहन केलं. मंडेलानं आपल्या सहकाऱ्यांचा

सल्ला न घेता या प्रस्तावाचा, चर्चेसाठीचं पहिलं पाऊल म्हणून स्वीकार केला. तसंच, आपल्या सहकाऱ्यांना त्यानुसार वागायचं आवाहन केलं.

या काळातल्या विनी मंडेलाच्या दुहेरी भूमिकेविषयीसुद्धा अनेकांनी भाष्य केलं पाहिजे. एकीकडे विनी मंडेला ही दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषाच्या विरोधातल्या लढ्याची प्रतीक आहे, असं चित्र सगळीकडे दिसत होतं. 1985 साली तर 'द मदर ऑफ अ नेशन' या नावाचं एक पुस्तकही तिच्यावर लिहिलं गेलं. पण, आपण स्वत:ला देशाची माता वगैरे कधीच म्हणवून घेतलं नसल्याचा दावा विनीनं केला. तरीही सगळीकडे विनीची प्रतिमा अगदी ठळकपणे उभी करण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा विनीला तिच्या कामगिरीबद्दल ओळखलं जायचं. जगभरात विनीविषयी भरपूर लिहिलं जायचं. पण, त्याच वेळी दुसरीकडे विनीनं अत्यंत आक्रमक पवित्रासुद्धा घेतला होता. तिला हिंसाचाराची जणू चटकच लागली होती. त्यामुळे दक्षिण आफ्रिकन सरकार, तसंच पोलीस यांना आयतं कोलीतच मिळायचं.

ब्रँडफर्टमधून 1984 साली सुवेटो प्रांतात परतल्यावर विनीच्या हिंसक वृत्तीत अजूनच वाढ झाली असल्याची चिन्हं दिसायला लागली होती. आता ती एखाद्या सैनिकासारखा पोषाख करायची आणि तसेच लष्करी बूटही घालायची. ती अत्यंत भडक विधानंही करायची. त्यामुळे लोकांना चेव यायचा आणि ते हिंसा करण्यासाठी प्रवृत्त व्हायचे. हे चित्र अगदी उघडपणे दिसत असल्यामुळे ते कुणी नाकारण्याचाही प्रश्न येत नसे. आणीबाणीच्या काळात वर्तमानपत्रांनी भडक मजकूर बातमी म्हणून छापणंसुद्धा वर्ज्य असताना, नियम तोडून उघडपणे विनी लोकांना हातात दगड घ्या, जाळपोळ करा असं सांगून भडकवते, असा प्रचार सरकारनं सुरू केला. त्यामुळे एएनसी ही दहशतवादी संघटनाच आहे, असं चित्र निर्माण करणं सरकारला सोपं झालं. दक्षिण आफ्रिकन वर्तमानपत्रांनी उघडपणे विनीच्या चिथावणीखोर भाषणांची निंदा केली.

आपल्यावर हे सगळं प्रकरण खूपच शेकतं आहे, हे लक्षात येताच विनीनं थोडा नरम पवित्रा स्वीकारला. तिनं आपले शब्द मागे घेतले नसले, तरी आपल्या शब्दांचा माध्यमांनी चुकीचा अर्थ लावला असल्याचा दावा केला. वर्णद्वेषामुळे कृष्णवर्णीय लोकांना कुठल्या परिस्थितीला तोंड द्यावं लागत आहे आणि कोणकोणते मार्ग नाईलाजानं स्वीकारावे लागत आहेत, याविषयी आपण फक्त बोललो असल्याची सारवासारव तिनं केली. लोकांना हे मार्ग स्वीकारण्यासाठीची चिथावणी आपल्याला अजिबात द्यायची नव्हती, असा खुलासा विनीनं केला. पण, विनीचा

खरा उद्देश सगळ्यांना उघडपणे दिसत असल्यामुळे या खुलाशांचा फारसा उपयोग झाला नाही.

मंडेलाची सुटका, तसंच एएनसीबरोबरचा शांतता करार या गोष्टींविषयीची अनिश्चितता संपतच नव्हती. मधूनच बोथा मंडेलाला सोडण्यासाठी अनुकूलता दाखवायचा; पण परत काही दिवसांनी तो हे सगळं विसरून जायचा. एएनसीसुद्धा सरकारनं आपलं म्हणणं मान्य करेपर्यंत माघार न घ्यायच्या भूमिकेवर ठाम होती. अशा प्रकारे हा गुंता कसा सुटणार हेच समजत नव्हतं. बोथाला मंडेलाला सोडणं महत्त्वाचं वाटत असलं, तरी त्याचबरोबर जगासमोर आपण मऊ भूमिका स्वीकारल्याचं चित्र त्याला दाखवायचं नव्हतं. त्यामुळे त्यानं धरसोडीचा मार्ग अवलंबला होता. याच दरम्यान अमेरिकेनं लीबियावर क्षेपणास्त्रं डागली. त्यात लीबियाचा राष्ट्रपती कर्नल मुअम्मर गद्दाफी याच्या राजप्रासादावर बॉम्ब पडून त्यात त्याची मुलगी ठार झाली. साहजिकच, अचानकपणे आपल्यालाही इतर देशांवर हल्ले करायला परवानगी मिळाली आहे, असा सोयीस्कर अर्थ बोथानं त्यातून काढला. मॅग्नस मलान या दक्षिण आफ्रिकेच्या संरक्षणमंत्र्यानं एएनसीच्या परदेशांमधल्या तळांवर हल्ले करायचा प्रस्ताव बोथासमोर ठेवताच, आपलं मंत्रिमंडळ किंवा इतर सल्लागार यांच्याशी कुठलीही चर्चा न करता, बोथानं या प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवला. त्यामुळे एकीकडे हा गुंता सोडवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत दाखल झालेलं शिष्टमंडळ वेगवेगळ्या लोकांशी चर्चा करत असताना दुसरीकडे बोथा लुसाका (झाम्बिया), हरारे (झिम्बाब्वे), तसंच गॅबरोन (बोटस्वाना) अशा ठिकाणी हल्ले करण्यात मग्न होता!

साहजिकच, दक्षिण आफ्रिकन सरकारवरचा आंतरराष्ट्रीय समुदायाचा उरलासुरला विश्वासही या घटनांनी उडून गेला. वैतागलेल्या शिष्टमंडळानं विनी मंडेलाबरोबर एक भोजन घेतलं आणि 4 महिन्यांच्या काळातले आपले सगळे प्रयत्न वाया गेले, असं समजून त्यांनी त्याच संध्याकाळी दक्षिण आफ्रिकेतून आपला गाशा गुंडाळला. त्यानंतर 10 दिवसांनी दक्षिण आफ्रिकन सरकार एएनसीशी कुठल्याही प्रकारची चर्चा करण्यासाठी उत्सुक नसल्याची अपेक्षित असलेली बातमीही या शिष्टमंडळाच्या कानावर पडली. त्यामुळे या प्रकरणातून या मंडळींनी आपलं लक्ष पूर्णपणे काढून घ्यायचं ठरवलं.

यानंतर बोथानं आपलं बोटचेपं धोरण सोडून अत्यंत आक्रमक भूमिका स्वीकारायचं ठरवलं. 12 जून 1985 या दिवशी त्यानं नव्यानं देशव्यापी आणीबाणी घोषित केली. पोलिसांना

प्रमाणाबाहेर अधिकार देण्यात आले. तीन आठवड्यांच्या काळात पोलिसांनी अनेक रस्त्यांमध्ये अडथळे उभे केले, कृष्णवर्णीय लोकांच्या घरोघरी छापे मारून 4000 जणांना अटक केली आणि सगळीकडे दहशतीचं वातावरण निर्माण केलं. आपण आपल्याकडे उपलब्ध असलेल्या ताकदीचा एक दशांश भागही अजून वापरला नसल्याची दर्पोक्ती बोथानं केली. सगळे कृष्णवर्णीय नेते भूमिगत तरी झाले किंवा तुरुंगात गेले. फक्त चर्चमध्येच जमावाला एकत्र यायची परवानगी असे. या अत्यंत निराशाजनक परिस्थितीच्या वेळी खचून न जाता मंडेलानं एका नव्या मार्गाचा अवलंब करायचं ठरवलं.

सगळ्यांना आश्चर्याचा धक्का देत मंडेलानं आपल्याला दक्षिण आफ्रिकेच्या संरक्षण मंत्र्याशी चर्चा करायची आहे, असं सांगितलं. ही विनंती मान्य होऊन काही दिवसांनी ही बैठक झाली. मंडेलानं जवळपास 3 तास आपले मुद्दे विस्तारानं मांडले. यात मंडेला हा एएनसीचा प्रवक्ता म्हणून चर्चेमध्ये सहभागी होईल का, कोणत्या अटींवर एएनसी आपला हिंसेचा मार्ग सोडेल, यानंतर नक्की काय केलं पाहिजे, पुढची पावलं कशी असली पाहिजेत, हे सगळे मुद्दे विचारात घेण्यात आले. आपल्याला यानंतर राष्ट्रपती बोथाची भेट घ्यायची असल्याचं मंडेलानं सांगितलं. मंडेलानं या बैठकीविषयी कुणाजवळच उल्लेख केला नाही. यातून नक्कीच चांगलं काहीतरी घडेल, असा विश्वास त्याला वाटत होता. पण पुढचे काही महिने मंडेलाला या संदर्भात कुणाकडून काहीच समजलं नाही.

त्यानंतर तुरुंगाचा अधिकारी असलेला माणूस मंडेलाला केपटाऊनमध्ये एक चक्कर मारण्यासाठी घेऊन गेला. तिथलं सर्वसामान्य लोकांचं आयुष्य जवळपास पाव शतकांनंतर मंडेला बघत होता! उन्हात बसलेली वृद्ध माणसं, खरेदी करणाऱ्या स्त्रिया यांसारख्या अत्यंत सामान्य गोष्टी बघून मंडेला हरखून गेला. पण, तेवढ्या वेळात गोऱ्या लोकांचं आयुष्य आपण सर्वसामान्य माणसासारखं राहात होतो त्या वेळेपासून खूपच सुधारलं असल्याचं आणि कृष्णवर्णीय लोकांची परिस्थिती आणखीनच दारुण झाली असल्याचं मंडेलाच्या चाणाक्ष नजरेतून सुटलं नाही. मंडेलाला गाडीत बसवून तो अधिकारी कोक विकत घ्यायला गेलेला असताना हळूच गाडीतून सटकावं की काय, असा विचार मंडेलाच्या मनात येऊन गेला. पण, त्यातले धोके लक्षात घेऊन त्यानं वेळीच हा मोह आवरला. यानंतर मंडेलाला अशा प्रकारे केपटाऊनचा फेरफटका मारण्यासाठी अधूनमधून नेण्यात येई. यातून एकदा मोठी गंमतच

घडली. एका समुद्रकिनाऱ्यावर मंडेलाला फिरायला म्हणून थोडा वेळ सोडलेलं असताना तिथल्या थोड्याशा निर्मनुष्य भागात मंडेलानं आपली लघुशंका उरकली. त्यानंतर लगेच तिथून काही जर्मन पर्यटक चालत गेले, पण त्यांचं मंडेलाकडे लक्ष नव्हतं. तेव्हा मंडेलानं 'हे जर्मन लोक या शतकामधल्या सगळ्यात सनसनाटी घटनेला मुकले आहेत', अशी प्रतिक्रिया दिली!

'टाईम' मासिकाकडून दखल

आता विनी आणि मुलं यांना मंडेलाला जास्त वेळा भेटू दिलं जाई. अर्थात, या 25 वर्षांच्या काळात मंडेलाची मुलं स्वत:च आपापल्या मुलांचं पालकत्व निभावत होती. मंडेलापासून ती मनानं खूप दूर गेली होती. निदान आपल्या पहिल्या लग्नातल्या मुलाचा मुलगा तरी पुढे नाव कमावेल, अशी आशा मंडेलाला वाटायची. मंडेलाच्या पहिल्या लग्नातली सगळ्यात मोठी मुलगी शिकून लग्न करून आपल्या नवऱ्याबरोबर अमेरिकेला स्थायिक व्हायच्या बेतात होती. आपल्याकडे मंडेलानं सदैव दुर्लक्ष केलं, अशी भावना तिच्या मनात कायम असे. आपल्या मुलांच्या आयुष्यात मंडेलानं अजिबात लुडबूड करायची नाही, असं तिनं मंडेलाला बजावलं होतं. तसंच, आपल्या भावाच्या आयुष्यातही मंडेला उगीच तोंड घालतो, अशी तक्रार तिनं केली. त्यातच विनी ही या मुलांची सावत्र आई त्यांना खूप कटकटीची झाली होती. मंडेलाच्या मनात मात्र, या मुलांशी संबंध येई तेव्हा विनी चांगलीच वागते, असा गैरसमज होता.

विनीशी झालेल्या लग्नानंतर जन्मलेल्या आणि स्वाझी राजपुत्राशी लग्न केलेल्या झेनी या मुलीच्या बाबतीत मंडेलाला जास्त विश्वास वाटे. आता तिला तीन मुलं झाली होती. 1987 साली अमेरिकेत जाऊन बॉस्टन विद्यापीठात झेनी पुढचं शिक्षण घेत होती. अमेरिकन लोकांच्या दक्षिण आफ्रिकेविषयीच्या अज्ञानाबद्दल झेनीला प्रचंड आश्चर्य वाटे. कित्येक अमेरिकन लोकांना दक्षिण आफ्रिका हा कॅरिबियन बेटांमधलाच एक देश आहे असं वाटायचं. आपल्या सगळ्यांना अमेरिकेविषयी इतकं माहीत असताना, या लोकांना इतरांविषयी काहीच माहीत नसतं, याचं झेनीला जरा दु:खही होई. मंडेलाविषयी झेनीला आपुलकी असली, तरी आपले वडील खूप प्रसिद्ध आहेत, असंही तिचं मत होतं. तसं नसतं, तर आपल्याला इतर मुलींसारखं सर्वसामान्य आयुष्य जगता आलं असतं, असं ती मंडेलाला म्हणत असे. तसंच, आपण मॉडेल व्हावं, असं झेनीचं स्वप्न होतं. पण, मंडेलाला हे समजलं असतं, तर त्याला चक्करच आली असती, हे झेनीला माहीत होतं. तिनं मंडेलाला तसं बोलूनही दाखवलं. विनीच्या पोटी जन्मलेल्या झिंड्झी या दुसऱ्या मुलीविषयी मात्र मंडेलाला खूप वाईट वाटे. तिनं आपलं शिक्षण अर्धवट सोडल्याविषयी मंडेला दु:ख व्यक्त करी. निदान झिंड्झीची मुलं तरी काही भरीव कामगिरी करून दाखवतील, अशी त्याला आशा वाटत असे.

तिकडे बोथानं सलग चार वर्षं देशामधली आणीबाणी सुरूच ठेवली. युडीएफ संघटनेच्या जवळपास 25000 कार्यकर्त्यांना पोलिसांनी तुरुंगात टाकलेलं असल्यामुळे त्या संघटनेमध्ये पुरती मरगळ आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. असं असूनही, सतत नवे कार्यकर्ते आपला संघर्ष सुरु ठेवायचे क्षीण प्रयत्न करत राहायचे. एएनसीचे लोकसुद्धा अधूनमधून गनिमी काव्यानं हल्ले करून पोलिसांना बेजार करायचे मार्ग शोधत राहायचे. 1988 सालच्या फेब्रुवारी महिन्यात युडीएफ आणि इतर 17 संघटना यांच्यावर सरकारनं बंदी घातली.

एएनसीशी स्पर्धा करणारा 'झुलू इंकाथा पार्टी' नावाचा एक नवा पक्ष बुथेलेझी नावाच्या माणसानं काढला. हा बुथेलेझी भलताच महत्त्वाकांक्षी होता. आपण मंडेलाला पर्याय ठरू शकतो, असा त्याचा दावा होता. त्यानुसार सगळ्यांनी बुथेलेझीची प्रसिद्धी करायला सुरुवात केली. एएनसी आणि बुथेलेझीचा पक्ष यांच्यात वारंवार चकमकी व्हायच्या. आपण मंडेलाला भेटायला उत्सुक आहोत, असं बुथेलेझीनं जाहीर केलं. पण, आपण तुरुंगातून मुक्त झाल्यावरच बुथेलेझीला भेटू, असं मंडेलानं अत्यंत चातुर्यानं सांगून टाकलं. वारंवार आपली छबी वर्तमानपत्रं,

तसंच टीव्ही या माध्यमांमध्ये झळकेल, याची बुथेलेझी व्यवस्था करायचा. आपल्या प्रसिद्धीसाठी बुथेलेझीनं चक्क माणसं नेमली. तसंच, उजव्या विचारसरणीच्या पत्रकारांशी तो नेहमी चर्चा करायला लागला. धनाढ्य गुंतवणुकदारांच्या 'सदिच्छा भेटी'सुद्धा बुथेलेझी नेहमीच घेत असे. आपली भाषणं एका चकाचक नियतकालिकात छापून, ते नियतकालिक तो जगभरातल्या महत्त्वाच्या लोकांपर्यंत पोहोचवत असे. याउलट, एएनसीच्या लोकांना कसलीच प्रसिद्धी मिळत नसे. मुळात त्यांच्यापर्यंत पोहोचणं हेच एक मोठं दिव्य असे. अगदी 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या वार्ताहरालासुद्धा एएनसीच्या प्रवक्त्याला भेटण्यासाठी तब्बल 3 दिवस वाट बघावी लागली होती. एएनसीचं एक मुखपत्र पूर्व जर्मनीतून छापलं जाई. पण, त्या मुखपत्राचा कागद, त्याची छपाई या सगळ्या गोष्टी खूपच खालच्या दर्जाच्या असत. तसंच, या मुखपत्रात फक्त डावी विचारसरणी असलेली मतंच सातत्यानं मांडली जात. त्यामुळे एएनसीचा प्रभाव कमी आहे, असं पत्रकारांना वाटे.

लवकरच बुथेलेझी हा पाश्चिमात्य उजव्या विचारसरणीच्या लोकांच्या गळ्यातला ताईत बनला. दक्षिण आफ्रिकेचा कारभार बोथा किंवा मंडेला यांच्याकडे न देता, तो बुथेलेझीकडे दिला पाहिजे, असं तिथल्या अनेक नेत्यांना वाटायला लागलं. 1985 सालच्या फेब्रुवारी महिन्यात स्वत: रोनाल्ड रीगन अमेरिकेत बुथेलेझीच्या स्वागताला हजर राहिला! पण बुथेलेझीला त्याहूनही जास्त पाठिंबा ब्रिटिश पंतप्रधान मार्गारेट थॅचर हिनं दिला. बुथेलेझी मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कर्ता असल्यामुळे त्याच विचारसरणीच्या अनेक उद्योगपतींना आणि गुंतवणुकदारांना थॅचरनं बुथेलेझीविषयी सांगितलं. दक्षिण आफ्रिकेमध्ये स्थैर्य आणि भरभराट यांचं पुनरागमन होण्यासाठी बुथेलेझीची तिथे राष्ट्रपतीपदी नेमणूक व्हायला हवी, असा आग्रह थॅचरनं धरला.

या सगळ्यामागचं रहस्य काही वर्षांनी बाहेर आलं. एएनसीचा प्रभाव कमी करण्यासाठी आणि त्या संघटनेचं अस्तित्वच धोक्यात आणण्यासाठी दक्षिण आफ्रिकेचं सरकार कित्येक वर्षं झुलू लोकांना पाठिंबा देऊन बुथेलेझीला चेतवत होतं. यासाठी राष्ट्रपती बोथा, संरक्षणमंत्री मलान आणि बुथेलेझी यांच्यात एक गुप्त करार झाला होता. एकीकडून सरकार आणि पोलीस एएनसीच्या विरोधात लढून, त्या संघटनेच्या कार्यकर्त्यांना ठेचून काढायचा प्रयत्न करणार आणि दुसरीकडून झुलू लोकांचा हा अनधिकृत गट एएनसीवर तुटून पडणार असा हा डाव होता.

यासाठी नामिबियामध्ये 200 तरुणांना दक्षिण आफ्रिकन लष्करानं प्रशिक्षण दिलं होतं. या प्रशिक्षणात रॉकेट्स वापरणं, बॉम्ब्जचा वापर करणं, लोकांमध्ये दहशत पसरवणं, लोकांच्या समुदायावर हल्ला करून जास्तीत जास्त प्राणहानी होईल, यासाठी प्रयत्न करणं, अशा अनेक गोष्टींचा समावेश होता. म्हणजेच, एकीकडे एएनसीच्या हिंसक धोरणांविषयी जोरदार आवाज उठवणारं सरकारच दुसरीकडे हिंसक मार्गांना प्रोत्साहन देत होतं. हे सगळं अधिकृत पातळीवर अर्थातच जाणवू दिलं जात नव्हतं. असे सगळे प्रयत्न करूनसुद्धा शेवटी मंडेलाची सुटका करणं आणि एएनसीशी समझोता करणं, या गोष्टींना पर्याय उरलेला नाही, ही गोष्ट बोथानं खासगीत मान्य केली होती.

जगभरात सगळीकडे दक्षिण आफ्रिकन सरकारच्या दडपशाहीच्या आणि वर्णद्वेषाच्या विरोधात वेगवेगळे पडसाद उमटत होते. स्टीव्ह बाईकोवर रिचर्ड ॲटनबरोनं 1987 साली 'क्राय फ्रीडम' नावाचा चित्रपट बनवला. तसंच, मंडेलाला आपला देव मानत असलेल्या मुलीच्या आयुष्यावरचा 1988 सालचा 'सरफिना' हा चित्रपटही तुफान गाजला. मंडेला हा सगळीकडे 'हीरो' झाला होता. टीव्हीच्या युगात गेली 25 वर्षं खूप कमी लोकांना मंडेलाचा चेहरा बघायला मिळाल्यामुळे त्याच्याविषयीचं आकर्षण अजूनच वाढलं होतं. 1965 सालापासून मंडेलाचं एकही छायाचित्र प्रकाशित झालं नव्हतं. त्यामुळे अन्यायाच्या विरोधात लढणारा; पण ज्याच्या सद्य:स्थितीविषयी लोकांना फारसं माहीत नाही, असा माणूस म्हणून मंडेलाची प्रतिमा सगळीकडे गाजत होती.

रोनाल्ड रीगन हा अमेरिकन राष्ट्रपती, तसंच सीआयए या गुप्तहेर संस्थेचा प्रमुख हे दोघं दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषी धोरणांविरुद्ध काहीही भूमिका घ्यायला तयार नव्हते. अप्रत्यक्षपणे ते गोऱ्यांच्या वर्चस्ववादाला पाठिंबाच देत होते. त्यामुळे अमेरिकेमध्ये वर्णद्वेषी दक्षिण आफ्रिकेच्या विरोधात कोणतीही कारवाई करणं शक्य होत नव्हतं. या संदर्भात काही अमेरिकन सरकारी अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या अहवालांचं रंगरूप पूर्णपणे बदलण्यात आलं. एएनसीच्या दहशतवादी कारवायांना ठेचून काढण्यासाठीच बोथा सरकारला आक्रमक व्हावं लागतं, असा खोटा प्रचार त्या अहवालात करण्यात आला. मूळ अहवाल याच्या पूर्ण विरुद्ध होता. सीआयए सतत दक्षिण आफ्रिकेला अनुकूल असलेली भूमिका घेत असे. रीगनला वर्णद्वेषाच्या विरोधात बोलायची इच्छासुद्धा होत नसे. यामुळे वैतागून अमेरिकेचा 'सेक्रेटरी ऑफ

स्टेट’ पदावर असलेला माणूस राजीनामा द्यायला निघाला होता. त्याला कसंबसं थांबवण्यात आलं. सुदैवानं देशाचा राष्ट्रपती जवळपास जाणूनबुजून पक्षपाती भूमिका घेत असताना, अमेरिकन संसदेची सदसद्विवेकबुद्धी शाबूत होती. 1986 सालच्या ऑगस्ट महिन्यात अमेरिकन सीनेटनं दक्षिण आफ्रिकेमध्ये केली जाणारी नवी गुंतवणूक, तिला नव्यानं देण्यात येणारी कर्जं, तसंच तेलाची निर्यात या सगळ्या गोष्टींच्या संदर्भात बंधनं घालायच्या विधेयकाला संमती दिली. दक्षिण आफ्रिकन सरकारला हा मोठा धक्काच होता.

बुथेलेझी

एकीकडे, रीगनचा वर्णद्वेषाला असलेला पाठिंबा आणि दुसरीकडे, अमेरिकन संसदेचा वर्णद्वेषाला असलेला विरोध या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश पंतप्रधान मार्गारेट थॅचर हिची भूमिका निर्णायक ठरेल, असं अनेकांना वाटत होतं. कारण बोथाशी ती वैयक्तिक पातळीवर चर्चा करू शके. पण, थॅचरनं बोथाचीच बाजू घ्यायचं आपलं धोरण कायम ठेवलं होतं. पूर्वी 7 लोकांच्या शिष्टमंडळानं दक्षिण आफ्रिकेचा दौरा केल्यावर त्यातून काहीच निष्पन्न झालेलं नसताना थॅचरनं परत एकदा आपलाच अडेलतट्टूपणा कायम ठेवला. 1986 सालच्या जुलै महिन्यात तिनं आपल्या हाताखाली काम करणाऱ्या एका अधिकाऱ्याला नव्यानं दक्षिण आफ्रिकेत जाऊन सरकारशी चर्चा करायला सांगितलं. अर्थातच, यातूनही काहीच हाती लागलं नाही. एएनसी, तसंच मंडेला यांनी या अधिकाऱ्याला भेट नाकारली. बोथा तर अत्यंत आक्रमक आणि जवळपास उद्धट भाषेतच या अधिकाऱ्याशी बोलला. आपण आपल्या

वर्चस्ववादी संकल्पना बदलायला अजिबात तयार नसल्याचं त्यानं स्पष्टपणे सांगितलं. यानंतर कॉमनवेल्थच्या झालेल्या एका बैठकीत आधीच्यासारखी परिस्थितीच कायम होती. थॅचर वर्णद्वेषाच्या विरोधात काहीच करत नाही, हे बघून युरोपीयन संघानं दक्षिण आफ्रिकेवर निर्बंध घालायचा निर्णय घेतला. त्याला थॅचर विरोध करू शकली नाही. पण वैयक्तिक पातळीवर किंवा ब्रिटिश धोरणांच्या संदर्भात थॅचरनं वर्णद्वेषाला पूरक अशीच भूमिका कायम ठेवली. बोथानं मंडेलाची तुरुंगातून सुटका करावी; पण एएनसीच्या बाबतीत मात्र बोथानं कडक भूमिकाच घ्यावी, असा थॅचरचा आग्रह होता. अर्थातच, मंडेला; तसंच एएनसी या दोघांनाही हे मान्य नव्हतं. त्यामुळे थॅचरच्या सल्ल्यांचा प्रत्यक्षात कुणाला काहीच उपयोग नव्हता.

क्राय फ्रीडम

इतकी वर्षं वर्णद्वेषी परिस्थिती असूनसुद्धा 1986 सालच्या फेब्रुवारी महिन्यात प्रथमच ब्रिटिश अधिकाऱ्यांना एएनसीच्या काही लोकांची भेट घ्यायची परवानगी देण्यात आली. यानंतर आणखी एक बैठक झाली. पण, या सगळ्यातून काहीच निष्पन्न झालं नाही. परिस्थिती अगदी 'जैसे थे' स्वरूपाचीच राहिली. त्यानंतर मात्र, थॅचरनं एका धडपड्या अधिकाऱ्यावर दक्षिण आफ्रिकेत बदल घडवून आणायची जबाबदारी दिली. या अधिकाऱ्यानं दक्षिण आफ्रिकेतल्या परिस्थितीचा अंदाज घेतला. एएनसीला या सगळ्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेतल्याशिवाय कुठलाच प्रश्न सुटणार नाही, याची त्या अधिकाऱ्याला जाणीव झाली. जाहीररीत्या एएनसीबरोर कुठलीही चर्चा करण्यावर थॅचरनं बंदी घातली होती. पण, खासगीत या अधिकाऱ्यानं एएनसीच्या लोकांशी संपर्क ठेवला. बोथाविषयी या अधिकाऱ्याचं मत एकदम

खराब झालं. जेव्हा बोथाला भेटायला म्हणून हा अधिकारी गेला, तेव्हा 'हिटलरला भेटल्यावर मला कसं वाटलं, असतं याची कल्पना आली', असं या अधिकाऱ्यानं नमूद केलं. बोथाला आपलं वर्चस्व काहीही करून टिकवायचं होतं, ही गोष्ट या अधिकाऱ्याच्या लक्षात आली. तसंच, मंडेलाच्या जिवाला धोका असेल, तरच त्याला तुरुंगातून सोडायला बोथा तयार होता, असंही या अधिकाऱ्याला समजलं. म्हणजेच, बोथाला एकूण परिस्थितीमध्ये कोणताही बदल करायचा नव्हता. इतर देशांनी घातलेल्या आर्थिक निर्बंधांमुळेही बोथा अजिबात बिथरून गेल्यासारखा दिसत नव्हता.

थॅचरचा एएनसी विरोध कायम होता. 1987 सालच्या ऑक्टोबर महिन्यात झालेल्या पुढच्या कॉमनवेल्थ सभेमध्ये याचं प्रत्यंतर आलं. एएनसीच्या प्रतिनिधीनं थॅचरला एक जरा बोचरा प्रश्न विचारला. त्यावर थॅचरनं अचानकपणे भडकून 'एएनसी ही इतर दहशतवादी संघटना असतात; त्याच स्वरूपाची संघटना आहे', अशी प्रतिक्रिया दिली. त्या वेळी उपस्थित असलेले सगळ्याच देशांचे सदस्य अवाक्च झाले! ब्रिटिश राजकारण्यांना आणि अधिकाऱ्यांनादेखील थॅचरच्या या विधानामुळे खूप धक्का बसला. दक्षिण आफ्रिकेमधली परिस्थिती सुधारण्याच्या संदर्भातली थोडीफार आशा आता मावळून गेली असल्याचं त्यांचं मत झालं.

अशा रीतीनं वर्णद्वेषी धोरणांना जवळपास उघडपणे पाठिंबा देत असलेले रीगन आणि थॅचर यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये सुधारणा होऊच द्यायच्या नाहीत, असा जवळपास चंगच बांधला होता. बुथेलेझीचं नवं संकटही मंडेलाच्या डोक्यावर घोंघावत होतं. अशा परिस्थितीमध्ये पुढची पावलं कशी टाकायची, याचा मंडेला विचार करत होता. सरकार आपल्यापुढे काही काळातच नमेल, असं त्याला आतून वाटत असलं, तरी यासाठी आणखी किती काळ जावा लागेल, हे मात्र त्याला समजत नव्हतं.

विनी मंडेलाचा दहशतवाद!

एकीकडे बोथा आणि मंडेला यांच्यातलं दक्षिण आफ्रिकेमधलं द्वंद्व सुरु असताना, आंतरराष्ट्रीय राजकारणात या काळात अत्यंत महत्त्वाचे बदल घडत होते. 1985 साली सोव्हिएत युनियनचा कारभार मिखाईल गोर्बाचेव्हनं हाती घेतला. दक्षिण आफ्रिका, तसंच इतर आफ्रिकन देश यांच्यामध्ये सोव्हिएत युनियनची सुरु असलेली लुडबूड खूपच खर्चीक असल्याचं त्याच्या लक्षात आलं. साहजिकच, त्यानं सोव्हिएत धोरणांमध्ये बदल करून आफ्रिकन भागांमधून लक्ष काढून घ्यायचं ठरवलं. तसा संदेश गोर्बाचेव्हनं रीगनला पाठवला. त्यामुळे सोव्हिएत युनियनच्या मदतीनं दक्षिण आफ्रिकेत उठाव घडणं आणि अल्पसंख्यांक गोऱ्यांचं सरकार उलथवून टाकलं जाणं, या गोष्टी आता घडू शकणार नाहीत हे स्पष्ट झालं. या काळात शीतयुद्धाच्या शेवटाला सुरुवात झाली. तसंच, दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषावरचा उपाय क्रांतिकारी नसून, राजकीय, तसंच चर्चेच्या स्वरूपातून निघालेलाच असला पाहिजे, हे आता नक्की ठरलं. शीतयुद्धाच्या शेवटाविषयी मंडेलानं 1978 सालच भाकीत केलं होतं. आता ते खरं ठरायची दाट चिन्हं दिसत होती. या दरम्यान अनेक अमेरिकन कंपन्या दक्षिण आफ्रिकेमधली परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करत होत्या. या कंपन्यांमधले काही वरिष्ठ अधिकारी कृष्णवर्णीय असल्यामुळे दक्षिण आफ्रिकेतल्या कृष्णवर्णीय लोकांवर होत असलेला अन्याय त्यांना सहन होत नसे.

यानंतरच्या काळात दक्षिण आफ्रिकेच्या कायदामंत्र्यानं मंडेलाची पूर्वीप्रमाणेच अनेकदा भेट घेतली. मंडेलाची सुटका व्हावी; म्हणून तो खूप प्रयत्न करत होता. त्यानं बोथाला न सांगताच यासाठी चार सदस्यांची एक समितीसुद्धा नेमली. हे चार लोक मंडेलाशी सरकारच्या वतीनं अनधिकृतपणे चर्चा करत असत. नंतर या चार जणांनी बोथाला विश्वासात घ्यायचा प्रयत्न केला. मंडेलानं आपल्याला बोथाशीसुद्धा चर्चा करायची असल्याचं सांगताच, परत एकदा मंडेला जोपर्यंत एएनसीच्या हिंसेची निंदा करत नाही, तोपर्यंत हे होणं शक्य नसल्याचं त्याला सांगण्यात आलं. त्या वेळी हिंसाचार एएनसीनं सुरु केलेला नसून तो दक्षिण आफ्रिकन सरकारनंच सुरु केला होता आणि एएनसीनं फक्त त्याला प्रत्युत्तर दिलं होतं, याची मंडेलानं दरवेळेप्रमाणे आठवण करून दिली. एएनसीला सगळ्या गोष्टींचं राष्ट्रीयीकरण करायचं असतं आणि हे कसं चालेल, असा सवाल मंडेलाला करण्यात आला. त्यावर मंडेलानं, आपण 1956

साली लिहिलेल्या एका लेखाचा दाखला देत आफ्रिकन व्यावसायिकांना मुक्तपणे आपलं काम करू देण्यावर कसा भर दिला होता, याची उदाहरणं दिली. त्यावर एएनसीवर साम्यवादी शक्तींचा पगडा असल्याचं आणि हा पगडा कायम असेपर्यंत सरकारनं एएनसीशी चर्चा करणं अशक्य असल्याचं मंडेलाला सांगण्यात आलं. त्यावर एएनसीवर साम्यवादाचा पगडा असला, तरी हा साम्यवाद अजिबात कट्टर नाही, असं मंडेलानं ठासून सांगितलं.

मंडेलाबरोबर सरकारच्या सुरू असलेल्या या चर्चेविषयी सर्वसामान्य लोकांना अजिबात कल्पना नव्हती. पण, मंडेलाचं नाव परत एकदा वर्तमानपत्रांमध्ये नियमितपणे झळकायला लागलं. मंडेलाचं छायाचित्र प्रकाशित करण्यावर दक्षिण आफ्रिकन सरकारनं घातलेली बंदीसुद्धा आता उठवण्यात आली. 1988 सालच्या जुलै महिन्यात मंडेलानं वयाची सत्तरी गाठली. त्याचा हा वाढदिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजला. तो साजरा करण्यासाठी लंडनमध्ये बीबीसीनं 11 जून 1988 या दिवशी वेम्ब्ली स्टेडियममध्ये 'फ्रीडम ॲट 70' या नावाचा एक रॉक संगीताचा कार्यक्रम मोठ्या धुमधामीनं आयोजित केला. यात अनेक नामवंत कलाकार सहभागी झाले. यामुळे दक्षिण आफ्रिकेच्या सरकारच्या संतापाला पारावार उरला नाही. बीबीसीचं आपल्या देशातलं नामोनिशाण आपण मिटवून टाकू, अशी धमकी दक्षिण आफ्रिकन सरकारनं दिली. इंग्लंडमध्ये उजव्या विचारसरणीच्या टोरी पक्षाच्या 24 खासदारांनी बीबीसीला 'दहशतवाद्यांना' पाठिंबा दिल्याबद्दल तिची निर्भत्सना केली. टोरी विचारसरणीच्याच एका लेखकानं पीतपत्रिकेसाठी कुप्रसिद्ध असलेल्या आणि 'टेलिफोन हॅकिंग' प्रकरण बाहेर आल्यावर 2011 साली बंद कराव्या लागलेल्या 'न्यूज ऑफ द वर्ल्ड' या उजव्या विचारसरणीच्या वर्तमानपत्रात मंडेला आणि एएनसी, 'साम्यवादावर आधारित असलेली कृष्णवर्णीय हुकूमशाही' प्रस्थापित करायचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. पण तरीही, बीबीसीनं याला दाद न देता, आपला कार्यक्रम करूनच दाखवला. त्यात मंडेलानं गुप्तपणे पाठवलेला एक संदेश वाचून दाखवण्यात आला. या कार्यक्रमाला स्टेडियममध्ये 72000 लोक हजर होते आणि शिवाय 6 देशांमध्ये तब्बल 20 कोटी लोकांनी तो टीव्हीवर बघितला! एका लेखकानं या अद्भुत प्रसंगाचं वर्णन 'येशू ख्रिस्ताच्या वाढदिवसानंतर इतक्या मोठ्या प्रमाणावर दुसऱ्या कुणाचा वाढदिवस आजवर साजरा झाला नसेल', अशा शब्दांमध्ये केलं. अर्थातच, सरकारी पोपटपंची करणाऱ्या दक्षिण आफ्रिकन प्रसारण सेवेनं 'मंडेलाला देवत्व प्राप्त करून देण्याच्या प्रकारानं भावनिक मूर्खपणाची

नवी नीचांकी पातळी गाठली आहे', अशी प्रतिक्रिया दिली.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेमधला हिंसाचार संपायचं नावच घेत नव्हता. आता दक्षिण आफ्रिकेतली उजव्या विचारसरणीची वर्तमानपत्रंसुद्धा मंडेलाच्या सुटकेची मागणी करत होती. मंडेलाच्या वाढदिवसाच्या काही दिवस आधी जोहान्सबर्गमधल्या रग्बी स्टेडियमच्या बाहेर एका मोटारीमधल्या बॉम्बच्या स्फोटात दोन गोरे लोक ठार झाले आणि 34 जण जखमी झाले.

मंडेलाच्या सुटकेविषयी उलटसुलट मतं मांडली जात असत. एका वर्तमानपत्रानं मंडेलाचं तुरुंगात निधन व्हायच्या आत; म्हणजेच जिवंतपणी त्याची सुटका झाली नाही, तर अनर्थ ओढवेल असा इशारा दिला. याउलट जिवंतपणी मंडेला तुरुंगाच्या बाहेर आला, तर त्याला खरी परिस्थिती समजेल आणि त्या परिस्थितीशी जुळवून घेता घेता त्याच्या भोवती तयार झालेलं वलय गळून पडेल आणि लोकांना मंडेलामध्ये कोणतेही असामान्य गुण नाहीत हे दिसून येईल, असं या लेखकानं म्हटलं होतं. मंडेलाला देवत्व प्राप्त करून देण्याची ही चूक सरकारनं टाळली पाहिजे आणि त्याला लवकर तुरुंगाबाहेर आणलं पाहिजे, असा सल्लाही या लेखकानं दिला होता. लोकांच्या मनातली मंडेलाविषयीची प्रतिमा आणि मंडेला तुरुंगातून बाहेर आल्यावर त्या प्रतिमेशी विसंगत असलेलं सत्य, या गोष्टींचा सरकारनं फायदा उठवला पाहिजे, असं हा लेखक इतर काही जणांप्रमाणेच सुचवत होता.

मंडेलाची प्रकृती ठीकठाक आहे, असं त्याला बघणाऱ्यांना वाटत असे. त्याचं वजन कमी झालेलं असलं आणि तो जरा निस्तेज दिसत असला, तरी त्यात काळजी वाटण्यासारखं काही नाही असं सर्वसाधारण मत होतं. पण आपल्या 70 व्या वाढदिवसाच्या सुमाराला मंडेलाला खोकला सुरु झाला आणि तो थांबतच नव्हता. त्यामुळे मंडेलाला भेटायला येणाऱ्या लोकांना जरा काळजी वाटायला लागली. अशाच एका प्रसंगी मंडेलाला उलटी झाली आणि त्यानंतर तर त्याला बसलेल्या जागेवरून उठवतसुद्धा नव्हतं. त्यामुळे काळजीत पडलेल्या अधिकाऱ्यांनी कडेकोट बंदोबस्तात मंडेलाला तपासणीसाठी रुग्णालयात नेलं. तिथे पहिल्या तरुण डॉक्टरनं मंडेलाची जुजबी तपासणी करून तो ठीकठाक असल्याचा अहवाल दिला. पण, त्यानंतर एका अनुभवी डॉक्टरनं मंडेलाच्या छातीजवळ एक-दोन वेळा हलकेच आवाज काढून बघितल्यावर, मंडेलाच्या फुप्फुसांमध्ये पाणी भरत चाललं असल्याचं त्या डॉक्टरच्या लक्षात आलं. त्यामुळे त्यानं मंडेलाला सरळ शस्त्रक्रिया करण्याच्या खोलीत नेलं आणि त्याच्या फुप्फुसांमध्ये साठलेलं

सगळं पाणी काढून टाकलं. ही क्षयरोगाची सुरुवात असल्याचं निदान त्या डॉक्टरनं केलं. मंडेलाला ज्या तुरुंगात ठेवलं होतं, तो अत्यंत कुबट असल्यामुळे असं घडलेलं असायची शक्यता व्यक्त करण्यात आली. पुढचे सहा आठवडे मंडेलानं यातून बरं होण्यासाठी रुग्णालयातच काढले.

मंडेलाची तब्येत बरी असली, तरी त्याला भेटायला आलेल्या विनी मंडेलाला मात्र तसं वाटत नव्हतं. त्यामुळे तिनं सरकारवर टीकेची झोड उठवली. सरकारच्या दुर्लक्षामुळे आणि सरकारनं जाणूनबुजून मंडेलाला खराब दर्जाच्या तुरुंगात ठेवल्यामुळे मंडेलाची तब्येत धोक्यात आल्याचा आरोप तिनं केला. साहजिकच, सरकारचं धाबं दणाणलं. अनेक तज्ज्ञांना मंडेलाच्या तब्येतीची तपासणी करण्यासाठी पाचारण करण्यात आलं. मंडेलाला काही झालं, तरी आपलं काही खरं नाही; याची सरकारला जाणीव होती. याविषयीचं अत्यंत सूचक भाष्य करताना लंडनच्या 'संडे टाईम्स'नं 'तुरुंगाबाहेर असलेला मुक्त मंडेला' याहून सरकारच्या दृष्टीनं अजून वाईट असलेली एकमेव गोष्ट म्हणजे 'मृतावस्थेतला मंडेला' ही असेल असं म्हटलं.

एकूणच, विनीच्या वागण्या-बोलण्यानं आणि कृतींनी मंडेला अडचणीत येण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. हिंसा आणि टोकाची भूमिका ही विनीची जणू वैशिष्ट्यंच झाली होती. अत्यंत बेदरकारपणे ती वागे. 1988 सालच्या जुलै महिन्यातल्या मंडेलाच्या वाढदिवसानंतरच्या काळातच विनीच्या या वागण्याची चुणूक मंडेलाला बघायला मिळाली होती. अमेरिकेतल्या बॉस्टन विद्यापीठाशी संबंध असलेल्या एका अमेरिकन उद्योगपतीशी विनीनं मंडेलाचं नाव जगभर वापरण्यासंबंधीचा एक करार केला. या उद्योगपतीनं विनीबरोबर मंडेलाची तुरुंगात जाऊन भेटसुद्धा घेतली होती. पण, या माणसापासून दूर राहायचा सल्ला मंडेलाला त्याच्या हितचिंतकांनी आधीच दिला होता. त्यामुळे विनीनं त्या माणसाशी केलेला करार आपल्याला अजिबात मान्य नसल्याचं मंडेलानं सांगून टाकलं.

विनीच्या अशा प्रकारच्या उद्योगांना मंडेला आळा घालू शकत असला, तरी तिच्या हिंसेवर मंडेलाकडे कुठलंच उत्तर नव्हतं. सुवेटो प्रांतातल्या कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीचं नेतृत्व अत्यंत आक्रमकरीत्या करायची विनीची इच्छा असे. अगदी तरुण पोरंसुद्धा शस्त्रं हातात घेऊन सरकारच्या विरोधात हिंसा करायला तयार असल्यामुळे या गावातल्या परिस्थितीला एखाद्या यादवी युद्धाचंच स्वरूप आलं होतं. अशा हजारो दिशाहीन युवकांना अंध:कारमय

भविष्य, नकोसा वाटणारा इतिहास, सतत डोळ्यांसमोर दिसणारी हिंसा आणि त्यामधल्या कित्येकांना मिळालेला तुरुंगवासाचा अनुभव या सगळ्या गोष्टींचा परिणाम व्हायचा तोच झाला. कसलाच आगापिछा नसलेली ही मंडळी अगदी सहजपणे कायदा हातात घ्यायला तयार असायची. आपणच कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीचं पुढचं पाऊल टाकत असल्याच्या थाटात आणि त्यातूनच वर्णद्वेष संपणार असल्याच्या आवेशानं ती हिंसक व्हायची. एमके, तसंच युडीएफ यांच्यासारख्या संघटनांचे आपण सदस्य असल्याच्या आणि त्या संघटनांच्या नेत्यांच्या आदेशांनुसारच आपण वागत असल्याच्या थापा हे लोक मारायचे. पण, प्रत्यक्षात ते इतके आक्रमक आणि बेधुंद असायचे की, कुठल्याच नेत्यांचा कोणताच प्रभाव त्यांना आवर घालायला पुरत नसे. पोलीस तर हा सगळा प्रकार साप-मुंगूस यांच्यातल्या झुंजीसारखा असल्यासारखे वागायचे. त्यासाठी एका टोळीमध्ये आपली माणसं घुसवून त्यांची माहिती काढायची, ती दुसऱ्या टोळीला पुरवून पहिल्या टोळीच्या विरोधात हिंसा करण्यासाठी भडकवायचं आणि आपण दुरून मजा बघायची, असले प्रकार सुरू असत.

या सगळ्या भडक माथ्याच्या लोकांना आणखी भडकवायचं काम विनी मंडेला करत असे. ती कुठल्याही नेत्याचं म्हणणं अजिबात ऐकत नसे. हिंसेला पर्याय नाही, असं ती म्हणत राही. ती स्वत: अनेकदा लष्करी पोषाख घालून लढ्यात उतरल्यासारखं चित्र निर्माण करे. आपण गनिमी काव्यानं लढणार असल्याचं ती जाहीर करे. विनीच्या अनेक महत्त्वाच्या लोकांशी ओळखी असल्यामुळे कुणावर दबाव टाकून विनीच्या विलक्षण उद्योगांना आळा घालायचं काम करणंही शक्य नसे. निदान विनीनं स्वत:च्या संरक्षणाची काळजी तरी घ्यावी, असं तिच्या मित्रांनी तिला आग्रहानं सांगितलं. त्यामुळे 1987 सालापासून विनीनं आपल्याभोवती सशस्त्र तरुणांचं एक कोंडाळं बाळगायला सुरुवात केली. गंमत म्हणजे, या युवकांच्या गटानं फुटबॉल खेळणारे खेळाडू सराव करताना घालतात, तसे ट्रॅकसूटचे कपडे घातलेले असल्यामुळे त्यांना 'मंडेला युनायटेड फुटबॉल क्लब' या नावानं ओळखलं जाई. हे सगळे युवक विनीच्या घराच्या मागच्या बाजूला राहायचे. आपल्या राहायच्या जागेला ते 'लुसाका' म्हणजे 'संसद' असं म्हणत असत. विनीच्या घरात हे युवक सतत आतबाहेर करताना दिसायचे. सुरुवातीला लोकांना या प्रकाराविषयी खूप कुतूहल वाटायचं. तसंच, विनीच्या शेजारपाजारीसुद्धा ही चांगलीच गोष्ट आहे असं मत बनलं. कारण विनी आपल्यासाठी झगडते आणि तिला मारून टाकायचा अनेक

जण प्रयत्न करतात, असं या लोकांना वाटायचं. पण थोडा काळ उलटून गेल्यावर विनीला संरक्षण देणारे युवक दक्षिण आफ्रिकन सरकार किंवा पोलीस यांच्याशी लढायच्या ऐवजी इतर कृष्णवर्णीय टोळ्या किंवा कित्येकदा तर सर्वसामान्य नागरिक यांच्या विरोधातच हिंसाचार करतात असं लक्षात आलं.

या युवकांची टोपण नावंसुद्धा 'निन्जा', 'किलर', 'स्कॉर्पियन', तसंच 'स्लॅश' अशी सगळ्यांच्या मनात धडकी भरेल अशी होती. त्यांच्याकडे बहुतेक वेळा गन असे. त्यांचा नेता असलेल्या माणसाची नुकतीच तुरुंगातून सुटका झाली होती. पण त्यामागेसुद्धा एक रहस्य होतं. तुरुंगातून सुटका करण्याच्या बदल्यात पोलिसांनी त्याला पैसे चारून आपला खबरी बनवलं होतं. तसंच, या युवकांपैकी अनेक जणांना नंतर खून, अपहरण अशा प्रकरणांमध्ये तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. तुरुंगात असलेल्या मंडेलाला या सगळ्या प्रकाराविषयीची माहिती मिळत होती. मंडेलानं विनीचे हे उद्योग थांबवण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती त्याला अनेक हितचिंतकांनी केली होती. पण, मंडेला या संदर्भात काही करु शकला नाही.

1987 सालच्या सुरुवातीच्या काळात विनीच्या घराच्या मागच्या भागात खूनखराबा आणि क्रूर अत्याचार या गोष्टी घडतात, अशा बातम्या पसरायला लागल्या. पोलीस हे सगळं नुसतं शांतपणे बघत नव्हते असं नाही, तर उलट त्या प्रकारांना खतपाणी घालत होते. कारण एएनसी; तसंच नेल्सन मंडेला यांच्या चळवळींच्या विरोधात सरकारला वापरता येईल, असा हा हुकमी एक्का होता. त्यामुळे पूर्वी विनीला प्रचंड त्रास देणारे आणि तिच्या हालचालींवर अगदी बारकाईनं लक्ष ठेवून असलेले पोलीस आता तिच्या कारवायांकडे ढुंकूनसुद्धा बघायचे नाहीत. आपल्या मिनीबसमध्ये विनी आणि तिची टोळी अगदी निवांतपणे सुवेटो गावात हिंडू शके, तसंच मनाला येईल ते करु शके. उलट पोलिसांचं तिला संरक्षण आहे, असं वाटेल अशी परिस्थिती होती!

हे प्रकरण वाढतच गेलं. 1988 साली विनीच्या 'फुटबॉल क्लब' टोळीचं त्या परिसरातल्या दुसऱ्या माथेफिरु टोळीशी असलेलं वैर हाताबाहेर गेलं. मारामाऱ्या, जबर मारहाण, बलात्कार असले प्रकार वाढतच गेले. याचा कळस म्हणजे या प्रतिस्पर्धी टोळीनं जुलै महिन्यात विनी मंडेलाचं घरच पेटवून दिलं! पोलीस आणि अग्निशामक दल हे तिथे पोहोचले, पण ते बघे असल्यासारखे सगळा प्रकार नुसता बघत राहिले. विनी तेव्हा घरी नव्हती, पण ही बातमी

समजताच ती तातडीनं तिथे पोहोचली. तिथे आपलं घर जळत असलेलं तिला नाईलाजानं बघावं लागलं. यात नेल्सन मंडेलाची सगळी कागदपत्रं आणि मंडेला कुटुंबानं जतन केलेल्या सगळ्या वस्तू जळून खाक झाल्या. मंडेलाला ही बातमी समजताच अर्थातच तो प्रचंड दु:खी झाला, पण पोलिसांकडे हे प्रकरण नेऊन त्यामधली सूडभावना आणखी वाढवू नये, अशी आपली इच्छा असल्याचं त्यानं आपल्या वकिलाला सांगितलं.

निदान या प्रकरणानंतर तरी विनीच्या वागण्यात सुधारणा होईल अशी मंडेलासकट इतर अनेकांना आशा वाटत होती, पण तसं काही घडलं नाही. आपल्या अमेरिकन उद्योगपती मित्राच्या मदतीनं विनीनं एक अत्यंत आलिशान भाड्याच्या घरात आपलं बस्तान हलवलं. तिथे जॅकुझी वगैरे सोयीसुद्धा होत्या. शिवाय आपली टोळीसुद्धा विनीनं आपल्याबरोबर तिथे नेली. आता तर या टोळीचा कहर आणखी वाढला. तिच्या कारवाया अगदी हाताबाहेरच गेल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. प्रचंड दहशतवादी कारवाया आणि आजूबाजूच्या लोकांच्या मनात भीतीचं वातावरण निर्माण करणं, अशा गोष्टींमध्ये खूप वाढ झाली. या दरम्यान 1988 सालच्या नोव्हेंबर महिन्यात दोन तरुणांना झालेली मारहाण आणि त्यानंतर त्या दोघांचंही अचानकपणे गायब होणं, याला विनीच कारणीभूत असल्याचा अहवाल देण्यात आला. हे प्रकरण गाजत असतानाच चर्चच्या अमलाखाली गरीब आफ्रिकन मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या एका वसतिगृहामध्ये दाखल झालेल्या 14 वर्षं वयाच्या मुलाचं प्रकरण सुरु झालं.

हा मुलगा डिसेंबर महिन्याच्या मध्यावर या वसतिगृहात आल्याआल्या त्याच्यावर समलिंगी संबंध ठेवल्याचे आरोप करण्यात आले. हे विनीच्या 'फुटबॉल क्लब' टोळीला समजताच, या मुलाचं इतर तीन मुलांसह अपहरण करण्यात आलं. त्यांना विनीच्या नव्या घराच्या मागच्या बाजूला ठेवण्यात आलं. तिथे त्यांना खूप मारहाण करण्यात आली. त्यातही समलिंगी संबंध ठेवल्याचे आरोप असलेल्या मुलाला खास लक्ष्य करून, त्याचा तर अनन्वित छळ करण्यात आला. धक्कादायक गोष्ट म्हणजे, हे सगळं विनीच्या उपस्थितीत म्हणजेच तिच्या संमतीनं सुरु होतं! काही दिवसांनी या मुलाचा जखमांनी भरलेला आणि कुजत चाललेला मृतदेह गावातल्या एका नदीपात्रानजीक मिळाला. त्या मुलाच्या मानेवर किमान तीन वेळा चाकूचा हल्ला करण्यात आला होता. नंतर दुसऱ्या एका मुलानं विनीला संकटात आणणारी साक्ष देताना, आपण स्वत: विनीला चंद्रप्रकाशात त्या मृत मुलाच्या मानेवर चाकूनं वार करताना बघितलं असल्याचं

सांगितलं, पण विनीच्या एका साहाय्यकानं मात्र आपणच हे वार केले असल्याचं सांगून हे प्रकरण विनीवर शेकू नये यासाठी प्रयत्न केले.

ही घटना अर्थातच खूप गाजली. या प्रकरणाचा तपास करणारी समिती, तसंच गरीब मुलांसाठी वसतिगृह चालवणारा धर्मप्रचारक यांनी या प्रकरणाची पाळंमुळं खणून काढायचं ठरवलं. हत्या करण्यात आलेल्या मुलाबरोबर अपहरण करण्यात आलेली इतर तीन मुलं अजूनही विनीच्याच ताब्यात होती. 11 जानेवारी 1989 या दिवशी समितीचे काही लोक आणि तो धर्मप्रचारक यांनी विनीच्या घरी जाऊन तिची भेट घेतली. तेव्हा ती तीन मुलं सुखरूप असून, आपण त्यांच्या सुरक्षिततेसाठीच त्यांना आपल्या घरात ठेवलं असल्याचा दावा विनीनं केला. पण, जेव्हा या लोकांनी त्या मुलांना बघितलं, तेव्हा त्यांच्या शरीरांवर ताज्या जखमा आढळल्या. त्यामुळे चिडून या लोकांनी विनीची एएनसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. तसंच, विनी स्वत:ला कुठलेच कायदेकानून लागू होत नाहीत अशा समजुतीत वागते, असं मतही त्यांनी मांडलं. आपल्या समितीविषयी, तसंच एकूण समाजाविषयी विनीला कसलाही आदर नसल्याचं किंवा देणंघेणं नसल्याचं आपलं मत असल्याचंही एएनसीला कळवण्यात आलं. याविषयी, एएनसीनं तातडीनं कारवाई करावी, अशी आपली अपेक्षा असल्याचंही या समितीनं म्हटलं होतं. शेवटी हे प्रकरण मंडेलापर्यंतसुद्धा पोहोचलं. घडल्या प्रकाराला विनी बहुधा कारणीभूत असावी असं मंडेलाचं अंतर्मन सांगत होतं, पण जोपर्यंत हाती कसला नक्की पुरावा लागत नाही; तोपर्यंत कुठल्याही निष्कर्षाप्रत आपण जाऊ नये, असं मंडेलानं ठरवलं. लवकरच अनेक साम्यवादी नेत्यांनी एकत्र येऊन या सगळ्या प्रकाराचा जाहीर निषेध केला. यानंतर आणखी एका खुनाच्या प्रकरणानं वातावरण अजूनच तापलं.

स्टॉम्पी या मुलाचं प्रकरण गाजलं

27 जानेवारी 1990 या दिवशी बराच प्रसिद्ध असलेला एक भारतीय डॉक्टर त्याच्या रुग्णालयात रक्ताच्या थारोळ्यात आढळला. या डॉक्टरकडे दोन बेकार कृष्णवर्णीय युवक शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी म्हणून आले होते आणि या डॉक्टरच्या हत्येनंतर ते पळून जाताना दिसले. नंतर त्यांना पकडून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. नंतर त्यांची तुरुंगात रवानगी करण्यात आली. या प्रकरणात विनीनं भलताच पवित्रा घेतला. पूर्वी कृष्णवर्णीय युवकांसाठी काढण्यात आलेल्या वसतिगृहात समलिंगी संबंधांची जबरदस्ती करण्यात आली होती, असं हा डॉक्टर सिद्ध करु शकला असता; म्हणून त्याची हत्या करण्यात आली, असं विनीचं म्हणणं होतं. पण, प्रत्यक्षात या डॉक्टरनं पूर्वी या वसतिगृहामधल्या मुलांची वैद्यकीय तपासणी करून, त्यांच्यावर कसलीही शारीरिक बळजबरी झाली नसल्याचा अहवाल दिला असल्याचं निष्पन्न झालं.

या सगळ्यानंतर एएनसीनं आपली धरसोड वृत्ती सोडून एकदम निर्णायक भूमिका स्वीकारली. विनी मंडेलाच्या संदर्भात एक अत्यंत धारदार पत्रक जारी करण्यात आलं. त्या पत्रकामधला मजकूर असा होता : 'अलीकडच्या काळातल्या एका तरुण मुलाच्या अपहरणाच्या आणि त्यानंतरच्या त्याच्या खुनाच्या संदर्भातल्या श्रीमती मंडेला यांच्या बेजबाबदार वर्तनामुळे आम्हाला धक्का बसला आहे... जर हा मुलगा आणि त्याच्याबरोबरचे इतर तीन जण यांचं श्रीमती मंडेला यांच्या फुटबॉल टीमनं अपहरण केलं नसतं, तर तो मुलगा आज जिवंत असल्याचं आपल्याला आढळलं असतं... कृष्णवर्णीयांच्या वर्णद्वेषाच्या

विरोधातल्या चळवळीच्या नावाखाली काही जण सरळसरळ मूलभूत मानवी हक्कांची पायमल्ली करत असताना आम्ही गप्प राहाणार नाही...'

या सगळ्या प्रकारांमुळे अत्यंत व्यथित झालेल्या नेल्सन मंडेलानं विनीला पत्र लिहून शांतपणाचं धोरण स्वीकारायचं आवाहन केलं. तसंच, या प्रकारात चौकशी समिती जो निर्णय घेईल, तो मान्य करायचंही विनीला त्यानं आग्रहानं सांगितलं. विनीनं 'फुटबॉल क्लब'ची आक्रमकता थांबवलीच पाहिजे, असं मात्र मंडेलानं तिला अगदी ठासून सांगितलं. नंतर एएनसीच्या काही वरिष्ठ लोकांना विनीनं चर्चसमोर सगळ्यांची माफी मागून नव्यानं सुरुवात करावी असं सुचवलं. पण, आता असं काही पाऊल उचलण्याला खूप उशीर झाला असल्याचं मत त्या लोकांनी मंडेलाजवळ व्यक्त केलं. यानंतरच्या काळातही विनीच्या या वागण्याविषयीची आणि तिनं केलेल्या तथाकथित गुन्ह्यांविषयीची चौकशी सुरूच राहिली.

अशा रितीनं विनी मंडेलाशी केलेलं लग्न या काळात नेल्सन मंडेलाला चांगलंच डोईजड झालं. एके काळी जिची आपण शूर आणि धैर्यानं वागणारी म्हणून तारीफ करत होतो, ती विनी आता आपलं नाव प्रचंड मोठ्या प्रमाणावर खराब करत असल्याचं कटू सत्य मंडेलाला स्वीकारणं जड गेलं. तुरुंगात राहून याबद्दल विनीकडे विनवण्या करण्याशिवाय दुसरं काही मंडेला करूही शकत नव्हता. परिस्थिती चिघळत चालली होती, पण त्याच सुमाराला सगळ्यांचं लक्ष परत एकदा नेल्सन मंडेलाच्या सुटकेच्या चर्चेकडे वळलं!

सुटकेची नांदी

मंडेलाच्या सुटकेविषयी तर्कवितर्क लढवले जात होते. अजूनही मंडेलाच्या सुटकेविषयी कुणाला खात्रीलायकरीत्या काही सांगता येत नव्हतं. दरम्यान 9 डिसेंबर 1988 या दिवशी मंडेलाला त्याच्या तुरुंगातून हलवून केपटाऊनपासून 35 मैल अंतरावर असलेल्या पार्ल नावाच्या निसर्गसौंदर्यानं नटलेल्या गावामधल्या एका मोठ्या बंगल्यात नजरकैदेत ठेवण्यात आलं. या बंगल्यात सगळ्या अत्याधुनिक सुखसोयी होत्या. हे सगळं बघून मंडेलाला भेटायला येणाऱ्या लोकांना एकदम आश्चर्यच वाटत असे. इथे मंडेलाला हवं तसं भोजनही मिळे. पण, आपणच आपला बिछाना तयार करणं आणि आपणच आपल्या स्वयंपाकासाठी, तसंच खाण्यापिण्यासाठी वापरलेली भांडी घासणं, या बाबतीत मंडेला अजूनही अत्यंत आग्रही असे. आपल्याला सरकार लवकरच मुक्त करायच्या विचारात असल्याचं मंडेलाला जाणवत होतं. पण त्याचबरोबर, आपली सरकारबरोबर सुरु असलेली चर्चा एकदम वेगळ्या वळणावर न्यायचा प्रयत्नही सरकार करु शकतं, याची त्याला जाणीव होती. म्हणूनच, आपल्या चर्चेतून कुठलेही वेगळेच निष्कर्ष निघू शकणार नाहीत आणि सरकार आपल्या नावावर काही खोटं खपवू शकणार नाही, याची त्याला खात्री करायची होती. सरकारची मंडेलाशी अजूनही नियमित चर्चा सुरु होती, पण सरकार आपल्या अटींवर अडून बसलं होतं. त्यात एएनसीनं हिंसक कारवाया बंद करत असल्याचं जाहीर करणं, साम्यवादाशी आणि कम्युनिस्ट पक्षाशी आपला कसलाच संबंध नसल्याचं एएनसीनं मान्य करणं आणि कृष्णवर्णीय लोक दक्षिण आफ्रिकेत बहुसंख्याक असल्यामुळे त्यांचीच सत्ता असावी, याची मागणी बंद करणं यांचा समावेश होता.

मंडेलानं आपल्याला राष्ट्रपती बोथा याच्याशीच चर्चा करायची असल्याचा आग्रह कायम ठेवला होता. या चर्चेशी संबंधित असलेल्या आपल्या मुद्यांचा एक मसुदा मंडेलानं तयार केला. सरकारनं हा मसुदा स्वीकारला असला, तरी त्याला कुठलंही अधिकृत रूप द्यायला सरकारनं नकार दिला. या मसुद्यात मंडेलानं; दक्षिण आफ्रिकेमधला संघर्ष गोऱ्या आणि काळ्या लोकांना पूर्णपणे वेगवेगळं करेल आणि त्यामुळे देशाचे दोन तुकडे पडतील, असा इशारा दिला होता. तसंच, सरकारनं मंडेलाला घातलेल्या तीन अटींचं उत्तरही मंडेलानं या मसुद्यात दिलं होतं. त्याचा सारांश असा होता : 'जोपर्यंत सरकार कृष्णवर्णीय लोकांबरोबर सत्ता विभागून घ्यायला

तयार नसेल, तोपर्यंत एएनसी हिंसात्मक मार्ग सोडायची एकतर्फी अट मान्य करणार नाही. तसंच, एएनसीनं कधीच साम्यवादाच्या प्रभावाखाली कुठला निर्णय घेतलेला नसल्यामुळे त्याच्यापासून फारकत घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शिवाय सरकारनं बहुसांख्यिक लोकांच्या सत्तेच्या संकल्पनेचा आदरही केला पाहिजे. कारण, बहुसंख्य लोकांची सत्ता असणं आणि देशांत शांतता नांदणं या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात.' या सगळ्या अपेक्षांच्या संदर्भात गोऱ्या दक्षिण आफ्रिकन जनतेला काळजी वाटणं, तसंच त्यांच्या मनात अनेक शंकाकुशंका असणं अगदी स्वाभाविक असल्याचं मान्य करून, यातून मार्ग काढण्यासाठी मंडेलानं सगळ्या पक्षांच्या आणि विचारसरणीच्या नेत्यांनी एकत्र येऊन खुल्या मनानं चर्चा करणं अतिशय गरजेचं असल्याचा पुनरुच्चार केला.

यावर सरकारनं आपल्याला एएनसीच्या नेहमीच्या एकतर्फी आणि अतिरेकी भूमिकेविषयी खेद वाटत असल्याचं सांगून आपल्याकडे 1964 सालापासूनच कम्युनिस्ट पक्षानं एएनसीवरची आपली पकड कशी घट्ट करत आणली आहे, यासंबंधीचे ठोस पुरावे असल्याचं सांगितलं. परदेशातल्या लोकांच्या मदतीशिवाय दक्षिण आफ्रिकन लोकांनी आपले अंतर्गत प्रश्न स्वत:च सोडवायची गरज असल्याचा मंडेलाच्या मसुद्यातला मुद्दा मात्र सरकारनं अर्थातच आनंदानं मान्य केला. कारण, परदेशांमधल्या बहुतेक सगळ्यांचा पाठिंबा आणि त्या सगळ्यांची सहानुभूती हे आपल्यापेक्षा एएनसी आणि मंडेला यांनाच जास्त असणार हे सरकारला माहीत होतं.

दरम्यान मंडेलाची सरकारशी चर्चा सुरू असली, तरी यातून एएनसीचा फायदा व्हायच्या ऐवजी सरकारचाच फायदा होईल, असं एक मत एएनसीचे वरिष्ठ नेते व्यक्त करत होते. कारण या नेत्यांचा चर्चेमध्ये सहभाग नसणं या गोष्टीचा वापर करून सरकार मंडेलाची दिशाभूल करेल आणि एएनसीमध्ये फूट पाडेल, अशी भीती या नेत्यांना वाटत होती. मंडेलाला याची कल्पना होती. त्यामुळे आपल्या एएनसीच्या सहकाऱ्यांना पाठवलेल्या पत्रांमध्ये मंडेला नेहमीच आपल्या सरकारबरोबर सुरू असलेल्या चर्चेविषयी उत्साहानं लिहायचा. तसंच, यातून आपल्या सगळ्यांच्या भलाईसाठीच काहीतरी घडेल, असा विश्वास तो व्यक्त करायचा. पण, मंडेलानं आपल्यामधल्या कुणाशीच चर्चा केली नाही, याविषयी मात्र एएनसी, तसंच युडीएफ या संघटनांचे नेते अनेकदा जवळपास जाहीरपणे नाराजी व्यक्त करायचे. त्यातच मंडेलाला क्षयरोगानं बेजार करून सोडलं असल्याची बातमी आणि एकूणच त्याची तब्येत खूप

बिघडल्याची अफवा यांच्यामुळे मंडेलाच्या खराब शारीरिक अवस्थेचा सरकार गैरफायदा घेत असल्याची आवईसुद्धा उठली. अर्थातच सरकारचा हाच हेतू होता. मंडेलाशी आपण सकारात्मक चर्चा करत असल्याचं भासवून मंडेला आणि एएनसी यांच्यात दरी निर्माण करायचे प्रयत्न सरकारकडून सुरु होते.

एकदा का मंडेला आणि एएनसी यांच्यातल्या विश्वासाची जागा संशयानं घेतली की, त्यानंतरची परिस्थिती आपल्या फायद्यासाठी वापरणं सरकारच्या दृष्टीनं सोपं होतं. कारण या दरम्यान सरकारचे बुथेलेझीला पाठिंबा द्यायचं नाटक करायचे प्रयत्नही सुरु होते. म्हणजेच, एकीकडे एएनसीमध्ये फूट पाडायची, मंडेलाविषयी अविश्वासाचं वातावरण निर्माण करायचं आणि दुसरीकडे बुथेलेझी हाच कृष्णवर्णीयांचा खरा नेता आहे, असं पाश्चिमात्य देशांना भासवायचं अशी ही खेळी होती.

पण, सरकारला मंडेलाची क्षमता आणि त्याचा खंबीरपणा या गोष्टींचा नीट अंदाज आलाच नव्हता. तोपर्यंत मंडेलाइतक्या जबरदस्त क्षमतेच्या नेत्याशी सरकारचा कधीच सामना झाला नव्हता. त्यामुळे मंडेलासुद्धा इतर कृष्णवर्णीय नेत्यांप्रमाणेच शेवटी हार मानेल अशी सरकारची अपेक्षा होती. असं झालं नाही, तर निदान तो शेवटी आपल्या दमदाटीला, लाचखोरीला, भूलथापांना बळी पडेल, असं सरकारचं मत होतं. मंडेला या सगळ्याला पुरुन उरेल, असं सरकारला कधीच वाटलं नाही. त्यामुळे आपलं दबावतंत्र सुरु ठेवणं, तसंच एकाच वेळी दमदाटी करण्याबरोबर दुसरीकडे खोटी लालूच दाखवायचे प्रकार करत राहाण्यावर सरकारनं भर दिला. पण, मंडेला त्यात अडकला नाही. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मंडेलानं सरकारला कधी फसवलंही नाही किंवा सरकारची दिशाभूलही त्यानं केली नाही. तो आपल्या योग्य आणि न्यायपूर्ण भूमिकेवर ठाम राहिला. यामुळे सरकारची पंचाईत झाली. कधीतरी आपल्या दबावतंत्राला वैतागून मंडेला बधेल, अशी सरकारची अपेक्षा फोल ठरली. एकदा चर्चा सुरु केली म्हटल्यावर त्यातून माघार घेणंही सरकारला शक्य नव्हतं. साहजिकच, या सगळ्या परिस्थितीमुळे सरकार कोंडीत सापडलं.

या सगळ्या परिस्थितीचं विश्लेषण करताना सिसुलूनंसुद्धा हीच प्रतिक्रिया दिली. आपल्या नेहमीच्या वर्णद्वेषी आणि वर्चस्ववादी विचारसरणीमुळे सगळे कृष्णवर्णीय लोक अत्यंत उतावीळ, तसंच अविचारी असतात असं सरकारला वाटल्याचं सिसुलू नमूद करतो. त्यामुळे

मंडेलाच्या बाबतीत सरकारनं मोठी चूक केली असं त्याचं मत होतं. विशेषत: मंडेला सरकारशी इतरांशी वागायचा तशाच नेहमीच्या अदबीनं आणि शांतपणे वागत-बोलत असल्यामुळे सरकार फसलं, असं सिसुलूला वाटलं. मंडेलाच्या शांतपणामागे एक अत्यंत ठाम वैचारिक भूमिका असल्याच्या मुद्याकडे सरकारचं दुर्लक्ष झालं, ही महत्त्वाची गोष्ट सिसुलूनं अभ्यासकांच्या लक्षात आणून दिली.

1989 सालच्या जानेवारी महिन्यात राष्ट्रपती बोथा याला मेंदूचा झटका आला. एक महिन्याची विश्रांती घेऊन बोथा परत आपल्या कामावर रुजू झाला असला, तरी त्यानं आपल्या 'नॅशनल पार्टी' या पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आपण तरीही राष्ट्रपतीपदावर कायम टिकून राहू असं बोथाला वाटत होत, पण त्यात त्याची चूकच झाली. दरम्यान 'नॅशनल पार्टी' या पक्षानं आपल्या अध्यक्षपदासाठी घेतलेल्या निवडणुकीत काँझर्व्हेटिव्ह विचारसरणीच्या एफ डब्ल्यू डी क्लार्क याची पक्षप्रमुख म्हणून निवड केली. तोच काही काळानंतर दक्षिण आफ्रिकेचा नवा राष्ट्रपतीसुद्धा झाला. डी क्लार्क हा बोथाहूनही जास्त वर्णद्वेषी असल्याचं मत बहुतेक अभ्यासकांनी लगेचच व्यक्त केलं. बोथानं निदान काही बाबतींमध्ये तरी सुधारणा करायचे प्रयत्न केले होते. पण डी क्लार्कनं मात्र त्या सगळ्यावर बोळा फिरवायचा पवित्रा घेतला.

ब्रिटिश पंतप्रधान मार्गरिट थॅचर हिलासुद्धा डी क्लार्कविषयी फारसा विश्वास वाटत नव्हता. तिनं मंडेलाची तुरुंगात भेट घ्यायची इच्छा व्यक्त केली, पण ती अजूनही एएनसीचा उल्लेख 'दहशतवादी संघटना' असाच करत असे. त्यामुळे चिडून एएनसीच्या नेत्यांनी थॅचरचा परत एकदा निषेध केला. दक्षिण आफ्रिकेची दारुण परिस्थिती करण्यामागे, तसंच तिथे वर्णद्वेष आणि वर्चस्ववाद इतका फोफावू देण्यामागे ब्रिटिश धोरणंच कारणीभूत आहेत, याचा पुनरुच्चार एएनसीच्या नेत्यांनी केला. तसंच, मंडेलाची तुरुंगात भेट घेण्याऐवजी थॅचरनं त्याची तुरुंगातून सुटका लवकर कशी होईल, यासाठी प्रयत्न करावेत, असा टोलाही एएनसीनं हाणला. या दरम्यान ब्रिटिश सरकार एएनसी आणि दक्षिण आफ्रिकन सरकार यांच्यामध्ये लंडनला चर्चा घडवून आणायचा प्रयत्न करत असल्याच्या अफवाही पसरल्या.

1989 सालच्या मार्च महिन्यात थॅचरनं आफ्रिकन देशांचा दौरा केला. तिनं नामीबियाला भेट दिली, पण जोपर्यंत दक्षिण आफ्रिकन सरकार मंडेलाची तुरुंगातून सुटका करत नाही, तोपर्यंत

आपण दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर पाय ठेवणार नाही, अशी भूमिका तिनं घेतली. साहजिकच, एएनसीला प्रथमच थॅचरच्या बोलण्यातून थोडंफार आशादायी चित्र दिसायला लागलं. पण त्याच सुमाराला थॅचरच्या म्हणण्यातला खरा अर्थही त्यांनी ओळखला. अत्यंत चातुर्यानं थॅचर दक्षिण आफ्रिकेचे दोन तुकडे व्हावेत; यासाठी प्रयत्न करत होती. म्हणजेच, गोरे आणि कृष्णवर्णीय लोक आपापल्या देशांमध्ये राहावेत आणि दोन्हींवर पाश्चिमात्य देशांचं वर्चस्व कायम राहावं, यासाठीची ही खेळी होती. त्यामुळे परत एकदा थॅचर आपल्या मूळ दुराग्रही मतांवरच कायम आहे, ही गोष्ट एएनसीला कळून चुकली.

मंडेला मात्र थॅचरची जाहीरपणे निर्भत्सना करायचं टाळे. गोर्बाचेव्हशी धीटपणे चर्चा केलेल्या या 'धाडसी' स्त्रीचा दक्षिण आफ्रिकेमधला गुंता सोडवण्यासाठी खूप चांगला उपयोग होऊ शकतो, असं मंडेलाचं मत होतं. त्यामुळे वर्णद्वेषाच्या विरोधात थॅचरनं जी काही पावलं उचलली आहेत, त्यांचं आपण स्वागत करत असल्याचा एक संदेश मंडेलानं तिला पाठवला. अमेरिकेत आता जॉर्ज बुश (सीनियर) राष्ट्रपतीपदावर आला होता. त्याच्या कार्यकाळात दक्षिण आफ्रिकेमधली परिस्थिती बदलेल आणि तिथलं वर्णद्वेषी धोरण संपुष्टात येईल, अशी आशा एएनसीला वाटत होती. यापूर्वी 1988 साली बुश उपराष्ट्रपती असताना सीआयए संघटनेनं एएनसीच्या कारवायांविषयी एक गुप्त अहवाल तयार केला होता. त्यात एएनसीच्या नेत्यांविषयी आदराची वाक्यं होती. तसंच, एकीकडे सोव्हिएत युनियनबरोबरचे संबंध बिघडू न देता, दुसरीकडे एएनसी पाश्चिमात्य देशांशीसुद्धा चांगलं नातं प्रस्थापित करत असल्याचा उल्लेख त्यात होता. पण, यानंतर 1989 सालच्या जानेवारी महिन्यातल्या आपल्या आणखी एका अहवालामध्ये नेल्सन मंडेलाच्या तुरुंगातून केल्या जाणाऱ्या सुटकेसारख्या प्रचंड मोठ्या घटनेशिवाय दक्षिण आफ्रिकेमधली परिस्थिती बदलणार नाही, असं म्हटलं गेलं. एकूणच अमेरिका, इंग्लंड, जर्मनी हे सगळे देश दक्षिण आफ्रिकन सरकारच्या साथीनं बुथेलेझीलाच नवा कृष्णवर्णीय नेता म्हणून प्रोत्साहन देत होते आणि त्यावर मंडेलाची प्रतिक्रिया काय आहे, याची चाचपणी करत होते. सगळा कृष्णवर्णीय समुदाय एकत्र न राहाता त्यामध्ये गटबाजी व्हावी आणि त्यांचे तुकडे पडावेत; यासाठी हा सगळा खेळ सुरु असल्याचं सीआयएच्याही लक्षात आलं होतं.

डी क्लार्कचे ब्रिटिशांशी असलेले चांगले संबंध अजूनच वाढत होते. त्यामुळे एएनसीच्या

नेत्यांना काळजी वाटत होती. 1989 सालच्या जून महिन्यात डी क्लार्कनं थॅचरसकट सगळ्या युरोपीय देशांना आश्वस्त करायचा प्रयत्न केला. तसंच, त्यानं दक्षिण आफ्रिकेमधल्या गौरेतर लोकांमध्ये फूट पाडण्यासाठी अनुकूल असलेली पावलं टाकली. दरम्यान, बोथाला अगदी स्पष्टपणे बाजूला टाकण्यात आलं, तरीही अजून तोच राष्ट्रपतीपदावर होता. या सुमाराला बोथानं मंडेलाला भेटायचं ठरवलं. मंडेलानं या भेटीसाठी खूप तयारी केली. कृष्णवर्णीयांना गोरे लोक नेहमीच दुय्यम वागणूक देतात आणि कमी लेखतात, याची मंडेलाला जाणीव असल्यामुळे त्यानं बोथाला समान पातळीची वागणूक द्यायचं ठरवलं. ही भेट चांगलीच वादळी ठरणार, असं मंडेलाला वाटत होतं. पण प्रत्यक्षात बोथा मंडेलाशी अत्यंत मोकळेपणानं वागत असल्याचे संकेत देत होता. त्यानं अगदी मोठं हास्य करून आणि आश्वासक देहबोलीचा वापर करून मंडेलाशी चर्चा करण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं सुचवलं.

मंडेला आणि बोथा यांनी सुमारे अर्धा तास आफ्रिकेचा इतिहास आणि त्यामधल्या वेगवेगळ्या घटना यांच्याविषयी चर्चा केली. त्या दरम्यान मंडेलानं कृष्णवर्णीय लोकांच्या गौरवपूर्ण इतिहासाविषयी भाष्य केलं. दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्यलढ्यात कृष्णवर्णीय लोकांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचाही मंडेलानं उल्लेख केला. चर्चेच्या शेवटी जरा दबकतच मंडेलानं बोथाकडे सगळ्या राजकीय कैद्यांची सुटका करायची मागणी केली आणि बोथानं ती अगदी तातडीनं फेटाळून लावली. त्यानंतर निदान शांतता प्रस्थापित करण्यासाठी काय केलं पाहिजे याविषयी त्या दोघांची चर्चा झाली. त्यातून त्यांनी एक छोटा करारनामा तयार केला आणि एकमेकांचा निरोप घेतला. या बैठकीची बोथाच्या एका सहकाऱ्यानं छायाचित्रं काढली आणि शिवाय त्याचा एक व्हीडिओसुद्धा तयार केला, पण नंतर बोथाच्या नकळत हे व्हीडिओ चित्रण नष्ट करण्यात आल्यामुळे एका ऐतिहासिक प्रसंगाचं चित्रण नष्ट झालं!

बोथा आणि मंडेला यांच्या बैठकीचे वेगवेगळ्या लोकांनी वेगवेगळे अर्थ लावले. काही जणांनी डी क्लार्कवर मात करण्यासाठी बोथानं ही चाल रचली असल्याचा दावा केला; पण यात तथ्य असेल, तर त्याचा फारसा उपयोग झाला नाही. कारण यानंतर जेमतेम 6 आठवड्यांच्या काळातच बोथावर राष्ट्रपतीपदाचा राजीनामा द्यायची वेळ आली. त्यानं टीव्हीवर भाषण करताना चिडून आपल्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांनीच आपल्या विरोधात हा कट रचल्याचं सांगितलं. बोथाच्या इच्छेविरुद्ध त्याचा पदभार डी क्लार्कनं स्वीकारला. इतर

काही जणांनी मात्र, बोथाच्या मनात खऱ्या अर्थानं मंडेला; तसंच एएनसी यांच्याविषयी कणव निर्माण होत होती, असं म्हटलं. अधिकृत अहवालानुसार या बैठकीमध्ये फारसं काहीच घडलं नसल्याची माहिती देण्यात आली. तसंच, ही फक्त एक 'सदिच्छा भेट' होती, असंही म्हटलं गेलं.

डी क्लार्कचा वर्णद्वेषी संकल्पनांना अजिबातच विरोध नव्हता. त्याला वर्णद्वेष अगदी योग्यच आहे असं वाटे, पण वर्णद्वेषाची संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यात काही अडचणी आहेत, एवढंच त्याचं म्हणणं होतं! त्याचबरोबर डी क्लार्कला देशासमोरच्या आर्थिक अडचणींचीही पुरेपूर कल्पना होती. वर्णद्वेषी धोरणांमुळे या अडचणींची भीषणता वाढत गेली असल्याची त्याला जाणीव होती. या सगळ्यातून मार्ग काढून देशाला प्रगतीपथावर न्यायचं असेल, तर त्यासाठी आपल्याला मंडेलाची सुटका केली पाहिजे, हे डी क्लार्कला कळून चुकलं. यानंतरच्या निवडणुकांमध्येसुद्धा डी क्लार्कला याची चुणूक दिसली. पक्षाच्या मतांच्या टक्केवारीमध्ये लक्षणीय घट झाली.



डी क्लार्क

दुसरीकडे पाश्चिमात्य देशांकडून मंडेलाच्या सुटकेसाठी येत असलेला दबाव वाढतच होता. अनेक गोऱ्या बुद्धिवादी लोकांनीसुद्धा मंडेलाच्या सुटकेचा आग्रह धरला होता. पूर्वीचा ऱ्होडेशिया म्हणजे आताचा झिम्बाब्वे; या देशात काय घडलं होतं याची डी क्लार्कला जाणीव होती.

तिथेसुद्धा कृष्णवर्णीय लोक बहुसंख्येनं असताना त्यांच्यावर गोऱ्या लोकांचीच जुलमी सत्ता होती. गोऱ्या लोकांनी या संदर्भात कृष्णवर्णीय लोकांशी चर्चा करण्याच्या कामात चालढकल करून खूपच उशीर केला. शेवटी गोऱ्या लोकांना कृष्णवर्णीयांच्या हाती सत्ता तर द्यावी लागलीच, पण शिवाय त्यांना यासाठी खूप रक्तपातालाही सामोरं जावं लागलं. हीच परिस्थिती दक्षिण आफ्रिकेत उद्भवू नये, यासाठी डी क्लार्कला प्रयत्न करावेसे वाटत होते. अर्थातच, त्याला हे जाहीरपणे बोलणं शक्यच नव्हतं. ही मतं त्यानं खासगीत आपल्या भावाजवळ बोलून दाखवली.

1989 सालच्या ऑक्टोबर महिन्यात सरकारनं सिसुलूसकट 8 राजकीय कैद्यांना विनाअट मुक्त करणार असल्याचं जाहीर केलं. हा प्रसंग एएनसीच्या कार्यकर्त्यांनी अगदी उत्साहानं साजरा केला. हजारो लोक रस्त्यांवर एएनसी, तसंच कम्युनिस्ट पक्ष यांचे बंदी घालण्यात आलेले झेंडे घेऊन उतरले. त्यांनी मोठा जल्लोष केला. सिसुलूनं याच घटनाक्रमांनी दक्षिण आफ्रिकेच्या भविष्याचा आलेख सजणार असल्याचं सांगून, सरकारवरचं आर्थिक दडपण वाढवत नेण्याचं आवाहन केलं. तसंच, सरकारनं असं अचानकपणे या नेत्यांना का मुक्त केलं असावं, याचं कोडं एएनसीला सोडवता येत नव्हतं. यामागे सरकारचा नक्कीच कसलातरी छुपा हेतू असला पाहिजे; याविषयी एएनसीच्या लोकांच्या मनात शंकाच नव्हती. तब्बल पावशतक तुरुंगात काढल्यानंतर या मुक्त नेत्यांना बाहेरचं स्वातंत्र्य सहन होत नसे! सतत प्रकाश देणाऱ्या विजेच्या दिव्याखाली झोपायची सवय असलेल्या सिसुलूला आता घरात अंधारात झोपच येईना. पण, कृष्णवर्णीय लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत तब्बल 25 वर्षांच्या काळात कसलाच फरक पडला नसल्याचंही या नेत्यांच्या लक्षात आलं. अजूनही दारिद्र्यात पिचलेले लोक, अत्यंत गलिच्छ वस्त्या, घाणेरडी आणि काड्यापेटीसारखी घरं अशीच ही परिस्थिती होती.

या नेत्यांच्या सुटकेमुळे त्यांचे पाश्चिमात्य देशांमधल्या लोकांशी संबंध वाढले. अमेरिकन राष्ट्रपती बुश यानं चक्क सिसुलूला त्याच्या सुटकेविषयी अभिनंदन करणारं एक पत्र पाठवलं. सिसुलू आणि इतर मुक्त नेते यांनी इंग्लंडमध्ये जाऊन थॅचरची भेट घ्यावी, असं मंडेलानं त्यांना सुचवलं. पण, थॅचरचा दृष्टिकोन, तसंच तिची या सुटकेविषयीची खरी भावना या गोष्टींविषयी अजूनही शंका वाटत असल्यामुळे सिसुलूनं याला नकार दिला. इतर सगळे देश दक्षिण

आफ्रिकेवर आर्थिक निर्बंध घालत असताना थॅचरचा मात्र याला अजून विरोध होता. आपला नवा परदेश सचिव आणि भावी पंतप्रधान जॉन मेजर याला तिनं जबरदस्तीनं या संदर्भात एका परिषदेत विधानं करायला लावल्यामुळे मेजर खूप खवळला होता. या आर्थिक निर्बंधांच्या विरोधात आपल्याला बुथेलेझीची साथ असेल, असं थॅचरनं परत एकदा म्हटलं.

डी क्लार्कनं कृष्णवर्णीय लोकांना दिलेल्या सवलतींमध्ये वाढ करायचं धोरण स्वीकारलं. केपटाऊनमधल्या कृष्णवर्णीय लोकांच्या एका भव्य मोर्च्याला डी क्लार्कनं परवानगी दिली. त्यानंतर बारीकसारीक गोष्टींमध्ये असलेल्या वर्णद्वेषी धोरणांनाही त्यानं मागे घेतलं. उदाहरणार्थ, समुद्रकिनारे, क्रीडांगणं, मुताऱ्या, उपहारगृहं अशा ठिकाणी गोरे लोक आणि कृष्णवर्णीय लोक यांच्यासाठी असलेल्या वेगवेगळ्या व्यवस्था त्यानं संपुष्टात आणल्या. तसंच, सर्वसामान्य लोकांवर नजर ठेवणाऱ्या लष्करवजा सैनिकांची व्यवस्था बंद केली. यानंतर आपण शांती प्रस्थापित करण्याविषयी खात्री देत असलेल्या कुठल्याही संघटनेशी बोलायला तयार असल्याचं डी क्लार्कनं आपल्या राष्ट्रपतीपदाच्या शपथविधीच्या भाषणाच्या वेळी जाहीर केलं. याचा फायदा उठवून मंडेलानं लगेच डी क्लार्कची भेट घेण्यात आपल्याला रस असल्याचं जाहीर केलं. काही दिवसांनी डी क्लार्कनं या भेटीला अनुकूलता दाखवली.

मंडेलानं, या भेटीमध्ये डी क्लार्कशी ज्या मुद्यांवर चर्चा करायची होती; त्या मुद्यांना अंतिम रूप देताना बराच विचार केला. त्यात सरकारनं एएनसीबरोबर विनाअट चर्चा करणं गरजेचं असल्याचा मुद्दा मांडण्यात आला होता. डी क्लार्कनं शांततेसाठी प्रयत्न करण्याच्या संकल्पनेविषयी उत्साह दाखवल्याचं कौतुक मंडेलानं यात केलं होतं. पण त्याचबरोबर, जोपर्यंत सरकार अनेक ठिकाणी सुरु असलेला उघड किंवा छुपा वर्णद्वेष संपवत नाही, तोपर्यंत कुठल्याही प्रकारची शांतता नांदणं शक्य नसल्याचं मतही मंडेलानं मांडलं होतं.

प्रत्यक्ष बैठकीत डी क्लार्कनं मंडेलाला कुठलंही आश्वासन दिलं नाही. मंडेलानं या बैठकीत डी क्लार्कच्या नजरेतून सगळ्या प्रश्नांचा अभ्यास करायचं ठरवलं होतं. डी क्लार्कशी सुरु असलेल्या बैठकीत तो आपलं बोलणं ऐकून घेतो आणि त्याला प्रतिसादसुद्धा देतो, हे बघून मंडेलाला जरा आश्चर्यच वाटलं. आपण कृष्णवर्णीय लोकांना गोऱ्या लोकांविषयी वाटत असलेली भीती दूर करायचा प्रयत्न करत असल्याचं डी क्लार्कनं मंडेलाला सांगताच मंडेलाला बरं वाटलं. कुठल्याही अटीविना एएनसीवरची बंदी उठवली पाहिजे, असा आपला जुना आग्रह

मंडेलानं डी क्लार्कपाशी धरला. या बैठकीनंतर मंडेला आणि डी क्लार्क यांचं एकमेकांविषयी चांगलं मत झालं. पण, त्यामुळे काही कट्टर एएनसी नेत्यांना मात्र मंडेला सरकारशी समझोता करताकरता एएनसीच्या विरोधातल्या सरकारी कटात अप्रत्यक्षरीत्या सहभागी झाल्याची भीती वाटायला लागली.

पण, मंडेलानं अत्यंत हुशारीनं डी क्लार्कशी झालेल्या चर्चेच्या मसुद्याची एक प्रत आपल्या सहकाऱ्यांना उपलब्ध करून दिली होती. त्यामुळे मंडेला सरकारशी कुठल्याही प्रकारच्या वाटाघाटी करत नसून, तो एएनसीच्या सरकारशी होऊ घातलेल्या चर्चेसाठी अनुकूल पार्श्वभूमी तयार करत असल्याचं एएनसीच्या लक्षात आलं. 1990 सालच्या नववर्षाच्या सुमाराला मंडेलाच्या सुटकेच्या संदर्भातली चर्चा परत एकदा सुरू झाली; पण तितक्याच वेगानं विरली. पण, डी क्लार्कच्या मनात काय सुरू आहे, याविषयी कुणालाच नीट थांगपत्ता लागत नव्हता. नाताळाचा सण कसा घालवायचा, या विचारात असलेल्या डी क्लार्कला अर्थातच मंडेलाच्या सुटकेच्या प्रश्नानं भंडावून सोडलं होतं. देशाची आर्थिक स्थिती अजूनच खराब होत चालली होती. तसंच, इतर देशांकडून दक्षिण आफ्रिकेवर येत असलेला दबाव वाढत चालला होता. थॅचरनं डी क्लार्कला मंडेलाच्या सुटकेच्या संदर्भात इतर देशांनी घातलेल्या आर्थिक निर्बंधांना मागे घेण्यासंबंधी त्यांच्यावर दबाव टाकण्याचा शब्द दिला.

मंडेलाच्या सुटकेसाठी अनुकूल वातावरण निर्माण होत चाललं होतं. तब्बल 27 वर्षं तुरुंगवासात काढलेल्या मंडेलाच्या मुक्ततेनंतरच दक्षिण आफ्रिकेमधल्या वर्णद्वेषाची अखेर होऊ शकते, याची डी क्लार्कला चांगलीच कल्पना होती. आपल्या हातून परिस्थितीवरचं नियंत्रण सुटत चाललं असल्याच्या भावनेनं डी क्लार्कला घाबरवून सोडलं होतं. आंतरराष्ट्रीय दबाव आणि आर्थिक अडचणी यांनी डी क्लार्कला बेजार करून सोडलं होतं. आपण मंडेलाला सोडलंच पाहिजे, असं मत बनवण्याकडे डी क्लार्कची विचारसरणी झुकत चालली होती. दक्षिण आफ्रिका एका नव्या युगात प्रवेश करायची चिन्हं दाट होत चालली होती.

तो ऐतिहासिक क्षण!

2 फेब्रुवारी 1990 या दिवशी दक्षिण आफ्रिकेच्या संसदेचं नवं सत्र सुरु होणार होतं. त्यासाठी डी क्लार्क आपलं भाषण तयार करत होता. त्याच्या मनात विचारांचं द्वंद्व माजलं होतं. या दरम्यान डी क्लार्कचं आपल्या संरक्षणमंत्र्याशी कम्युनिस्ट पक्षावरची बंदी उठवण्याच्या संदर्भात चांगलं वाजलंसुद्धा. 1 फेब्रुवारी 1990 च्या मध्यरात्री डी क्लार्कनं थॅचरला तार पाठवून आपल्या मनसुब्यांविषयी कल्पना दिली. आपल्या दुसऱ्या दिवशीच्या भाषणानं थॅचरची निराशा होणार नाही, एवढंच त्यात म्हटलं होतं. संसदेच्या सत्राच्या सुरुवातीला डी क्लार्कचं भाषण सुरु झालं. या भाषणाविषयी खूप जणांनी अनेक प्रकारचे अंदाज व्यक्त केले होते. त्या सगळ्या अंदाजांना कलाटणी देत डी क्लार्कनं आपल्या आधीच्या दक्षिण आफ्रिकन राष्ट्रपतींच्या तीन दशकांच्या निर्णयांमध्ये कमालीचे बदल जाहीर केले. एएनसी, तसंच कम्युनिस्ट पक्ष यांच्यासकट सगळ्या संघटनांना अधिकृत दर्जा देत असल्याचं डी क्लार्कनं जाहीर केलं. हिंसा न केलेल्या सगळ्या राजकीय कैद्यांना मुक्त करणार असल्याचंही डी क्लार्कनं सांगितलं. मृत्यदंडाची शिक्षा थांबवल्याचं त्यानं जाहीर केलं. तसंच, मंडेलाला तुरुंगातून बिनशर्त सोडण्यासंबंधी सरकार ठाम असल्याचं विधानही डी क्लार्कनं केलं.

या ऐतिहासिक घटनेनं मंडेलाचा जवळपास तीन दशकं सुरु असलेला लढा यशस्वी ठरल्याचं दिसून येत होतं. पण, मंडेलाला हा क्षण उन्मादानं साजरा करायचा नव्हता. त्याचं अत्यंत काळजीपूर्वकरीत्या शब्दबद्ध केलेलं एक पत्रक विनीनं जोहान्सबर्गमध्ये जाहीरपणे वाचून दाखवलं. त्यात मंडेलानं दक्षिण आफ्रिकन नागरिकांना या यशाचं श्रेय दिलं. त्याशिवाय आंतरराष्ट्रीय समुदायानं टाकलेल्या दबावाचाही खूप उपयोग झाला असल्याचं मंडेलानं नमूद केलं होतं.

अचानकपणे दक्षिण आफ्रिका हा एकदम नवा आणि वेगळा देश आहे, असं वाटायला लागलं. अनेक वर्षांच्या दडपशाहीचा अंत झाला. इतकी दशकं भूमिगत झालेले लोक आणि त्यांच्या बंदी घालण्यात आलेल्या संघटना या सगळ्यांना अधिकृत दर्जा मिळाला. लपवून ठेवलेले एएनसीचे झेंडे बाहेर आले आणि डौलानं फडकवले जायला लागले. देशभर मंडेलाची छायाचित्रं दिसायला लागली. लोक सतत मंडेलाविषयीच बोलत असत. मंडेलाची तब्येत कशी

आहे, त्याची सुटका नेमकी कधी होणार, याविषयी अंदाज बांधले जायला लागले. दरम्यान, स्वत: मंडेला आपली सुटका झाल्यावर जनतेचा प्रतिसाद आणि माध्यमांचं आक्रमण या गोष्टी कशा हाताळायच्या याविषयी जोमानं तयारी करत होता.

आपल्या भाषणाला एक आठवडा उलटून गेल्यावर डी क्लार्कनं मंडेलाला बोलावणं पाठवलं आणि त्याला त्यानंतरच्या दिवशी जोहान्सबर्गला विमानानं पाठवून सोडण्यात येणार असल्याचं सांगितलं. आश्चर्य म्हणजे मंडेलानं आपल्याला लगेच न सोडता एका आठवड्यानं सोडलं जावं, अशी विनंती केली. कारण एएनसीला मंडेलाच्या स्वागताची जय्यत तयारी करायची होती. पण याचा सुरक्षा व्यवस्थेवर खूप ताण पडेल, अशी संबंधित अधिकाऱ्यांना भीती वाटत होती. मंडेला आणि डी क्लार्क यांच्यात मोठी वादावादीच झाली. इराणमध्ये अयातुल्ला खोमेनी या धार्मिक नेत्याला मुक्त केल्यावर 1979 साली लोकांनी केलेल्या जल्लोषाचं रूपांतर जवळपास दंगलींमध्येच झाल्याची आठवण काढून डी क्लार्कच्या सल्लागारांनी अशीच परिस्थिती मंडेलाच्या सुटकेनंतर दक्षिण आफ्रिकेत बघायला मिळेल, असं मत व्यक्त केलं. आपण तुरुंगातून विनीसोबत चालत बाहेर येणार आणि केपटाऊनमधल्या जनतेशी बोलणार, असा मंडेलाचा आग्रह होता. डी क्लार्कला मात्र मंडेलाच्या सुटकेमध्ये आता अजिबातच उशीर करायचा नव्हता. त्यामुळे मंडेलाच्या काही मागण्या मान्य करून दुसऱ्या दिवशी त्याची तुरुंगातून सुटका करण्यात येणार असं ठरलं.

एएनसीनं मंडेलाची सुटका झाल्यावरच्या त्याच्या स्वागतासाठी एक समिती नेमली होती. या समितीमधले लोक मंडेलाच्या सुटकेनंतरच्या त्याच्या भाषणाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी त्याच्याकडे आले. दुसऱ्या दिवशी पहाटे 4.30 वाजता मंडेला झोपेतून उठला. आपला नाश्ता झाल्यावर त्यानं वैद्यकीय तपासणी करून घेतली आणि तो परत एकदा आपल्या भाषणावर शेवटचा हात फिरवण्यासाठी एएनसीच्या नेत्यांना भेटला. आपलं सगळं सामानसुमान आवरून त्यानं तुरुंगामधल्या लोकांचा निरोप घेतला. नेहमीप्रमाणेच मंडेलानं कुठल्याही भावनांचं प्रदर्शन करायचं टाळलं. अत्यंत शांतपणे आणि धीरगंभीरपणे तो या ऐतिहासिक आणि अत्यानंदाच्या क्षणालासुद्धा सामोरा जात होता. ठरल्याप्रमाणे विनीबरोबर दुपारी 4 वाजता, 71 वर्षं वयाचा मंडेला 10 हजार दिवसांहून जास्त काळ बंदिवासात घालवल्यावर अखेरचा तुरुंगातून चालत बाहेर पडला.

हा काळ इतिहास बदलून टाकणारा होता. सोव्हिएत युनियनचं वेगानं विघटन होत होतं. दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व आणि पश्चिम जर्मनी यांना विभागून टाकण्यासाठी उभी करण्यात आलेली भिंत मोडून टाकण्यासाठीची धुमधाम सुरू होती. साहजिकच, सगळीकडे अत्यंत अविश्वसनीय असंच वातावरण होतं. पण, या पार्श्वभूमीवरसुद्धा विनीचा हात हातात घेऊन तुरुंगाबाहेर पडत असलेला मंडेला ही सगळ्या जगाचं लक्ष वेधून घेणारी घटनाच ठरली. 11 फेब्रुवारी 1990 या दिवशी एखाद्या चित्रपटात किंवा कथेत अन्यायाशी झुंज देऊन शेवटी नायकानं क्रूर शत्रूंवर बाजी पलटवावी आणि आपला शांत चेहरा घेऊन विजयाकडे वाटचाल करावी, असंच हे सनसनाटी दृश्य होतं. मंडेलाविषयी इतकी वर्षं लपूनछपूनच सगळ्या बातम्या येत असल्यामुळे आपला नायक नक्की कसा आहे, याविषयी लोकांच्या मनात आपापल्या प्रतिमा तयार झाल्या होत्या. आता हा नायक त्यांच्यासमोर येत होता. लोकांनी तुरुंगाबाहेर तुफान गर्दी केली होती. उभं राहायला जागा मिळेना; तेव्हा लोक झाडांवर चढले, खांब आणि तारा असं जे मिळेल त्यांना लटकले. विनीच्या चेहऱ्यावर हास्य झळकत असलं, तरी मंडेलाचा चेहरा अगदी भावनाशून्य होता. त्यावर थोडी चिंता उमटल्यासारखं वाटत होतं.

ऐतिहासिक क्षण

आपल्या स्वागतासाठी आलेल्या जनतेकडे मंडेलानं बघितलं आणि तेव्हाच त्याला खऱ्या

परिस्थितीची जाणीव झाली. इतका वेळ तो आपल्या सुटकेनंतरच्या वातावरणाविषयीच्या विचारांमध्येच बुडून गेला होता. पण, आता समोर उभा असलेला जनसागर बघून मंडेलाला भविष्याचा विचार करण्याबरोबरच त्या ऐतिहासिक क्षणाचा आस्वाद घ्यायचं भानही आलं. त्यानं आपल्या हाताची मूठ आवळून लोकांसमोर हात हलवत विजय झाल्याची प्रतिक्रिया दिली. त्यानंतर दोन मिनिटांनी मंडेला त्याच्यासाठी आलेल्या टोयोटा गाडीत बसला. पण, मंडेलाची गाडी वेगानं पुढे जाणं शक्यच नव्हतं. गाडीच्या सभोवताल लोकांनी गर्दी केली होती. ते मंडेलाकडे बघून, ओरडून आणि घोषणा देऊन आपला आनंद व्यक्त करत होते. मंडेला एकदा दोन मुलांसह त्याच्या स्वागतासाठी आलेल्या एका गोऱ्या जोडप्यापाशी थांबून त्यांच्याशी बोलला. पण, काही काळातच या जल्लोषाचं रूपांतर गोंधळात झालं. मंडेलाची गाडी लोकांच्या गर्दीमुळे पुढे जाऊ शकत नव्हती. गोंधळलेल्या वाहनचालकानं ही गाडी भलतीकडेच वळवली. त्यातून माजलेल्या गोंधळामुळे एक छोटी दंगलच सुरू झाली. कुणीतरी हवेत गोळी झाडली आणि त्यानंतर झालेल्या पळापळीत दंगेखोरांनी दुकानांमध्ये लूटमार करणं, तसंच जमलेल्या लोकांना लुबाडणं असले प्रकार सुरू केले. काही काळानंतर हे प्रकार थांबले.

शेवटी संध्याकाळच्या सुमाराला मंडेला आपल्या नियोजित स्वागतस्थळी हजर राहू शकला. 1964 साली तुरुंगवास होण्याच्या वेळेला केलेल्या प्रदीर्घ भाषणानंतरचं मंडेलाचं हे पहिलंच जाहीर भाषण होतं. पण, मंडेलाचं भाषण अगदीच कोरडं झालं. त्यानं ते चक्क वाचून दाखवल्यासारखं आणि त्याला त्या भाषणाचा मजकूर माहीत नसल्यासारखं कंटाळवाण्या शैलीत सादर केलं. गोरे राजकीय नेते आणि आंतरराष्ट्रीय नेते यांना तर त्याहूनही जास्त निराशा झाली. कारण मंडेलानं आपल्या भाषणात आपण एएनसी, तसंच साम्यवाद यांच्यापासून लांब असल्याची कुठलीही घोषणा केली नाही. उलट आपण एएनसीचाच कार्यकर्ता असल्याचं, तसंच साम्यवादाला आपला कोणताही विरोध नसल्याचं मंडेलाच्या बोलण्यातून दिसून आलं. त्यानं एएनसी आणि कम्युनिस्ट पक्ष यांचे जाहीर आभार मानले. त्याचबरोबर कृष्णवर्णीयांच्या लढ्याकडे सहानुभूतीनं बघणाऱ्या गोऱ्या लोकांचेही मंडेलानं आभार मानले. याशिवाय डी क्लार्कचेही मंडेलानं आभार मानून उपस्थित लोकांना मोठा धक्काच दिला. यानंतर मंडेलानं, आपण तुरुंगातून सरकारशी कोणत्याही वाटाघाटी करत नव्हतो, तर फक्त आपल्याला बिनशर्त तुरुंगातून सोडलं जाण्याविषयीची चर्चा करत होतो असं सांगितलं. गोऱ्या लोकांच्या आणि थॅचर

बाईच्या दृष्टीनं सगळ्यात धक्कादायक गोष्ट म्हणजे, एएनसीच्या हिंसक कारवायांचं समर्थन करून मंडेलानं जोपर्यंत कृष्णवर्णीयांना समान हक्क मिळत नाहीत; तोपर्यंत एएनसीनं आपला हा पवित्रा कायम ठेवला पाहिजे, असं मत व्यक्त केलं.

या भाषणानं एएनसीचे नेते आणि कार्यकर्ते, तसंच कम्युनिस्ट पक्षाचे लोक अत्यंत खूश झाले. पण डी क्लार्क, थॅचर आणि वर्णद्वेषाचा उघड/छुपा पुरस्कार करणारे सगळे लोक प्रचंड निराश झाले. त्यांना अतिशय मोठा धक्का बसला. अर्थात, मंडेलाच्या दृष्टीनं एएनसी आणि आपल्या इतर कार्यकर्त्यांमुळेच आपण आपला लढा देऊ शकलो हे जाहीरपणे सांगणं महत्त्वाचं होतं. कारण मंडेलानं त्यांच्याविषयी ऋण व्यक्त केलं नसतं किंवा त्यांना आपल्या लढ्याचं श्रेय दिलं नसतं, तर त्याच्या सुटकेनंतरचं उत्साहाचं वातावरण निवळल्यावर या संघटनांनी त्याला दूर केलं असतं. त्यामुळे सोव्हिएत युनियनचं विघटन झाल्यावर रशियामध्येसुद्धा मिखाईल गोर्बाचेव्हला अजिबात किंमत मिळाली नाही आणि त्याच्या विरोधात बंड झालं, तसं आपल्या बाबतीत होऊ शकतं, याची मंडेलाला जाणीव होती. त्यामुळे आपण आपल्या संघटनेशी प्रामाणिक राहिलं पाहिजे, आणि एकमेकांच्या साहाय्यानंच आपण आपला लढा पुढे नेला पाहिजे, याची मंडेलाला पूर्ण कल्पना होती. म्हणूनच मंडेलानं अत्यंत काळजीपूर्वकरीत्या विचार करून चाणाक्षपणे आपलं भाषण लिहिलं होतं. आता एएनसीचे आभार मानून आपण एएनसीचं नेतृत्व करत असल्याची जाहीर पावती मंडेलानं दिल्यामुळे सरकारबरोबर पुढचा प्रवास शांततामय मार्गानं व्हावा; यासाठीची चर्चा करण्यासाठी तो मोकळा होता.

काही दिवसांनी सुवेटो स्टेडियममध्ये जमलेल्या 1 लाख लोकांसमोर भाषण करण्यासाठी मंडेला दाखल झाला. एएनसीच्या दृष्टीनं हे मोठं आव्हानच होतं. कारण इतक्या मोठ्या प्रमाणावर गर्दी जमल्यावर त्यातून दंगेखोरी किंवा इतर गोंधळ माजण्याची दाट शक्यता होती. पोलिसांची यासाठी मदत घेणंही शक्य नव्हतं. त्यामुळे एएनसीनं आपल्याच शेकडो स्वयंसेवकांना गर्दीवर नियंत्रण ठेवायचं काम दिलं. कानाचे पडदे फाटतील अशा आवाजात मंडेलाचं स्वागत झालं. आपल्या भाषणात मंडेलानं शिस्तबद्धपणे काम करण्याच्या महत्त्वाविषयी सांगितलं. आता इथून पुढे शिक्षणावर भर दिला पाहिजे, असं सांगत कृष्णवर्णीय लोकांनी हिंसा आणि दंगलखोरी हे उद्योग ताबडतोब बंद केले पाहिजेत, अशी आपली अपेक्षा असल्याचं मंडेलानं जाहीर केलं. लोकांनी मंडेलाचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं आणि त्याला

टाळ्यांचा जोरदार प्रतिसादही दिला. पण, भाषणाच्या दरम्यान किंवा त्यानंतरही ज्या दंगलीची भीती एएनसीला वाटत होती, ती दंगल झाली नाही. लोकांनी शांतपणे आणि शिस्तबद्धपणे भाषण संपताच स्टेडियममधून बाहेर पडत आपापली घरं गाठली.

प्रचंड समुदायासमोर मंडेला

भाषण संपल्यावर लोकांची गर्दी टाळण्यासाठी मंडेला हेलिकॉप्टरमधून आपल्या सुवेटोमधल्या झोपडपट्टीमधल्या घरी दाखल झाला. तिथे विनीबरोबर मंडेला असलेलं दृश्य एखाद्या सर्वसामान्य जोडप्यासारखं दिसत होतं. सतत लोक त्यांना भेटायला येत होते. एएनसीचे सगळे नेते आणि कार्यकर्ते उत्साहानं हजर होते. मंद हास्य करत आणि अत्यंत शांतपणे मंडेला सगळ्यांशी बोलत होता. तुरुंगवासानं मंडेलाचा स्वभाव आणखी मृदू झाला आहे, असं त्याला भेटणाऱ्या प्रत्येकाला वाटत होतं. मंडेलाच्या वागण्या-बोलण्यात कुठलाही कडवटपणा जाणवत नव्हता. मंडेलानंच त्याविषयीचं स्पष्टीकरण दिलं. तुरुंगातला एकाकीपणा आणि तिथे असलेला निवांत वेळ या गोष्टी आपल्याला खूप काही शिकवून जातात, असं आपल्याला वाटत असल्याचं मंडेलानं सगळ्यांना सांगितलं. तसंच, याच काळात सगळ्या अडचणींकडे वेगळ्या नजरेनं बघायची संधीसुद्धा मिळते, असं आपल्याला वाटत असल्याचं मंडेला म्हणाला. म्हणूनच तुरुंगवासामुळे आपल्यात किंवा आपल्या कुठल्याही सहकाऱ्यामध्ये कडवटपणाची झाकसुद्धा आढळणार नाही, असं मंडेलानं सांगितलं. यानंतर मंडेलानं आपला सर्वसमावेशकतेवर विश्वास असल्याचं सांगून; गोरे नेते, तसंच गोरे व्यावसायिक यांच्या भेटीगाठीसुद्धा घेतल्या.

मंडेलानं आपल्याविषयी लोकांच्या मनात कोणती प्रतिमा आहे, याचा नीट अभ्यास केला होता. ही प्रतिमा ढासळू नये, याची मंडेला अत्यंत बारकाईनं काळजी घ्यायचा. पण त्याचबरोबर, आपल्याकडे कसलीतरी अलौकिक शक्ती आहे, अशा नजेरनं लोकांनी आपल्याकडे बघू नये, यासाठीसुद्धा तो धडपडायचा. म्हणूनच, तो आपल्या बोलण्यात कधीच 'मी... माझा... मला' असे आत्मप्रौढी मिरवणारे शब्द येऊ देत नसे. आपल्यामुळे लोक किंवा सहकारी नसून, त्यांच्यामुळेच आपण आहोत हे तो कधी विसरायचा नाही. पुढचे 6 महिने मंडेला परदेशांमध्ये ठिकठिकाणी फिरला. त्याचे मुख्य हेतू एएनसीविषयीच्या चुकीच्या समजुती पुसून टाकणं, एएनसीसाठी निधी गोळा करणं आणि वर्णद्वेषाच्या विरोधातल्या चळवळींना अंतिम रूप देणं हे होते. मंडेलानं थोडी विश्रांती घ्यावी, असा सल्ला एका ब्रिटिश खासदारानं दिल्यावर मंडेलानं त्याला 'मी गमावलेल्या 27 वर्षांची मला भरपाई करायची आहे' असं उत्तर दिलं! झांबियामध्ये जाऊन मंडेलानं जुन्या साथीदारांची भेट घेतली. पॅलेस्तिनियन लोकांची चळवळ चालवणाऱ्या यासर अराफातची भेट घेऊन मंडेलानं त्याला आलिंगन दिलं.

झिम्बाब्वेमध्ये मंडेला गेलेला असताना तिथल्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये कृष्णवर्णीय लोकांची सत्ता प्रस्थापित करणाऱ्या रॉबर्ट मुगाबेनं एका स्टेडियममध्ये मंडेलाची लोकांना ओळख करून दिली. तिथेच या दोन नेत्यांमधला फरक दिसून आला. मुगाबेनं आपल्या भाषणात स्वत:ची तुतारी फुंकली, तसंच वारंवार आपल्या विरोधकांविषयी खराब मतं प्रकट केली, पण मंडेलानं मात्र अत्यंत काळजीपूर्वकरीत्या नेहमीच्या शालीनतेनं आपलं भाषण केलं.

आपला दौरा मंडेलानं स्वीडन भेटीनं पूर्ण केला. स्वीडननं एएनसीला सतत पाठिंबा दिला होता. तिथेच आपल्या प्रदीर्घ आजारानंतर आता 72 वर्षं वय असलेला ऑलिव्हर तांबो राहात होता. जवळपास तीन दशकांच्या काळानंतर मंडेला आणि तांबो यांची भेट झाली! तांबो एएनसीचं अध्यक्षपद सांभाळत होता. पण हे पद आता मंडेलानं स्वीकारावं, यासाठी तांबोनं मंडेलापाशी आग्रह धरला. मंडेलानं त्याला नकार देत या पदासाठी तांबोच योग्य असल्याचं सांगितलं. यानंतर मंडेला इंग्लंडच्या दौऱ्यावरही गेला. तिथे थॅचरनं त्याला भेटीचं आमंत्रण दिलं असलं, तरी त्यानं स्वत:हून थॅचरची भेट घ्यायचं टाळलं. एएनसीच्या काही बैठकांना मंडेलानं हजेरी लावली, पण इंग्लंड दौऱ्यातलं त्याचं मुख्य आकर्षण म्हणजे वेम्ब्लीच्या स्टेडियममधला संगीताचा एक कार्यक्रम हे होतं. या कार्यक्रमाचं परत एकदा बीबीसीनं थेट प्रक्षेपण केलं.

या कार्यक्रमात कुणी एएनसीची स्तुती करायला सुरुवात केली, तर कार्यक्रमाचं प्रक्षेपण थांबवायचे आदेश ब्रिटिश सरकारनं बीबीसीला दिले होते. त्यामुळे कार्यक्रमाचा निर्माता प्रक्षेपण सुरु असताना अगदी काळजीतच होता. 75 हजार तरुण या कार्यक्रमाला जमले होते आणि प्रचंड उत्साहानं प्रतिसाद देत होते. अनेक आंतरराष्ट्रीय कलाकारांनी एएनसीसाठी निधी गोळा करण्याच्या हेतूनं या कार्यक्रमात मानधन न घेताच आपली अदाकारी सादर केली. कार्यक्रमाच्या शेवटी मंडेलाचं व्यासपीठावर आगमन झालं. लोकांच्या टाळ्या आणि त्यांचा जल्लोष यांनी स्टेडियम डोक्यावरच घेतलं.

इंग्लंडच्या यशस्वी दौऱ्यानंतर मंडेला मायदेशी परतला. त्यानंतर तो आपल्या मूळ गावी भेट द्यायला गेला. तिथली परिस्थिती फारशी बदलली नव्हती. मंडेलानं आपल्या आईच्या दफन केलेल्या शवपेटीच्या ठिकाणाला भेट दिली. आपण तिच्यासाठी काही करु शकलो नाही, याचं दु:ख त्याला अजूनही भेडसावतच होतं. मंडेलाची आपली बहीण माबेल हिच्याशी भेट झाली.

थॅचरसह मंडेला

नंतर मंडेलानं अनेक पाश्चिमात्य देशांना भेट दिली. ठिकठिकाणचे नेते मंडेलाला जणू तो दक्षिण आफ्रिकेचा राष्ट्रपती असावा, अशा प्रकारे मान देत होते. फ्रान्समध्ये राष्ट्रपती मितराँ यानं मंडेलाचं स्वागत केलं. रोममध्ये तर पोपच मंडेलाच्या स्वागतासाठी हजर होता. यानंतर मंडेला

परत इंग्लंडला गेला आणि तांबोला भेटला. त्याची टेलिफोनवर थॅचरशी बराच काळ चर्चा झाली. दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेष संपत नाही; तोपर्यंत इंग्लंडनं दक्षिण आफ्रिकेवर आर्थिक निर्बंध घालावेत, अशी विनंती मंडेलानं थॅचरला केली. पण, पूर्वीप्रमाणेच थॅचरची भूमिका ठाम होती. तरीही, थॅचरनं मंडेलाला त्याच्या वयाकडे बघून विश्रांती घ्यायचा आणि जास्त दगदग न करायचा सल्ला दिल्यामुळे मंडेलाला तिच्याविषयी आपुलकी निर्माण झाली. मंडेलाच्या वयाच्या निम्म्या वयाच्या लोकांनाही इतकी दमछाक सहन होणार नाही, असं मंडेलाला सांगून थॅचरनं मंडेलाला, त्यानं आपला वेग कमी केला नाही, तर तो अमेरिकेहून जिवंत परतणार नाही, असं खडसावून सांगितलं!

अमेरिकेत मंडेला आठ शहरांमध्ये फिरला. सगळीकडे लोक त्याचा जयजयकार करण्यासाठी हजर असायचे. न्यूयॉर्कमध्ये लोकांनी मंडेलाचं केलेलं उत्स्फूर्त स्वागत बघून तिथल्या मेयरनं आपल्या आयुष्यात यापूर्वी आपण असा जल्लोष बघितला नसल्याची प्रतिक्रिया दिली. मंडेलानं संयुक्त राष्ट्रसंघाच्या परिषदेत भाषण केलं. तसंच, कृष्णवर्णीयांच्या वस्त्यांना भेट दिली. अमेरिकेमध्ये 1970 च्या दशकात झालेल्या समान हक्कांसाठीच्या कृष्णवर्णीयांच्या चळवळींनंतर प्रथमच त्यांना इतक्या मोठ्या प्रमाणावर दिलासा देणारा माणूस भेटला असल्याचं 'न्यूयॉर्क टाईम्स'नं म्हटलं. वॉशिंग्टनमध्ये राष्ट्रपती बुश (सीनियर)नं मंडेलाची भेट घेतली. बुशनं एएनसीच्या हिंसात्मक चळवळीविषयी मंडेलाजवळ नाराजी व्यक्त केली. त्यावर मंडेलानं यामागचं कारण दक्षिण आफ्रिकन सरकारची हिंसा हे असल्याचं सांगितलं. सरकारनं ज्या पद्धतीनं कृष्णवर्णीय लोकांची चळवळ दडपून टाकायचे क्रूर प्रयत्न केले, त्याच भाषेत लोकांनी सरकारला उत्तर दिलं असल्याचं मंडेलानं सांगितलं. तसंच, आपण शांततामय मार्गांनी जाण्यासाठी, तसंच चर्चा करून प्रश्न सोडवण्यासाठी उत्सुक असल्याचंही मंडेलानं सांगितलं. यामुळे बुश आणि त्याच्याबरोबर काम करणाऱ्या लोकांना मंडेलाविषयी आदर वाटायला लागला. बुशनं दोन दिवसांनी चक्क डी क्लार्कला फोन करून मंडेला त्याच्यावर कुठल्याही प्रकारे मात करायचा प्रयत्न करत नसल्याचं सांगितलं! पण तरीही, तीन महिन्यांनी अमेरिकेला भेट देऊन आपणच दक्षिण आफ्रिकेमधला सर्वोच्च नेता आहोत; असं दाखवायची हास्यास्पद धडपड डी क्लार्कनं केलीच.

वॉशिंग्टनमध्ये अमेरिकन 'सीनेट' आणि 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज' या दोन्ही सभागृहांच्या

सदस्यांच्या संयुक्त बैठकीसमोर मंडेलानं भाषण केलं. पण, मंडेलाचं सभागृहात आगमन होताच, पहिली तीन मिनिटं या सदस्यांनी उभं राहून टाळ्या वाजवत मंडेलाला मानवंदना दिल्यानंतरच हे भाषण होऊ शकलं! आपल्या भाषणात मंडेलानं मार्कस् गार्व्ही, मार्टिन ल्यूथर किंग यांच्यासारख्या कृष्णवर्णीय नेत्यांबरोबरच वर्णद्वेष संपवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या अब्राहम लिंकनची स्तुती केली. दक्षिण आफ्रिकेमध्ये सुरु असलेल्या वर्णद्वेषामुळे इतर देशांनी घातलेले आर्थिक निर्बंध, तसंच इतर प्रकारचे बहिष्कार योग्यच असल्याचं मत मंडेलानं मांडलं. यामुळे उजव्या विचारसरणीचे लोक अर्थातच भडकले, पण त्यांनी मंडेलाचं भाषण सुरु असताना उठून जायची आधी दिलेली धमकी प्रत्यक्षात खरी करून दाखवली नाही. याशिवाय क्यूबा, तसंच लीबिया या अमेरिकन दादागिरीला विरोध करणाऱ्या देशांविषयी मंडेलानं गौरवाचे उद्गार काढल्यामुळेसुद्धा उजव्या विचारसरणीचे अमेरिकन नेते वैतागले.

मंडेलाच्या सततच्या दौऱ्यांमुळे आणि भाषणांमुळे कित्येकदा तो पार दमून जाई. अशा वेळी त्याचे शरीररक्षक सरळ त्याला विश्रांती घ्यायला भाग पाडत. निदान अधिकृत कार्यक्रम सोडून इतरांशी बोलून मंडेलानं आपली शक्ती 'वाया घालवू नये' यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु असत. मंडेलाची अफाट लोकप्रियता बघून 'न्यूयॉर्क टाईम्स'नं 'काही महिन्यांपूर्वी, 'दक्षिण आफ्रिकेमधल्या वर्णद्वेषाकडे ढुंकूनसुद्धा न बघणाऱ्या लाखो लोकांचा; मंडेला आता अचानकपणे हीरो झाला आहे', अशी प्रतिक्रिया दिली.

अमेरिका दौरा आटोपल्यावर मंडेला परत एकदा इंग्लंडला गेला. या खेपेला थॅचरशी त्याची भेट झाली. त्यातही कहर म्हणजे थॅचरनं सलग 50 मिनिटं मंडेलाला बोलू दिलं, हा एक विक्रमच होता! आपल्या सुटकेसाठी थॅचरनं केलेल्या मदतीविषयी मंडेलानं तिचे आभार मानले. आता कृष्णवर्णीयांचा दक्षिण आफ्रिकेमधला लढा अगदी निर्णायक टप्प्यावर आला असून, शेवटचं पाऊल टाकताना त्यात थॅचरनं हातभार लावावा, अशी अपेक्षाही मंडेलानं व्यक्त केली. यानंतर अर्धा तास थॅचर बाई बोलल्या! थॅचरनं मंडेलाला बुथेलेझीशी चर्चा करण्याविषयी सुचवलं. तसंच, एएनसीनं हिंसा बंद केली पाहिजे, असं ती परत एकदा म्हणाली. या बैठकीसाठी एक तास; इतका वेळ राखून ठेवलेला असला, तरी प्रत्यक्षात ही बैठक तब्बल तीन तास चालली.

मंडेलाची तुरुंगातून झालेली सुटका हा अर्थातच दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषी इतिहासामधला अत्यंत महत्त्वाचा क्षण होता. ज्या माणसावर तऱ्हेतऱ्हेचे आरोप ठेवून आणि

खूप अन्याय करून सरकारनं त्याला तुरुंगात डांबलं होतं, त्यालाच मानानं मुक्त करायची वेळ सरकारवर आली होती. पण, आपली सुटका झाल्यामुळे वर्णद्वेष संपला, असं मानण्याइतका मंडेला दुधखुळा नव्हता. कृष्णवर्णीय लोकांना खऱ्या अर्थानं सगळे हक्क गोऱ्या लोकांसारखे समान पातळीवर मिळणार नाहीत, तोपर्यंत आपल्या सुटकेला काही अर्थ नाही; अशी मंडेलाची धारणा होती. साहजिकच, आता वर्णद्वेष पूर्णपणे संपवण्याचं स्वप्न मंडेलानं मनाशी बाळगलं होतं.

कार्यरत

नेल्सन मंडेलाची तुरुंगातून झालेली सुटका हा विसाव्या शतकामधल्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या नकाशावरच्या अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगांपैकी एक मानला जातो. सगळ्या जगाची नजर या प्रसंगाकडे लागून राहिली होती. साहजिकच, तुरुंगातून सुटका झाल्यापासून नेल्सन मंडेलाच्या पायांना भिंगरी लागल्यासारखीच त्याची अवस्था होती. 1990 सालच्या ऑक्टोबर महिन्यात मंडेलानं आशियाई देशांचा दौरा केला. भारतभेट हा मंडेलाच्या दृष्टीनं अर्थातच सगळ्यात महत्त्वाचा टप्पा होता. कृष्णवर्णीयांच्या चळवळीत भारतानं पूर्वीपासूनच अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली असल्यामुळे, मंडेला आपलं ऋण व्यक्त करण्यासाठी आतूर झाला होता. भारतात मंडेलाचं स्वागत एखाद्या राष्ट्रप्रमुखासारखं करण्यात आलं. भारतीय राष्ट्रपती आर वेंकटरामन आणि मंडेला यांच्या भेटीत एएनसीला मदत मिळत राहील, असं आश्वासन मंडेलाला देण्यात आलं. कलकत्त्यामध्ये मंडेलानं मोठ्या जनसमुदायासमोर भाषण करताना भारतीय लोकांचे आभार मानले आणि 'गांधीजींना काही काळ दक्षिण आफ्रिकेत पाठवल्याबद्दल' आपलं ऋण व्यक्त केलं. इंडोनेशियामध्ये राष्ट्रपती सुहार्तो यानं मंडेलाचं असं जंगी स्वागत केलं की, मंडेलानं लगेचच एएनसीसाठी 1 कोटी डॉलर्सच्या मदतनिधीची मागणी केली. सुहार्तोनं पत्रकारांसमोर जाहीररीत्या ही मागणी मान्य करून टाकली. मलेशियानंसुद्धा एएनसीला मदत केली. पण, जपानमध्ये मात्र मंडेलाचं फारसं जोरदार स्वागत झालं नाही, तसंच त्याच्या एएनसीसाठीच्या निधीच्या आवाहनाला जपानी नेत्यांनी प्रतिसाद दिला नाही.

मंडेलानं जवळपास सगळ्या महत्त्वाच्या देशांना भेटी दिल्या असल्या, तरी अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे; ज्या सोव्हिएत युनियनशी चांगले संबंध असल्याच्या आरोपांवरून पाश्चिमात्य जग मंडेलाकडे तो आरोपी असल्यासारख्या नजरेनं बघायचं, तिथेच मंडेला गेला नाही. यामागचं कारण म्हणजे सोव्हिएत युनियनमधल्या पडझडीनंतर आर्थिक महासंकटात सापडलेल्या रशियानं आपल्या व्यावसायिक गरजा आधी पूर्ण केल्या पाहिजेत, असं गोर्बाचेव्हला वाटत होतं. त्यामुळे त्यानं घाईघाईनं वर्णद्वेषी दक्षिण आफ्रिकन सरकारशी व्यावसायिक संबंध प्रस्थापित केले. अर्थातच, ही गोष्ट एएनसीच्या विरोधातली होती. यानंतरच्या रशियन राष्ट्रपतींनीसुद्धा गोर्बाचेव्हचीच री ओढल्यामुळे मंडेलाचा रशियाला भेट

द्यायचा बेत बारगळला. मात्र, पाश्चिमात्य जगाचे शत्रू असलेले लीबियाचा मुअम्मर गद्दाफी, इराकचा सद्दाम हुसेन, पॅलेस्टाईनचा यासर अराफात अशा नेत्यांशी मात्र मंडेलानं मैत्रीपूर्ण संबंध वाढवले. 1990 सालच्या ऑगस्ट महिन्यात इराकच्या कुवेतवरच्या आक्रमणानंतर अमेरिका, तसंच इतर पाश्चिमात्य देश यांनी इराकच्या विरोधात युद्ध सुरु केल्यावर मंडेलानं या देशांवर दुटप्पीपणे वागण्याचा आरोप केला. पूर्वी अमेरिकेनं ग्रेनेडा, तसंच पनामा या देशांमध्ये घुसखोरी केली, तेव्हा सगळ्यांनी वेगळे निकष का लावले होते, असा सवाल करून मंडेलानं त्यांना निरुत्तर केलं.

मंडेलाला क्युबाचा राष्ट्राध्यक्ष फिडेल कॅस्ट्रो याच्याविषयी विशेष आपुलकी होती. कॅस्ट्रोच्या 1959 सालच्या उठावातून मंडेलानं खूप मोठी प्रेरणा घेतली होती. अमेरिकेच्या दबावतंत्राला आणि कटकारस्थानांना न जुमानता कॅस्ट्रोनं आपला देश स्वतंत्र विचारांनी चालवला होता. 1991 सालच्या जुलै महिन्यात कॅस्ट्रोनं क्युबाला भेट दिली. तिथे अत्यंत भावनापूर्ण भाषण करून कॅस्ट्रो, तसंच क्युबन जनता यांनी एएनसीला तिच्या वर्णद्वेषाच्या विरोधातल्या चळवळीला पाठिंबा दिल्याबद्दल मंडेलानं त्यांचे आभार मानले. अँगोला देशातल्या जुलमी हुकूमशहाला मदत करण्यासाठी अमेरिका आणि दक्षिण आफ्रिका यांनी सैन्य पाठवलेलं असताना कॅस्ट्रोनं या हुकूमशहाच्या विरोधातल्या क्रांतिकारकांना मदत करण्यासाठी क्युबन सैन्य धाडलं होतं. या क्युबन सैन्यानं अमेरिका, तसंच दक्षिण आफ्रिका यांच्या फौजांना नमवलं होतं, याची आठवण मंडेलानं काढली. 'वर्णद्वेषी दक्षिण आफ्रिकेच्या त्या पराभवामुळे आज मी इथे येऊ शकलो', असं विधान मंडेलानं केलं. त्यावर कॅस्ट्रोनं 'या जमानातल्या अद्वितीय अशा आदर्शांपैकी आणि प्रतीकांपैकी एक म्हणजे नेल्सन मंडेला', अशा शब्दांमध्ये मंडेलाचा गौरव केला. आपल्या हातात कागदाचा एक तुकडासुद्धा न घेता तीन तास भाषण करणाऱ्या कॅस्ट्रोनं 'भांडवलशाही आणि वर्चस्ववाद यांचं फॅसिस्ट रूप म्हणजे वर्णद्वेष' अशी व्याख्या केली.

फिडेल कॅस्ट्रोसमवेत मंडेला

अशा प्रकारे पाश्चिमात्य जगानं खलनायक ठरवलेले अनेक मित्र असूनसुद्धा मंडेलाला पाश्चिमात्य जगानं धुडकारलं नाही. स्वत: मंडेलाला काही काळ याचं नवल वाटे, पण त्यामागे एक उघड कारण होतं. आता सोव्हिएत युनियन अस्तित्वात नव्हती. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतला गोरा वर्चस्ववाद संपून तिथे कृष्णवर्णीय लोकांची सत्ता आली, तरी त्यात घाबरण्यासारखं असं पाश्चिमात्य देशांना काही वाटत नव्हतं. कारण या कृष्णवर्णीयांना पाठिंबा द्यायला साम्यवादी सोव्हिएत युनियनच अस्तित्वात नव्हती. साहजिकच, दक्षिण आफ्रिकेमधल्या सत्तापालटाच्या वेळी आपण महत्त्वाची भूमिका निभावली, तर उलट आपले व्यावसायिक संबंध पुढे वाढतील, असं अनेक पाश्चिमात्य देशांना वाटत होतं. त्यामुळे मंडेलाला पायघड्या घालून बोलवायला ते उत्सुक होते.

अर्थातच, मंडेलाची लोकप्रियता मात्र फक्त राजकीय कारणांमधून वाढलेली नव्हती. कदाचित मंडेला भविष्यात दक्षिण आफ्रिकेचा राष्ट्रपती होईलसुद्धा असं त्यांना वाटायचं. पण

त्यानं त्यापूर्वी ज्या धीरोदात्तपणे आपला लढा दिला होता, त्याला सर्वसामान्य लोक सलाम करत होते. अनेक दशकांचा अन्याय सहन करूनसुद्धा मंडेला ज्या प्रकारे सगळ्यांशी वागत-बोलत होता त्याला तोड नव्हती. वेगवेगळ्या प्रकारच्या अन्यायी परिस्थितीचा सामना करणाऱ्या लोकांनाही अशा प्रकारे लढा देऊन आपल्यावरचा अन्याय एक दिवस दूर करता येईल, असा विश्वास त्यानं दिला होता. हे सगळं नेहमीच्या राजकारणी माणसांच्या आवाक्यापलीकडचं होतं. त्यामुळे मंडेलाची लोकप्रियता फक्त त्याच्याकडे भविष्यात येऊ घातलेल्या सत्तेमधून वाढलेली नव्हती. त्यात नेहमीच्या मोजमापात न बसणारे अनेक घटक होते. याचबरोबर कुठलीही कृत्रिमता न आणता मंडेला आपल्या साधेपणाविषयी भरभरून बोलत असल्यामुळे लोकांना तो आपल्यातलाच एक वाटे. यासाठी तो अनेक बहारदार किस्से सांगे. उदाहरणार्थ, बहामामध्ये एका अमेरिकन पर्यटकानं मंडेलाचा चेहरा ओळखला खरा; पण तो नक्की कोण आहे हे न समजल्यामुळे त्यानं मंडेलाला 'तू नक्की कशामुळे प्रसिद्ध आहेस?' असं विचारलं होतं. तसंच, दक्षिण आफ्रिकेमधल्या दोन गोऱ्या स्त्रियांनी मंडेलाची एकदा सही घेतली आणि नंतर त्याला त्याचं नाव विचारलं होतं. एका 13 वर्षं वयाच्या शाळकरी मुलीनं मंडेलाला 'आमच्या शाळेत तुझ्याबद्दल काय बोलतात सांगू? तू तरुणपणी एकदम मस्त दिसायचास, पण आता तू म्हातारा आणि बेढब दिसतोस...' असं सुनावलं होतं. एकदा एका 5 वर्षं वयाच्या मुलीनं मंडेलाला इतकी वर्षं तुरुंगवासात का राहावं लागलं? असं विचारल्यावर मंडेलानं तिला सगळी परिस्थिती थोडक्यात समजावून सांगितली. त्यावर त्या मुलीची प्रतिक्रिया 'म्हणजे तू एकदम मूर्ख माणूसच दिसतोयस', अशी होती! हे सगळे किस्से मंडेला अगदी रंगवून सांगे!

जगभरात मंडेलाची अशी उजळ प्रतिमा झालेली असली, तरी प्रत्यक्षात मायदेशी मात्र दक्षिण आफ्रिकेमधली मंडेलाची परिस्थिती यथातथाच होती, असं अभ्यासक म्हणायचे. यामागे अनेक कारणं होती. एक तर अधिकृत पातळीवर 'बंडखोर नेता' एवढीच मंडेलाची प्रतिमा होती. त्याच्याकडे कुठलीच अधिकृत सत्ता नव्हती. सत्ता अजूनही पूर्णपणे डी क्लार्कच्याच हातात होती. त्यामुळे देशाची धोरणं ठरवायचे कुठलेच अधिकार मंडेलाला नव्हते. एएनसीची चळवळ अनेक वर्षांच्या गोंधळामुळे अस्ताव्यस्त होती. तिची मोट नीटपणे बांधायचं जड शिवधनुष्य मंडेलाला पेलणं भाग होतं. शिवाय मंडेलाकडून लोकांना असलेल्या अपेक्षा खूपच वाढल्या होत्या. अशा सगळ्या गोंधळाच्या वातावरणात नक्की कोणती पावलं टाकायची,

हे ठरवणं मंडेलाच्या दृष्टीनं खूप महत्त्वाचं आणि तितकंच अवघडही होतं. कुणीही आपल्या हातातली सत्ता सहजपणे सोडणार नाही, याची मंडेलाला जाणीव होती. त्यामुळे डी क्लार्कवर प्रचंड दबाव आल्याशिवाय तो सत्ताबदल घडू देणार नाही, हे मंडेलाला माहीत होतं. दरम्यान, डी क्लार्क पाश्चिमात्य देशांशी असलेले संबंध सुधारण्याच्या बाबतीत जोरदार प्रगती करत होता. कुठल्याच एका पक्षाचं देशात वर्चस्व राहू नये, अशा प्रकारची राजकीय व्यवस्था उभी करण्यासाठी डी क्लार्कचे प्रयत्न सुरु होते. त्याचा रोख अर्थातच एएनसीची प्रगती रोखण्याकडे होता.

एकूणच, आपल्याला तुरुंगातून मुक्त करून झाल्यावर देशामध्ये वर्णद्वेष संपवण्यासाठीच्या पुढच्या सुधारणा करण्यात डी क्लार्कला फारसा रस नाही, हे मंडेलाला जाणवायला लागलं. शक्य तितका काळ सत्तेवर चिकटून राहायचा डी क्लार्कचा हेतू होता. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेमधल्या पुढच्या सुधारणांच्या बाबतीतलं अवाक्षरही तो काढेना. पोलिसांच्या भूमिकेविषयीसुद्धा मंडेलाला संशयच येत होता. 1990 सालच्या मार्च महिन्यात एएनसीनं केलेल्या एका निदर्शनाच्या वेळी पोलिसांनी जोहान्सबर्गमध्ये विनाकारण गोळीबार करून 12 कार्यकर्त्यांना ठार केलं. यामुळे संतापलेल्या मंडेलानं डी क्लार्कला 'एकीकडे चर्चेचं आमंत्रण द्यायचं आणि दुसरीकडे आमच्या लोकांची कत्तल करायची, असले प्रकार चालणार नाहीत', असं सुनावून त्याच्याबरोबरच्या चर्चेसाठीचा ठरलेला बेत रद्द केला.

कृष्णवर्णीय लोकांमध्ये फूट पाडून त्यांची चळवळ मोडून काढायचा दक्षिण आफ्रिकेच्या लष्करामधल्या गुप्तचर विभागाचा डाव होता. पूर्वी हाच प्रकार दक्षिण आफ्रिकेच्या लष्करानं नामीबियाच्या बाबतीत यशस्वीपणे करून दाखवला होता. त्यामुळे या खेपेला आपल्या देशातसुद्धा तसंच करता येईल, असा आत्मविश्वास लष्कराला जाणवत होता. वर्णद्वेषाचा शेवट करायच्या कामात शक्य तितका उशीर करायचा आणि दरम्यानच्या काळात दक्षिण आफ्रिकेमधल्या कृष्णवर्णीय लोकांमध्ये फूट पाडायची, असं या कामाचं स्वरूप होतं. म्हणजे मग जेव्हा वर्णद्वेष संपला, असं डी क्लार्क जाहीर करेल आणि निवडणूक घेईल, तेव्हा एएनसीला पुरेशी मतं मिळणार नाहीत आणि त्यानंतर वर्णद्वेष संपूनसुद्धा परत एकदा आपलंच वर्चस्व राहील, असं डी क्लार्कला वाटत होतं.

या पार्श्वभूमीवर 30 वर्षं बंदी घालण्यात आलेल्या एएनसीची पुनर्बांधणी करणं, मंडेलाच्या

हे ठरवणं मंडेलाच्या दृष्टीनं खूप महत्त्वाचं आणि तितकंच अवघडही होतं. कुणीही आपल्या हातातली सत्ता सहजपणे सोडणार नाही, याची मंडेलाला जाणीव होती. त्यामुळे डी क्लार्कवर प्रचंड दबाव आल्याशिवाय तो सत्ताबदल घडू देणार नाही, हे मंडेलाला माहीत होतं. दरम्यान, डी क्लार्क पाश्चिमात्य देशांशी असलेले संबंध सुधारण्याच्या बाबतीत जोरदार प्रगती करत होता. कुठल्याच एका पक्षाचं देशात वर्चस्व राहू नये, अशा प्रकारची राजकीय व्यवस्था उभी करण्यासाठी डी क्लार्कचे प्रयत्न सुरु होते. त्याचा रोख अर्थातच एएनसीची प्रगती रोखण्याकडे होता.

एकूणच, आपल्याला तुरुंगातून मुक्त करून झाल्यावर देशामध्ये वर्णद्वेष संपवण्यासाठीच्या पुढच्या सुधारणा करण्यात डी क्लार्कला फारसा रस नाही, हे मंडेलाला जाणवायला लागलं. शक्य तितका काळ सत्तेवर चिकटून राहायचा डी क्लार्कचा हेतू होता. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेमधल्या पुढच्या सुधारणांच्या बाबतीतलं अवाक्षरही तो काढेना. पोलिसांच्या भूमिकेविषयीसुद्धा मंडेलाला संशयच येत होता. 1990 सालच्या मार्च महिन्यात एएनसीनं केलेल्या एका निदर्शनाच्या वेळी पोलिसांनी जोहान्सबर्गमध्ये विनाकारण गोळीबार करून 12 कार्यकर्त्यांना ठार केलं. यामुळे संतापलेल्या मंडेलानं डी क्लार्कला 'एकीकडे चर्चेचं आमंत्रण द्यायचं आणि दुसरीकडे आमच्या लोकांची कत्तल करायची, असले प्रकार चालणार नाहीत', असं सुनावून त्याच्याबरोबरच्या चर्चेसाठीचा ठरलेला बेत रद्द केला.

कृष्णवर्णीय लोकांमध्ये फूट पाडून त्यांची चळवळ मोडून काढायचा दक्षिण आफ्रिकेच्या लष्करामधल्या गुप्तचर विभागाचा डाव होता. पूर्वी हाच प्रकार दक्षिण आफ्रिकेच्या लष्करानं नामीबियाच्या बाबतीत यशस्वीपणे करून दाखवला होता. त्यामुळे या खेपेला आपल्या देशातसुद्धा तसंच करता येईल, असा आत्मविश्वास लष्कराला जाणवत होता. वर्णद्वेषाचा शेवट करायच्या कामात शक्य तितका उशीर करायचा आणि दरम्यानच्या काळात दक्षिण आफ्रिकेमधल्या कृष्णवर्णीय लोकांमध्ये फूट पाडायची, असं या कामाचं स्वरूप होतं. म्हणजे मग जेव्हा वर्णद्वेष संपला, असं डी क्लार्क जाहीर करेल आणि निवडणूक घेईल, तेव्हा एएनसीला पुरेशी मतं मिळणार नाहीत आणि त्यानंतर वर्णद्वेष संपूनसुद्धा परत एकदा आपलंच वर्चस्व राहील, असं डी क्लार्कला वाटत होतं.

या पार्श्वभूमीवर 30 वर्षं बंदी घालण्यात आलेल्या एएनसीची पुनर्बांधणी करणं, मंडेलाच्या

आणायचा बेत रचत असल्याची खबर दिली. साहजिकच, मंडेलाबरोबरच्या चर्चेसाठी डी क्लार्कला हे मोठं कोलितच मिळालं. याशिवाय एएनसीमध्ये अंतर्गत फूट पाडण्यासाठीसुद्धा या माहितीचा चांगला वापर करून घेता येईल, हे डी क्लार्कला माहीत होतं. एएनसीच्या नेत्यांसकट अनेक कार्यकर्त्यांना सरकारच्या विरोधात घातक कारवाया करण्याचा कट रचल्याबद्दल अटक करण्यात आली.

या प्रकरणामुळे एएनसीची पीछेहाट व्हायचं आणखी एक कारण होतं. सरकारशी सुरु असलेल्या चर्चेमध्ये सरकारची पूर्वीपासून वाढत असलेली हिंसक कारवाया बंद करायची अट काही काळासाठी अचानकपणे आपण मान्य करून टाकायची, असं एएनसीनं ठरवलं होतं. मंडेलानं सुरुवातीला त्याला नकार दिला असला, तरी नंतर मान्यता दिली होती. याच्या बदल्यात सरकारकडून आपण आपल्या अटी मान्य करून घ्यायच्या, असा एएनसीचा डाव होता. पण, या संदर्भात तयार करण्यात आलेलं एक हस्तलिखित एएनसीवर पोलिसांनी टाकलेल्या धाडीत जप्त करण्यात आलं. त्यामुळे एएनसीचे बेत डी क्लार्कला आधीच समजले आणि तो एएनसीच्या बदललेल्या पवित्र्याला वेळीच तोंड द्यायला सज्ज झाला. मंडेलाला याची कल्पना नव्हती. ठरल्याप्रमाणे मंडेलाची डी क्लार्कशी 6 ऑगस्ट 1990 या दिवशी चर्चा झाली. त्या वेळी मंडेलानं ताबडतोब शांततामय मार्ग अवलंबायचं धोरण जाहीर केलं. डी क्लार्कनं त्याच्या बदल्यात राजकीय कैद्यांना मुक्त करणं, तसंच राजकीय स्वरूपाच्या गुन्ह्यांसाठी फरारी म्हणून घोषित करण्यात आलेल्या लोकांवरचे गुन्हे काढून घेणं या गोष्टी मान्य केल्या. एएनसी आपल्या सगळ्या आक्रमक आणि हिंसक कारवाया तातडीनं थांबवणार असल्याचं आश्वासन मंडेलानं दिलं, पण या सगळ्या गोष्टींची पूर्वकल्पना असलेल्या डी क्लार्कनं चातुर्यानं त्यात 'हिंसक कारवाया आणि त्या संदर्भातल्या इतर गोष्टी' असा बदल केला. याचा नंतर फायदा करून घ्यायचा, असं डी क्लार्कनं ठरवलं होतं.

यात अनेक गुंतागुंती होत्या. आपल्या भूमिगत कारवाया एएनसी सुरूच ठेवेल, असं एएनसीनं डी क्लार्कला सांगितलं होतं आणि त्यानं ते मान्यसुद्धा केलं होतं. पण, मुळात अत्यंत क्षुल्लक फायद्यांसाठी मंडेलानं एएनसीच्या हिंसक कारवाया बंद करायच्या कलमाला मान्यता का दिली, हेच एएनसीच्या आक्रमक गटाला समजत नव्हतं. प्रत्यक्षात एएनसीची हिंसक कारवाया करायची क्षमता बरी असली, तरी सरकारच्या पोलिसी किंवा लष्करी ताकदीसमोर

एएनसीची लढायची क्षमता अगदीच क्षीण आहे; याची मंडेला, तसंच एएनसीचे वरिष्ठ नेते यांना जाण होती. म्हणूनच, त्यांनी हा करार केला होता. पण, भडक माथ्याच्या आक्रमक तरुणांना मात्र हे मान्य होणं शक्यच नव्हतं. मंडेलाच्या या करारामुळे अनेक अफवा उठल्या. सरकारबरोबर मंडेला हातमिळवणी करत असल्यापासून ते डी क्लार्कच्या मंत्रीमंडळात मंडेला सहभागी होणार आहे, इथपर्यंतच्या अनेक बातम्या प्रसिद्ध झाल्या. पण, सुरुवातीच्या उत्साहानंतर त्यामध्ये काही दम नसल्याचं लक्षात आलं आणि या बातम्या हवेत विरून गेल्या.

या काळातली आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे दक्षिण आफ्रिकेमधल्या कम्युनिस्ट पक्षाला अधिकृत दर्जा मिळणं ही होती. खरं म्हणजे, एएनसी आणि कम्युनिस्ट पक्ष या दोन संघटना कित्येक वर्षं एकमेकांना पूरक असल्यासारख्याच काम करायच्या. पण, आता दोन्ही पक्षांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा वाढीला लागल्या. त्यामुळे या पक्षांमध्ये अंतर पडलं. सुरुवातीला मंडेलानं कम्युनिस्ट पक्षाच्या व्यासपीठावर जाऊन त्या पक्षाच्या कामाविषयी गौरवोद्गार काढले होते. पण नंतर, मंडेला कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणांवर टीका करायला लागला.

साहजिकच, एएनसीची घसरती गाडी रुळांवर आणण्यात मंडेलाला अनेक अडचणी येत गेल्या. 1990 सालच्या डिसेंबर महिन्यात एएनसीची एक बैठक झाली. एएनसीनं जरा सामंजस्याची भूमिका घेऊन सरकारशी चर्चा केली पाहिजे, असं मत अनुभवी नेत्यांनी या बैठकीत व्यक्त केलं. पण, एएनसीमधल्या तरुणांना मात्र हे अजिबात मान्य नव्हतं. त्यांना आक्रमण हा एकच मार्ग माहीत होता. त्यामुळे त्यांनी आपल्या धोरणांमध्ये कोणतेही बदल करायच्या सूचनांना बाद ठरवलं. शेवटी या बैठकीचं कामकाज सुरळीतपणे चालवायची जबाबदारी मंडेलाकडेच आली. मंडेलानं अत्यंत चातुर्यानं एएनसीच्या लढ्यामध्ये सहभागी झालेल्या वेगवेगळ्या गटांचं आणि लोकांचं खूप कौतुक केलं. पण, मंडेला फारच सौम्य धोरण स्वीकारतो आहे, तसंच सरकारशी नको तितक्या सहकार्याची भूमिका घेतो आहे, असं तिथे हजर असलेल्या काही जणांचं मत होतं. त्यांनी उघडपणे मंडेलाला ते सांगितलं. आपल्या समारोपाच्या भाषणात मंडेलानं या सगळ्या मुद्यांची आपण दखल घेतली असल्याचा उल्लेख केला.

यानंतर सहा महिन्यांनी 30 वर्षांच्या काळानंतर एएनसीची पहिली देशव्यापी परिषद झाली.

2000 लोकांच्या उपस्थितीत आपण शांततामय मार्गानं आणि चर्चेच्या रूपानं सरकारबरोबर लढा दिला पाहिजे, असं मंडेलानं सांगितलं. त्याचा मुख्य हेतू अर्थातच एएनसीला हिंसात्मक मार्गावरून न नेता, शांतीच्या मार्गावरून न्यायचा होता. पण, मंडेलाला आपल्यावर टीका झालेली सहन होत असली, तरी अधूनमधून तोही भडकायचा, याचं उदाहरण या परिषदेत बघायला मिळालं. एएनसीच्या संचालक समितीमधल्या एकूण जागांपैकी 30 टक्के जागा महिलांसाठी राखून ठेवाव्यात, असं मत मंडेलानं व्यक्त केलं. त्याला रॉबन आयलंडमधल्या तुरुंगात मंडेलाबरोबर असलेल्या एका सहकाऱ्यानं विरोध करताच 'ही गोष्ट तू मला रॉबन आयलंडमध्ये सांगायला हवी होतीस', असं मंडेलानं त्याला भडकून सांगितलं! लवकरच मंडेलानं एएनसीच्या संचालक मंडळाची व्याप्ती वाढवून त्यात सगळ्या वर्णांच्या आणि प्रकारच्या लोकांना थारा दिला. या संघटनेची शकलं होणार असं वाटत असताना; त्यामुळे परत तिच्यात एकसंधपणा आला. अगदी गोरे लोकसुद्धा एएनसीच्या वरच्या पदांवर निवडले गेले. त्यामुळे गटबाजी किंवा इतर प्रकारच्या अडचणी यांच्यामुळे ही संघटना पोखरली गेली आहे, असं म्हणणाऱ्यांना आपली टीका आवरती घ्यावी लागली. तांबोनं एएनसीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे आता त्याच्या जागी एकमतानं मंडेलाची निवड करण्यात आली.

लवकरच मंडेलानं एएनसीचा कारभार वेगानं चालवायला सुरुवात केली. त्यामुळे त्याच्या कामाचा आवाका इतका वाढला की, 'मला तुरुंगात इथल्यापेक्षा जास्त स्वातंत्र्य मिळत होतं की काय असं वाटायला लागलं आहे', असं मंडेला गमतीनं म्हणायला लागला. आपल्या प्रतिमेविषयी मंडेलाला विलक्षण जाणीव होती. तो कितीही थकलेला असेल किंवा मानसिकदृष्ट्या काही कारणांनी खचला असेल, तरीही प्रचंड उत्साहानं त्याला भेटायला आलेल्या लोकांचं स्वागत करायला तयार असायचा. बहुतेक वेळा मंडेला आपला मानसिक तोल सांभाळायचा; पण कधीकधी मात्र तो भयंकर चिडायचा. मंडेलाला उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाविषयी खूप आपुलकी होती. पण याच कारणामुळे, खासगी व्यावसायिक लोक आणि गुंतवणुकदार घाबरून जात. मंडेला दक्षिण आफ्रिकेचा राष्ट्रपती झाला, तर आपली काही खैर नाही, असं त्यांना वाटे. पण लवकरच मंडेलानं आपल्या भाषणांमधून अशी वक्तव्यं गाळायला सुरुवात केली. ठरावीक कंपन्यांचं आणि उद्योगांचंच राष्ट्रीयीकरण केलं पाहिजे, असा सूर त्यानं पकडला. वेगवेगळ्या व्यावसायिकांशी आणि उद्योगपतींशी मंडेलानं

चर्चा केली. त्यांना मंडेलानं विश्वासात घेतलं. 1992 साली स्वीत्झर्लंडच्या दाव्होस इथल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या परिषदेत मंडेला सहभागी झाल्यावर त्यानं आपला उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाचा आग्रह थोडाफार मागे घेतला.

अशा रितीनं, तुरुंगातून मुक्त झालेला मंडेला एकाच वेळी अनेक पातळ्यांवर लढत होता. आपल्या पुढ्यातला मार्ग सोपा नाही, याची त्याला जाणीव होती. म्हणूनच आपल्या वयाची आणि प्रकृतीची काळजी न करता, मंडेला सतत कार्यरत होता. वर्णद्वेष संपवण्यासाठी डी क्लार्कचा पिच्छा पुरवणं, एएनसीची घसरलेली प्रतिमा सुधारणं, देशोदेशी फिरून आपल्या कामासाठी पाठिंबा आणि आर्थिक मदत मिळवणं याचबरोबर आपल्या देशवासियांना सतत विश्वास देत राहाणं, अशा अनेक जबाबदाऱ्या तो एकाच वेळी सांभाळत होता.

दुःखाचे दिवस

एकीकडे मंडेलाचे सगळ्या आघाड्यांवर नियंत्रण मिळवायचे प्रयत्न सुरु असताना दक्षिण आफ्रिकेत अचानकपणे वाढत चाललेल्या हिंसाचारामुळे तो एकदम बेजार झाला. या हिंसाचारावर मंडेला नियंत्रण ठेवू शकण्यात अपयशी ठरल्यामुळे, त्याच्या भविष्याविषयी काही जणांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. हा हिंसाचार नक्की कोण आणि का करतं, हे समजतच नव्हतं. पण, जवळपास 8 वर्षांच्या काळानंतर हे रहस्य उलगडलं. सुरुवातीच्या काळात हा हिंसाचार क्वाझुलू-नताल या प्रांतात मोठ्या प्रमाणावर बघायला मिळायचा. झुलू लोकांचा हा निसर्गसौंदर्यानं नटलेला; पण दारिद्र्यानं बरबटलेला भाग होता. 1990 ते 1993 या काळात दरमहा शंभरहून जास्त लोक 'राजकीय हिंसाचार' या प्रकारात दगावायचे. झुलू लोक आणि त्यांच्या विरोधात असलेले एएनसीच्या मदतीनं लढणारे खोसा जमातीचे लोक यांच्यातल्या स्पर्धेमुळे हे हत्याकांड घडत असल्याचं मत गोरे लोक व्यक्त करायचे. हा हिंसाचार थांबवण्यासाठी झुलू जमातीच्या वतीनं बुथेलेझी यानं योग्य अशी पावलं उचलली पाहिजेत, असं वरकरणी वाटे.

आपल्या तुरुंगवासाच्या काळातसुद्धा मंडेलानं बुथेलेझीशी चांगले संबंध ठेवण्यावर भर दिला होता. आपल्याच लोकांनी आपसात लढून एकमेकांना मारण्यासारखं दुसरं दुर्दैव नाही, असं मंडेलाचं मत होतं. बुथेलेझीच्या आधीच्या उद्योगांमुळे त्याच्यावर एएनसीच्या इतर नेत्यांचा मात्र अजिबात विश्वास बसत नव्हता. तरीही बुथेलेझीच्या प्रयत्नांमुळे सरकारला झुलू लोकांचा वेगळा देश करण्यात अपयश आलं असल्याची खात्री मंडेलाला होती. तसंच, आपण बुथेलेझीशी चर्चा करून त्याला एएनसीच्या चळवळीत सहभागी करून घेऊ शकतो, असा विश्वासही मंडेलाला वाटत होता. तुरुंगातून सुटका झाल्यावर मंडेलानं बुथेलेझीला फोन करून सरकारच्या दबावाला बळी न पडल्याबद्दल त्याचं अभिनंदन केलं. यानंतर तर दर्बनमधल्या किंग्ज पार्कमध्ये 1 लाख झुलू लोकांसमोर जाऊन भाषण करायचं धाडसही मंडेलानं केलं. काहींनी याची तुलना भक्ष्यानं आपणहून सिंहाच्या गुहेत प्रवेश करण्याशी केली. बुथेलेझीनंही आपल्याबरोबर व्यासपीठावर यावं, यासाठी मंडेलानं प्रयत्न केले, पण बुथेलेझीच्या सहकाऱ्यांनी विरोध करून मंडेलाचा हा बेत हाणून पाडल्यावर बुथेलेझीच वैतागला. आपल्या भाषणात

मंडेलानं एएनसी आणि झुलू लोकांची चळवळ यांनी भविष्यात एकत्र यायचं आवाहन केलं खरं; पण उपस्थित असलेल्या जमावानं याला जोरदार विरोध केला. आपली सगळी शस्त्रं फेकून द्यायचं आवाहन मंडेलानं लोकांना केलं खरं; पण 'आपलं बोलणं बहुधा बहिऱ्या लोकांनी ऐकलं असावं', अशी खंत त्याला नंतर व्यक्त करावी लागली. यानंतर मंडेलाच्या भाषणाला प्रत्युत्तर देण्यासाठी झुलू लोकांनी आपली स्वत:ची जाहीर सभा आयोजित करावी, यासाठी पोलिसांनी त्यांना 1.20 लाख रँड इतका निधी गुपचूप बहाल केला.

बुथेलेझीची मंडेलाशी चर्चा होऊ नये, यासाठी एएनसीचा मोठा दबाव होता. अशी चर्चा झाली, तर त्यात आपल्या इतर नेत्यांचाही समावेश असला पाहिजे, असा आग्रह एएनसीनं मंडेलापाशी धरला. शेवटी ही चर्चा होऊ शकली नाही. अन्यथा, कदाचित दक्षिण आफ्रिकेमध्ये त्या काळात होत असलेल्या मोठ्या प्रमाणातल्या हिंसाचारामध्ये घट होऊ शकली असती, असं मानलं जातं. बुथेलेझीला जर एएनसीनं विश्वासात घेऊन त्याला मानाची वागणूक दिली असती, तर त्यानं झुलू लोकांना हिंसाचारापासून रोखलं असतं, असं मत इतिहासकार व्यक्त करतात. तसं न घडल्यामुळे हिंसाचारानं जवळपास यादवी युद्धाचं रूप धारण केलं. पोलीस हा सगळा घटनाक्रम बघ्यासारखे लांबूनच पाहात राहायचे. 1990 सालच्या जुलै महिन्यात झुलू लोकांना राष्ट्रीय पातळीवर स्थान देण्यासाठी बुथेलेझीनं एक नवा पक्ष काढल्यावर तर या हिंसाचारामध्ये अजूनच वाढ झाली. एएनसी, तसंच कम्युनिस्ट पक्ष यांना त्यांचं वर्चस्व प्रस्थापित करून सत्ता मिळवू देणार नाही, असं बुथेलेझीनं जाहीर केलं. लवकरच बुथेलेझीच्या पक्षाचे तब्बल 18 लाख सदस्य झाले. यानंतर ट्रान्सव्हाल भागातसुद्धा हिंसाचार पसरला. पुढच्या 3 वर्षांमध्ये तिथे 4756 लोकांची कत्तल झाली! हा हिंसाचार बुथेलेझीच्या पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवरच्या आशा-आकांक्षांशी जुळलेला होता, यात शंकाच नाही.

एकीकडे मंडेला सरकारशी वर्णद्वेष संपवण्याविषयी आणि कृष्णवर्णीय लोकांना त्यांचे मूलभूत हक्क देण्याविषयी चर्चा करत असताना, दुसरीकडे कृष्णवर्णीय लोक, तसंच इतर वर्णांच्या लोकांचं प्रचंड मोठ्या प्रमाणावर शिरकाण सुरू होतं. साहजिकच, मंडेलाच्या हेतूविषयी, तसंच त्याच्या नेतृत्वकौशल्याविषयी लोक शंका व्यक्त करायला लागले. एएनसी पक्षाचं सरकार सत्तेवर आलं, तर देशात किती गंभीर परिस्थिती निर्माण होईल, असं गोरे वर्चस्ववादी लोक म्हणायला लागले. कृष्णवर्णीय लोकांच्या चळवळीमध्ये फूट पाडण्याचे

सरकारचे प्रयत्न फळाला आल्याची चिन्हं दिसायला लागली. डी क्लार्कपेक्षा बुथेलेझी हाच आपला जास्त मोठा शत्रू आहे, असं एएनसीमधले अनेक लोक म्हणायला लागले. आता सुवेटो आणि जोहान्सबर्ग या दरम्यानच्या भरगच्च गर्दीच्या रेल्वे गाड्यांवर हल्ले करायला सशस्त्र टोळ्यांनी सुरुवात केली. त्यात अनेक कृष्णवर्णीय लोक बळी पडायचे. अशाच एका हल्ल्यात तर 26 लोक मृत्युमुखी पडले आणि 100 जण जखमी झाले. तीन वर्षांमध्ये 572 लोक रेल्वे गाड्यांवरच्या हल्ल्यांमध्ये दगावले!

थोड्या काळातच या हल्ल्यांमागे फक्त बुथेलेझीच्या पक्षाचा हात नाही; हे मंडेलाच्या लक्षात आलं. सरकारची या प्रकाराला चिथावणी आणि मदत असल्याशिवाय हे काम चालू राहू शकत नाही, याची मंडेलाला खात्री वाटत होती. म्हणूनच एएनसीनं हिंसा बंद करावी, या सरकारच्या मागणीला तो थोपवून धरत होता. डी क्लार्कला मंडेलानं सरकारमधल्याच काही लोकांच्या इच्छेनुसार हा हिंसाचार सुरु असल्याचं सांगितलं. यावर डी क्लार्कनं एक समिती नेमून, तिला या प्रकरणाची तपासणी करायला सांगितलं. या समितीच्या अहवालात आक्षेपार्ह असं काही आढळलं नाही. मंडेलाचा यावर अजिबात विश्वास बसेना. डी क्लार्क, तसंच सरकारमधले इतर लोक जाणूनबुजून सत्य परिस्थितीकडे दुर्लक्ष करत असल्याचं मत मंडेलानं मांडलं. अमेरिकेपर्यंत याची खबर गेली. डी क्लार्कशी झालेल्या पुढच्या भेटीत अमेरिकन राष्ट्रपती बुशनं याविषयी काळजी व्यक्त केली.

या प्रकारांमुळे मंडेला आणि डी क्लार्क यांच्यात दरी निर्माण झाली. मंडेला डी क्लार्कला अधूनमधून फोन करून सरकारवर नवे आरोप करायचा. त्यावर डी क्लार्कनं दिलेलं स्पष्टीकरण मंडेलाला बहुतेक वेळा पटत नसे. मंडेलानं वेड पांघरलं असल्याचं सांगून, एएनसीच हिंसाचाराला जबाबदार असल्याचं मत डी क्लार्क मांडत असे. एकदा तर 'मी माझा अपमान करून घेण्यासाठी तुझ्याशी बोलत नाहीये... गुडबाय...' असं सांगून डी क्लार्कनं फोन ठेवूनच दिला. पूर्वी आपण आपल्या हितचिंतकांचा आणि सहकाऱ्यांचा रोष पत्करून डी क्लार्कची स्तुती केली होती, हे आठवून मंडेलाला त्याविषयी पश्चात्ताप होई. मंडेलाचा आपल्यावरचा विश्वास उडालेला बघून डी क्लार्कनं बुथेलेझीची मर्जी संपादन करायचे प्रयत्न केले. पण, बुथेलेझी अत्यंत बेभरवशाचा असल्यासारखा वागे. त्यामुळे डी क्लार्कचीसुद्धा कोंडी झाली. पाश्चिमात्य देश बुथेलेझीकडून आपल्याला हवं असलेलं सगळं वदवून घ्यायचे. विशेषत:

इंग्लंडकडून अजूनही बुथेलेझीलाच दक्षिण आफ्रिकेचा भविष्यातला नेता म्हणून मान मिळत असे.

मंडेलाच्या विरोधातलं जनमत वाढीला लागत असतानाच 1991 सालच्या जुलै महिन्यात 'गार्डियन' या ब्रिटिश वर्तमानपत्राच्या हाती काही गुप्त कागदपत्रं लागली आणि त्यामुळे मोठी सनसनाटीच माजली. कारण पोलिसांच्या मदतीनंच बुथेलेझीच्या पक्षाच्या हिंसक कारवाया सुरु असल्याचं यातून स्पष्टपणे दिसून येत होतं. दक्षिण आफ्रिकेमधल्या एका वर्तमानपत्रामध्येसुद्धा मोठ्या मथळ्यासह ही बातमी झळकली. साहजिकच, देशामध्ये प्रचंड खळबळ माजली. देशाचा संरक्षणमंत्री, तसंच पोलीस विभागाचा मंत्री या दोघांना पदमुक्त करण्यात आलं. यानंतरच्या काळात या प्रकरणाच्या संदर्भातली आणखी काही हादरून टाकणारी माहिती छापून आल्यामुळे सरकारचे सगळे दावे साफ खोटे असल्याचं अगदी स्पष्टपणे दिसून आलं.

1991 सालच्या सप्टेंबर महिन्यात डी क्लार्क, मंडेला, बुथेलेझी यांचा समावेश असलेली एक बैठक सरकारनं भरवली. त्यात सगळ्या प्रमुख पक्षांचे प्रतिनिधीसुद्धा सहभागी झाले. या बैठकीनंतर सगळे जण शांततामय मार्गानं पुढे जातील आणि हिंसाचाराला आपल्या मार्गात अजिबात स्थान देणार नाहीत, असा निर्धार व्यक्त करण्यात आला. पण, प्रत्यक्षात याचा काही फायदा झाला नाही. हिंसाचार सुरूच राहिला. लवकरच आपल्याला खरा डी क्लार्क आधी समजलाच नाही, ही गोष्ट मंडेलानं कबूल केली. यानंतर सरकारच्या वतीनं हिंसाचार करणाऱ्या लोकांना पाठिंबा आणि अभय या गोष्टी मिळाल्या असल्याचे आणखी पुरावे वर्तमानपत्रांनी दिले. त्यामुळे डी क्लार्कला आणखी लोकांना त्यांच्या पदांवरून काढून टाकणं भाग पडलं.

या सगळ्या काळात मंडेलाची समर्थ साथ करायला विनी उभी आहे, असं चित्र दिसत असे. मंडेला तुरुंगात असतानाच्या काळातल्या काही घटनांनी विनीची प्रतिमा डागाळलेली असली, तरी अनेक जण विनीच्या कामाला खूप महत्त्व देत असत, पण मंडेला आणि विनी एकमेकांबरोबर सुखात राहात असल्याचं चित्र वरवर दिसत असलं, तरी खरी परिस्थिती वेगळीच होती. एकमेकांपासून दूर असताना मंडेला आणि विनी यांना एकमेकांची विलक्षण ओढ असे. पण, या शारीरिक दुराव्याच्या काळात ते मनानंही एकमेकांपासून खूप दूर गेले होते. एकमेकांपासून दूर असतानाच्या काळात विनी अत्यंत आदर्शपणे वागत असावी, असा मंडेलाचा

समज झाला होता. पण, प्रत्यक्ष भेटीत हा गैरसमज असल्याचं त्याच्या लक्षात आल्यामुळे त्याची पार निराशा झाली. आता मंडेलाला विनीची खूप गरज भासे. पण, जवळपास तीन दशकांच्या काळात विनीची इतर पुरुषांशी झालेली जवळीक या गोष्टीच्या आड यायला लागली.

विनीच्या प्रकरणांविषयी तशी वर्तमानपत्रांमध्ये पूर्वीपासूनच चर्चा होत असे. पण तरीही, त्यासंबंधी भडकपणे काही लिहिणं टाळलं जाई. विनी आणि मंडेला यांची 'वैयक्तिक घड्याळं'च एकदम वेगवेगळी होती. मंडेलाला सकाळी लवकर उठून आपला दिवससुद्धा लवकर आटोपता घ्यायची सवय होती. विनी रात्री-अपरात्री घराबाहेर असे. मंडेलाची सुटका झाल्यावर पहिल्यांदा विनी आणि मंडेला सुवेटोमध्ये एकत्र आलेले असतानाच्या रात्री विनी 10 वाजता घराबाहेर पडली आणि पहाटे कधीतरी परतली. तसंच, पूर्वीप्रमाणेच घरामध्ये तरुण लोकांची उठबस सुरू असे. मंडेलानं विनीच्या या जीवनशैलीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी केलेले सगळे प्रयत्न फोल ठरले.

स्वत: मंडेला प्रदीर्घ तुरुंगवासामुळे एक पती, वडील, आजोबा, मित्र म्हणून कसं वागायचं, हे साफ विसरूनच गेला होता, असं त्याच्या जवळचे लोक म्हणायचे. मंडेलाला घरच्या कुणाशी नीटपणे संवादच साधता येत नसे. तो आपलं खासगी आयुष्य नीटपणे जगू शकत नव्हता. तसंच, मंडेला तुरुंगातून बाहेर आल्यावर सगळ्या जगाला त्याचा एवढा वेळ हवा असायचा की, आपल्या जवळच्या लोकांसाठीच त्याच्याकडे अजिबात वेळ शिल्लक नसायचा. उलट तो तुरुंगात असतानाच बरी परिस्थिती होती, असं मंडेलाच्या घरातले लोक म्हणायला लागले.

मंडेलाला पहिल्या लग्नात झालेली दोन मुलं मनानं विनीच्या जवळ कधीच जाऊ शकली नव्हती. त्या दोघांपैकी मोठा असलेला चाळिशीतला मुलगा अजूनही अडळखत शिकायचा प्रयत्न करत होता. तो मंडेलाला अगदी कधीतरीच भेटे. या लग्नामधली मुलगी पूर्वी, मंडेला मुद्दामच तुरुंगात गेला, असं मानायची. आता खरी परिस्थिती समजल्यावर ती मंडेलाच्या जरा जवळ आली. पण, त्यात एक घोटाळा झाला. ती अमेरिकेतल्या बॉस्टनमध्ये राहायची. तिथे मंडेला गेलेला असताना तो आपल्या नातवंडांना भेटला, पण आपल्या मुलीला भेटायची फार इच्छा त्यानं दाखवली नाही; असं चित्र विनीनं निर्माण केलं. त्यामुळे मंडेलाच्या जवळ आलेली ही मुलगी परत नाराज झाली. ती 1990 सालच्या ऑक्टोबर महिन्यात दक्षिण आफ्रिकेत परतली असली; तरी आपल्या वडिलांशी तिचे संबंध कायम तुटकच राहिले.

आपल्या झोपडीवजा घरात काही दिवस काढल्यानंतर मंडेला कुटुंब सुवेटोमधल्याच एका आलिशान घरात राहायला गेलं. विनीनं 7 बेडरूम्सवालं हे घर तयार करून घेतलं होतं, पण मंडेलाला तिथे घुसमटल्यासारखं होई. त्या काळात मंडेलाला रोजच्या खर्चाची चिंता भेडसावू नये; म्हणून एक अज्ञात माणूस त्याला पैसे पाठवायचा. त्यानं अचानकपणे पैसे पाठवणं बंद केल्यावर मंडेलावर आर्थिक संकटच गुदरलं. दरम्यान विनी खूप दारू प्यायची आणि त्या नशेत घरात इथेतिथे पडायची. मंडेलाच्या घरातलं वातावरण अत्यंत खराब असल्याच्या बातम्या फार काळ लपून राहिल्या नाहीत. सतत खमंग माहितीसाठी धडपड करणाऱ्या पत्रकारांनी या रहस्याचा शोध घेतलाच. एखाद्या 'देवासारखा' असलेला नेल्सन मंडेला आपल्या 'चेटकिणीसारख्या' बायकोबरोबर कसा काय राहू शकतो, अशा अर्थाचं कुत्सित लिखाण लवकरच वर्तमानपत्रांमध्ये छापून यायला लागलं.

मंडेलाला या सगळ्याची जाणीव होती. पण, आपल्या वैयक्तिक अडचणींबरोबरच सार्वजनिक आयुष्यातल्या विनीच्या लोकप्रियतेचं काय करायचं, हा प्रश्नही त्याला भेडसावत होता. विनीच्या आक्रमकतेमुळे एएनसीच्या तरुणाईमध्ये आणि हिंसा करूनच सत्ताबदल घडवला पाहिजे, अशा विचारसरणीच्या लोकांमध्ये विनी प्रचंड लोकप्रिय होती. त्यामुळे आपल्या खासगी आयुष्यातल्या प्रश्नांचं उत्तर मिळवण्यासाठी विनीला दूर करणं परवडण्यासारखं नाही, हे मंडेलाला पुरेपूर माहीत होतं. एएनसीच्या इतर नेत्यांनासुद्धा मंडेलाचा हा मुद्दा पटत होता. शेवटी यातून मार्ग काढण्यासाठी विनीकडे एएनसीच्या मदतनिधीशी संबंधित असलेले हिशेब सांभाळायचं काम देण्याचा अत्यंत घातक निर्णय घेण्यात आला. या निर्णयानं एएनसीला निधी पुरवणाऱ्या अनेक मोठ्या देणगीदारांना धक्काच बसला. विनीवर अशा कामांसाठी विश्वास टाकणं योग्य नाही, असं मत त्यांनी व्यक्त केलं. पण, मंडेलानं हे मत खोडून काढलं.

1988 सालच्या सहा मुलांच्या अपहरणाच्या प्रकरणाची सुनावणी 1991 सालच्या आरंभी सुरू झाली. या प्रकरणात विनी दोषी ठरली, तर मंडेलाच्या भविष्यावर त्याचा मोठा परिणाम होईल, असं लोक म्हणायला लागले. विनीची निर्दोष सुटका व्हावी; म्हणून डी क्लार्कच्या मदतीनं मंडेला प्रयत्न करत असल्याच्या बातम्याही पसरल्या. शेवटी विनीवर खुनाचा आरोप न ठेवता अपहरण आणि मारहाण असे आरोप ठेवण्यात आले. हा सरकारचा आपल्या

चळवळीला असलेल्या विरोधाचा परिणाम असल्याची प्रतिक्रिया विनीनं अपेक्षेप्रमाणेच दिली. मंडेलानं विनीची बाजू लढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर मदत मिळवायचे खूप प्रयत्न केले. त्यातून बरेच वादंग निर्माण झाल्यावरच ही गोष्ट शक्य झाली. या दरम्यान लीबियाच्या कर्नल गद्दाफीनंही मंडेलाला आर्थिक मदत केली. विनीवरच्या आरोपांची सुनावणी झाल्यावर मंडेला खंबीरपणे तिच्यापाठी उभा राहिला. हे बघून मंडेलाच्या परिचयातल्या एका कार्यकर्तीनं 'मंडेलाचा विनीला असलेला पाठिंबा बघून मला भरूनच आलं... पण खरं म्हणजे विनीची तेवढी लायकीच नव्हती...', अशी प्रतिक्रिया दिली. चार महिने चाललेल्या या खटल्यात अनेक नाट्यमय प्रसंग आले. मधूनच साक्षीदार गायब व्हायचे. तसंच, अनेक साक्षीदार आपली जबानी बदलायचे. विनीनं 'मंडेला युनायटेड फुटबॉल क्लब'शी आपला काहीही संबंध नसल्याची भूमिका घेतली. तसंच, हा सगळा प्रकार घडला, त्या रात्री आपण त्या गावातच नव्हतो; असा पवित्रा तिनं स्वीकारला. पण, सगळ्या साक्षीपुराव्यांनंतर शेवटी या गुन्ह्यामध्ये विनीचा हात होता, असा निकाल देत न्यायाधीशानं तिला 6 वर्षं कैदेची शिक्षा सुनावली. विनीनं उच्च न्यायालयात या निर्णयाच्या विरोधात दाद मागितली. त्यातून तिची शिक्षा कमी होऊन 2 वर्षांवर आली.

यानंतरही विनीच्या वागण्यात काही बदल घडलाच नाही. ती उघडपणे आपल्या तरुण वकील प्रियकराबरोबर राहायची. मंडेलाचं म्हणणं ती धुडकावून लावायची. मंडेलाच्या इच्छेविरुद्ध ती या वकिलाबरोबर अमेरिकेच्या अधिकृत दौऱ्यावरही गेली. विनीच्या प्रक्षोभक वागण्यामुळे आणि तिच्या चित्रविचित्र प्रकारांमुळे एएनसीनं तिच्या हातातले अधिकार कमी केले. या दरम्यान आणखी एक मोठंच प्रकरण घडलं.

विनीवरच्या खटल्यात तिच्या बाजूनं असलेल्या एका स्त्रीला विनीनं अचानकपणे तिच्याच घरातून हुसकावून लावलं. ही बातमी एका वार्ताहराला समजताच त्यानं या घटनेचं व्हीडिओ चित्रण केलं. मंडेलाला हा प्रकार समजताच त्यानं त्या वार्ताहराची भेट घेऊन त्याला हे प्रकरण दाबून टाकायची विनंती केली. तसंच, विनीशी आपण चर्चा करावी; या हेतूनं या वर्तमानपत्राच्या संपादकाला घेऊन आपल्या घरी आला. तिथे आपल्या मुलीच्या एका व्यावसायिकाशी झालेल्या साखरपुड्याचा प्रसंग साजरा करण्यात विनी मग्न होती. मस्तपैकी दारूचे फवारे उडत होते. हे बघून हताश झालेला मंडेला निमूटपणे आपल्या अभ्यासिकेत

जाऊन बसला. हे विदारक दृश्य बघून त्या संपादकाला खूप वाईट वाटलं, पण व्यावसायिक गरज भागवण्यासाठी त्यानं या सगळ्या प्रकरणाविषयीची बातमी दुसऱ्या दिवशीच्या अंकात छापली. 30 मार्च 1992 या दिवशीच्या त्या बातमीमुळे विनीच्या वागणुकीविषयी, तसंच तिच्या अविचाराविषयी सगळीकडे मोठी खळबळ माजली. ज्या स्त्रीला विनीनं तिच्याच घरातून बाहेर काढलं होतं, त्या स्त्रीनं या घटनेचा बदला घेत विनीच्या बाजूनं दिलेली आपली साक्ष मागे घेतली. विनीच या सगळ्या प्रकरणाची आणि इतरही काही प्रकरणांची सूत्रधार असल्याची नवी साक्ष तिनं आता दिली. विनीच्या वाहनचालकानंही अचानकपणे अशाच प्रकारची साक्ष दिली.

आता हे सगळं निमूटपणे बघत राहणं मंडेलाच्या सहनशक्तीच्या पलीकडचं होतं. 13 एप्रिल 1992 या दिवशी एक पत्रकार परिषद बोलावून मंडेलानं विनीच्या आधीच्या कामगिरीसाठी तिचं कौतुक केलं. पण, आताची परिस्थिती सुधारण्यापलीकडची असल्यामुळे विनी आणि आपण वेगळं व्हायचा निर्णय घेत असल्याचा बॉम्ब त्यानं टाकला. आपल्याला विनीविषयी कुठलाही राग नसल्याचं सांगून, मंडेलानं 'मला होत असलेल्या अतीव दु:खाची तुम्हाला कल्पना आली असेल, अशी मी आशा करतो', अशा शब्दांमध्ये केली, तेव्हा त्या सभागृहात स्मशानशांतता पसरली! यानंतर काही काळ मंडेला एकदम दु:खात होता. आत्मविश्वास गमावल्यासारखा तो वागत असे. एकाकीपणामुळे तो त्रस्त असे. काही ठरावीक लोकांशीच तो बोलत असे. आपली नातवंडंसुद्धा आपल्यावर निष्पाप प्रेम करत नाहीत, असं मंडेलाला वाटायचं. म्हणूनच, नाताळचा काळ जवळ आल्यावर त्यांना आपली आठवण येते, असं मंडेला म्हणत असे. फक्त नाताळच्या काळात आपली नातवंडं आपल्याला त्यांचं आपल्यावर किती प्रेम आहे, हे दाखवून देतात आणि आपल्याला मंडेला काय भेटवस्तू देणार आहे असं विचारतात, असं उद्वेगानं मंडेला म्हणत असे.

विनी प्रकरणातली स्त्री

मंडेला परत आपल्याजवळ येईल, अशी विनीला अजूनही आशा वाटत असल्यामुळे त्यासाठी ती प्रयत्न करायची. पण दरम्यान, एएनसीलाही विनी नको असल्यामुळे तिची तिथून हकालपट्टी करण्यात आली. कहर म्हणजे, विनीच्या तरुण वकील प्रियकरानं एएनसीच्या मिळालेल्या देणग्यांचा अपहार केला असल्याचं नवं प्रकरण बाहेर आलं. याशिवाय विनीनं अत्यंत घाणेरड्या भाषेत त्या प्रियकराला लिहिलेलं एक पत्रही एएनसीच्या हाती लागलं. मंडेलाला ते पत्र बघून अक्षरश: लाज वाटली. 6 सप्टेंबर 1992 या दिवशीच्या 'संडे टाईम्स'च्या अंकात ते पत्र जसंच्या तसं छापण्यात आलं. त्याच्या शेजारीच विनी आणि तो प्रियकर यांचं छायाचित्रही होतं.

या सगळ्या घडामोडींचा मंडेलावर खूपच विपरीत परिणाम झाला. तो काही काळ सतत झोपूनच असायचा. एका महिन्याभराच्या काळानंतर तो यातून बाहेर आला. याच काळात झिंड्झी या आपल्या मुलीच्या लग्नाप्रित्यर्थ विनीनं एक मोठा समारंभ आयोजित केला होता. अत्यंत कोरा चेहरा घेऊन तिथे आलेला मंडेला विनीशी एक शब्दही बोलला नाही. शेवटी मंडेला फारच दु:खी दिसत असल्यामुळे त्यानं जरा हसावं, अशा अर्थाची सूचना एका ओळखीच्या स्त्रीनं केली, तेव्हा मंडेलानं मंद स्मितहास्य केलं. ही पार्टी संपायच्या सुमाराला मंडेलानं एक अत्यंत हृदयद्रावक भाषण केलं. त्यात मंडेलानं 'आमची मुलं आमच्या अनुपस्थितीत वाढली..., जेव्हा

ही मोठी झालेली मुलं बघायला आम्ही परतलो, तेव्हा ती म्हणाली... आम्हालाही एक वडील आहेत आणि ते एके दिवशी परत येतील असं वाटायचं, पण आता तर आमचे वडील येतात आणि जवळपास दररोजच आम्हाला एकाकी करून निघून जातात; कारण आता ते आमचेच नव्हे; तर सगळ्या देशाचेच वडील झाले आहेत... हे सगळं बघून आपण काय मिळवलं, असं मला कित्येकदा वाटतं... पण अशा शंका अगणितवेळा मनात येऊन गेल्या असल्या, तरी सगळ्या अडचणींचा सामना करून आपण चळवळीत उतरलो, हाच निर्णय योग्य होता असं म्हणावंसं वाटतं...', असे उद्गार काढले.

एका लहानमुलाबरोबर मंडेला

वैयक्तिक आयुष्यातला हा दु:खांचा डोंगर बाजूला सारून आपल्यासमोर असलेलं काम

करत राहायचा मंडेलाचा निर्णय तरीही पक्का होता. आपल्याला वर्णद्वेष संपवायचा आहे आणि दक्षिण आफ्रिकेत समानतेचं वातावरण निर्माण करायचं आहे, हे ध्येय त्यानं मनाशी बाळगलं होतं. विनीच्या सगळ्या चित्रविचित्र प्रकरणांमुळे निराश झालेला मंडेला म्हणूनच सार्वजनिक आयुष्यात आपलं मन रमवण्यासाठी धडपडत होता.

निवडणुकांचा ऐतिहासिक क्षण

आपल्या वैयक्तिक अडचणी बाजूला सारून दक्षिण आफ्रिकेमधला वर्णद्वेष संपवण्यासाठीचं काम जोरानं करण्यासाठी मंडेलाची धडपड सुरू असे. त्यामुळे काही काळ घरगुती समस्यांविषयीचं दु:ख सहन करण्यात घालवल्यावर, मंडेला परत एकदा कामाला लागला. 21 डिसेंबर 1991 या दिवशी दक्षिण आफ्रिकेमधल्या सगळ्या पक्षांच्या प्रतिनिधींचं एक चर्चासत्र भरवण्यात आलं. साहजिकच, सगळ्या जगाचं लक्ष या चर्चासत्राकडे लागून राहिलं होतं. दक्षिण आफ्रिकेला पिढ्यान्पिढ्या भेडसावणारा वर्णद्वेषाचा प्रश्न सुटतो की काय, असं अचानकपणे वाटायला लागलं होतं. साहजिकच, या चर्चासत्राचा मुख्य हेतू दक्षिण आफ्रिकेला परत एकदा लोकशाहीच्या मार्गाकडे कसं नेता येईल, याविषयीची चर्चा करणं हा होता. एकूण 19 पक्षांचे 228 प्रतिनिधी या चर्चासत्राला उपस्थित होते.

गरज पडली तर आपण आणखी दहा वर्षसुद्धा सत्तेवर राहू शकतो, पण त्यासाठी देशाला मोठी किंमत मोजावी लागेल, असं डी क्लार्कनं उपस्थित असलेल्या लोकांना सांगितलं. मंडेलानं डाव्या विचारसरणीचे कृष्णवर्णीय लोक, तसंच उजव्या विचारसरणीचे गोरे लोक यांच्यापैकी कुणालाच खूप न दुखावता शांततामय मार्गानं क्रांती घडवून आणण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत, असं आपलं मत असल्याचं जाहीर केलं. ही परिषद म्हणजे मंडेला, तसंच डी क्लार्क यांच्या आयुष्यातल्या अत्यंत कठीण परीक्षांपैकी एक असल्याचं मत बरेच जण व्यक्त करत होते. एक विचित्र योगायोगाची गोष्ट म्हणजे या काळात मंडेला आणि डी क्लार्क यांच्या वैयक्तिक आयुष्यात एकाच वेळी गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. मंडेलाचे विनीशी असलेले संबंध जवळपास संपुष्टात आले होते, तर डी क्लार्क आपल्या एका ग्रीक मित्राच्या पत्नीच्या प्रेमात पडला होता!

1992 साली आपल्याला प्रथमच दक्षिण आफ्रिकेमध्ये लोकशाही तत्त्वांनुसार घेतल्या जाणाऱ्या निवडणुका बघायला मिळतील, अशी आशा मंडेलानं या चर्चासत्रात व्यक्त केली. बहुतेक सगळ्या प्रतिनिधींनी दक्षिण आफ्रिकेच्या झालेल्या अंतर्गत तुकड्यांना जोडून त्यांच्यापासून एकसंध देश बनवण्याची गरज व्यक्त केली. पहिल्या दिवसाच्या चर्चासत्राचा शेवट व्हायच्या सुमाराला अचानकच डी क्लार्कनं मंडेलावर जोरदार टीका केली. मंडेलानं

आपल्याला पूर्वी दिलेली आश्वासनं पाळली नसल्याचा डी क्लार्कचा आरोप होता. यामुळे उपस्थित असलेले सगळे प्रतिनिधी एकदम चक्रावूनच गेले. शांतपणे मंडेला आपल्या जागेवरून उठला. व्यासपीठावर जाऊन त्यानं माईकचा ताबा घेतला. डी क्लार्कचा कुठलाही अपमान न करता आपण नव्हे; तर डी क्लार्कच खोटं बोलत असल्याचा दावा मंडेलानं अत्यंत आक्रमक शब्दांमध्ये केला. त्याचबरोबर 'हा माणूस दक्षिण आफ्रिकेचा कारभार सांभाळण्याच्या लायकीचा नाही', असं डी क्लार्कविषयी सांगून मंडेलानं सगळ्यांना थक्क करून सोडलं. डी क्लार्कचा आपल्या बसल्या जागी रागानं तीळपापड होत होता. मोठ्या मुष्किलीनं त्यानं स्वत:ला आवरलं. मंडेलाचं भाषण झाल्यावर डी क्लार्कनं अगदी मोजक्या शब्दांमध्ये एएनसी एकीकडे शांतीची भाषा करते, तर दुसरीकडे हिंसाचाराला प्रोत्साहन देते, असं सांगून अशा परिस्थितीमध्ये देशामध्ये शांतता निर्माण होणं अशक्य असल्याचा पुनरुच्चार केला. दुसऱ्या दिवशी वातावरण जरा निवळलं असलं, तरी हे चर्चासत्र निराशाजनक ठरल्याचं बहुतेक सदस्यांचं मत झालं.

1992 सालच्या एका पोटनिवडणुकीमध्ये डी क्लार्कच्या पक्षाचा काँझर्व्हेटिव्ह पक्षानं पराभव केल्यामुळे डी क्लार्कला मोठा धक्का बसला. काँझर्व्हेटिव्ह पक्ष पूर्वीपासूनच एएनसीशी कोणत्याही प्रकारची चर्चा करायच्या साफ विरोधात होता. यानंतर दक्षिण आफ्रिकेत घटनादुरुस्ती करणं आवश्यक आहे का, याविषयीचं सगळ्या गोऱ्या लोकांचं मत डी क्लार्कनं मागितलं. मतदारांनी डी क्लार्कच्या प्रस्तावाला अनुकूलता दर्शवणारं बहुमत दिलं.

15 मे 1992 या दिवशी सर्वपक्षीय चर्चासत्राचा दुसरा टप्पा सुरु झाला. डी क्लार्क प्रत्यक्षात कोणत्याच सुधारणा न करता, नुसती वेळ मारून नेत असल्याचं मंडेलाचं या सुमाराला मत झालं होतं. दरम्यान घटनादुरुस्ती करून झाल्यावर नवी सत्ता नक्की कशी असावी, याविषयी डी क्लार्कचा निश्चय होत नव्हता. अल्पसंख्यांक असलेल्या गोऱ्या लोकांवर कृष्णवर्णीयांची सत्ता आल्यानंतर गोऱ्यांवर अन्याय होऊ नये; यासाठी नव्या घटनेमध्ये काय तरतुदी असल्या पाहिजेत, याविषयी डी क्लार्कचा विचार सुरु होता. मंडेलाला मात्र कृष्णवर्णीयांमध्ये फूट पाडण्यासाठीच डी क्लार्कचे हे सगळे प्रयत्न सुरु आहेत याविषयी अजिबात शंका वाटत नव्हती. या दुसऱ्या चर्चासत्रातूनही काहीच हाती लागलं नाही. शेवटी हा प्रश्न असाच सुरु राहाणार असं सगळ्यांना वाटायला लागलं.

त्यातच 17 जून 1992 या दिवशी एएनसीच्या विरोधातल्या काही झुलू लोकांनी कृष्णवर्णीयांच्या एका वस्तीवर हल्ला करून 45 लोकांना ठार केलं. या झुलू लोकांना आपले चेहरे रंगवून काळे केलेल्या गोऱ्या लोकांनी साथ दिली होती. कहर म्हणजे पोलिसांचीसुद्धा या हल्लेखोरांना साथ होती. या प्रकरणानंतर मंडेलाचा डी क्लार्कवरचा विश्वास पूर्णपणे उडून गेला. सरकारला आपल्या कृष्णकृत्यांची अजिबात लाज वाटत नसल्याचं सांगून, अशा परिस्थितीत सरकारशी चर्चा करून कोणताही फायदा होणार नाही, असं मंडेलानं जाहीर केलं. डी क्लार्कनं मंडेलाला दिलेला चर्चेचा प्रस्ताव मंडेलानं धुडकावून लावला. हे हत्याकांड घडलं त्या ठिकाणाला डी क्लार्कनं भेट दिली असताना; त्याला आपल्या गाडीतून उतरणंसुद्धा शक्य होणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. झुलू लोकांनी घडवून आणलेलं हे हत्याकांड 'डी क्लार्कनं का थांबवलं नाही?' असा सवाल केल्यावर 'मंडेला माझ्या जागी असता, तर त्याला खरी परिस्थिती समजली असती... माझ्या हातात जितके अधिकार आहेत असं मंडेलाला वाटतं, तितके अधिकार माझ्याकडे नाहीत...', असं उत्तर डी क्लार्कनं दिलं. मंडेलानं हे प्रकरण आता आंतरराष्ट्रीय समुदायासमोर न्यायची गरज असल्याचं मत मांडून, त्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेला मध्यस्ती करायचं आवाहन केलं. त्याला प्रतिसाद देत संयुक्त राष्ट्रसंघानं या प्रश्नासंबंधी दक्षिण आफ्रिकेमधल्या वरिष्ठ नेत्यांची बैठक बोलावली. त्यात मंडेलानं आक्रमक भाषण केलं. झुलू लोकांकडून सरकारच्या मदतीनं घडलेल्या हत्याकांडामध्ये दोषी असलेल्या लोकांना योग्य ती शिक्षा दिली जाईल, असं संयुक्त राष्ट्रसंघानं जाहीर केलं.

दरम्यान, मंडेलानं शांततामय धोरण धुकडकावून आता हिंसाचाराला पाठिंबा दिला पाहिजे, अशी अपेक्षा एएनसीमधले भडक माथ्याचे काही लोक करायला लागले. मंडेलाच्या दृष्टीनं हा परत एकदा कसोटीचा काळ होता. एकीकडे आंतरराष्ट्रीय, तसंच राष्ट्रीय पातळीवर एएनसीच्या प्रतिमेला बारीकसा धक्कासुद्धा लागायला नको याची काळजी त्याला घेणं भाग असलं, तरी दुसरीकडे एएनसीमधल्या सहकाऱ्यांच्या मतांचाही आदर व्हायला हवा, याकडे त्याला दुर्लक्ष करून चालणार नव्हतं. साहजिकच, आपण अत्यंत सावधपणे पुढची पावलं टाकली पाहिजेत, याची मंडेलाला जाणीव होती. त्यासाठी त्यानं देशव्यापी आंदोलनाची हाक दिली. सुवेटोच्या स्टेडियममधल्या भरगच्च गर्दीसमोर 16 जून 1992 या दिवशी भाषण करून मंडेलानं

या कार्यक्रमाचं रणशिंग फुंकलं. या आंदोलनाची सांगता 3 ऑगस्टला दिलेल्या संपाच्या हाकेनं झाली. त्या दिवशी तब्बल 40 लाख लोक कामावर गेलेच नाहीत. दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणावर कुणी संप घडवून आणू शकलं नव्हतं. तीस वर्षांपूर्वी अशीच हाक मंडेलानं दिली होती, पण तिला म्हणावा तसा प्रतिसाद न मिळाल्यामुळेच आपल्याला हिंसाचाराकडे वळायची घाई झाली होती, हे मंडेला विसरला नव्हता. आता मात्र मंडेलाचा जोर काही औरच होता. 50 हजार ते 1 लाख यांच्या दरम्यान संख्या असलेल्या प्रचंड मोठ्या जमावाचं नेतृत्व करून मंडेलानं प्रिटोरिया प्रांतामधल्या सरकारी इमारतींवर एक विराट मोर्चा नेला. आपण या आंदोलनाला अजिबात हिंसक रूप देता कामा नये, तसंच आपल्याला यश मिळालं अशा समजुतीनं हुरळून जाता कामा नये; असा इशारा मंडेलानं उपस्थित असलेल्या लोकांना दिला.

डी क्लार्कची सत्तेवरची हुकूमत ढासळत चालली होती. त्याच्या मंत्रीमंडळामध्येच त्याला फारसा मान राहिला नाही. काही जण उघडपणे, तर काही जण पडद्यामागून डी क्लार्कवर भरपूर टीका करत होते. आपण वेळकाढूपणा केला, तर शेवटी यश आपल्यालाच लाभेल; अशी डी क्लार्कची समजूत चुकीची ठरायची चिन्हं दिसत होती. दक्षिण आफ्रिकेची आर्थिक धूळधाण आणि देशामध्ये सुरु असलेला हिंसाचार या गोष्टी काही केल्या थांबतच नव्हत्या. पूर्वी बुथेलेझीला हाताशी धरून एएनसी आणि इतर शत्रू यांच्याशी चर्चा करायचा डाव डी क्लार्क खेळायचा. पण, आता डी क्लार्क आणि बुथेलेझी यांच्यामधले संबंध बिघडले होते. शिवाय बुथेलेझीविषयीचं जनमत पार रसातळाला गेलं होतं. त्यामुळे डी क्लार्कच्या हातातून हा पर्यायही निसटला होता.

26 सप्टेंबर 1992 या दिवशी डी क्लार्क आणि मंडेला यांच्यात परत एकदा चर्चा सुरु झाली. हा प्रकारही अत्यंत नाट्यमयच होता. आता आपली बोलणी फिस्कटणं डी क्लार्कला परवडण्यासारखं नाही, असं मंडेलाला वाटत होतं. त्यामुळे डी क्लार्कशी बोलणी करण्यापूर्वी त्यानं आपल्या तीन अटी मान्य केल्या पाहिजेत, असा आग्रह धरला. त्यापैकी सगळ्या राजकीय कैद्यांना सोडायची मागणी डी क्लार्कला मान्य नव्हती. तेव्हा मंडेलानं आपल्याला डी क्लार्कशी चर्चा करण्यात रस नसल्याचं सांगून टाकलं. डी क्लार्कनं मंडेलाची ही मागणी फेटाळून लावायचे खूप प्रयत्न केले, मंडेलाच्या काही सहकाऱ्यांनीही त्याला आपला हट्ट सोडायची विनंती केली.

पण मंडेला ठाम होता. शेवटी डी क्लार्कला हार मानून मंडेलच्या तिन्ही अटी मान्य करणं भाग पडलं. उरलेल्या दोन्ही अटी झुलू लोकांच्या आक्रमकतेला आळा घालण्यासाठीच्या उपापयोजनांविषयीच्या होत्या. यानंतरच्या चर्चेमध्ये एक सर्वसमावेशक सरकार तात्पुरतं उभं केलं जावं आणि त्यानंतर पुढच्या गोष्टी ठरवाव्यात असा निर्णय घेण्यात आला. मंडेलासाठी हा मोठा विजय होता, पण बुथेलेझी मात्र या सगळ्या प्रकारामुळे प्रचंड संतापला. त्यानं आपण सरकारशी सहकार्य करण्याचं धोरण थांबवत असल्याचं जाहीर केलं. पण आश्चर्य म्हणजे, यानंतर झुलू लोकांकडून होत असलेल्या हिंसाचारामध्ये प्रचंड घट झाली. यातूनच बुथेलेझीला त्याच्या सगळ्या कामांमध्ये डी क्लार्कचा पाठिंबा होता आणि शिवाय डी क्लार्कला हवं तेव्हा तो हिंसाचार थांबवू शकला असता, हे सिद्ध होत होतं.

यानंतरच्या काळात एएनसी आणि सरकार यांच्यामधल्या वाटाघाटी पुढे गेल्या. राष्ट्रीय निवडणुका घेतल्या जाव्यात आणि त्यानंतर निवडून आलेल्या सरकारनं 5 वर्षांसाठी देशाचा कारभार चालवावा असा निर्णय घेण्यात आला. ज्या पक्षाला एकूण मतांपैकी 5 टक्क्यांहून जास्त मतं मिळालेली असतील, अशा सगळ्या पक्षांना या नव्या सरकारमध्ये प्रतिनिधित्व दिलं जाईल, असं ठरलं. 1993 सालच्या फेब्रुवारी महिन्यात डी क्लार्कनं हे जाहीर केल्यावर एक महिन्याच्या आतच त्यानं शब्दश: एक बॉम्ब टाकला. त्यात गेल्या 9 वर्षांच्या काळात दक्षिण आफ्रिकेनं 'आपल्यावर अणुबॉम्बचा हल्ला झाला तरच वापर करायच्या' हेतूनं गुप्तपणे अणुबॉम्ब तयार केला असल्याची आणि आता तो नष्ट केल्याची माहिती डी क्लार्कनं दिली. एएनसीला मात्र हा अणुबॉम्ब कृष्णवर्णीय लोकांच्या हाती पडू नये; म्हणून सरकारनं नष्ट केला असल्याची खात्रीच झाली.

10 एप्रिल 1993 या दिवशीच्या एका घटनेनं मात्र परत एकदा सगळं मुसळ केरात जायची भीती निर्माण झाली. कम्युनिस्ट पक्षाचा सचिव आणि पूर्वी मंडेलानं हिंसात्मक कारवायांसाठी उभ्या केलेल्या एमके संघटनेचा माजी सदस्य असलेल्या एका नेत्याची हत्या झाली. खुनी माणसाच्या मोटारीची नंबर प्लेट एका महिलेनं बघितली असल्यामुळे पोलिसांनी अगदी आश्चर्यकारकरीत्या फक्त 15 मिनिटांमध्ये हल्लेखोराला पकडलं. मूळचा पोलिश नागरिक असलेला; पण आता दक्षिण आफ्रिकेत स्थायिक झालेला हा खुनी माणूस दंगली माजवणं आणि सरकार, तसंच एएनसी यांच्यामध्ये सुरु असलेली शांतीवार्ता बंद पाडणं, या हेतूंनी प्रेरित

होऊन हे कृत्य करत होता. या प्रसंगी सुट्टीवर असलेल्या डी क्लार्कनं शोकसंदेश पाठवला असला, तरी खरी बाजी मंडेलानं मारली. त्यानं 'अत्यंत क्रौर्य आणि द्वेष या भावनांनी भरलेल्या एका गोऱ्या माणसानं आपल्या देशात येऊन केलेल्या या अमानवी कृत्यामुळे आपला देश प्रचंड मोठ्या संकटात सापडला आहे... पण या माणसाला पकडून देण्यात एका गोऱ्या महिलेनंच अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे...', असं विधान टीव्हीवर केलं. या घटनेमुळे एएनसी, तसंच कम्युनिस्ट पक्ष यांचे लोक विलक्षण भडकले आहेत, याची मंडेलाला जाणीव होती. त्यांना शांत करण्यासाठी मंडेलाला हे एका माथेफिरूचं कृत्य असून ते सगळ्या गोऱ्या लोकांच्या भावनांचं प्रतीक नसल्याचं मत आग्रहानं मांडायचं होतं. पण तरीही केप आणि नताल या भागांमध्ये हिंसेचा डोंब छोट्या प्रमाणात उसळलाच. त्यात 70 लोक ठार झाले. शेकडो गोऱ्या लोकांनी घाबरून आपला देश सोडून इतरत्र मुक्काम हलवायचे प्रयत्न सुरु केले. या खुनामुळे दु:खी झालेल्या मंडेलाला आणखी दोन आठवड्यांमध्ये ऑलिव्हर तांबोच्या मृत्यूचीही बातमी समजली आणि त्यामुळे मंडेला आणखीनच शोकग्रस्त झाला.

आता 'मंडेला आणि डी क्लार्क हे दोघं एका प्रदीर्घ काळ चाललेल्या मुष्टियुद्धाच्या लढाईमध्ये रक्तबंबाळ झालेले आणि प्रचंड थकलेले मुष्टियोद्धे असल्यासारखे वाटत होते', असं अत्यंत चपखल वर्णन एका लेखकानं केलं आहे. पण, आता मंडेलानं आपल्या हातात आलेलं नियंत्रण गमवायचं नाही असा निश्चय करून, डी क्लार्कबरोबरच्या पुढच्या चर्चेच्या फेरीत निवडणुकांच्या तारखा नक्की करायचा आग्रह धरला. शेवटी 27 एप्रिल 1994 या दिवशी त्या निवडणुका घेण्यात येतील, असं जाहीर करण्यात आलं. पण या चर्चांमध्ये कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष, तसंच बुथेलेझीचा पक्ष सहभागी झालेले नसल्यामुळे त्यांनी या निर्णयाच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी निर्माण करायचा निर्णय घेतला. झुलू टोळ्यांनी परत एकदा हिंसाचार सुरु केला. एएनसीनं त्याला प्रतिसाद देत रक्तपात घडवला. मंडेलानं परत एकदा हिंसाचार बंद झालाच पाहिजे, असं सगळ्यांना आग्रहानं सांगितलं. पण दरम्यान, बुथेलेझीला दक्षिण आफ्रिकेत दुय्यम स्थान मिळत असल्यामुळे त्यानं आपला प्रांत देशापासून वेगळा करायची मागणी लावून धरली.

मंडेलानं बुथेलेझीची भेट घेऊन त्याचं मन वळवायचा अयशस्वी प्रयत्न केला. डी क्लार्कला बुथेलेझीबद्दल कोणतीही सहानुभूती वाटत नव्हती, पण परदेशांमधली उजव्या विचारसरणीची कॉन्झर्व्हेटिव्ह माध्यमं अजूनही बुथेलेझीच्या पाठीशी होती. झुलू लोकांच्या स्वातंत्र्यासाठी

दक्षिण आफ्रिकेत यादवी युद्ध भडकणार हे नक्की आहे, अशा अर्थाच्या बातम्या छापल्या जात. दरम्यान, निवडणुकांची तारीख जवळ येत राहिली आणि हिंसक प्रवृत्तींच्या वर्णद्वेषी आक्रमणांना धार चढली. एएनसी आणि सरकार यांच्यामध्ये पुढच्या बदलांसाठीच्या संदर्भातली चर्चा सुरु असताना स्वत: मंडेला आणि डी क्लार्क मात्र एकमेकांशी कटूपणामुळे बोलतसुद्धा नव्हते. 1993 सालच्या जुलै महिन्यात डी क्लार्क अमेरिकेच्या 'व्हाईट हाऊस' या राष्ट्रपतीच्या बंगल्यात असतानाच तिथे नेल्सन मंडेलाचं आगमन झालं. पण अमेरिकन राष्ट्रपती बिल क्लिंटनच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांनी डी क्लार्क आणि मंडेला यांची एकमेकांशी भेट होणार नाही; यासाठी चोख व्यवस्था केली होती. दुसऱ्या दिवशी डी क्लार्क आणि मंडेला यांना एका समारंभात एक मानाचं पदक देऊन गौरवण्यात आलं. पण आपल्या भाषणात 'दक्षिण आफ्रिकेच्या एकूण लोकसंख्येपैकी फक्त 15 टक्के लोकांनी निवडलेल्या डी क्लार्कला आपण देशाचा राष्ट्रपती मानत नाही... तो इतर अनेक नेत्यांसारखाच एक नेता आहे...', असं म्हणून मंडेलानं डी क्लार्कला हिणवलं.

यानंतर दक्षिण आफ्रिकेमधल्या निवडणुकांची तयारी खऱ्या अर्थानं चालू असल्याची खात्री पटल्यावर संयुक्त राष्ट्रसंघासमोरच्या आपल्या ऐतिहासिक भाषणात मंडेलानं दक्षिण आफ्रिकेवरचे निर्बंध उठवायचं आवाहन केलं. यानंतर मंडेला आणि डी क्लार्क यांनी निवडणुका, तसंच दरम्यानच्या काळातली आणि नंतरची राज्यघटना या गोष्टींवर काम केलं. वेळप्रसंगी आपापल्या सहकाऱ्यांचा असंतोष स्वीकारूनसुद्धा त्यांनी देशाच्या हिताच्या दृष्टीनं काय महत्त्वाचं आहे, याचा विचार करूनच अनेक निर्णय घेतले. त्यांच्या ऐनवेळच्या या शांततामय चर्चांमुळेच दक्षिण आफ्रिकेमध्ये इतर काही देशांसारखं यादवी युद्ध झालं नाही आणि तिथलं वातावरण सुधारलं असं सगळं जग म्हणायला लागलं. साहजिकच, 1993 सालच्या अखेरीला डी क्लार्क आणि मंडेला या दोघांनाही शांततेसाठीचं नोबेल पारितोषिक मिळालं. विनीनं मात्र 'गोऱ्या लोकांच्या हातचं बाहुलं बनणं मान्य करण्यासाठी मंडेलाला दिलेली ही लाच होती', अशी प्रतिक्रिया यानंतर व्यक्त केली!

आपल्या वयाच्या 75 व्या वर्षी मंडेला आपली पहिली निवडणूक लढवायच्या तयारीला लागला. समान नागरी हक्कांसाठीच्या चळवळीमध्ये मंडेलानं या 75 पैकी गेली 50 वर्षं खर्च केली होती. त्यामुळे वय विसरून तो अत्यंत जोषानं आपल्या कामाची जबाबदारी उचलत होता.

1992 साली अमेरिकेमध्ये बिल क्लिंटनच्या विजयाच्या वेळी डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रचारामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या माणसाला एएनसीनं आता आपल्या प्रचाराच्या कामामध्ये ओढलं. देशभर एएनसीनं मोठ्या प्रमाणावर प्रचार करायचं ठरवलं, पण आपला हुकमी एक्का मंडेलाच आहे, याची एएनसीला जाणीव होती. अर्थात, मंडेलाची भाषणं इतर काही नेत्यांसारखी प्रभावी अजिबातच नसत. मंडेला अत्यंत कंटाळवाणा वक्ता आहे, असं अनेकांचं मत होतं. कितीही चांगली भाषणं लिहून दिली, तरी मंडेला त्यात फारशी जान ओतू शकत नसे. आपल्या वर्गातल्या खोडकर मुलांशी संवाद साधणाऱ्या मुख्याध्यापकासारख्या स्वरात मंडेला बोलतो, असं अनेकांचं म्हणणं असे. पण त्याचबरोबर मंडेलाचा साधेपणा, त्याची लोकांची नावं आणि त्यांचे चेहरे लक्षात ठेवायची हातोटी आणि एकूणच इतकं सनसनाटी आयुष्य जगलेला माणूस म्हणून त्याची लोकांना अवाक् करून सोडणारी प्रतिमा या गोष्टींमुळे त्याच्या प्राणहीन भाषणांकडे लोक दुर्लक्ष करायचे. तरुणांना मंडेलाचं विशेष आकर्षण होतं. '18 वर्षांवरच्या लोकांनीच मतदान का करायचं?', असा सवाल करून आपण हे वय कमी करून 14 वर्षांवर आणणार असल्याचं मंडेलानं जाहीर केल्यावर काही पत्रकारांनी त्याची चेष्टा केली. एका वर्तमानपत्रानं तर लंगोट घातलेलं छोटंसं बाळ मतदान करत असल्याचं बहारदार व्यंगचित्रही छापलं! स्वत: मंडेलाला ते खूप आवडलं. मंडेलाच्या या प्रस्तावाला एएनसीमधूनच विरोध झाला, हा भाग वेगळा.

मंडेलाच्या भाषणांमधले मुद्दे मात्र लोकांना दिलासा देणारे असायचे. एकाच वेळी आक्रमक धोरण स्वीकारलेल्या कृष्णवर्णीय लोकांना चुचकारण्याबरोबरच मंडेला गोऱ्या लोकांना आश्वस्तही करत असे. गोऱ्या लोकांनी दक्षिण आफ्रिका सोडून इतरत्र राहायला जाऊ नये, यासाठी मंडेला त्यांना आवाहन करत असे. आपल्या भाषणांमध्ये कृष्णवर्णीय तरुणांना उद्देशून तो आपला देश गोऱ्या लोकांविना अपूर्ण आहे असं सांगत असे. याचबरोबर इतर काही 'थर्ल्ड वर्ल्ड' देशांमध्ये काय घडलं होतं, याचंही मंडेला नेहमी भान बाळगत असे. या देशांमधल्या क्रांतिकारकांनी आपल्या इथे खूप प्रयत्नांनंतर लोकशाही पद्धत रुजवण्यात यश मिळवल्यानंतर पहिल्याच निवडणुकीत या क्रांतिकारी लोकांनाच पराभवाचा सामना करावा लागला होता. एएनसीच्या बाबतीत हे घडता कामा नये; या दृष्टीनं मंडेला खूप काळजी बाळगत असे. आपल्या सहकाऱ्यांनाही या गोष्टीची मंडेला सतत आठवण करून देत असे. यासाठी आपण सत्तेवर

आलो, तर पाच वर्षांमध्ये गोरगरिबांसाठी 10 लाख घरं बांधणं; सगळ्यांना पाणी, वीज, मूलभूत आरोग्य, शिक्षण या गोष्टी मोफत किंवा स्वस्त दरांत उपलब्ध करून देणं अशी उद्दिष्टं एएनसीनं नजरेसमोर बाळगली होती, तसंच या गोष्टीकडे उद्योगपतींनी वाक्दृष्टीनं बघू नये; यासाठी त्यांनाही विश्वासात घेण्यात आलं होतं.

एएनसी समर्थक

मंडेला आयुष्यभर ज्या क्षणासाठी धडपडला होता, ज्या क्षणासाठी त्यानं दोन तपांहून अधिक काळ तुरुंगवास सोसला होता, तो क्षण आता अगदी जवळ येत चालला होता. दक्षिण आफ्रिकेमध्ये कित्येक शतकांपासून छुपेपणानं आणि त्यानंतर कित्येक दशकं उघडपणे सुरु असलेला वर्णद्वेष संपण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत होती. सगळ्या जगाचं या घटनाक्रमाकडे अगदी बारकाईनं लक्ष लागलं होतं!

राष्ट्रपती मंडेला

नव्या परिस्थितीमध्ये पत्रकारांशी अत्यंत खुबीनं संभाषण करायची गरज मंडेलाला वारंवार भासे. भावी राष्ट्रपती म्हणून सगळे जण त्याच्याकडे बघायचे. शिवाय मंडेलाच्या ऐतिहासिक तुरुंगवासामुळे सगळ्यांनाच त्याच्याशी बोलण्यासंबंधी कुतूहल जाणवत असे. सुदैवानं आपल्या तीन दशकांच्या तुरुंगवासात माध्यमांना कसं हाताळायचं, याची खुबी मंडेलाला साध्य झाली होती. त्यामुळे कुठल्या वार्ताहरासमोर काय बोलायचं, वेगवेगळ्या माध्यमांच्या संदर्भातली आव्हानं कशी हाताळायची, या सगळ्या गोष्टींचं भान मंडेलाला असे. एका वार्ताहरानं 'आम्ही प्रयत्न करूनसुद्धा मंडेलाविषयी वाईट लिहूच शकत नाही' असं म्हटलं होतं. पण दक्षिण आफ्रिकेमधल्या महत्त्वाच्या वर्तमानपत्रांचं मात्र एएनसीला समर्थन नव्हतं. ते सगळे गोऱ्या नेत्यांना आणि त्यांच्या पक्षांनाच समर्थन द्यायचे. इंग्लंडमध्येसुद्धा उजव्या विचारसरणीची 'डेली मेल', तसंच 'द टाईम्स' यांच्यासारखी वर्तमानपत्रं मंडेला आणि एएनसी यांच्याविषयी घाबरगुंडीचं वातावरण निर्माण करणारा मजकूरच जास्त प्रमाणात छापायची.

एएनसीसाठी निधी गोळा करायच्या कामात तर मंडेलाचा हात कुणीच धरू शकायचं नाही. मोठ्या प्रमाणावर तो देणग्या गोळा करत असे. पूर्वी वर्णद्वेषाला पाठिंबा दिलेल्या एका कंपनीनं एएनसीला 2,50,000 रँडचा चेक दिल्यावर मंडेलानं तो परत करून आपला अपमान केल्याचं सांगितलं. आपल्याला 'किमान 7 आकडी' रक्कम अपेक्षित असल्याचं मंडेलानं त्या कंपनीच्या अधिकाऱ्याला ठणकावून सांगितलं. आपल्या परदेश दौऱ्यांचं प्रमाण वाढवून मंडेलानं अनेक देशांमधून मोठमोठ्या देणग्या पक्षासाठी गोळा केल्या. पूर्वी वर्णद्वेषाचा पुरस्कार करणारे आणि मंडेलाचा निषेध करणारे अनेक लोक आता रांगा लावून मंडेलाशी हस्तांदोलन करायची संधी मिळवण्यासाठी धडपडत असत.

राष्ट्रपती मंडेला

12 फेब्रुवारी 1994 या दिवशी निवडणुकीच्या प्रचाराची अधिकृत सुरुवात झाली. सत्तेवर असलेल्या डी क्लार्कच्या 'नॅशनल पार्टी' या पक्षापेक्षा एएनसीला खूप जास्त मतं मिळणार याविषयी कुणालाच शंका नव्हती. या संदर्भात बोलताना 'आपण हत्ती आहोत आणि नॅशनल पार्टी म्हणजे उंदीर आहे', अशी तुलना मंडेलानं केली होती. पण, एएनसीला घटनादुरुस्ती करण्यासाठीचे अधिकार मिळवण्यासाठी आवश्यक असलेली 67 टक्के मतं मिळतील का, हा मात्र महत्त्वाचा प्रश्न होता. अर्थात, या निवडणुका तरी होतील किंवा नीटपणे पार पडतील का नाही, याविषयी शंकाच होती. कारण बुथेलेझीचा पक्ष आणि आणखी एक पक्ष यांनी या निवडणुकांमध्ये सहभागी व्हायचं नाही, असा निर्णय घेतला होता. मंडेलानं हा प्रश्न सोडवण्यासाठी आश्चर्यकारकरीत्या माजी पंतप्रधान बोथा, तसंच स्वत: बुथेलेझी यांची भेट घेतली. बुथेलेझीला आपण त्याच्या मनातल्या शंकांना समाधानकारक उत्तर मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या सल्लागारांचीसुद्धा मदत घेऊ, असं मंडेलानं सांगितलं; पण बुथेलेझी आपल्या निर्णयावर अडून बसला.

28 मार्च 1994 या दिवशी बुथेलेझीनं जोहान्सबर्ग शहरात एक आक्रमक मोर्चा काढायचं ठरवलं. याची बातमी मंडेलाला समजताच त्यानं डी क्लार्कला आणि डी क्लार्कनं पोलीस

अधिकाऱ्यांना याविषयीची पूर्वकल्पना दिली. पण, पोलिसांनी याविषयी काहीच खबरदारी घेतली नसल्याचं दृश्य बघायला मिळालं. त्यामुळे काळजीत पडलेल्या मंडेलानं एएनसीच्या लोकांना सावधगिरी बाळगण्याच्या सूचना दिल्या. हा मोर्चा एएनसीचं मुख्यालय असलेल्या 'शेल हाऊस'च्या दिशेनं चाल करून येत असलेला दिसताच मंडेलानं या इमारतीच्या सुरक्षारक्षकांना वेळप्रसंगी मोर्च्यामधल्या लोकांवर गोळीबार करूनसुद्धा आपल्या इमारतीचं संरक्षण करायला सांगितलं.

मोर्च्यामधल्या काही लोकांनी इमारतीवर गोळ्या झाडल्या आणि तेव्हाच उपस्थित असलेले थोडेफार पोलीस पळून गेले. एएनसीच्या सुरक्षारक्षकांनी हवेत एक गोळी झाडूनसुद्धा मोर्चा घेऊन येणाऱ्या लोकांच्या आक्रमणात काही घट झाली नाही. त्यामुळे एएनसीच्या सुरक्षारक्षकांनी जमावावर सरळ गोळीबार केला. त्यात मोर्चा घेऊन येणाऱ्या लोकांपैकी 8 जण ठार झाले. डी क्लार्कनं मंडेलाला फोन करून एएनसीच्या मुख्यालयामधल्या शस्त्रास्त्रांच्या जप्तीसाठी पोलीस कसलीही कारवाई करणार नाहीत, याची हमी दिली. पण, दुसऱ्याच दिवशी याच कामासाठी पोलीस हजर झाले. मंडेलानं स्वत:हून पुढे होत पोलिसांना इमारतीमध्ये प्रवेश नाकारला. डी क्लार्कनं लगेच मंडेलावर 'पोलिसांच्या कामात आपण कोणतेही अडथळे आणणार नाही'; असं पूर्वी दिलेलं आश्वासन मंडेलानं पाळलं नसल्याचा आरोप केला. त्यावर आपण इशारा देऊनसुद्धा जाणूनबुजून डी क्लार्कनं हा मोर्चा थांबवला नसल्यामुळे स्वसंरक्षणार्थ एएनसीच्या सुरक्षारक्षकांना गोळीबार करणं भाग असल्याचं उत्तर दिलं. या प्रकरणाची सुनावणी झाल्यावर चार वर्षांनंतर न्यायालयानं या प्रकरणात बुथेलेझीचा पक्ष, पोलीस, तसंच एएनसी या सगळ्यांचाच दोष असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

या घटनेनंतर इतरही अजून हिंसक कारवाया झाल्या. बुथेलेझीनं आता एएनसीविरुद्ध झुलू लोक यांच्यामधल्या निर्णायक लढाईची वेळ आली असल्याचं जाहीर केलं. यानंतर डी क्लार्क, मंडेला आणि बुथेलेझी यांच्यात आणखी एक बैठक झाली. पण, आपल्या आक्रमक भूमिकेवरून हटायला बुथेलेझी तयारच नव्हता. त्यामुळे या बैठकीचा काही फायदा झाला नाही. लंडनच्या 'संडे टाईम्स'नं दुसऱ्या दिवशी 'यादवी युद्धासाठी दक्षिण आफ्रिकेत काल अनुकूल वातावरण निर्माण झालं' अशा मथळ्याची बातमी छापली. या यादवी युद्धात किमान 10 लाख लोक मरतील, अशी भीती अभ्यासक मंडळी व्यक्त करत होती. पण यानंतर आंतरराष्ट्रीय

पातळीवरच्या एका समितीला हा प्रश्न सोडवायचा शेवटचा प्रयत्न करू द्यायला बुथेलेझी तयार झाला. एएनसीनं या निर्णयाला विरोध केला असला, तरी मंडेलानं मात्र या निर्णयाला पाठिंबा द्यायचं ठरवलं. अमेरिकेचा हेन्री किसिंजर याचा समावेश असलेल्या या समितीत एकूण सात सदस्य होते. त्यांनी तीन दिवस सगळ्या नेत्यांशी चर्चा केली, पण यातून आपण कसलाही तोडगा काढू शकत नसल्याचं या समितीच्या लक्षात आलं आणि त्यामुळे हा प्रश्न तसाच अनुत्तरित राहिला.

दरम्यान, बुथेलेझीला मिळत असलेला पाठिंबा अजूनच कमी होत गेला. बुथेलेझी एकटा पडत असल्याची चिन्हं दिसायला लागली. शेवटी तीन अटी घालून होऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये आपण उतरायला तयार असल्याचं बुथेलेझीनं जाहीर केलं. मंडेलानं या अटी मान्य करून डी क्लार्कला फोन केला. डी क्लार्कनंही कुरकुरत का होईना; पण बुथेलेझीच्या अटी मान्य केल्या. निवडणुका आता एका आठवड्यावर आलेल्या असल्यामुळे मतपत्रिकासुद्धा छापून तयार झाल्या होत्या. पण तरीही, अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे, बुथेलेझीच्या पक्षाचे स्टिकर्स छापून ते या मतपत्रिकांवर चिकटवण्यात निवडणूक अधिकाऱ्यांना यश मिळालं.

प्रत्यक्ष मतदानाच्या आदल्या दिवशी कृष्णवर्णीय लोकांनी मतदान करण्यासाठी येऊ नये; म्हणून त्यांना घाबरवण्यासाठी बॉम्बस्फोट घडवण्यात आले. पण, या बॉम्बस्फोटांनी कृष्णवर्णीय लोकांच्या मतदानाच्या इच्छेवर कसलाही परिणाम केला नाही. पहाटेपासूनच मतदान केंद्रांबाहेर मतदारांच्या रांगा लागल्या. काही मतदारांना तर त्यांची पाळी येईपर्यंत तब्बल 5 तास थांबावं लागलं. पण, '350 वर्षं या दिवसाची वाट बघितलेल्या लोकांना 350 मिनिटं म्हणजे काहीच वाटत नाही', असं म्हणून एका माणसानं सगळ्या कृष्णवर्णीय लोकांच्या प्रातिनिधिक भावना बोलून दाखवल्या. 2.30 कोटी मतदारांच्या या निवडणुकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी 2 लाख अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

सगळ्या जगाच्या नजरा या ऐतिहासिक निवडणुकांकडे लागल्या होत्या. अनेक ठिकाणांहून हेराफेरीच्या प्रकारांच्या बातम्या आल्या. मतपत्रिका किंवा शाई वेळेवर न पोहोचणं, मतपत्रिकांच्या नकला तयार केल्या जाणं, बोगस मतदान होणं असे प्रकार घडले. विशेषत: झुलू लोकांच्या भागांमध्ये या गोष्टी जास्त प्रमाणात आढळल्या. यामागे नक्कीच कटकारस्थान असणार अशी प्रतिक्रिया मंडेलानं दिली. तरीही निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यावर एएनसी

हाच सगळ्यात मोठा पक्ष म्हणून निवडून आला. संसदेच्या एकंदर 400 जागांपैकी 252 जागा एएनसीला मिळाल्या. घटनादुरुस्ती करण्यासाठी आवश्यक असलेलं बहुमत मात्र एएनसीला मिळालं नाही, पण हे एका दृष्टीनं बरंच झालं, असं मंडेलाचं मत होतं. कारण एएनसीनं या अधिकाराचा दुरुपयोग करायची भीती मंडेलाला वाटत होती. तसंच, एएनसीला आणखी मोठ्या प्रमाणावर जागा मिळाल्या असत्या, तर एएनसीनं निवडणुकांच्या निकालांच्या संदर्भात कसला तरी घोटाळा केला आहे, असा आरोप करून डी क्लार्कनं आपल्याला न्यायालयात खेचलं असतं, अशी प्रतिक्रियाही मंडेलानं दिली.



मतदान करताना मंडेला

डी क्लार्कनं आपला पराभव दिलदारपणे मान्य केला आणि देशाचं इथून पुढचं भवितव्य मंडेलाच्या हाती असल्याचं जाहीर केलं. दरम्यान, सततच्या परिश्रमांनी थकलेल्या आणि फ्ल्यू झाल्यामुळे आजारी पडलेल्या मंडेलानं एएनसीच्या आनंदोत्सवात सहभागी व्हायचं ठरवलं. डी क्लार्कनं दिलेल्या लढ्याबद्दल मंडेलानं त्याचंही कौतुक केलं. अर्थातच, निवडणूक जिंकणं हा तसा सोपा भाग होता. इथून पुढेच आपल्यासमोरचं खरं आव्हान सुरु होणार आहे, याची

मंडेलाला पुरेपूर जाणीव होती. राष्ट्रपती म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर घटनेमधल्या तरतुदींनुसार मंडेलाला दोन उपराष्ट्रपती मिळणार होते. त्यांच्यामधला एक म्हणजे दुसऱ्या क्रमांकाच्या जागा जिंकलेल्या पक्षाचा नेता डी क्लार्क असणार होता. दुसरा उपराष्ट्रपती मात्र मंडेलाला एएनसीमधून निवडायचा होता. या माणसाची निवड करताना मंडेलाला नीट विचार करणं भाग होतं. कारण आता वयाची पंच्याहात्तरी गाठलेल्या मंडेलाला राष्ट्रपतीपद एकदाच भूषवायचं होतं. त्यामुळे पुढच्या वेळी राष्ट्रपतीपदाची जबाबदारी स्वीकारू शकेल, अशा माणसाला आत्ता आपल्या हाताखाली घडवणं मंडेलाला महत्त्वाचं वाटत होतं. बऱ्याच चर्चेनंतर या पदासाठी थाबो एम्बेकी याची निवड करण्यात आली.

10 मे 1994 या दिवशी मंडेलानं अधिकृतपणे राष्ट्रपतीपदाची सूत्रं हाती घेतली. हा सोहळा जगभरात सुमारे 100 कोटी लोकांनी टीव्हीवर बघितला, असं मानलं जातं! या सोहळ्याला हिलरी क्लिंटन, फिडेल कॅस्ट्रो, यासर अराफात, इझ्राईली राष्ट्रपती चेम हरझॉग, ब्रिटिश राजपुत्र फिलिप्स अशा अनेक प्रकारच्या आणि परस्परभिन्न विचारसरणीच्या लोकांनी प्रत्यक्ष हजेरी लावली. आपल्या भाषणात मंडेलानं 'कल्पनेपलीकडच्या भीषण परिस्थितीनंतर आता सगळ्या जगाला अभिमान वाटेल असा समाज आपण मिळून घडवू या!', असं आवाहन आपल्या देशवासियांना केलं. त्याचबरोबर या सुंदर देशात इथून पुढे ठरावीक प्रकारचे लोक इतर सगळ्या लोकांवर आपली सत्ता गाजवत असल्याचं दृश्यही कधीच बघायला मिळणार नाही, असा विश्वास मंडेलानं व्यक्त केला. या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या वेळी मंडेलाची मुलगी झेनी त्याच्या शेजारी काळी हॅट घालून उभी होती. विनीला इतर लोकांबरोबर बसवण्यात आलं होतं. पण विनीनं या बाबतीत नाराजी प्रकट केल्यावर तिला मंडेलाजवळ जायची परवानगी देण्यात आली. मंडेलाच्या पहिल्या पत्नीला या समारंभाला हजर राहायचं आमंत्रणच देण्यात आलं नव्हतं. कुटुंबातले इतर सदस्यही हजर नव्हते. अशा प्रकारे मंडेलाच्या सार्वजनिक आयुष्यातल्या सर्वोच्च क्षणी त्याच्या घरातलं जवळपास कुणीच उपस्थित नसल्याच्या वेदना त्याला आतून खात होत्या! 1652 साली केप वसाहतीमध्ये लादण्यात आलेल्या गोऱ्या लोकांच्या वर्चस्ववादाचा आता पाडाव झाला होता.

अचानकपणे सत्ता हाती आल्यामुळे मंडेला आणि एएनसी सुरुवातीला खूपच गोंधळून गेले. कित्येक दशकांच्या तुरुंगवासातून मुक्त झाल्यावर अनेक चित्रविचित्र प्रसंगांना तोंड देणं आणि

त्यानंतर आता चक्क देशाचा राज्यकारभार चालवणं, अशी अवघड जबाबदारी मंडेलावर आली. क्रांती, उठाव, मोर्चा, हिंसा असल्या प्रकारचे शब्द आणि त्यांच्याच संदर्भातलं वातावरण या सगळ्याची एएनसीला सवय झाली होती. आता अचानकपणे आर्थिक तूट, परकीय चलनाचे विनिमय दर, शेतमालाचा दर ठरवणं, महागाई अशा 'चमत्कारिक' गोष्टींच्या संदर्भातले निर्णय घ्यायची वेळ एएनसीवर आली होती. इतर आफ्रिकन देशांमध्ये पूर्वी असं घडलं होतं; पण दक्षिण आफ्रिकेचा आकार आणि तिची प्रगत अर्थव्यवस्था यांच्यामुळे एएनसीपुढचं आव्हान तुलनेनं जास्त कठीण होतं. गोऱ्या लोकांना सत्तेचा अनुभव होता. तसंच, अर्थव्यवस्थेची सूत्रंही त्यांच्याच हातात होती. त्यांना न दुखावता बहुसंख्य कृष्णवर्णीय लोकांना बरोबर घेऊन जाण्याचं अवघड आव्हान मंडेलाला पेलायचं होतं.

लवकरच मंडेलानं राष्ट्रपतीपदाची जबाबदारी स्वीकारली. राष्ट्रपतीच्या कार्यालयात काम करणारे सगळे लोक गोरे होते. त्यामुळे सुरुवातीला वातावरण जरा तंग असायचं. पण मंडेलानं अगदी सहजपणे काम करून, त्यात लगेचच मोकळेपणा आणला. सगळ्या सहकाऱ्यांशी आणि कर्मचाऱ्यांशी आपुलकीनं बोलून त्यानं त्यांची मनं जिंकून घेतली. सगळ्यांची नावं आणि अनेक जणांच्या कुटुंबांचे तपशील मंडेला लक्षात ठेवतो, हे बघून तिथले कर्मचारी अवाक्च झाले. त्यांना मंडेलाविषयी जिव्हाळा निर्माण झाला. राष्ट्रपती निवासातून डी क्लार्कला बाहेर न काढता मंडेलानं स्वत: दुसऱ्या घरात राहायचं ठरवलं. आपले सगळे सहकारी, कर्मचारी, नोकर, माळी यांच्याशी मंडेला नियमतिपणे हस्तांदोलन करे आणि त्यांच्याशी तो बोले. हे सगळे लोक त्यामुळे थक्क होऊन जायचे. राष्ट्रपतीचा अंगरक्षक म्हणून नेमला गेलेला एक जण 'पूर्वी हे काम मी पैशांसाठी करायचो, पण आता मी हे काम मंडेलासाठी करतो... मंडेलाचा बचाव करण्यासाठी मी बंदुकीची गोळी खायला तयार आहे...' असं म्हणाला यातूनच मंडेलाच्या प्रभावाची कल्पना यावी. अनेक लोक मंडेलाच्या सर्वसामान्य लोकांशी संवाद साधण्याच्या कसबानं थक्क व्हायचे. योग्य वेळेला योग्य अंतर राखणं, आपल्या पदाचा मान न गमावता सगळ्यांशी प्रेमानं बोलणं या अवघड कला मंडेलाला सहजपणे जमायच्या. एकदा मंडेलाची टीव्हीवर मुलाखत घेण्यासाठी इंग्लंडहून काही लोक आले आणि त्यांनी आपले कॅमेरे चालू केले, तर मंडेला सरळ उठला आणि त्यानं कॅमेरामनशीच हस्तांदोलन केलं. ब्रिटिश पंतप्रधानाला '10 डाऊनिंग स्ट्रीट' या त्याच्या निवासस्थानी मंडेला भेटायला गेलेला असताना नेहमीप्रमाणे

आतल्या पोलीस अधिकाऱ्यानं दार उघडलं, तर मंडेलानं त्याच्याशी हस्तांदोलन केलं. आपली भेट झाल्यावर मंडेला परत जाताना या पोलिसाशी बोलला आणि त्याच्या कुटुंबाची त्यानं चौकशी केली! मंडेलाच्या अशा वागण्यामुळे तो उगीचच आपण एकदम साधे आहोत, असं दाखवायचा प्रयत्न करतो असं काही जणांना वाटायचं. कधीतरी मंडेलाच्या चेहऱ्यावरचा हा मुखवटा गळून पडेल आणि त्याचा खरा चेहरा आपल्याला दिसेल, असं ते म्हणायचे; पण तसं कधी घडलंच नाही. कारण मंडेलानं कृत्रिमपणे मुखवटा घालून चांगलं वागायचं असं ठरवून काहीच केलेलं नव्हतं. चांगुलपणा, दयाळूपणा, सगळ्यांशी प्रेमानं आणि आपुलकीनं वागणं हे गुण मंडेलामध्ये पुरेपूर भिनले होते. त्यामुळे इतर काही नेत्यांप्रमाणे त्याला या गोष्टी दिखाऊपणासाठी वापरायचा केविलवाणा प्रयत्न करायची कधीच गरज भासायची नाही. अत्यंत नैसर्गिकरीत्याच हे सगळं व्हायचं.

अर्थात, वरून मंडेला असा आनंदी आणि सगळ्यांशी आपुलकीनं वागणारा दिसत असला, तरी आतून तो खूप एकटा असायचा. आपल्या घरामधल्या भल्यामोठ्या टेबलाशेजारच्या खुर्चीत तो एकटा बसलेला असे. एका सहकाऱ्याला मंडेलानं 'मला कुणीच मित्र नाही', असं सांगितल्यावर त्या सहकाऱ्याच्या काळजात चर्र झालं होतं. आपल्या भावना अगदी जवळच्या लोकांव्यतिरिक्त इतर कुणालाच कळू न द्यायचं कसब मात्र मंडेलानं चांगलंच साधलं होतं. कारण आपण कुणामध्ये भावनिकरीत्या गुंतून राहिलो, तर त्याचा आपल्या निर्णयक्षमतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो, याची जाण मंडेलाला होती. त्यामुळे आपली राजकीय कारकीर्द, तसंच आपले निर्णय या गोष्टींमध्ये तो आपल्या भावना मिसळत नसे. त्यामुळे कुणाशी वैयक्तिक पातळीवर मनसोक्तपणे चर्चा करताना मंडेला फारसा दिसत नसे. यामागे त्याचा प्रदीर्घ तुरुंगवास हेसुद्धा एक महत्त्वाचं कारण होतं. या तुरुंगवासामुळे मंडेला, तसंच त्याच्याबरोबर तुरुंगात असलेले सगळे सहकारी यांना एकटेपणाची जणू सवयच झाली होती. स्वत:शी संवाद साधून ही सगळी माणसं समाधानी राहू शकत. त्यांना कित्येकदा इतर लोकांशी बोलायची गरज भासत नसे. उलट आपण स्वत: आणि इतर लोक यांच्यामध्ये अंतर ठेवायला त्यांना आवडे. यातूनच स्वत:शी संवाद साधण्याची त्यांची भूक भागत असे.

मंडेलाला तब्येतीच्या बारीकसारीक कुरबुरी सतावत असल्या, तरी त्याची एकंदर प्रकृती खूप धडधाकट होती. मंडेलाची नजर तुरुंगवासातच खराब झाली होती. त्यामुळे आता

मंडेलाची छायाचित्रं काढण्यासाठी येणाऱ्या छायाचित्रकारांना फ्लॅश वापरायला परवानगी नसे. या संदर्भात मंडेलानं एक शस्त्रक्रियासुद्धा करून घेतली, पण तिचा फायदा झाला नाही. मंडेलाचे गुडघेसुद्धा दुखायचे. त्यामुळे जिने चढताना-उतरताना त्याला मदत लागे. कधीकधी अतिश्रमांमुळे मंडेला पार थकून जायचा. डॉक्टर्स त्याला पूर्ण विश्रांती घ्यायला सांगायचे, पण मंडेला त्यांच्या अंदाजापेक्षा खूपच लवकर बरा व्हायचा. मंडेलाला वेगवेगळ्या प्रमाणवेळांमध्ये प्रवास करून एका देशातून दुसऱ्या देशात गेल्यावर वेळेतल्या फरकामुळे येणारा 'जेटलॅग' जाणवायचाच नाही. 76 वर्षं वयाचा मंडेला त्याच्या वयाहून 20 वर्षं कमी असलेल्या माणसाइतका तंदुरुस्त आहे, असं अनेक डॉक्टर्स म्हणायचे.

विनीच्या संदर्भातल्या मंडेलाच्या कटकटी अजून कमी झाल्याच नव्हत्या. त्या दोघांमधले नवरा-बायको म्हणून असलेले संबंध मंडेलाच्या तुरुंगवासातून झालेल्या सुटकेनंतर लगेचच दुरावले होते. त्यानंतर त्यांनी वेगळं व्हायचं ठरवल्यामुळे या दुराव्यावर अधिकृत मोहोर उमटली होती. तरीही विनीच्या बाबतीत आपण अन्याय केला, असं वाटून मंडेलानं तिच्या बाबतीत मऊ धोरणच स्वीकारलं होतं. विनीनं दक्षिण आफ्रिकेत झालेल्या निवडणुकांच्या वेळी एएनसीतर्फे आपली उमेदवारी जाहीर केली होती. अत्यंत जोरदार प्रचार करून विनीनं संसदपटू होण्याचा मान मिळवला.

मंडेलानं विनीच्या बाबतीत आपण केलेल्या अन्यायाचं परिमार्जन म्हणून तिला कला क्षेत्राशी संबंधित असलेलं उपमंत्रीपद देण्याची घोडचूक केली. विनीनं या संधीचा पुरेपूर फायदा उठवून परत एकदा प्रचंड भ्रष्टाचार केला. हिऱ्यांचे व्यवहार, पर्यटन, गरीबी हटवण्यासाठीची मोहीम अशा अनेक नावांखाली विनीनं देशाची मनसोक्त लयलूट केली, तरीही मंडेलानं या प्रकारांकडे दुर्लक्ष केलं. यामुळे हिंमत वाढलेल्या विनीनं एएनसी सत्तेवर आल्यापासून कृष्णवर्णीय लोकांसाठी काहीच काम करत नसून, फक्त अल्पसंख्यांक गोऱ्या लोकांच्या हिताचाच विचार करत असल्याचा आरोप केला. यामुळे चिडलेल्या मंडेलानं विनीकडून माफीनामा मागितला. विनीनं अत्यंत जिवावर आल्यासारख्या भाषेत तो लिहून दिला. पण, लगेचच हा माफीनामा आपण एएनसीच्या दंडेलशाहीला घाबरून लिहून दिला असल्याचं आणि एएनसीमध्ये सर्वसामान्य लोकांच्या मतांना अजिबात स्वातंत्र्य दिलं जात नसल्याचं सांगून, विनीनं नवं वादळ निर्माण केलं. शेवटी मंडेलाचा आदेश धुडकावून विनी एका दौऱ्यावर

गेलेली असताना तिच्या घरावर धाड टाकण्यात आली. त्यात महत्त्वाची कागदपत्रं सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती लागली. काही दिवसांमध्येच विनीची सरकारमधून हकालपट्टी करण्यात आली.

विनी आणि मंडेला तीन वर्षांपासून वेगळे राहात असले, तरी त्यांच्यात अधिकृतरीत्या घटस्फोट झाला नव्हता. आता मात्र मंडेलानं लगेचच हा निर्णय घेऊन टाकला. 1995 सालच्या ऑगस्ट महिन्यात मंडेलानं यासाठीचा अर्ज दाखल केला. याची सुनावणी 1996 सालच्या मार्च महिन्यात सुरु झाली. राष्ट्रपती नेल्सन मंडेला आपली पत्नी विनी हिच्यापासून काही फूट अंतरावर उभा राहून आपल्या घटस्फोटाची मागणी करत असल्याचं विचित्र दृश्य उपस्थित लोक बघत होते. आपल्याला हे लग्नसंबंध कायम ठेवण्यात कोणताही रस नसल्याचं, तसंच कुणाची मध्यस्थी आपल्याला या प्रकरणात नको असल्याचं मंडेलानं सांगितलं. न्यायाधीशानं जरा खोलात जाऊन काही प्रश्न विचारल्यावर मंडेलानं नाईलाजानं 'मी जागा असताना विनी आमच्या बेडरुममध्ये यायलाही तयार नसायची', असं सांगून आपणही एक माणूसच आहोत हे अप्रत्यक्षरीत्या सांगितलं. विनीनं नेहमीप्रमाणेच आपली बाजू एकदम जोरदारपणे मांडली आणि आपण हे लग्न मोडू इच्छित नसल्याचं सांगितलं. काही घडामोडींनंतर शेवटी न्यायाधीशानं मंडेलाचा युक्तीवाद मान्य करून त्याला घटस्फोट मंजूर केला.

अशा रितीनं मंडेलाच्या आयुष्यामधले दोन महत्त्वाचे टप्पे पार पडले. पहिला टप्पा अर्थातच दुय्यम दर्जाचा कृष्णवर्णीय नागरिक म्हणून सहन केलेल्या अन्यायी आणि अपमानकारक वागणुकीपासून त्याच देशाचं राष्ट्रपतीपद मिळवण्याचा होता. दुसरा टप्पा मात्र मंडेलाच्या वैयक्तिक आयुष्यातल्या दु:खाचा होता. ज्या विनी मंडेलामुळे प्रभावित होऊन मंडेलानं तिच्याशी लग्न केलं होतं, त्याच विनीच्या अत्यंत विचित्र वागण्यामुळे मंडेला अधिकृतपणे तिच्याशी वेगळा झाला होता. हे सगळं मंडेलाच्या आयुष्याच्या आठव्या दशकामध्ये व्हावं, हा त्यातला आणखी एक दैवदुर्विलास होता!

राष्ट्रपतीपदाच्या मार्गाची काटेरी वाट

कृष्णवर्णीय एएनसीकडे दक्षिण आफ्रिकेच्या कारभाराची सूत्रं आल्यावर आणि नेल्सन मंडेलाकडे देशाचं राष्ट्रपतीपद आल्यावर गोऱ्या लोकांना खूप काळजी वाटायची. ते स्वाभाविकच होतं. कृष्णवर्णीय लोकांचं सरकार आल्यावर आपलं काय होणार, याची भीती गोऱ्या लोकांना पूर्वीपासूनच वाटत असे पण, मंडेलानं गोऱ्या लोकांना धडकी भरेल अशा प्रकारची कुठलीही पावलं घाईघाईनं उचलायची नाहीत, असं ठरवलं होतं. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेत झालेली क्रांती ही गोऱ्यांच्या विरोधातली क्रांती आहे, अशा अर्थाचे समजलेले गैरसमज दूर व्हायला मदत झाली. मंडेलाच्या राष्ट्रपतीपदाच्या कारकीर्दीला 100 दिवस पूर्ण झाल्यावर 'फायनॅन्शियल टाईम्स' या वर्तमानपत्रानं केलेल्या एका सर्वेक्षणामध्ये मंडेलाविषयी वाईट बोलणारा एकसुद्धा गोरा माणूस आढळला नाही!

अर्थात, मंडेलाची सुरुवात अशी असूनसुद्धा नंतर काय घडेल याविषयी अनेक लोक साशंक असायचे. झिम्बाब्वेमध्ये रॉबर्ट मुगाबेच्या नेतृत्वाखाली कृष्णवर्णीय लोकांनी क्रांती घडवून आणल्यावर तिथेसुद्धा सुरुवातीला गोऱ्या लोकांच्या मनात भीती निर्माण होईल, असं काहीच घडलं नाही. पण, कालांतरानं मुगाबेनं कृष्णवर्णीय लोकांच्या हितासाठी अनेक निर्णय अगदी घाईघाईनं घ्यायला सुरुवात केल्यावर तिथे अनर्थच झाला. असंच काहीसं दक्षिण आफ्रिकेच्या बाबतीतसुद्धा घडू शकतं, असं काही अभ्यासक म्हणत होते. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेमध्ये एवढी मोठी क्रांती घडूनसुद्धा आपल्या हितासाठी फार मोठ्या प्रमाणावर काही घडत नाही, असं लक्षात आल्यामुळे कृष्णवर्णीय लोक नाराज होतील आणि आक्रमक धोरण स्वीकारतील, अशी दुसऱ्या प्रकारची भीतीसुद्धा व्यक्त केली जात होती.

पण, मंडेला हा या सगळ्या राजकारणाच्या वरच्या पातळीच्या दर्जाला जाऊन पोहोचला होता. त्याची मानसिकता इतर अनेक लोकांप्रमाणे कद्रू विचारांची नव्हती. मंडेलाच्या कारकीर्दीतल्या राज्यकारभाराविषयी लोकांना कितीही नाराजी असली, तरी त्या संदर्भात ते मंडेलाला जबाबदार धरत नसत. सगळे नागरिक आपल्या घरामधला कर्ता पुरुष देशपातळीवर जाऊन पोहोचला असावा, अशा नजरेनं मंडेलाकडे अत्यंत आपुलकीनं बघायचे.

स्वत: मंडेला कधीकधी बोलताना एखादा विचारवंत किंवा तत्त्वज्ञ बोलतो तसा बोले.

आपण दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्रपतीपदी नसून तुरुंगातच आहोत; असं त्याला वाटतं की काय, असं त्याच्या बोलण्यामधून कित्येकदा जाणवे. अनेकदा तो मानवतेच्या मूलभूत संकल्पनांविषयी बोलत राही. त्याला सगळ्यांनी आपसातले मतभेद विसरून आणि एकमेकांशी असलेलं वैर सोडून देऊन, एकत्रित काम करणं, प्रत्येक माणसानं इतर माणसांविषयी आदर बाळगणं आणि सगळ्यांनी प्रेमानं आणि आपुलकीनं मानवता जपणं या गोष्टींचं खूप महत्त्व वाटे. कित्येकदा आपण किती क्रूर आणि आतल्या गाठीच्या लोकांबरोबर व्यवहार करतो आहोत; याची मंडेलाला जाणीवसुद्धा होत नाही का काय इतक्या निरागसपणे तो वागतो-बोलतो, असं त्याच्या साहाय्यकांना वाटे. कुठलाही प्रश्न समोरच्या माणसाशी संवाद साधून सुटू शकतो, यावर मंडेलाचा दृढ विश्वास असे. त्यामुळे मंडेला एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असताना एकोणिसाव्या शतकामध्ये असल्यासारखं वागतो, असं काही जण म्हणत असत. पण मंडेलाचा या सगळ्या तत्त्वांवर आणि साधेपणानं राहाण्यावर खूप भर असे. कदाचित त्याच्या आजूबाजूच्यांना मंडेलाचं महात्म्य खूप प्रयत्न करूनही पुरतं समजलं नसल्यामुळे असं घडलं असावं, असंच आपण म्हणू शकतो!

सुरुवातीपासूनच मंडेला आपल्या हाताखाली काम करत असलेल्या थाबो एम्बेकी या उपराष्ट्रपतीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असे. एम्बेकीचं काम मोठं कठीण होतं. कारण दक्षिण आफ्रिकेत होत असलेल्या सगळ्या सुधारणा, तसंच सगळ्या चांगल्या गोष्टी यांचं श्रेय अर्थातच मंडेलाला मिळत असे. पण ज्या काही चुका होत असतील किंवा खराब गोष्टी घडत असतील त्यांचं खापर मात्र एम्बेकीच्या माथ्यावर फोडलं जात असे. मंडेलाकडे सगळे जण देवत्वाच्या नजरेतून बघत असल्यामुळे असं घडणं अगदी स्वाभाविकच होतं.

मंडेलाच्या हाताखाली काम करत असलेल्या सरकारमध्ये सगळ्या वर्णांचे लोक असत. त्यामुळे तिथलं वातावरण तापायची दाट शक्यता असे. पण बहुधा असं घडत नसे. तिथलं वातावरण एकदम सलोख्याचं नसलं, तरी ते अगदी खराबही नव्हतं. तसंच, आपसातले पराकोटीचे मतभेद बाजूला ठेवून हे सगळ्या वर्णांचे लोक एकत्र येऊन काम करायचे. एएनसीचे लोक मार्क्सवादी आहेत, तसंच ते साम्यवादी विचारसरणीशी सुसंगत असलेलीच धोरणं स्वीकारतील, अशा प्रकारची मतं उजव्या विचारसरणीच्या लोकांनी पूर्वीपासूनच व्यक्त केली होती. पण आता एकत्र काम करताना एएनसीच्या लोकांमध्ये असले गुणधर्म दिसत असल्याचं

या उजव्या विचारसरणीच्या लोकांना जाणवत नसे. रोजच्या कारभारातले प्रश्न कसे सोडवायचे या गोष्टीवरच सगळ्यांचा भर असे.

अशा प्रकारे विविध पक्षांच्या लोकांचं मिळून बनलेलं सरकार चालवताना नक्की काय धोरण स्वीकारलं पाहिजे, याविषयी मंडेलानं इतिहासाचा अभ्यास करून 1917-1920 या काळात फ्रान्सची अशाच प्रकारची सत्ता जॉर्ज क्लेमॉसू यानं कशी सांभाळली होती, हे समजून घेतलं. आपल्या सगळ्या सहकाऱ्यांचं म्हणणं क्लेमेन्सू ऐकून घेई. नंतर तो आपलं वैयक्तिक मत प्रकट करे आणि 'कुणाला आपला राजीनामा द्यायचा असेल तर देऊन टाका' असं सांगे! मंडेलानं कधीकधी ही पद्धत वापरूनसुद्धा बघितली! त्यात कुणीच राजीनामा दिला नाही. आपल्या कारकीर्दीमध्ये जवळपास कुठल्याच प्रश्नासंबंधी सरकारला मतदान करून निर्णय घ्यावा लागला नाही, याचा मंडेलाला विलक्षण अभिमान वाटत असे. संरक्षण आणि गुप्तचर विभाग या संदर्भातल्या चर्चांमधले बारकावे समजून घेणं मंडेलाला खूप महत्त्वाचं वाटे. पण, इतर विषयांवरच्या बैठकांना तो अधूनमधूनच हजर असे. मंडेला अत्यंत स्पष्ट निर्णय घेण्याविषयी प्रसिद्ध होता. कुठल्याही मुद्यावर मंडेला विनाकारण वेळकाढूपणाचं धोरण अवलंबणं किंवा उगीचच चालढकल करून निर्णय घेणं अशा गोष्टी करत नसे.

डी क्लार्क आणि एम्बेकी हे विचारसरणी, तसंच तोपर्यंतची पार्श्वभूमी या बाबतींमध्ये एकमेकांचे कट्टर विरोधक असले, तरी अनेकदा हे दोन उपराष्ट्रपती चर्चा करून वेगवेगळे प्रश्न निकालात काढत. त्यांच्या बैठकांमध्ये या दोन लोकांच्या विचारसरणीत इतका कमालीचा फरक असेल, यावर कुणाचाच विश्वास बसत नसे. डी क्लार्कला एम्बेकीची आर्थिक प्रश्नांमधली जाण, तसंच आधुनिक मार्गांनी सरकारचा कारभार चालवण्यावर असलेली श्रद्धा या गोष्टींचं खूप कौतुक वाटे. पण, त्या मानानं मंडेला आपल्याशी कोरडेपणानं वागतो, तसंच त्याचा आपल्यावर पूर्ण विश्वास नाही, असंही डी क्लार्कला जाणवत असे.

मंडेला आणि डी क्लार्क यांच्यामधल्या अविश्वासाच्या नात्यानं गंभीर रूप धारण केल्याची उदाहरणंही अधूनमधून बघायला मिळत. डी क्लार्कनं वर्णद्वेषाच्या काळात सर्वसामान्य लोकांवर अत्याचार केलेल्या 3500 पोलिसांना अभय द्यायचा निर्णय घेतला. एका बैठकीमध्ये मंडेलानं या निर्णयावर सडकून टीका केली. त्यामुळे व्यथित झालेल्या डी क्लार्कनं तिथेच आपल्या पदाचा राजीनामा द्यायचं ठरवलं होतं, पण त्याच्या एका सहकाऱ्यानं त्याला या निर्णयापासून

परावृत्त केलं. यानंतर एकदा डी क्लार्कच्या काळात संरक्षणमंत्री असलेल्या माणसाला खुनाच्या आरोपावरून अटक करण्यासंबंधीच्या प्रश्नावरूनही मंडेला आणि डी क्लार्क यांच्यात मतभेद निर्माण झाले. शेवटी 'राष्ट्रपती मी आहे... मी काय तो निर्णय घेईन...', असं मंडेलानं डी क्लार्कला सुनावून त्याला गप्प केलं!

बुथेलेझी हा मंडेलाचा दुसरा शत्रू गृहमंत्री होता. पूर्वी मंडेलानं आपली सत्ता आली, तर आपण झुलू लोकांच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नामधून तोडगा काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या निरीक्षकांना दक्षिण आफ्रिकेत आमंत्रित करू, असं आश्वासन दिलं होतं. हे आश्वासन आता मंडेला पाळत नसल्याचा बुथेलेझीचा आरोप होता. लवकरच बुथेलेझीनं आक्रमक धोरण अवलंबून झुलू लोकांना सरकारवर बहिष्कार टाकायचं आवाहन केलं. त्यावर आपण आणीबाणी घोषित करू आणि झुलू लोकांना मिळत असलेला सरकारी निधी बंद करून टाकू अशी धमकी मंडेलानं दिली. शेवटी एम्बेकी आणि जेकब झुमा या एएनसीच्या नेत्यांनाच या प्रकरणात मध्यस्ती करावी लागली.

मंडेलाच्या काळातल्या संसदेपुढचं सगळ्यात मोठं आव्हान हे अर्थातच देशाच्या राज्यघटनेमध्ये योग्य बदल करण्याचं होतं. त्या संदर्भातला एक मुद्दा गुन्हा सिद्ध झालेल्या आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा देण्याचा होता. मंडेला मृत्युदंडाच्या शिक्षेच्या विरोधात होता. कुठल्याही सुसंस्कृत देशानं एखाद्या माणसाचं आयुष्य संपवण्यासाठीची शिक्षा देणं क्रूर आहे, असं मंडेलाचं मत होतं. या संदर्भात मंडेलानं पूर्वी त्याच्यावर चालवल्या गेलेल्या खटल्याची आणि त्याला फाशी मिळणार असं चित्र सगळीकडे निर्माण करण्यात आल्याची आठवणही काढली. शेवटी हा निर्णय दक्षिण आफ्रिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं घ्यावा असं ठरलं. न्यायालयानं फाशीच्या गुन्ह्याला बेकायदेशीर ठरवून कुठल्याही माणसाला त्याची शिक्षा म्हणून ठार मारण्यात येऊ नये, असा निर्णय घेतला. यासारख्या अनेक मुद्यांवर चर्चा होऊन 1996 सालच्या ऑक्टोबर महिन्यात नवी राज्यघटना संसदेसमोर चर्चेसाठी आली.

मंडेलाला राष्ट्रपतीपदाची जबाबदारी निभावताना दक्षिण आफ्रिकेसमोरच्या आर्थिक प्रश्नांनी भंडावून सोडलं. डाव्या विचारसरणीमुळे सरकारकडे अर्थव्यवस्थेची सूत्रं असावीत, सगळ्यांना समान संधी असावी, सरकारी, तसंच खासगी उद्योगांनी फक्त स्वत:चा नफा नजरेसमोर न ठेवता, सर्वसामान्य लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी

धडपडावं, अशा प्रकारच्या गोष्टींवर मंडेलाचा खूप भर असे. पण, प्रत्यक्षात या गोष्टी अमलात आणणं खूपच कठीण असल्याची मंडेलाला जाणीव झाली. आधीच्या काळात सत्तेवर असलेल्या सरकारांनी देशावर मोठ्या कर्जाचं ओझं टाकलं होतं. ते फेडता फेडताच सरकारची दमछाक होत असे. आपल्याला पाश्चिमात्य देश भरघोस मदत करतील, अशी मंडेलाला वाटत असलेली आशासुद्धा बऱ्यापैकी फोल ठरली. एकूणच, आपल्याला अपेक्षित असलेली अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था या गोष्टी उभ्या करणं जवळपास अशक्य असल्याचं मंडेलाच्या लक्षात आलं.

सगळ्या जगाला मंडेलाचं सरकार भ्रष्टाचाराच्या चिखलात खोल रुतेल, अशी भीती वाटत होती. कारण बहुतेक सगळ्या आफ्रिकन देशांमध्ये क्रांती घडल्यावर नव्यानं स्थापन झालेलं सरकार भ्रष्टाचारानं बरबटलं असल्याची उदाहरणं बघायला मिळाली होती. शिवाय दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेषी काळात भ्रष्टाचाराला जवळपास अधिकृत दर्जाच मिळाला होता. त्यामुळे मंडेलाच्या कारकीर्दीत भ्रष्टाचाराचं नवं टोक गाठलं जाईल, अशी भीती व्यक्त केली जात होती. 1997 सालच्या ऑगस्ट महिन्यामधल्या एका आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या सर्वेक्षणामध्ये एकंदर 52 देशांपैकी दक्षिण आफ्रिका सगळ्यात कमी भ्रष्ट देशांच्या यादीत वरून 33 वा होता. म्हणजेच, फक्त 19 देशच दक्षिण आफ्रिकेहून जास्त भ्रष्टाचारी होते.

या पार्श्वभूमीवर स्वत: मंडेला तर अजिबातच भ्रष्टाचारी नाही, असं चित्र समोर येत होतं. मंडेलाचं राहणीमान अत्यंत साधं होतं. शिवाय आपल्याला मिळणाऱ्या पगारापैकी एक तृतियांश भाग मंडेला लहान मुलांसाठीच्या एका मदतनिधीलाच देत असे. दरम्यान, आर्चबिशप डेस्मंड टुटू यानं मंत्री; तसंच सरकारी अधिकारी या सगळ्यांना खूप जास्त पगार मिळतो, अशी जाहीर टीका केली. त्यावर मंडेलानं हा विषय टुटूनं आपल्याशी खासगीमध्ये चर्चेसाठी आणला असता, तर बरं झालं असतं, अशी प्रतिक्रिया दिली. टुटूनं मात्र आपण हा विषय काढूनसुद्धा मंडेलानं त्यावर काही केलं नसल्याची प्रतिक्रिया दिली. शेवटी मंडेलानं स्वत:च्या, तसंच सगळ्या मंत्र्यांच्या पगारात कपात करून टुटूची वाहवा मिळवली. तरीही, मंडेलाच्या हाताखाली काम करणाऱ्या काही लोकांनी भ्रष्टाचार केला असल्याचे आरोप व्हायला लागले. अधिकृत कामांसाठी देण्यात आलेला निधी स्वत: हडप करून टाकणाऱ्या लोकांनी मंडेलाला त्रस्त करून सोडलं.

मंडेलाच्या राष्ट्रपतीपदाला एक वर्षाचा काळ व्हायच्या सुमाराला अनेक गोरे दक्षिण आफ्रिकन लोक पार वैतागून गेले होते. गोऱ्या लोकांना गुन्ह्यांचं वाढतं प्रमाण, दक्षिण आफ्रिकेच्या रँड या चलनात होत असलेली जोरदार घसरण, भ्रष्टाचाराची प्रकरणं, आरोग्यसेवा, तसंच शिक्षणक्षेत्र यांच्यामध्ये माजलेली बजबजपुरी या गोष्टींचा वैताग आला होता. इतकी वर्षं सुरक्षित वातावरणात आणि पक्षपाती निर्णयांचा फायदा मिळत असल्यामुळे खूश असलेल्या गोऱ्या लोकांना आता समान संधी असलेल्या समाजाशी जुळवून घेणं कठीण जात होतं. कृष्णवर्णीय लोकांना मात्र आपल्या आयुष्यात चांगले बदल होत असल्याची चिन्हं काही प्रमाणात दिसत होती. प्राथमिक आरोग्यसेवा, शुद्ध पाणीपुरवठा, पूर्वीच्या मानानं नोकऱ्या मिळायची जास्त शक्यता अशा गोष्टींमुळे कृष्णवर्णीय समाज समाधानी होता. पण श्रीमंत उद्योगपती, तसंच परदेशी गुंतवणुकदार यांच्यामध्ये मात्र असमाधानाचं वातावरण होतं. दक्षिण आफ्रिकेची वाढ खुंटली असल्यामुळे आपल्याला या देशात गुंतवणूक करून काही फायदा होणार नाही, असं त्यांचं मत झालं होतं.

दक्षिण आफ्रिकेमध्ये क्रांती घडून मंडेलाचं सरकार आल्यानंतरच्या काळात प्रचंड गाजलेलं प्रकरण म्हणजे 'Truth and Reconciliation Commision (TRC)'; म्हणजेच सत्याचा शोध घ्यायचा प्रयत्न करणाऱ्या समितीची स्थापना आणि या समितीनं नोंदवलेले निष्कर्ष यांचं होतं. वर्णद्वेषाच्या काळातल्या सगळ्या घटनांचा तपास करायची जबाबदारी या समितीवर होती. याची सुरुवात 1996 सालच्या फेब्रुवारी महिन्यात झाली. या समितीच्या निर्मितीमागे प्रचंड वादळं होती. अशा प्रकारची समिती स्थापन करायला डी क्लार्क, तसंच इतर सगळ्या गोऱ्या नेत्यांचा साफ विरोध होता. याचं कारण म्हणजे, या समितीच्या अहवालात पूर्वीच्या वर्णद्वेषी काळातल्या अन्यायी राजवटीविषयी अनेक ताशेरे असणार आणि त्यामुळे आपल्यासकट इतर सहकाऱ्यांना मोठी शिक्षा व्हायची दाट शक्यता निर्माण होणार, याची डी क्लार्कला कल्पना होती. म्हणूनच, या कचाट्यातून वाचण्यासाठी डी क्लार्कनं या समितीचा अहवाल काहीही असला, तरी आपल्याला आणि आपल्या काही वरिष्ठ सहकाऱ्यांना सरकारनं अभय दिलं पाहिजे, अशी मागणी केली होती. शेवटी यातून एक तोडगा निघाला. जर लोकांनी सगळ्या खऱ्या गोष्टी सांगितल्या आणि त्या निव्वळ राजकीय परिस्थितीमुळेच कराव्या लागल्या; असं सिद्ध झालं, तर त्या लोकांना अभय देण्यात येईल असं ठरलं.

मंडेला आणि डेस्मंड टुटू

यामुळे अनेक कृष्णवर्णीय लोक प्रचंड नाराज झाले. कारण आपले गुन्हे सरळ मान्य करून गोरे लोक शिक्षा होण्यापासून आपला बचाव करतील, असं चित्र यातून निर्माण झालं. त्यात तथ्य होतंच, पण मुळातच या समितीचा हेतू कुणालाही न्याय देणं किंवा योग्य शिक्षा ठोठावणं हा नसून, फक्त दडलेलं सत्य बाहेर काढणं हा असल्यामुळे असं घडणं स्वाभाविकच होतं. या समितीचं कामकाज सुरु व्हायच्या आधी मंडेलानं छोटं भाषण करून, त्यात 'आपण सगळे अत्यंत निषेधार्ह घटनांच्या इतिहासाला माफ करु शकतो; पण तो विसरु शकत नाही', असं सूचक प्रास्ताविक केलं.

टीआरसी समिती

पुढच्या दोन वर्षांच्या काळात मंडेलासकट इतर अनेक मोठ्या नेत्यांना अपेक्षा नव्हती; इतक्या मोठ्या प्रमाणावर या समितीनं वेगवेगळी प्रकरणं उकरून काढली. गुन्हेगार आणि त्या गुन्ह्यांचे बळी ठरलेली मंडळी अशा दोन्ही प्रकारच्या लोकांनी अत्यंत क्रूरपणे घडलेले खून, अत्याचार वगैरे गोष्टींची हृदयद्रावक वर्णनं या समितीपुढे केली. समितीच्या कामकाजाला टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्रं, नियतकालिकं यांच्यामध्ये प्रसिद्धी दिली जात असल्यामुळे सर्वसामान्य लोकांपर्यंतही या घटनांची माहिती पोहोचत असे. यात फक्त गोऱ्या लोकांवरच्या आरोपांचाच समावेश होता असं अजिबात नाही. एएनसीनं केलेल्या अत्याचारांच्या घटनांनाही या समितीनं खोदून बाहेर काढलं. एकदा एएनसीच्या परदेशामध्ये असलेल्या 22 सदस्यांना खून, बलात्कार, अत्याचार, बंड, दगाबाजी अशा आरोपांवरून कसं ठार मारण्यात आलं होतं, याची एएनसीनं कबुली दिली. पण अर्थातच, वर्णद्वेषी गोऱ्या लोकांनी केलेल्या अत्याचारांविषयीच्या घटनांचं प्रमाण खूप जास्त होतं.

सरकारच्या आदेशावरून आपण हत्या; तसंच इतर क्रूर अत्याचार कसे केले होते, याची

भयानक वर्णनं पोलीस अधिकारी, तसंच लष्करी अधिकाऱ्यांनी केली. अत्यंत घृणास्पदरीत्या लोकांचा अनन्वित छळ करणं, त्यांचे हालहाल करून त्यांना ठार मारणं, त्यांचा मृत्यू झाल्यावर त्यांच्या शरीराचे अवयव कापणं, जाळणं किंवा त्याची एकूणच विटंबना करणं अशा सगळ्या गोष्टींची माहिती समितीसमोर सादर केली जाई. स्टीव्ह बाईकोची हत्या करणाऱ्या लोकांनी त्या संदर्भातली शिसारी आणणारी वर्णनं केली; तेव्हा सगळेच सुन्न झाले होते! हे सगळे प्रकार सरकारच्या आदेशांवरून घडत असले पाहिजेत आणि त्याला सर्वोच्च पातळीवरून पाठिंबा असला पाहिजे, असा समितीचा सूर होता. त्यानुसार काही मंत्र्यांनी आपली चूक कबूलही केली. एका मंत्र्यानं 'मी या गोष्टींना कधीच पाठिंबा दिला नसला, तरी त्या थांबवण्यासाठी कोणते प्रयत्नसुद्धा केले नाहीत... त्याबद्दल देव मला माफ करेल, एवढीच आशा मला वाटते', अशा शब्दांमध्ये आपल्या चुकांची कबुली दिली. वर्णद्वेषाच्या काळात आपण आता लाज वाटेल असे अनेक निर्णय घेतले असल्याची कबुली तेव्हाच्या पोलीस विभागाच्या मंत्र्यानं दिली, पण काही काळातच या संदर्भातले आदेश आपल्याला थेट डी क्लार्ककडूनच मिळत असल्याचं सांगून या मंत्र्यानं सगळ्यांना मोठा धक्काच दिला.

डी क्लार्क मात्र आपला गुन्हा मान्य करत नव्हता. आपली अनेक धोरणं चुकली असतील किंवा आपण खूनखराबा, बलात्कार, अत्याचार, छळ असले प्रकार थांबवण्यात काही प्रमाणात अपयशी ठरलो असू; पण आपण कधीच हे सगळे निंदाजनक प्रकार घडवून आणण्यासाठी कुणाला सांगितलं नाही, असं डी क्लार्क म्हणत राहिला. आपल्यावर वळत असलेली संशयाची सुई तो सतत दुसरीकडे वळेल यासाठीचे प्रयत्न करत राहिला.

डी क्लार्कच्या आधी सत्तेवर असलेल्या बोथा यानं या समितीच्या सुनावणीसाठी हजर राहायला नकार दिला. आपणही कधीच कोणत्याही अत्याचारी कृत्यांना परवानगी दिली नसल्याचं बोथाचं म्हणणं होतं. या संदर्भात पुढचं पाऊल कसं टाकावं, हे मंडेलाला नीट समजत नव्हतं. मंडेलाच्या हितचिंतकांनी त्याला सावधगिरीचा इशारा देत 'चुकीची पावलं टाकून बोथाला देवत्व प्राप्त करून देण्यासारखं काही करू नकोस' असं सुचवलं. बोथाबरोबर आपणही या सुनावणीला हजर राहायला तयार आहोत, असंही मंडेलानं जाहीर करून बघितलं; पण बोथा बधला नाही. आपल्याविरुद्धच्या समन्सलासुद्धा बोथानं त्याला दाद दिली नाही. मंडेलानंही बोथाला अटक करून त्याला या समितीसमोर उभं करायचं पाऊल मुद्दामच टाळलं. शेवटी

चौकशी समितीनं उपलब्ध असलेली कागदपत्रं आणि अनेक लोकांच्या साक्षी यांच्या आधारे; अनेकदा जाणूनबुजून बोथानंच अत्याचार करण्यासाठी आदेश दिले असल्याचा निष्कर्ष काढला. मूलभूत मानवी हक्कांची पायमल्ली होईल; अशा प्रकारच्या बऱ्याच गोष्टी बोथानं घडवून आणल्या; असं समितीचं म्हणणं होतं.

1998 सालच्या ऑक्टोबर महिन्यात या समितीनं आपला अहवाल पूर्णपणे तपासून संबंधितांपुढे खुला केला. त्यात एएनसीवरही ठपका ठेवण्यात आला. गोऱ्या लोकांच्या पूर्वीच्या वर्णद्वेषी धोरणांवर तर बरेच ताशेरे होते. त्यामुळे सगळेच संबंधित लोक खवळले. आपल्याविरुद्धच्या अहवालातल्या मजकुराला गाळून टाकलं जावं किंवा निदान त्याला जाहीर प्रसिद्धी तरी दिली जाऊ नये, अशी मागणी डी क्लार्कनं केली. ही मागणी न्यायालयानं उचलून धरली. एएनसीनंसुद्धा अशाच प्रकारची मागणी केली. मंडेलाचा या मागणीला विरोध होता. न्यायालयानं एएनसीची मागणी फेटाळून लावली. या समितीच्या कामकाजाच्या प्रमुखपदी असलेल्या डेस्मंड टुटू याला एएनसीच्या मागणीचा खूप राग आला. आपण आता सत्तेवर आहोत म्हणून काहीही करु शकतो, असा एएनसीला भ्रम झाला असल्याचं बोचरं विधान टुटूनं केलं. तसंच, पूर्वी ज्यांच्यावर अन्याय झाला तेच लोक आता लोकांवर अन्याय करण्याची भूमिका स्वीकारु शकतात, हे दिसून येत असल्याबद्दलही टुटूनं नाराजी व्यक्त केली. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. हा अहवाल जाहीर करण्यात येण्याआधी त्यात एएनसीनंच या समितीच्या स्थापनेचा आग्रह धरला होता, ही एएनसीच्या बाजूची गोष्ट अगदी त्रोटकपणे मांडण्यात आली. पण, प्रत्यक्षात हा अहवाल दडपून टाकण्यासाठी एएनसीनं कशी धडपड केली, याविषयी मात्र या अहवालात चांगलीच टिपण्णी करण्यात आली होती.

अल गोर आणि मंडेला हस्तांदोलन करताना सोबत एम्बेकी

एएनसीचा अध्यक्ष असलेल्या आणि दक्षिण आफ्रिकेच्या उपराष्ट्रपतीपदावर असलेल्या थाबो एम्बेकी यानं समितीच्या अहवालावर कडाडून टीका केली. एएनसीच्या विरोधात या अहवालात मांडण्यात आलेले मुद्दे त्यानं खोडून काढले. मंडेलानं मात्र समितीच्या मतांना पाठिंबा दिला. एएनसीच्या लोकांनी हा अहवाल पूर्णपणे वाचलासुद्धा नसल्याची टीका मंडेलानं केली. कारण हा अहवाल पूर्णपणे वाचला, तर त्यात एएनसीवरच ठपका ठेवण्यात आलेला आहे किंवा एएनसीविषयी वाईटच लिहिलं आहे, असं अजिबात घडलं नसल्याकडे मंडेलानं सगळ्यांचं लक्ष वेधलं.

आता या समितीच्या अहवालातून बाहेर आलेल्या निष्कर्षांच्या संदर्भात पुढची पावलं नक्की कशी टाकायची, हा प्रश्न सोडवणं भाग होतं. समितीपुढे आपले दोष मान्य केलेल्या सगळ्या लोकांना सरसकट अभय द्यायची मंडेलाची तयारी पूर्वीपासूनच नव्हती, पण त्याचबरोबर काही ठरावीक लोकांना अभय द्यायचा निर्णय समिती किंवा न्यायालय घेऊ शकेल, असं मंडेलाचं तेव्हापासूनचं म्हणणं होतं.

मंडेलानं अत्यंत धाडसीपणानं टाकलेल्या या पावलांचं कौतुक करावं तितकं कमी आहे. पूर्वी ज्या चुका घडल्या, त्या चुकांचं अत्यंत निष्पक्षपणे मूल्यमापन करून संबंधित लोकांनी त्या

संदर्भात माफी तरी मागावी किंवा शिक्षा भोगावी, असा मंडेलाचा दृष्टिकोन खूपच सरळ होता. त्यात पूर्वीपासून वर्णद्वेष करत आलेल्या गोऱ्या लोकांनाच सगळा त्रास व्हावा; अशी मंडेलाची अजिबात इच्छा नव्हती. जे घडलं ते जगासमोर यावं आणि त्यामुळे सगळ्यांच्या मनात खदखदत असलेला राग बाहेर पडावा, असं मंडेलाला प्रामाणिकपणे वाटत होतं. किती लोकांनी अशा प्रकारचं पाऊल उचलायचं धाडस दाखवलं असतं, हा मोठा प्रश्नच आहे. आपल्या मार्गातल्या काट्याकुट्यांचं मंडेला फुलांसारखंच स्वागत करत होता हे नक्की!

मंडेलाच्या राष्ट्रपतीपदाच्या काळामधलं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पूर्वी जे मंडेलाचे अत्यंत कट्टर विरोधक होते आणि मंडेलाच्या तुरुंगवासाबरोबरच इतर अनेक अडचणींना कारणीभूतसुद्धा होते, त्यामधले अनेक लोक आता मंडेलाच्या हाताखाली काम करत होते! म्हणूनच मंडेला आणि डी क्लार्क हे एकाच मंत्रीमंडळात असावेत, ही गोष्ट अनेक जणांना अजूनही अविश्वसनीयच वाटत होती. अर्थातच, आता आपण राष्ट्रपतीपदावर नाही आणि त्याहून भयंकर म्हणजे मंडेलाच्या हाताखाली आपण आता काम करतो या गोष्टी डी क्लार्कला सहन होत नसत. त्यामुळे तो वारंवार मंडेलाशी वाकडं घेई. याचबरोबर मंडेला विनाकारणच आपल्याशी खुन्नस घेतल्यासारखा वागतो, असं डी क्लार्कला वाटे. त्यामुळे त्या दोघांचे संबंध तणावपूर्णच असत. पण, याचा आपल्या कामकाजावर परिणाम होऊ नये, या गोष्टीची मंडेला बहुतेक वेळा यशस्वीपणे काळजी घेत असे.

1995 सालच्या सप्टेंबर महिन्यातल्या एका घटनेमुळे मात्र मंडेला आणि डी क्लार्क यांच्यामधले बिघडलेले संबंध अगदी चव्हाट्यावरच आले. जोहान्सबर्गमध्ये डी क्लार्कच्या 'नॅशनल पार्टी'वर एका भाषणात मंडेलानं टीका केली. त्यामुळे डी क्लार्क अर्थातच भडकला. त्यानं मंडेलाला टाळायचा प्रयत्न केला, पण मंडेलानं तो हाणून पाडला. त्यानंतर पत्रकार आणि कॅमेरामन यांच्यासमोरच मंडेला आणि डी क्लार्क यांच्यात वादावादी झाली. दोघांनी रस्त्यातच एकमेकांकडे बोटं दाखवून, हातवारे करून आपल्यामधले मतभेद उघड केले. नंतर रस्त्यात ही वादावादी झाल्याचा खेद मंडेलानं व्यक्त केला असला, तरी आपल्या भूमिकेवरून हटायला मात्र तो तयार नव्हता.

डी क्लार्कचं एकीकडे मंडेलाशी पटत नसतानाच त्याच्या पक्षातच त्याच्याविरुद्ध खूप नाराजी पसरली होती. तो आपल्या पक्षाकडे अजिबातच लक्ष देत नाही, तसंच आपल्या पक्षामधल्या सहकाऱ्यांची अजिबात कदर करत नाही, असं चित्र ठळकपणे दिसत होतं. 1996 सालच्या मे महिन्यात 2004 सालापर्यंत 'नॅशनल पार्टी'ला सत्तेमध्ये स्थान मिळणार नाही, अशी तरतूद असलेली राज्यघटना अमलात आल्यावर तर डी क्लार्कच्या विरोधानं नवं टोकच गाठलं. या निर्णयाला पक्षातून कडाडून विरोध करण्यात आला. शेवटी 9 मे 1996 या दिवशी

आपला पक्ष संयुक्त सरकारमधून माघार घेत असल्याचं डी क्लार्कनं जाहीर केलं. यामुळे त्याच्या मंत्रीमंडळातल्या सहकाऱ्यांना मोठा धक्काच बसला. डी क्लार्क असा काही टोकाचा निर्णय घेईल, याची त्यांना अपेक्षाच नव्हती. आपण सरकारला जोरदार विरोध करून खऱ्या अर्थानं लोकशाही आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं डी क्लार्कनं जाहीर केलं, पण प्रत्यक्षात असं घडलं नाही. काही महिन्यांमध्येच 'नॅशनल पार्टी' या पक्षामध्ये प्रचंड दुफळी माजली. काही जणांनी बंडाळीचं निशाण फडकवलं. स्वत: डी क्लार्कनं राजकारणातून निवृत्ती जाहीर केली. खरं म्हणजे, डी क्लार्कच्या निवृत्तीमागचं मूळ कारण वेगळंच होतं. आपल्या मित्राच्या पत्नीशी प्रेमात पडलेला डी क्लार्क या भानगडीमध्ये पुरता रममाण झाला होता आणि त्याला आपल्या सार्वजनिक आयुष्यामधल्या कटकटी नकोशा झाल्या होत्या. त्यामुळे त्यानं आपल्या पत्नीला घटस्फोट देऊन नव्या प्रेमिकेशी लग्न करून टाकलं!

डी क्लार्कच्या निर्णयानं मंडेलाला अर्थातच वाईट वाटलं, पण आपण या प्रकरणात काही करू शकणार नाही, याची त्याला जाणीवही होती. 'नॅशनल पार्टी' शिवायच एएनसी सरकारचा कारभार व्यवस्थितपणे चालवू शकेल, असा मंडेलाचा आत्मविश्वास होता. त्यानं पूर्वी 'नॅशनल पार्टी'च्या लोकांनी सांभाळलेल्या जबाबदाऱ्यांचं वाटप एएनसीच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये केलं. एम्बेकी हा आता एकमेव उपराष्ट्रपती झाला. त्याला डी क्लार्कनं घेतलेला निर्णय पसंतच होता. एएनसी एकट्यानं सरकार जास्त जोमात चालवेल, असं त्याचं म्हणणं होतं. जाताजाता डी क्लार्कनं बुथेलेझीला, तो सरकारमधून कधी बाहेर पडणार? असं विचारलं. पण, जोपर्यंत आपला पक्ष असा निर्णय घेत नाही, तोपर्यंत आपण सरकारमध्ये राहणार असल्याचं उत्तर बुथेलेझीनं दिल्यावर डी क्लार्क जरा खट्टूच झाला. बुथेलेझीचे मंडेलाशी असलेले संबंध चक्क सुधारले. एकदा मंडेला आणि एम्बेकी असे दोघंही देशाबाहेर जात असताना मंडेलानं बुथेलेझीची 'कार्यवाहू राष्ट्रपती' म्हणून नेमणूक केल्यावर बुथेलेझी खूपच खूश झाला होता. हा प्रकार नंतर अनेकदा घडल्यामुळे मंडेला अधूनमधून बुथेलेझीला 'मिस्टर ॲक्टिंग प्रेसिडेंट' असंच म्हणायला लागला!

78 वर्षं वय झालेला मंडेला आता रोजच्या कारभारातून आणखीनच बाहेर पडला. तरुणांना देशाचा कारभार चालवायची संधी दिली पाहिजे, असं तो वारंवार म्हणत असे. त्यानं आता सगळी सूत्रं एम्बेकीकडे दिली होती. पण तरीही, मधूनच एखादा महत्त्वाचा निर्णय मंडेला घेत

असे. लोकही अर्थातच त्याला बिचकून असत. याचं मजेशीर शब्दांमध्ये स्वत: मंडेलानंच वर्णन केलं होतं. त्या संदर्भात बोलताना मंडेलानं आपल्या लहानपणाची आठवण काढली. एका खोपट्यावजा जागेत अनेक मांजरी दिवसभर गडबड करायच्या आणि एक दांडगी; पण म्हातारी मांजर सुस्तपणे पडून असायची. पण मधूनच अचानकपणे ती दांडगी म्हातारी मांजर नुसती त्या इतर मांजरांकडे बघायला जरी लागली, तरी त्या मांजरांमध्ये प्रचंड बेचैनी यायची आणि त्या घाबरून पळापळ सुरु करायच्या. ही गंमतीदार आठवण काढत मंडेलानं, 'आता आपण त्या दांडग्या मांजरीसारखे आहोत आणि आपले सहकारी इतर मांजरांसारखे आहेत', असं विधान केलं!

1997 साली मंडेलानं आपण एएनसीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देणार असल्याचं, तसंच पुढच्या निवडणुकीपूर्वी राष्ट्रपतीपदाला रामराम ठोकणार असल्याचं जाहीर केलं. ही घोषणा तशी अनपेक्षित नव्हती. पण, त्यामुळे एएनसीच्या नेत्यांमध्ये एक प्रकारची रस्सीखेच सुरु झाली. याचं कारण म्हणजे मंडेलानंतर राष्ट्रपतीपदाची जबाबदारी एम्बेकीकडे येणार याविषयी कुणालाच तशी शंका वाटत नव्हती, पण मंडेलानं राष्ट्रपतीपद सोडल्यानंतर एम्बेकी त्याच्या उपराष्ट्रपतीपदावरून हटणार हे नक्की होतं. त्याच्या जागी नव्यानं उपराष्ट्रपती कोण होणार, यावरून वादविवाद सुरु झाले. त्यातून झुलू लोकांच्या वादग्रस्त प्रश्नावर तोडगा काढण्याच्या कामात बऱ्यापैकी यश मिळवलेला आणि झुलू लोकांच्या वसाहतींमध्ये शांतता निर्माण करु शकलेला जॅकॉब झुमा याच्या नावाला एएनसीमधल्या अनेकांची पसंती होती. पण, त्याच सुमाराला मंडेलाच्या काळजात कालवाकालव होईल, अशी एक बातमी आली. विनी मंडेला हीसुद्धा उपराष्ट्रपतीपदाच्या शर्यतीत उतरणार असल्याच्या बातम्या पसरल्या. अनेक वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये विनीची विलक्षण बदनामी झालेली असली, तरी सर्वसामान्य कृष्णवर्णीय लोकांमध्ये विनीची लोकप्रियता अजून कायम होती. त्यांच्या दृष्टीनं विनी म्हणजे संकटं दूर करु शकणारी एखादी देवताच होती. त्यातच एएनसीच्या नेतृत्वाखालच्या सरकारनं सगळीकडे कसा गोंधळ माजवला आहे आणि सर्वसामान्य लोकांच्या अपेक्षांचा कसा चुराडा केला आहे, असा प्रचार विनी करत होती. आपल्यासारखं नेतृत्वच दक्षिण आफ्रिकेला संकटातून बाहेर काढू शकेल, असा विनीचा दावा होता.

एएनसीमधले अनेक वरिष्ठ लोक विनीच्या या धाडसामुळे थक्कच झाले. त्यांनी विनीवर

कडाडून टीका केली. त्यातच मागे मंडेलानं नेमलेल्या चौकशी समितीनं विनीचे अनेक अचाट उद्योगही बाहेर काढले. बीबीसी, तसंच दक्षिण आफ्रिकेमधली राष्ट्रीय टीव्ही वाहिनी या वाहिन्यांशी बोलताना विनीच्या पूर्वीच्या एका सहकाऱ्यानं सनसनाटी आरोप केले. हा सहकारी विनीच्या कुप्रसिद्ध 'मंडेला युनायटेड फुटबॉल क्लब'मध्येही असल्यामुळे त्याच्या म्हणण्याला खूप वजन होतं. आपल्या डोळ्यांदेखत विनीनं त्या गाजलेल्या खून प्रकरणातला खून केला असल्याचं या सहकाऱ्यानं सांगितलं. पण, विनीनं हा सगळा प्रकार म्हणजे निव्वळ खोटेपणा असल्याचं सांगून, त्याला आपण अजिबात महत्त्व देत नसल्याचं जाहीर केलं. पण, एएनसीच्या नंतर झालेल्या निवडणुकीमध्ये विनीनं उपराष्ट्रपतीपदासाठी केलेला दावा मतदानानं फेटाळून लावण्यात आला. अपेक्षेप्रमाणेच जॅकॉब झुमाची पुढच्या निवडणुकीनंतर उपराष्ट्रपतीपदी निवड होणार हे नक्की झालं. याच कार्यक्रमात नंतर मंडेलानं आपण एएनसीमधली जबाबदारी सोडत असल्याचं अधिकृतरीत्या जाहीर केलं.

तुरुंगवासातून आपली सुटका झाल्यावर सहा महिन्यांनी 1990 सालच्या जून महिन्यात मंडेलानं मोझांबिक देशाचा दौरा केला होता. तिथे काही वर्षांपूर्वी मरण पावलेला मोझांबिकचा माजी राष्ट्रपती समोरा माशेल याची पत्नी ग्रेसा माशेल हिच्याशी मंडेलाची प्रथमच भेट झाली होती. 1986 साली गूढ परिस्थितीमध्ये एका विमान अपघातात समोरा माशेलचं निधन झालं होतं. त्या वेळी मंडेलानं ग्रेसाला तुरुंगातून शोकसंदेश पाठवला होता. त्याच्या उत्तरामध्ये ग्रेसानं मंडेलाला 'माझ्या आयुष्यातल्या या अंधाऱ्या प्रसंगी तू प्रकाशाचा आशाकिरण पाठवला आहेस', असं म्हटलं होतं. मंडेलानं मोझांबिकला भेट दिली, तेव्हा ग्रेसा अजूनही आपल्या दु:खातून बाहेर पडायचा प्रयत्नच करत होती. यानंतर दोन वर्षांनी विनीशी मंडेलानं विभक्ती घेतल्यावर मंडेला आणि ग्रेसा यांची परत एकदा भेट झाली. ग्रेसाला दक्षिण आफ्रिकेत मानद डॉक्टरेटचा स्वीकार करण्यासाठी बोलावण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला मंडेलाची उपस्थिती होती. ग्रेसा एका रांगेत इतर जणांप्रमाणेच उभी असताना मंडेला त्या सगळ्यांसमोरून त्यांना अभिवादन करून गेला. त्यानं ग्रेसाला ओळखलं नाही. मंडेला पुढे गेल्यावर कुणीतरी त्याला ग्रेसाविषयी सांगितलं. त्याबरोबर मंडेला लगेच मागे आला आणि त्यानं ग्रेसाशी छोटी बातचीत केली. मंडेलाच्या या कृतीमुळे ग्रेसाला खूपच बरं वाटलं. यानंतर परत एकदा त्यांची भेट झाली आणि या खेपेला मंडेलाला ग्रेसाविषयी आकर्षण वाटायला लागलं.

ग्रेसाच्या सहा मुलांना सांभाळण्याच्या कामात ऑलिव्हर तांबो मदत करत असे. तांबोचं निधन झाल्यावर मंडेलानं ही जबाबदारी स्वत:कडे घेतली. त्यामुळे मंडेलाला ग्रेसाला भेटायची संधी वारंवार मिळायला लागली. तेव्हा 46 वर्षं वय असलेली ग्रेसा मंडेलाहून 27 वर्षांनी लहान होती. ग्रेसाला स्वत:ची मतं असली, तरी ती विनीसारखी हट्टी किंवा आक्रस्ताळी नव्हती. कठीण परिस्थितीमध्ये आपलं शिक्षण पूर्ण केल्यावर ग्रेसा टांझानियामध्ये सुरु असलेल्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाली. तिथेच समोरा माशेलशी ग्रेसाची ओळख झाली. माशेलच्या पत्नीचं नुकतंच निधन झालं होतं. 1975 साली मोझांबिकला पोर्तुगालपासून स्वातंत्र्य मिळाल्यावर माशेलच्या संघटनेचं तिथे सरकार आलं. माशेल देशाचा राष्ट्रपती झाला. ग्रेसाला तिच्या वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी देशाची शिक्षणमंत्री हे पद देण्यात आलं. माशेलला पहिल्या लग्नातून 6 मुलं होती. त्यांना सांभाळण्याच्या बोलीवर ग्रेसानं लवकरच माशेलशी लग्न केलं.

पण, मोझांबिकमध्ये प्रचंड अस्थिरता होती. कृष्णवर्णीय लोकांचं सरकार आल्यामुळे घाबरून गोऱ्या वर्चस्ववाद्यांनी तिथून पळ काढला. एका दशकभराच्या कारभारानंतर माशेलचा गूढ मृत्यू झाला. दक्षिण आफ्रिकन सरकारनं माशेलची हत्या करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याची ग्रेसाची खात्री होती. चार वर्षं काळे कपडे घालून ग्रेसा आपल्या दिवंगत नवऱ्याचा शोक प्रकट करत राहिली. त्यानंतर लहान मुलांसाठी तिनं काम सुरु केलं. लहान मुलांवर युद्धांच्या होणाऱ्या दुष्परिणामांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाबरोबर ग्रेसानं काम सुरु केलं. त्यातूनच मंडेलाच्या लहान मुलांच्या कल्याणासाठीच्या योजनेशी ग्रेसाची ओळख झाली.

विनीला घटस्फोट दिल्यावर 1995 सालाच्या मध्यापासून आपल्या नव्या प्रेमाविषयी मंडेला जाहीर भाष्य करायला लागला. काही सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये मंडेला आणि ग्रेसा एकत्र दिसायचे. दररोज मंडेला ग्रेसाला फोन करायचा. ग्रेसाला मंडेलानं अधिकृतपणे लग्नाची मागणीसुद्धा घातली, पण आपली मुलं आणि आपला देश या गोष्टी सांभाळून हे कसं शक्य आहे, असा प्रश्न ग्रेसाला पडला. आपण कायम मोझांबिकच्या दिवंगत राष्ट्रपतीची पत्नी म्हणूनच ओळखलो गेलो पाहिजे, असं तिचं अंतर्मन तिला सांगत होतं. यातून एक विचित्र मार्ग निघाला. दर महिन्याचे दोन आठवडे ग्रेसा जोहान्सबर्गला येईल आणि मंडेलाबरोबर राहील असं ठरलं. विनी मात्र या घटनाक्रमामुळे चवताळली होती. ती ग्रेसाचा उल्लेख नेहमी 'नरभक्षिका'

किंवा ‘ती पोर्तुगीझ बाई’ असाच करे. मंडेला आणि ग्रेसा यांचे संबंध हा एक मोठा विनोद असल्याचं सांगून आफ्रिकन रीतीरिवाजांनुसार आपणच मंडेलाची अजूनही पत्नी असल्याचा दावा विनी करे. या सगळ्याचा आपल्या मुलांवर विपरीत परिणाम होई, असंही विनी म्हणत असे. पण, आपली सगळी मुलं आता सज्ञान झालेली असून त्यांना एकंदर परिस्थितीचा नीट अंदाज येतो, असं म्हणून मंडेलानं विनीला प्रत्युत्तर दिलं. कहर म्हणजे, देवाच्या नजरेत मंडेला हा आपलाच पती असल्याचं मंडेलाची पहिली पत्नी इव्हलिनसुद्धा म्हणत असे. त्यांच्या घटस्फोटाला तर चार दशकांचा काळ उलटून गेला होता! त्याहून विलक्षण गोष्ट म्हणजे, असं विधान करणाऱ्या इव्हलिननं पुढच्याच वर्षी आपल्या वयाच्या 77 व्या वर्षी नवं लग्न केलं! काही धार्मिक मंडळींनी मंडेलाच्या ग्रेसाबरोबरच्या या अनधिकृत संबंधांना आक्षेप घेतला आणि मंडेलानं तिच्याशी लवकर लग्न करून टाकलं पाहिजे, असा सल्ला त्याला दिला.

मंडेला आणि ग्रेसा

अनेक अधिकृत दौऱ्यांवर मंडेलाबरोबर आता ग्रेसाही जायची. मंडेलाची तब्येत सांभाळणं, त्याच्या मूडची काळजी घेणं, त्याला कसला त्रास होत नाही ना हे बघणं, या सगळ्या जबाबदाऱ्या ग्रेसा आनंदानं सांभाळायची. पण आपला तळ मात्र तिनं मोझांबिकमध्येच ठोकला होता. मोझांबिकमध्ये ग्रेसा एका आलिशान बंगल्यात राहायची. ती तिथे खूप लोकप्रिय होती. मंडेलानं आपल्या या प्रेमाची अधिकृत कबुली अगदी मोकळेपणानं द्यायला सुरुवात केली. 1998 सालच्या एका टीव्हीवरच्या मुलाखतीत याविषयी बोलताना मंडेलानं आपलं ओसाड

वाळवंटासारखं झालेलं आयुष्य फुलासारखं बहरलं असल्याचं विधान केलं. तसंच, ग्रेसा नसेल, तर आपण अत्यंत बेचैन आणि शक्तिहीन आहोत, असं आपल्याला वाटायला लागतं, असंही मंडेला म्हणाला.

मंडेलाच्या जीवनशैलीशी जुळवून घेणं ग्रेसाला कधीकधी त्रासदायक होई. मंडेला सकाळी झोपेतून लवकर उठायचा आणि ग्रेसाला त्याची अजिबात सवय नव्हती. पण तक्रार न करता ती अशा छोट्या गोष्टींशी जुळवून घेई. मंडेला सतत वेळकाळ न बघता देशोदेशीच्या लोकांना फोन करून त्यांच्याशी गप्पा मारत असे. त्याची ही सवय घालवायचा ग्रेसा खूप प्रयत्न करे! मंडेलाच्या राजकारणातल्या निवृत्तीची ग्रेसा आतुरतेनं वाट बघायची. कारण त्यानंतर आपल्याला त्याच्याबरोबर आरामात वेळ घालवता येईल, अशी तिला आशा वाटत असे.

18 जुलै 1998 या दिवशी मंडेलाचा ऐंशीवा वाढदिवस होता. त्या दिवशी ग्रेसा आणि मंडेला यांचं लग्न होणार, अशी एक बातमी सगळीकडे पसरली. मंडेलानं त्या बातमीत अजिबात तथ्य नसल्याचं सांगून, ती फेटाळून लावली. पण, खरं म्हणजे दोन महिन्यांपूर्वीच ग्रेसाचा मंडेलाशी लग्न करण्याला असलेला विरोध मावळला होता आणि त्यांनी हे लग्न करायचं ठरवलं होतं. शेवटी हा लग्नसोहळा पार पडला.

आपल्या मुलींसह मिशेल ओबामा मंडेलांची भेट घेताना

मंडेलाच्या रखरखीत वाळवंटासारख्या आयुष्यातल्या अगदी शेवटच्या टप्प्यात का होईना, पण यामुळे आनंद आला. ग्रेसा आणि मंडेला या दोघांनीसुद्धा अनेक अडचणींचा सामना केलेला असल्यामुळे, तसंच वेगवेगळ्या प्रकारची दु:खं भोगल्यामुळे एकमेकांना सांभाळून घेण्याचं महत्त्व त्यांना चांगलंच माहीत होतं. अर्थातच, हे सगळं प्रकरण विनी मंडेलाला चांगलंच खुपायचं. पण, त्याला मंडेलाचा इलाज नव्हता. विनीनंच आपल्याला घटस्फोट घ्यायला भाग पाडला, हे त्याला माहीत होतं. ग्रेसानं विनीची ही उणीव मंडेलाच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात पुरेपूर भरून काढली!

राष्ट्रपती मंडेलाचं यश-अपयश

मंडेलाच्या राष्ट्रपतीपदाच्या काळात दक्षिण आफ्रिकेमध्ये काही सुधारणा झाल्या का, याविषयी अनेक लोकांनी वेगवेगळी मतं मांडली. मंडेलाच्या राष्ट्रपतीपदाच्या कार्यकालाचं मूल्यमापन नक्की कसं करायचं, याविषयी अर्थातच एकमत नाही. 1999 सालच्या फेब्रुवारी महिन्यात संसदेसमोरच्या आपल्या शेवटच्या भाषणात मंडेलानं आपल्या तुरुंगवासाच्या अखेरच्या दिवसांची आठवण काढली. तेव्हा आपण त्या काळातल्या दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्रपतीसमोर देशाचे दोन तुकडे होऊ नयेत; म्हणून प्रयत्न करण्यासाठी कशी विनंती करत होतो, याविषयी मंडेलानं सांगितलं. कृष्णवर्णीय लोक बहुसंख्य असल्यामुळे त्यांची देशात सत्ता असणं, पण त्याचबरोबर गोऱ्या लोकांना समान हक्क उपलब्ध करून देणं, या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचं आपण वारंवार सांगत आल्याचा उल्लेख मंडेलानं केला. तसंच, आता सगळे लोक समान नागरी हक्क असणं, निष्पक्षपणे पार पडलेल्या निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क असणं, आपली मतं मोकळेपणानं मांडायचं स्वातंत्र्य असणं या सगळ्या गोष्टी अगदी सहजपणे आणि आपले मूलभूत अधिकार असल्यासारखे वापरत असले, तरी यासाठी आपल्या सगळ्यांना किती झगडावं लागलं होतं, याची रास्त आठवण मंडेलानं काढली. तरी अजूनही सगळीकडे गोरे लोक आणि कृष्णवर्णीय लोक यांच्यात असलेल्या असमानतेविषयी, तसंच त्यांच्यात होत असलेल्या रक्तपाताविषयी मंडेलानं दु:ख व्यक्त केलं. जोपर्यंत वर्णद्वेषाची पाळंमुळं खणून त्याला मुळापासून संपवलं जात नाही, तोपर्यंत हे प्रकार सुरूच राहाणार असल्याचं मत मंडेलानं मांडलं.

मंडेलाच्या कारकीर्दीमध्ये अनेक खराब घटना घडल्या, असं अनेक गोऱ्या लोकांचं मत होतं. अर्थव्यवस्थेमध्ये घसरण होणं, गुन्ह्यांच्या प्रमाणात खूप वाढ होणं, गोऱ्या लोकांना अर्थव्यवस्थेमध्ये पूर्वीसारखं चांगलं स्थान नसणं, मोठ्या प्रमाणावरचा भ्रष्टाचार या सगळ्या गोष्टींकडे गोरे लोक बोट दाखवायचे. कृष्णवर्णीयांचं सरकार आलं, तरी आपल्या जीवनमानात फारसा फरक पडणार नाही, तसंच आपण पूर्वीसारखेच चैनीत राहू शकू, असं बहुतेक गोऱ्या लोकांना वाटत असे, पण प्रत्यक्षात चित्र वेगळंच होतं. एखाद्या प्रगतिशील देशाला भरभराट, संकटं अशा सगळ्या गोष्टींचा आलटून पालटून सामना करावा लागतो, तशीच दक्षिण

आफ्रिकेची आता परिस्थिती होती. त्यामध्ये गोऱ्या लोकांना कृष्णवर्णीय लोकांच्या बरोबरीनं सगळ्या संकटांचा सामना करावा लागे. वर्ण, स्थलांतर, अर्थशास्त्र, आरोग्य, शिक्षण अशा अनेक आघाड्यांवर मंडेलानं लढायचे खूप प्रयत्न केले होते, पण तरीही त्याला अनेक अडचणींना सामोरं जावं लागत होतं.

गोऱ्या लोकांचे प्रश्न घेऊन लढणाऱ्या राजकारण्यांचा मंडेलाला भारी संताप येई. दक्षिण आफ्रिकेमध्ये कित्येक पिढ्या घडली नव्हती; अशी सनसनाटी क्रांती घडून कृष्णवर्णीय लोकांचं सरकार आलेलं असताना त्यामुळे झालेल्या बदलाचा सगळ्यांनाच थोडाफार त्रास होणार, असं मंडेला म्हणत असे. त्यात गोऱ्या लोकांना होत असलेल्या त्रासाचं किती कौतुक करायचं, असा प्रश्न तो विचारत असे. देशापुढे असलेल्या अनेक मूलभूत प्रश्नांची उत्तरं मिळवण्यासाठी मंडेलाला आपल्याबरोबर सरकारमध्ये काम करणाऱ्या; पण गोऱ्यांचेच प्रश्न उराशी बाळगून असलेल्या लोकांनी मदत करावी असं वाटे, पण प्रत्यक्षात तसं घडत नसे. गोऱ्या लोकांच्या तुलनेत कृष्णवर्णीय लोकांना मात्र आता परिस्थिती पूर्वीपेक्षा सुधारली आहे असं वाटे.

अर्थकारण, तसंच आजूबाजूची परिस्थिती यांच्यामधलं चंगळवादाचं वाढतं प्रमाण बघून मंडेला अनेकदा उद्विग्न होत असे. जग चंगळवादाला आपलंसं करत असतानाची अनेक दशकं मंडेलानं तुरुंगात काढलेली असल्यामुळे त्याला हा चंगळवाद प्रत्यक्षात अनुभवायला मिळाला नव्हता. अर्थात, वाचनातून आणि इतर लोकांशी झालेल्या चर्चेतून मंडेलाला या परिस्थितीची कल्पना होती. पण, त्या सगळ्या गोष्टींचा स्वत: अनुभव घेतल्यावर मंडेलाला अनेकदा नैराश्य येत असे. आपल्या नातवंडांसकट सगळी नवी पिढी किती मोठ्या प्रमाणावर मौजमजा करण्यातच धन्यता मानते, हे बघून तो संतापत असे. पण त्याचबरोबर जागतिकीकरण, परकीय कंपन्यांची गुंतवणूक, भांडवलशाहीची जागतिक पटावरची अपरिहार्यता या गोष्टी तो नाईलाजानं का होईना; मान्य करत असे. आपण या गोष्टी आनंदानं स्वीकारल्या नाहीत, तर त्या आपल्यावर जबरदस्तीनं लादल्या जातील किंवा त्या न स्वीकारल्यामुळे आपण एकटे पडू याची मंडेलाला जाणीव होती. या आधुनिक अर्थकारणाचा स्वीकार करत असतानाच, त्यातून उभा केलेला पैसा विधायक कामांसाठी वापरावा, ही हुशारी मंडेलानं दाखवली. लहान मुलांसाठी शिक्षण, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधा उभ्या करण्यासाठी मंडेला उद्योगपतींना वारंवार भेटत असे. त्यांनी या कामांमध्ये पैसा ओतावा, यासाठी तो त्यांना प्रवृत्त करे. त्यात मंडेलाला

प्रचंड यश आलं. यामुळे डाव्या विचारसरणीचे अनेक लोक मंडेलावर खट्टू व्हायचे. मंडेला या मोठ्या उद्योगपतींकडून मिळत असलेला पैसा आनंदानं स्वीकारतो; पण त्याच वेळी या उद्योगपतींच्या इतर उद्योगांकडे दुर्लक्ष करतो, अशी टीकाही मंडेलावर होत असे. पण, मंडेला या सगळ्यामध्ये वाहवत गेलेला नव्हता. आधुनिक अर्थकारण आणि त्या अर्थकारणातून योग्य मार्गांनी उभा केलेला पैसा चांगल्या कामांसाठी वापरला गेला पाहिजे, या श्रद्धेपोटीच तो हे सगळं काम करत असे.

बहुतेक गोरे लोक, तसंच इतर टीकाकार यांना दक्षिण आफ्रिकेमधल्या नव्या परिस्थितीमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर फोफावेल, अशी भीती खूप भेडसावून सोडत असे. त्यात तथ्यही होतं. उद्योगांना मोठमोठी कंत्राटं मिळावीत, त्यांना असंख्य बाबतींमधले परवाने मिळावेत, त्यांच्यावर फार कर लादले जाऊ नयेत म्हणून मंत्री, तसंच सरकारी अधिकारी यांना भरपूर लाच खाऊ घातली जाई. एएनसीचे मंत्री या बाबतीत आघाडीवर असल्याचं बघून मंडेलाला धक्काच बसे. या देशामधला सगळा भ्रष्टाचार संपवण्याचा निर्धार करून आपलं सरकार सत्तेवर आलं आणि हा निर्धार केलेले लोकच आता मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करतात, यावर आपला विश्वासच बसत नसल्याचं मत मंडेलानं व्यक्त केलं. तो खूपच निराश झाला. पण, एम्बेकीच्या मदतीनं या भ्रष्टाचाराची पाळंमुळं खणून काढण्यासाठी मंडेलानं खूप प्रयत्न केले. एका न्यायाधीशाला या सगळ्या भ्रष्ट लोकांची चौकशी करण्यासाठी मंडेलानं नेमलं.

1997 साली दक्षिणपूर्व आशियामधल्या 'टायगर इकॉनॉमीज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनेक देशांमध्ये प्रचंड संकटं आली. या सगळ्या अर्थव्यवस्थांमध्ये कमालीची घसरण आली. या देशांची चलनं साफ घसरली. सुरुवातीला या सगळ्याचा दक्षिण आफ्रिकन अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम होणार नाही, असं चित्र दिसत होतं. पण, या काळात दक्षिण आफ्रिकेकडच्या अमेरिकन डॉलर्सच्या साठ्यामध्ये विलक्षण वेगानं घट होत गेल्यामुळे; तिथेही संकट पसरणार, अशी चिन्हं दिसायला लागली. 1998 सालच्या मे महिन्यात सट्टेबाजांनी तुफान वेगानं दक्षिण आफ्रिकेच्या रँड या चलनाची विक्री केली. त्यामुळे डॉलरच्या तुलनेत रँडचं मूल्य 25 टक्क्यांनी घसरलं. साहजिकच, परदेशांमध्ये डॉलर्सची कर्जं घेतलेल्या दक्षिण आफ्रिकन कंपन्यांवर मोठी संकटं आली. त्यामुळे तिथलं वातावरण तंग झालं, अर्थव्यवस्था ढासळली. तरीही, इतर देशांच्या मानानं दक्षिण आफ्रिकेवर आलेलं संकट बरंच कमी होतं, असं म्हणता येईल.

या दरम्यान दक्षिण आफ्रिकेमधली सामाजिक परिस्थितीसुद्धा ढासळत होती. गुन्हेगारांनी अनेक ठिकाणी नुसतं थैमान घातलं होतं. जोहान्सबर्गला तर 'जागतिक गुन्हा केंद्र' अशा कुप्रसिद्ध नावानं ओळखलं जाई. दररोज खून, बलात्कार, मोटार थांबवून लूटमार करणं, बँका तसंच दुकानं लुटणं अशा गोष्टी होत असत. आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या गुन्हेगारी टोळ्या, तसंच अंमली पदार्थांचा व्यापार करणारी मंडळी यांनी नुसता धुडगूस घातला होता. दक्षिण आफ्रिकेच्या आंतरराष्ट्रीय सीमारेषा पुरेशा सुरक्षित नसणं, सरकारचं कायदा आणि सुव्यवस्था यांच्यावर पुरेसं नियंत्रण नसणं; पण दुसरीकडे हे सगळे कारभार करण्यासाठी आवश्यक असलेली अत्याधुनिक अर्थव्यवस्था असणं या गोष्टींमुळे हे गुन्हेगार, तसंच अंमली पदार्थांचे दलाल यांना मोकळं रान मिळे.

पूर्वीपासूनच जोहान्सबर्ग, सुवेटो हे भाग गुन्हेगारीसाठी कुप्रसिद्ध होते. अगदी 1950 आणि 1960 च्या दशकांमध्येसुद्धा ही गुन्हेगारी सुरू असे. पण तेव्हा हे सगळे प्रकार फक्त कृष्णवर्णीय लोकांच्या बाबतीतच घडत असल्यामुळे त्यांच्याकडे फारसं लक्ष दिलं जात नसे. आता अनेक प्रसिद्ध उद्योजक, तसंच समाजामध्ये प्रतिष्ठित म्हणून ओळखले जाणारे गोरे लोक यांची हत्या होणं किंवा त्यांच्यावर हल्ले होणं, यांचंही प्रमाण वाढल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर जोहान्सबर्गची बदनामी व्हायला लागली. घरांमध्ये घुसून लूटमार करणं, रस्त्यावर मोटार उभी केलेली असताना ती अडवून लूटमार किंवा खून करणं, पर्यटकांना लुबाडणं, तसंच त्यांचा खातमा करणं असले प्रकार वाढले. काही ग्रामीण भागांमध्ये गोऱ्या शेतकऱ्यांवर हल्ले सुरू झाले. चार वर्षांच्या काळात अशा 400 शेतकऱ्यांचे खून पाडण्यात आले.

मंडेलाला गुन्हेगारीचा शेवट करण्यासाठी काय करता येईल, या प्रश्नानं घेरून टाकलं होतं. त्यानं 1997 साली एका प्रसिद्ध उद्योगपतीलाच पोलीस विभागाची पुनर्रचना करायचं काम दिलं. हे काम सोपं नसल्याचं आणि ते पटकन होणार नसल्याचं या उद्योगपतीचं मत होतं. यामधला महत्त्वाचा मुद्दा गुन्हेगारीबरोबरच पोलिसांचा त्या सगळ्या प्रकारांमध्ये सहभाग असण्याचा होता. पोलीस विभागामधले अनेक जण दुय्यम दर्जाचे किंवा हे काम करण्याची क्षमता नसलेलेच होते. शिवाय अनेक पोलीस अधिकारी अत्यंत मोठ्या प्रमाणावर स्वत:च भ्रष्टाचारामध्ये सहभागी होते. या पोलिसांच्या प्रशिक्षणामध्ये खऱ्या गुन्ह्यांचा तपास करून गुन्हेगारांचा माग काढण्यापेक्षा आपल्या राजकीय विरोधकांना पकडून त्यांच्यावर अत्याचार

करण्यावरच जास्त भर दिलेला असे. साहजिकच, गुन्हेगारीचा खातमा करण्यासाठीची कौशल्यंसुद्धा त्यांच्याकडे नसत. तसंच, त्यांच्याकडे पुरेशी शस्त्रं नसत. गरिबी आणि खराब सामाजिक परिस्थिती यांच्यामुळे पोलीस अत्यंत खडतर गोष्टींचा सामना करत. 1984-87 या काळात 874 पोलिसांचाच खून झाला आणि आणखी 300 जणांनी आत्महत्या केली, तसंच एकूण पोलिसांपैकी एक चतुर्थांश पोलिसांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला! इतकी खराब परिस्थिती आपण जगात इतरत्र कुठेच बघितली नव्हती, असं मत लंडनमधल्या पोलीस विभागाचा गाजलेला प्रमुख पॉल कॉंडन यानं व्यक्त केलं.

मंडेलाचा माणुसकीवर खूपच भर असल्यामुळे त्यानं गुन्हेगारीमध्ये प्रचंड वाढ होत असूनही खूप कडक धोरणं अमलात आणण्याविषयी ठाम पावलं उचलली नाहीत. इतर अनेक लोकांनी मात्र मृत्युदंडाची शिक्षा नव्यानं सुरु केली जावी, यासाठीची मागणी उचलून धरली. त्यानंच गुन्हेगारांना थोडा तरी वचक बसेल, असं त्यांचं म्हणणं होतं. पण मंडेलानं मात्र ही मागणी फेटाळून लावली. आपण मूलभूत मानवी हक्कांचं कायम समर्थन करत असल्याचं त्यानं ठासून सांगितलं. आपण गुन्हा केला, तर आपण तुरुंगात जाऊ एवढी भीती गुन्हेगारांना गुन्हे करण्यापासून परावृत्त करु शकते, असं मत मंडेला व्यक्त करत असे. त्यासाठी लोकांना मृत्युदंडाची भीती दाखवणं गरजेचं नाही, असं मंडेलाचं मत होतं.

दक्षिण आफ्रिकेमधल्या गुन्ह्यांचं प्रमाण कमी होत नसल्याचं बघून निराश झालेल्या आणि अर्थातच प्रचंड घाबरलेल्या गोऱ्या लोकांनी मोठ्या प्रमाणावर इतरत्र आपला मुक्काम हलवायचं ठरवलं. 1998 सालच्या एका सर्वेक्षणामध्ये दक्षिण आफ्रिकेमधून इतरत्र स्थलांतर करत असलेल्या गोऱ्या लोकांपैकी 96 टक्के जणांनी गुन्हेगारी हेच आपल्या स्थलांतरामागचं प्रमुख कारण असल्याचं सांगितलं होतं. यामुळे अनेक उच्चशिक्षित आणि दक्षिण आफ्रिकेच्या दृष्टीनं अनेक महत्त्वाची कौशल्यं अंगी असलेले हजारो लोक देश सोडून गेले. या प्रकारांमुळे मंडेला प्रचंड वैतागायचा. अशा प्रकारे देश सोडून जाणाऱ्या लोकांना तो 'घाबरट' म्हणायचा. दक्षिण आफ्रिकेत राहून या लोकांनी तिथली परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असं मत तो व्यक्त करायचा. तसंच, दक्षिण आफ्रिकेमधली परिस्थिती खराब असली, तरी मुद्दामच गुंतवणुकदारांनी तिथे गुंतवणूक करु नये, यासाठी या परिस्थितीची घाबरवून सोडणारी अतिरंजित वर्णनं केली जातात, असं मंडेलाचं मत होतं.

या दरम्यान लष्करामधले सगळे अधिकारी आणि जवान दक्षिण आफ्रिकेशी किती प्रमाणात प्रामाणिक आहेत, याविषयीसुद्धा मंडेलाला शंका वाटत असे. कारण लष्करामध्ये असलेल्या गोऱ्या सैनिकांनी देशाशी प्रतारणा केल्याची काही उदाहरणं बघायला मिळत. काही बँकांवरच्या दरोड्यांना लष्कराचा मूक पाठिंबा असल्याचे पुरावेही मंडेलाच्या हाती लागले होते. 5 फेब्रुवारी 1998 या दिवशी मंडेलाच्या हाती एक अहवाल पडला. त्यात कृष्णवर्णीय असलेले काही वरिष्ठ लष्करी अधिकारी सरकारच्या विरोधात कट रचत असल्याची माहिती होती. या कटाला बाहेरून विनी मंडेलाचाही पाठिंबा असल्याचा दावा करण्यात आला होता. तसंच, हा कट यशस्वी करून पुढच्या निवडणुकांमध्ये सत्ता आपल्या ताब्यात घ्यायची, असा या मंडळींचा डाव होता, असं मंडेलाच्या कानावर घालण्यात आलं. पण, मंडेलाला मात्र ही निव्वळ धूळफेक वाटत होती. कृष्णवर्णीय लोकांविषयी विनाकारण संशय निर्माण करण्याच्या हेतूनं हा अहवाल तयार करण्यात आला असल्याचं त्याचं मत होतं. त्यामुळे मंडेलानं या अहवालाची फेरतपासणी करून घेतली. त्यात मंडेलाचा अंदाज खरा ठरला.

अनेक अडचणींचा सामना करून त्यातून मार्ग काढण्यासाठी जिवाचं रान केल्यावर 29 मार्च 1999 या दिवशी मंडेलानं दक्षिण आफ्रिकेच्या संसदेसमोर आपलं समारोपाचं भाषण केलं. 2 जून या दिवशी देशामध्ये नव्यानं निवडणुका होणार होत्या. त्यांच्या तयारीसाठी संसदेच्या अधिवेशनाचं कामकाज लवकर थांबवण्यात आलं. आपल्या या भाषणात मंडेलानं लोकशाहीवादी संस्कृती देशात रुजवण्यासाठी आपल्या पिढीनं खूप धडपड केली असल्याचं सांगून, त्या मार्गावर देशाची वाटचाल सुरु झाली असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं. आपल्या भाषणाचा शेवट मंडेलानं 'अँड द लाँग वॉक कंटिन्युज' अशा शब्दांनी केला. मंडेलाच्या कट्टर विरोधकांनीसुद्धा यानंतर त्याचा गौरव करणारी भाषणं केली.

मंडेलानं अत्यंत कठीण आणि सनसनाटी परिस्थितीमध्ये देशाच्या कारभाराची सूत्रं हातात घेतली होती, यात शंकाच नाही. मंडेलाच्या जागी दुसरा एखादा नेता राष्ट्रपतीपदावर आला असता, तर कदाचित नव्यानं दक्षिण आफ्रिकेची वाटचाल यादवी युद्धाकडे झाली असती, असं मानलं जातं. मंडेलाचा दांडगा अनुभव, त्याचा सहनशीलपणा, त्याची माणुसकी, त्याचा सर्वसमावेशकतेविषयी असलेला आग्रह या गोष्टींमुळेच दक्षिण आफ्रिकेत अराजक माजलं नाही, असं म्हणता येईल. म्हणूनच, मंडेलाच्या राष्ट्रपतीपदाचा काळ ही घटना दक्षिण आफ्रिकेच्याच

नव्हे; तर जागतिक राजकारणाच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाची ठरली. प्राप्त परिस्थितीमध्ये मंडेलानं प्रचंड मोलाची कामगिरी करून दाखवली, याविषयी अभ्यासकांना कोणतीच शंका वाटत नाही!

मंडेलाचं मूल्यमापन

आपण नेल्सन मंडेलाचं मूल्यमापन कसं करायचं? अर्थातच, मंडेलाविषयी उपलब्ध असलेली माहिती, त्याच्या आयुष्यावर लोकांनी लिहिलेली चरित्रं, मंडेलाचं स्वत:चं आत्मचरित्र, दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासाविषयीची पुस्तकं या सगळ्यांमधून जेवढी माहिती उपलब्ध होईल; त्या माहितीच्या आधारे आपण मंडेलाविषयी भाष्य करू शकतो. त्यात काही वेळा काही लेखकांचा पक्षपातीपणा असू शकतो, तसंच माझा स्वत:चा दृष्टिकोनही आड येऊ शकतो. पण, त्याला इलाज नाही. शक्य तितक्या निष्पक्षतेनं मंडेलाचं आयुष्य रेखाटायचा हा प्रयत्न आहे. शिवाय महात्मा गांधीजींचं आयुष्य आणि भारताचा स्वातंत्र्यलढा या गोष्टी जशा वेगळ्या करणं फार कठीण आहे, तसंच मंडेलाचं आयुष्य आणि दक्षिण आफ्रिकेमधला वर्णद्वेषाच्या विरोधातला लढा या गोष्टीही अगदी एकसंध आहेत. त्यामुळे या वर्णद्वेषाच्या विरोधातल्या लढ्यामधल्या अनेक घटनांचा मंडेलाच्या आयुष्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीतीनं प्रभाव पडणं अगदी स्वाभाविकच आहे.

इतर सगळ्या महान नेत्यांप्रमाणेच मंडेलाला आपली प्रतिमा जपण्याची आणि योग्य वेळी योग्य प्रतिमा सादर करण्याची हातोटी साध्य झाली होती, यात शंकाच नाही. कधी वर्णद्वेषाच्या विरोधात शांतपणे; पण ठामपणे उभा राहाणारा नेता, कधी आक्रमक मार्ग अवलंबण्याची तयारी करणारा गनिमी काव्यानं लढणारा नेता, कधी राष्ट्राचं नेतृत्व अत्यंत समर्थपणे करणारा राष्ट्रपती, कधी माणूस म्हणून अत्यंत दयाळू असणारा नेता अशा वेगवेगळ्या प्रतिमा मंडेलानं सादर केल्या. अर्थातच, याचा अर्थ त्या कृत्रिमपणे सादर केल्या असं इथे म्हणायचा उद्देश नाही. पण, कुठल्या वेळी आपल्या वागण्या-बोलण्यातले कुठले पैलू सादर करायचे, याची मंडेलाला चांगलीच जाण होती, हे मात्र नक्की.

मंडेलाला वर्णद्वेषाच्या विरोधात लढून समान नागरी कायद्याचं राज्य स्थापन करण्यासाठी अर्थातच या प्रतिमांची मदत घेणं भाग होतं. कारण मंडेलाचा लढा ज्या वर्णद्वेषी लोकांच्या विरोधात होता, त्या वर्णद्वेषी लोकांनी कित्येक शतकांपासून आपल्याला सोयीच्या असलेल्या, साफ खोट्या प्रतिमा निर्माण करून ठेवल्या होत्या. गोरे लोक हे कृष्णवर्णीयांच्या तुलनेत उच्च दर्जाचे असणं, कृष्णवर्णीय लोकांमध्ये अनेक कमतरता असणं, गोऱ्या लोकांचं कृष्णवर्णीय

लोकांवरचं वर्चस्व ही अत्यंत नैसर्गिक गोष्ट असणं अशा अनेक प्रकारच्या प्रतिमा उभ्या करून त्या खऱ्याच आहेत, असं भासवण्यासाठी वर्णद्वेषी लोकांनी जंग जंग पछाडलं होतं. त्यामुळे या आभासी प्रतिमांच्या विरोधातला लढा यशस्वी करायचा, तर त्यासाठी मंडेलालाही आपल्या स्वत:च्या लढ्याविषयी प्रतिमा उभ्या करणं गरजेचं होतं. पिढ्यान्पिढ्या आपण सुमारच आहोत, असं सांगण्यात आलेल्या आणि त्यामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणावर शारीरिक, तसंच मानसिक खच्चीकरण झालेल्या कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांना दिलासा मिळावा; यासाठी खूप प्रयत्न करणं मंडेलाच्या दृष्टीनं अत्यंत गरजेचं होतं. त्यामुळे गोरे न्यायाधीश, गोरे वकील आणि इतर सगळे गोरे लोक उपस्थित असताना मंडेला मुद्दामच न्यायालयात आफ्रिकन संस्कृतीचं दर्शन घडवणारे पोशाख घालून हजर राहात असे. पण एवढ्यावर काम भागणार नाही याची मंडेलाला लगेचच जाणीव झाली.

इतर काही ठिकाणी बाहेरून आलेल्या लोकांनी जबरदस्तीनं देशाचा कब्जा घेतला असला, तरी दक्षिण आफ्रिकेत या लोकांची सत्ता चांगलीच रुजली होती. त्यांनी अर्थकारण, तसंच लष्कर या दोन महत्त्वाच्या गोष्टींचा पूर्ण ताबा मिळवला होता. साहजिकच, त्यांच्या विरोधातली आपली चळवळ प्रदीर्घ काळ चालू राहील, याची मंडेलाला कल्पना होती. कृष्णवर्णीय लोकांना काहीही करून वर येऊ द्यायचं नाही, हे गोऱ्या वर्चस्ववाद्यांनी ठरवलं होतं, हे मंडेलाच्या लक्षात आलं. अर्थात, गोऱ्या लोकांची सत्ता उलथून टाकण्यासाठी किती लष्करी ताकद लागेल, या संदर्भातला मंडेलाचा अंदाज मात्र साफ चुकला. त्यानं अगदी थोडीच लष्करी तयारी करायचा घाट घातला. तसंच, खऱ्या अर्थानं गनिमी काव्यानं लढायचं असेल, तर त्यासाठी आपण काय तयारी केली पाहिजे; हेसुद्धा मंडेलाला अजिबातच उमगलेलं नव्हतं. त्यामुळे तो बऱ्यापैकी निष्काळजीपणे वावरत असे. त्यातूनच मंडेलाचा ठावठिकाणा दक्षिण आफ्रिकेच्या सरकारपर्यंत पोहोचला आणि मंडेलाला अटक करण्यात सरकारला यश आलं.

अलीकडच्या काळात काही जणांनी मंडेलाच्या कारकीर्दीवर खूप टीका केली आहे. उदाहरणार्थ, ब्रायन वॉल्डन नावाच्या बीबीसीच्या एका विश्लेषकानं मंडेलाच्या लष्करी कारवायांची तयारी करत असतानाच्या बालिशपणावर खूप ताशेरे ओढले आहेत. तसंच, दक्षिण आफ्रिकेमधला वर्णद्वेष संपवण्यात एएनसीची तशी मोठी भूमिका नव्हती, असं वॉल्डनचं म्हणणं आहे. वर्णद्वेषामुळे आपलं नुकसान होत असल्याच्या आणि त्यामुळे हा वर्णद्वेष संपवण्याच्या

निर्णयापर्यंत गोरे लोक आले असल्याचं मत त्यानं व्यक्त केलं. याशिवाय मंडेलाच्या साम्यवादाशी असलेल्या संबंधांविषयी बोलताना मंडेलाची यात फसवणूक झाली असल्याचं मतही वॉल्डननं व्यक्त केलं. कारण 1998 साली कम्युनिस्ट पक्षानं मंडेलाचा विश्वासघात केला, असं वॉल्डन म्हणतो. पण, इतिहासाची पानं चाळली तर वॉल्डनच्या विधानांमध्ये फारसं तथ्य नाही, असं आढळून येईल. मंडेलानं मोठ्या चतुराईनं साम्यवाद्यांचा उपयोग करून घेतला. जेव्हा कृष्णवर्णीयांच्या चळवळीला पाठिंब्याची गरज होती, तेव्हा साम्यवाद्यांशी हातमिळवणी करण्यात मंडेलानं हुशारीच दाखवली होती. साम्यवाद्यांच्या मंडेलाला असलेल्या या पाठिंब्याला दक्षिण आफ्रिकन सरकार, तसंच पाश्चिमात्य देश किती टरकून होते, हे नंतर उघड करण्यात आलेल्या संदेशांवरून दिसून येतं.

मंडेलानं शस्त्रं हाती घ्यायच्या निर्णयावरही टीका केली जाते. पण, यातही मंडेलाची दूरदृष्टी दिसून येते. वेळप्रसंगी आपण आक्रमक होऊ शकतो, हा संदेश मंडेलाला गोऱ्या वर्चस्ववाद्यांपर्यंत पोहोचवायचा होता. तसंच, आक्रमक होऊन हाती शस्त्रं घेण्यानं आपण दक्षिण आफ्रिकेमधला वर्णद्वेष संपवू शकतो, अशा भ्रमातही तो कधीच नव्हता. म्हणूनच, तुरुंगात असताना मंडेलानं सतत सरकारशी चर्चा करण्यावरच भर दिला. पण त्याच्या जोडीला आपण अगदी बचावात्मक मार्गानं ही लढाई लढत राहिलो, तर आपण लेचेपेचे आहोत, असं समजून सरकार आपल्या चळवळीला चिरडून टाकायचा प्रयत्न करेल, याची मंडेलाला जाणीव होती. म्हणूनच हिंसक कारवायांची धमकी सतत डोक्यावर टांगत्या तलवारीसारखी लटकत राहिली नसती, तर गोऱ्या वर्चस्ववाद्यांनी दक्षिण आफ्रिकेत क्रांती घडूच दिली नसती, असं अनेक अभ्यासकांचं मत आहे. या हिंसेमुळेच गोरे उद्योगपती आणि गुंतवणुकदार काळजीत पडले. म्हणूनच, प्रामुख्यानं चर्चा करत राहाणं; पण त्याचबरोबर हिंसेची धमकी देऊन ती प्रत्यक्षात खरी करून दाखवणं असा दुहेरी मार्ग मंडेलानं स्वीकारला.

1962 साली तुरुंगवासाची शिक्षा भोगायला सुरुवात करताना मंडेलाला आपल्या लढ्याची फळं लवकरच मिळतील, अशी आशा वाटत होती. पण, तुरुंगात गेल्यावर हा लढा किती कठीण आणि दीर्घकाळ चालणारा असेल, याची कल्पना मंडेलाला आली. तुरुंगवासाच्या काळात मंडेला खूप विचारी झाला. त्याच्यातला समंजसपणा खूप वाढला. तो घाईनं निर्णय घेईनासा झाला. सर्वसामान्य लोक, टीव्हीचे कॅमेरे, पत्रकारांच्या नजरा या सगळ्यांपासून

जवळपास तीन दशकांचा काळ मंडेला दूर झाला. त्यामुळे माणसानं माणसाशी कसं वागलं पाहिजे, या बाबतीत विचार करण्यासाठी मंडेलाला खूप वेळ मिळाला. समोरच्या माणसाच्या मनात असलेल्या भीती आणि असुरक्षितता या गोष्टींचा उपयोग आपण कसा करून घेतला पाहिजे, या खुबी मंडेलानं आत्मसात केल्या. आपलं कुटुंब आणि आपल्या जवळचे लोक यांना आपण योग्य तो न्याय देऊ शकत नाही, याची मंडेलाला पुरेपूर जाणीव होत राहिली. त्यामुळे तो दु:खीसुद्धा होत राहिला. पण, आपण निवडलेल्या वाटेवरचा प्रवास असाच असणार आणि त्यात अशा गोष्टींचा बळी द्यावाच लागणार याची खूणगाठ त्यानं मनाशी बांधून टाकली.

निवांत क्षणी

हळूहळू आपण आपलं रक्त गरम होऊ न देता थंड डोक्यानं विचार कसा करायचा; यासाठीची तंत्रं मंडेला शिकला. त्यानं जाणीवपूर्वकरीत्या आपल्या एकट्याची प्रतिमा खूप उजळ करून आपल्या सहकाऱ्यांचं महत्त्व कमी करायचा इतर अनेकांना झालेला मोह टाळला. उलट तो सतत 'मी' ऐवजी 'आम्ही' हाच शब्दप्रयोग करायला लागला. नंतर अचानकपणे त्यानं एकट्यानंच सरकारशी बोलणी सुरू केली, तेव्हा मात्र मंडेलानं ही जबाबदारी स्वत:च्या खांद्यांवर घेतली होती. त्या वेळी आपण एकट्यानंच हे काम पुढे नेलं पाहिजे, याची जाणीव मंडेलाला झाली होती. कारण आपल्या सहकाऱ्यांकडून या कामासाठी अनुकूल प्रतिसाद मिळणार नाही, हे त्याला उमगलं होतं. त्या वेळी मंडेला आपला विश्वासघात करत असल्याची किंवा तो

आत्तापर्यंतच्या चळवळीच्या सगळ्या यशावर पाणी फिरवत असल्याची भावना त्याच्या काही सहकाऱ्यांच्या मनात यायला लागली होती. पण, त्यात काही तथ्य नसल्याचं मंडेलानं आपल्या कृतींमधून दाखवून दिलं.

तुरुंगात जातानाचा मंडेला आणि तुरुंगातून बाहेर पडलेला मंडेला यांच्यात अर्थातच कमालीचा फरक होता. या काळात मंडेलानं धूर्तपणानं अनेक निर्णय कसे घ्यायचे हे तर जाणून घेतलं होतंच, पण शिवाय त्याचा नवा मानवतावाद आणि त्याचा साधेपणा या गोष्टी बघून त्याला ओळखणारे लोक थक्कच व्हायचे. तुरुंगात रवानगी होण्यापूर्वी मंडेलामध्ये असलेली आक्रमकता, तसंच त्याच्यामधला गर्व हे सगळं आता पार विरघळून गेलं होतं. समोरच्या माणसाला पटकन आपलंसं करण्याची हातोटी त्याला आता साध्य झाली होती. आपल्या भावना आणि आपल्या मनात सुरु असलेलं मानसिक द्वंद्व या गोष्टी कशा हाताळायच्या, याची गुरुकिल्लीच जणू मंडेलाला आता सापडली होती.

सत्ता हातात आल्यावर किंवा ती हातात यायची चिन्हं दिसायला लागल्यावर इतर अनेक विकसनशील देशांमधल्या नेत्यांची अवस्था किती सैरभैर होते, याची लोकांना जाणीव होती. मंडेलाच्या बाबतीतसुद्धा असंच काहीतरी घडेल, असं काही लोक म्हणत असत. पण, या नेत्यांमध्ये असलेला दिखाऊपणा, अहंमन्यपणा किंवा सत्तेविषयी वाटणारं भय यातलं काहीच मंडेलामध्ये दिसत नसे. एखाद्या साध्यासुध्या नव्या जबाबदारीला सामोरं जावं; इतक्या सहजपणे मंडेलानं देशाच्या कारभाराची सूत्रं हाती घेतली. मंडेलाचा नेहमी लोकांच्या चांगुलपणावर विश्वास ठेवून काम करण्यावर भर असल्याचा काही जणांनी गैरफायदाही घेतला. पण त्याचबरोबर, अनेक लोकांना आपल्यामध्ये असलेले छुपे गुणसुद्धा मंडेलामुळे समजले, याचाही उल्लेख केला पाहिजे. कुठल्या क्षणी काय केलं पाहिजे, याची विलक्षण जाणीव मंडेला दाखवे. रग्बीचा सामना बघायला येताना रग्बी खेळाडूंसारखा पोशाख घालणं, टीव्हीवरच्या वादविवादांनंतर शेवटच्या क्षणी डी क्लार्कचा हात हातात घेऊन त्याला नि:शब्द करून टाकणं, अशा अनेक गोष्टींनी मंडेला जगाला जिंकून घेई.

मंडेलाचा सगळ्यात मोठा गुण म्हणजे आपल्या तत्त्वांशी प्रतारणा न करण्याचा होता. मंडेलाच्या प्रदीर्घ तुरुंगवासाच्या काळात जगभरात अनेक नेते आले आणि गेले. अनेक नेत्यांनी मोठमोठी वक्तव्यं करून क्रांती घडवली, सत्ताही कमावली. पण, काही काळातच ही मंडळी

आपली मूळ तत्त्वंच विसरून गेली. त्यामुळे हे लोक भरकटत गेले. मंडेलानं मात्र अगदी विपरीत परिस्थिती येऊनसुद्धा आपली तत्त्वं कधीच सोडली नाहीत. आपल्या विचारांवर तो नेहमी ठाम राहिला. कधीकधी मंडेलाच्या या ठामपणामुळे त्याचे सहकारी दुखावलेही जात. यामुळे काही लोकांना मंडेलानं गमावलंसुद्धा. पण म्हणून; मंडेला आपल्या तत्त्वांशी तडजोड करायला कधीच तयार झाला नाही. त्यानं कायम आपण ठरवलेल्या मार्गावरूनच जात राहायचं ठरवलं. म्हणूनच, दक्षिण आफ्रिकेत क्रांती घडू शकली. मंडेलानं आधीच 'शॉर्ट कट' घ्यायचा किंवा अनेक मोहांना बळी पडायचा निर्णय घेतला असता, तर कदाचित दक्षिण आफ्रिकेचा इतिहास अगदी वेगळाच झाला असता.

आपल्या राष्ट्रपतीपदाच्या काळात मंडेलानं आपल्या सरकारकडून होत असलेल्या चुका अगदी सहजपणे मान्य केल्या. त्याबद्दल तो स्वत:ही टीका करे. पण, मंडेलाला स्वत: या कारभारात बारकाईनं लक्ष घालायची कल्पना पटत नसे. एखाद्या पंतप्रधानापेक्षा किंवा राष्ट्रपतीपेक्षा मंडेला देशाचा राजा असावा; त्या प्रकारे कामकाज करत असे. म्हणजेच, आपल्या हाताखालच्या लोकांना मार्गदर्शक तत्त्वं आखून देणं, त्यांनी काय आणि कसं काम केलं पाहिजे, याविषयी त्यांना नीट कल्पना देणं आणि त्यानंतर त्यांच्या कारभारात लुडबूड न करता दुरून तो कसा सुरु आहे, याकडे लक्ष देणं अशी मंडेलाची कामाची पद्धत असे.

1998 साली मंडेलानं 'लाँग वॉक टू फ्रीडम' हे आपलं आत्मचरित्र लिहिल्यानंतरचा प्रवास शब्दबद्ध करायची तयारी सुरु केली. 1994 साली राष्ट्रपतीपदी मंडेलाची निवड झाल्यापासून तो निवृत्त झाल्यापर्यंतचा काळ मंडेला या पुस्तकामध्ये विचारात घेणार असं ठरलं. या पुस्तकाचं नाव 'द प्रेसिडेंशियल इयर्स' असावं, असं मंडेलाचं मत होतं. पण, प्रत्यक्षात हे पुस्तक पूर्ण झालंच नाही. राष्ट्रपतीपदावरून निवृत्ती स्वीकारल्यावर दक्षिण आफ्रिकेमध्ये वेगवेगळ्या पातळ्यांवर सुरु असलेले संघर्ष मिटवण्यासाठी काम करणं, आपल्या अनेक कल्याणकारी आणि सामाजिक योजनांचं काम बघणं, तसंच सतत भेटायला येत असलेल्या लोकांशी चर्चा करणं, यातच मंडेलाचा बहुतेक वेळ खर्च होत असे. त्यामुळे हे पुस्तक लिहिण्यासाठी लागणारा वेळ मंडेला देऊ शकला नाही.

अनेक देशांमधल्या नेत्यांना, तसंच लोकप्रिय लोकांना भेटून मंडेला विविध विषयांवर त्यांच्याशी बोलणी करे. जगभरातून त्याला कित्येक मोठमोठे लोक भेटायला येत. स्वत:

मंडेलाही ठिकठिकाणी प्रवास करून अनेक जणांना भेटे. अर्थातच, मंडेलाला या सगळ्या गोष्टी करायला खूप आवडत. 2003 साली बीबीसीला दिलेल्या एका मुलाखतीत मंडेलानं 'मी निवृत्त झालो आहे खरा... पण रोज सकाळी उठल्यावर आता आपण काय करायचं, असा प्रश्न मला पडला; तर मला आपण जगायचं तरी कशाला, असं नक्कीच वाटेल...', असं विधान केलं होतं. यातूनच सतत कार्यरत राहायची मंडेलाची इच्छा आपल्याला दिसून येईल. सतत उद्योगी नसलो, तर आपण अत्यंत अस्वस्थ होऊ, असं मंडेला आपल्या सेक्रेटरीला नेहमी बोलून दाखवे. ती बिचारी मंडेलानं आपल्या वयाची कदर करून जरा आराम करावा किंवा अधूनमधून तरी विश्रांती घ्यावी, यासाठी प्रयत्न करे. पण, मंडेला तिला अजिबात दाद देत नसे. त्याला कायम कसला ना कसला उद्योग केल्याशिवाय अजिबात चैन पडत नसे. शेवटी त्या सेक्रेटरीनं हार मानून मंडेलाला सल्ले देणं बंद करून टाकलं!

अर्थात, निवृत्तीच्या काळात ग्रेसा या आपल्या पत्नीबरोबर जास्त वेळ घालवणं मंडेलाला शक्य झालं. तिच्या सहवासामुळे मंडेला एकदम खूश आणि आश्वस्त दिसे. ग्रेसानंही 'आमच्या दोघांचीही आयुष्यं स्वतंत्रपणे उद्ध्वस्त झालेली असताना आम्ही दोघं एकमेकांना भेटलो ही खूप चांगली गोष्ट झाली', अशा शब्दांमध्ये आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. आपापला एकटेपणा दूर झाल्यामुळे आपल्या दोघांचीही आयुष्यं नव्यानं समृद्ध झाली असं ग्रेसाला वाटे.

दक्षिण आफ्रिकेत काही वर्षांपूर्वीपासून एड्सच्या रोगानं थैमान घातलं होतं. विशेषत: कृष्णवर्णीय लोकांमध्ये योग्य ती काळजी न घेतल्यामुळे या रोगाच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली होती. मंडेलानं आपल्या राष्ट्रपतीपदाच्या काळात त्याकडे हवं तेवढं लक्ष दिलं नाही, अशी टीका केली जाते. कदाचित त्याची जाणीव झाल्यामुळे नंतरच्या काळात मंडेलानं आपल्या निवृत्तीनंतरच्या कामात एड्सचा प्रसार रोखण्यावरही भर दिला. 2005 साली 54 वर्षं वयाचा मंडेलाचा मुलगाच एड्सनं दगावला. तेव्हा ही गोष्ट लपवून न ठेवता मंडेलानं लगेचच त्याविषयी जाहीर वाच्यता केली आणि लोकांनी या महाभयानक संकटाशी धीटपणे लढलं पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा मंडेलानं आपल्या निवृत्तीनंतर महत्त्वाची भूमिका पार पाडली. 2003 साली जॉर्ज डब्ल्यू बुश आणि टोनी ब्लेअर या दोघांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आदेशाकडे साफ दुर्लक्ष करून इराकवर हल्ला करायचं चुकीचं पाऊल उचलल्यावर मंडेलानं

त्यांच्यावर सडकून टीका केली. मंडेलानं या संदर्भात बुशचं वर्णन 'कुठलीही दूरदृष्टी नसलेला, विचार करायची क्षमता नसलेला हा अमेरिकन राष्ट्रपती सगळ्या जगाला नरसंहाराच्या नव्या छावणीमध्ये घेऊन चालला आहे', असं अगदी स्पष्ट शब्दांमध्ये केलं होतं. अमेरिकेच्या मानवी हक्कांची वारंवार पायमल्ली करण्याच्या आततायी कृतींवरही मंडेला तुटून पडला. जगभरात अत्यंत क्रूर आणि अन्यायी, एकतर्फी कारवाया केल्याबद्दल मंडेलानं अमेरिकेची तीव्र शब्दांमध्ये निंदा केली. मंडेलाच्या या विधानांमुळे जगभर खळबळ माजली. 'न्यूजवीक' या अमेरिकेमधल्या लोकप्रिय साप्ताहिकाला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये मंडेलानं अमेरिकेवर आणखी टीका केली. जगभरातल्या शांततामय मार्गांनी प्रश्न सोडवण्यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांमध्ये अमेरिका नेहमी खोडा घालत असल्याची आणि विनाकारण हिंसक मार्ग अवलंबत असल्याची खरमरीत टिप्पणीही मंडेलानं केली. तरीही, मंडेलाच्या विरोधात काही बोलायची अमेरिकेची हिंमत झाली नाही.

फिडेल कॅस्ट्रो, ह्युगो चॅवेझ, नेल्सन मंडेला यांच्यासारखे अगदी मोजके अपवाद वगळता इतर कुणाची अशा प्रकारची वक्तव्यं अमेरिकेनं सहन केली असती असं वाटत नाही! आपण आता दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्रपतीपदी नसल्याचा फायदा उठवून मंडेलानं आपल्या विधानांमध्ये आता आणखी धार आणली. त्यानं तेव्हाचा ब्रिटिश पंतप्रधान टोनी ब्लेअर याचं वर्णन 'अमेरिकेचा परराष्ट्रमंत्री' अशा भाषेत करून ब्लेअरच्या खऱ्या हेतूचा पर्दाफाश केला. यामुळे अस्वस्थ झालेल्या ब्लेअरनं फोनवरून मंडेलाशी संपर्क साधून त्याच्याशी चांगले संबंध प्रस्थापित करायचा प्रयत्न केला. पण, त्यामध्ये मंडेलानं अजिबात रस दाखवला नाही आणि आपली भूमिका स्पष्ट केली.

लीबिया हा देश अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देशांच्या नजरेतून नेहमीच दहशतवादी मानला जाई. लीबियाविषयीचं हे चित्र बदलून टाकण्यात मंडेलानं महत्त्वाची भूमिका अदा केली. यामुळे अमेरिकेनं आपल्या दहशतवादी देशांच्या यादीतून लीबियाचं नाव काढून टाकलं. इंग्लंड आणि फ्रान्स यांनी लीबियाला शस्त्रं पुरवली. अनेक पाश्चिमात्य देशांनी लीबियाबरोबर व्यापार सुरु केला. अर्थात, 2011 साली याच पाश्चिमात्य देशांनी लीबियाला परत एकदा दहशतवादी देश ठरवून तिथे आक्रमण केलं आणि कर्नल गद्दाफी या तिथल्या हुकूमशहाला ठार करवलं हा भाग वेगळा!

आंतरराष्ट्रीय पातळीवर मंडेलानं अनेक कठीण प्रश्नांमध्ये तडजोड घडवून आणण्यात महत्त्वाचा वाटा उचलला. पण त्याचबरोबर, पॅलेस्टाईनच्या लढ्याचं नेतृत्व करणारा यासर अराफात, लीबियाचा राष्ट्रपती कर्नल गद्दाफी, क्यूबाचा राष्ट्रपती फिडेल कॅस्ट्रो अशा अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देश यांच्या नाकात दम आणणाऱ्या नेत्यांबरोबर मंडेलानं सलोख्याचे संबंध निर्माण करून अमेरिका आणि इतर पाश्चिमात्य देश यांचा रागही ओढवून घेतला.

राष्ट्रपतीपदाची जबाबदारी सांभाळतानाच मंडेलानं आपण फक्त पाच वर्षांसाठी या पदावर राहू ही गोष्ट स्पष्टपणे सांगितली होती. तसंच, आपल्या कार्यकाळात मंडेलानं एम्बेकीला आपल्या हाताखाली तयार केलं होतं. बहुतेक सगळे निर्णय आणि रोजचा कारभार या गोष्टी एम्बेकीच करत असे. महत्त्वाच्या, तसंच अडचणीच्या काळात एम्बेकी मंडेलाचा सल्ला घेत असे. साहजिकच, मंडेलाच्या राष्ट्रपतीपदाची मुदत संपायच्या सुमाराला मंडेला आणि एम्बेकी यांच्यामध्ये सत्तेवरून संघर्ष होण्याचा काही प्रश्नच नव्हता. स्वत: मंडेलानंच एम्बेकीकडे अगदी आनंदानं सत्ता सोपवली होती. पण म्हणून, मंडेला आणि एम्बेकी यांच्यामधलं नातं अगदी चांगल्या संबंधांचं होतं असं मात्र नाही. एकदा मंडेलाच्या निवृत्तीनंतर त्याच्या सत्कारासाठी आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात एम्बेकी पाऊण तास उशीरा आला. मंडेलाला हे अजिबात आवडलं नाही. त्यानं आपल्या भाषणात सरळ 'काही लोक जाहीर कार्यक्रमांना मुद्दाम उशीरा येतात... म्हणजे मग सगळे लोक त्यांची दखल घेतील असं त्यांना वाटतं...', अशा शब्दांमध्ये एम्बेकीची हजेरी घेतली.

नंतर एकदा एएनसीच्या एका कार्यक्रमात एम्बेकीचं भाषण सुरु असताना व्यासपीठावरच्या अध्यक्षाकडे एक चिठ्ठी देण्यात आली. त्यात एका हेलिकॉप्टरमधून जवळच्या भागात मंडेलाचं आगमन झालं असल्याचा संदेश होता. त्यामुळे एम्बेकीचं भाषण थांबवून लवकरच मंडेलाचं व्यासपीठावर आगमन होत असल्याची बातमी सभेच्या अध्यक्षानं जाहीर केली. त्यामुळे उपस्थित असलेले लोक खूप खूश झाले. त्यांनी मोठ्यानं मंडेलाच्या गौरवाप्रित्यर्थ गाणी म्हणायला आणि जल्लोष करायला सुरुवात केली. नाईलाजानं एम्बेकीला हा सगळा प्रकार थांबेपर्यंत खुर्चीत बसून राहावं लागलं. काही काळानंतरच एम्बेकीला आपलं अर्धवट राहिलेलं भाषण पुढे सुरु ठेवणं शक्य झालं.

ठरल्याप्रमाणेच मंडेलाकडून एम्बेकीकडे राष्ट्रपतीपदाची जबाबदारी 1999 साली कुठल्याही

अडचणींविना आली होती. पण एम्बेकीनंतर ही जबाबदारी जॅकॉब झ्युमाकडे मात्र सरळपणे आली नाही. एम्बेकीचा राष्ट्रपतीपदावर टिकून राहायचा बेत होता. त्यामुळे त्यानं हे पद सोडायला नकार दिला. त्यामुळे एम्बेकीच्या विरोधकांनी या संदर्भात रान उठवलं. एएनसीमध्ये अंतर्गत फूट पडली. मंडेलानं एएनसीमध्ये भांडणं होऊ नयेत, तसंच सगळ्यांनी एकीनं वागावं; यासाठी घालून दिलेल्या धोरणांचं सरळसरळ उल्लंघन होत असल्याची चिन्हं दिसायला लागली. मंडेलाची या लढ्यात झ्युमाला पसंती होती. पण, आता थकलेला आणि विस्मरणाचा त्रास होत असलेला मंडेला एम्बेकी विरुद्ध झ्युमा या संघर्षातला फुटबॉल बनून राहील, अशी भीती मंडेलाचे समर्थक व्यक्त करायला लागले. झ्युमाच्या विरोधात पैशांची अफरातफर केल्याचे, तसंच बलात्कार केल्याचे आरोप होते. त्या संदर्भात कोणतंही भाष्य करायचं मंडेलानं टाळलं. नंतर हे आरोप सिद्ध झालेच नाहीत.



आत्मचरित्र

2009 साली दक्षिण आफ्रिकेत निवडणुका होणार होत्या. त्यानंतर राष्ट्रपतीपदाची माळ एम्बेकीच्या गळ्यात पडणार की झ्युमाच्या गळ्यात पडणार हे अजून नक्की नव्हतं. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी आणि एएनसीमध्ये एकीचं वातावरण निर्माण करण्यासाठी

2008 सालच्या ऑगस्ट महिन्यात मंडेलाचा नव्वदावा वाढदिवस जोरानं साजरा करायचा कार्यक्रम एएनसीनं आखला. शेवटी या सत्तासंघर्षात झ्युमाची सरशी झाली.

आपल्या वयाच्या आठव्या दशकात तोपर्यंत जिवंत राहिलेल्या बहुतेक सगळ्या माणसांना मृत्यूचे वेध लागलेले असतात. मंडेलानं मात्र या काळात दक्षिण आफ्रिकेमध्ये क्रांती घडवायचा चमत्कार करून दाखवला. पण मंडेला हासुद्धा माणूसच आहे याची जाणीव करून देणाऱ्या घटना घडायला लागल्या. मंडेलाचे बहुतेक सगळे जुने सहकारी दगावले होते. त्यांच्यापैकी वॉल्टर सिसुलूच्या निधनानं मंडेलाला सगळ्यात जास्त त्रास झाला. आपल्यामधला एक हिस्सा मेला, असं मंडेलाला त्यानंतर वाटायला लागलं. 1985 साली अंडकोषाच्या कर्करोगाची शक्यता, तसंच 1988 सालचा क्षयरोग या गोष्टींमुळे मंडेला पूर्वी तुरुंगातच दगावेल असं वाटत असताना तो त्यातून बाहेर आला होता. 2001 साली मात्र मंडेलाला अंडकोषाचा कर्करोग झाला असल्याचं निदान डॉक्टरांनी केलं. तरीही मंडेलानं त्यावरच्या रेडिएशनच्या वेदनामय उपचारांना चांगला प्रतिसाद दिला. 2004 सालापासून मंडेलाची तब्येत घसरणीला लागल्याची चिन्हं दिसत होती. तो अधिकाधिक कृश दिसायचा. त्याचे सगळे केस पांढरे झाले होते. चालताना मंडेलाला काठीचा सहारा घ्यावा लागायचा. त्याला स्मृतिभ्रंशाचा त्रास होत होता. आता मंडेलानं जाहीर कार्यक्रमांना हजेरी लावणं कमी केलं. तसंच, मंडेलाला भेटायला उत्सुक असलेल्या लोकांना यासाठीची परवानगी बहुतेककरून मिळेनाशी झाली. अगदी जवळच्या लोकांनाच मंडेला भेटत असे.

थकलेला मंडेला ग्रेसासह

पण, 2010 साली फुटबॉलची विश्वचषक स्पर्धा भरवायचा मान मिळवण्यासाठी दक्षिण आफ्रिकेची धडपड सुरु झाल्यावर मंडेलाशिवाय दुसरा कुठला माणूस यासाठीचा प्रचार करण्यासाठी नजरेसमोर येणं शक्यच नव्हतं. मंडेलानंही या संदर्भात अगदी आघाडीवर येऊन आपल्या देशालाच हा मान मिळावा; म्हणून जोरदार प्रयत्न केले. 2006 सालच्या विश्वचषक स्पर्धेचं आयोजन करण्यासाठी पूर्वी दक्षिण आफ्रिकेनं खूप धडपड केली होती. पण, अगदी थोडक्यात जर्मनीनं या शर्यतीत दक्षिण आफ्रिकेला हरवलं होतं. 1976 साली दक्षिण आफ्रिकेवर तिच्या वर्णद्वेषी धोरणांमुळे फुटबॉलशी संबंधित असलेल्या स्पर्धांचं आयोजन करणाऱ्या 'फिफा' या संघटनेनं बंदी घातली होती. या सगळ्या कटू आठवणींचा विसर पडण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत ही स्पर्धा भरणं खूप गरजेचं होतं. शेवटी मंडेलाचा इथेही विजय झाला. दक्षिण आफ्रिकेलाच हा मान मिळाला. त्यामागे मंडेलाची उपस्थिती आणि त्याच्या नावाचा दबाव या गोष्टींचा प्रचंड मोठा वाटा होता यात शंकाच नाही. अनेक जणांनी अशा अर्थाची विधानंही केली.

एकीकडे मंडेला अधिकाधिक थकत चाललेला असतानाच, दुसरीकडे त्याची लोकप्रियता आणखीनच वाढत चालली होती. वेगवेगळे कार्यक्रम, कलाकुसर, चित्रपट, कथा, पुस्तकं, टीव्ही कार्यक्रम अशा अनेक माध्यमांमधून मंडेलाचा जगभर गौरव होत होता. 2009 साली 'इन्व्हिक्टस' नावाच्या एका हॉलीवूड पटात मंडेलाच्या चळवळीचा गौरव करण्यात आला. 2009 साली संयुक्त राष्ट्रसंघानं 18 जुलै हा मंडेलाचा वाढदिवस इथून पुढे 'नेल्सन मंडेला इंटरनॅशनल डे' म्हणून साजरा केला जाईल, असं जाहीर केलं.

अखेरचे दिवस

2009 सालच्या जानेवारी महिन्यात बराक ओबामानं अमेरिकन राष्ट्रपतीपदाची सूत्रं हाती घेतल्यावर अनेक जणांना इतिहासातलं एक वर्तुळ पूर्ण झाल्यासारखं वाटलं. गोऱ्या लोकांनी कृष्णवर्णीय लोकांना गुलाम बनवून त्यांच्यावर अनन्वित अत्याचार करणं, तसंच त्यांच्या कष्टांवर आधारलेली अर्थव्यवस्था उभी करून स्वत: त्याचे फायदे घेणं इथपासून झालेल्या सुरुवातीनंतर कित्येक दशकांनी आता एक कृष्णवर्णीय माणूस जगातल्या सगळ्यात महत्त्वाच्या आणि ताकदीच्या जागेवर जाऊन पोहोचला होता. मंडेलाविषयी ओबामाला खूप आदर होता. मंडेलाच्या एका पुस्तकासाठी लिहिलेल्या प्रस्तावनेमध्ये मंडेलाची भेट होण्यापूर्वीपासूनच आपल्याला मंडेलाविषयी विलक्षण कुतूहल असल्याचा उल्लेख ओबामानं केला. त्यातही

मंडेलाच्या आयुष्यातली सगळ्यात जास्त भावलेली गोष्ट म्हणजे बदला घ्यायची आणि आपला सूड उगवायची संधी चालून आलेली असताना मंडेलानं आपलं मन मोठं करून, उलट आपल्याशी वाईट वागलेल्या लोकांशी चांगलंच वागून जगासमोर नवा आदर्श घालून दिला असल्याचं ओबामानं नमूद केलं. आपली तत्त्वं ही आपल्या हातात असलेल्या सत्तेहूनही मोठी असतात, हे मंडेलानं सगळ्या जगाला शिकवलं असल्याचा आदरपूर्ण उल्लेख ओबामानं केला. रोनाल्ड रीगनच्या काळात एएनसीच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना अमेरिकेमध्ये सहजासहजी प्रवेश मिळू नये; यासाठी कायदा करण्यात आला होता. त्यानुसार एएनसी ही दहशतवादी संघटना असून, तिच्यासाठी काम केलेल्या कोणत्याही माणसाला अमेरिकेत प्रवेश करत असताना इमिग्रेशन अधिकारी अडवू शकतील आणि त्याची उलटतपासणी करून त्याला अमेरिकेत प्रवेश नाकारू शकतील अशी तरतूद होती. ओबामाच्या काळात ही तरतूद रद्द करण्यात आली. मंडेलाची दक्षिण आफ्रिकेचा राष्ट्रपती म्हणून निवड झाल्यावरही 14 वर्षं हा कायदा अमेरिकेनं कायम ठेवावा, यातच तिची मानसिकता दिसून येते!

2011 सालच्या फेब्रुवारी महिन्यात 92 वर्षं वयाच्या मंडेलाला श्वसनयंत्रणेमध्ये झालेल्या बिघाडामुळे अतिदक्षता विभागात ठेवायची वेळ आली. साहजिकच, ही बातमी जगभरातल्या वर्तमानपत्रांमध्ये आणि टीव्ही, तसंच इंटरनेट इथे झळकली. पण मृत्यूला गुंगारा देत आठवडाभराच्या काळात मंडेला घरी परतला. या काळात मंडेलावर नक्की कुठल्या इस्पितळात उपचार करण्यात यावेत, यावरून मंडेला कुटुंबात खूप वादावादी झाली. तसंच, सरकारनंही मंडेलाच्या तब्येतीविषयी नीट बातम्या न दिल्यामुळे माध्यमांनी नाराजी व्यक्त केली.

अखेर वयाच्या 95व्या वर्षी 5 डिसेंबर 2013 या दिवशी मंडेलाचं निधन झालं. मंडेलाच्या पश्चात दक्षिण आफ्रिका गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार यात नव्यानं बुडून गेली; पण हे दुर्दैव बघायला आता मंडेला नव्हताच.

असा हा मंडेला. अत्यंत अद्भुत आयुष्य जगलेला. एका सर्वसामान्य कुटुंबात आणि जन्मानंच आपण हीन असतो अशी समजूत करून घेतलेल्या वर्णात जन्मलेला. पण, त्यानं स्वत:ला बदलवलं आणि जगालाही बदलून टाकलं. मंडेलाच्या या अविश्वसनीय आयुष्याला सलाम करण्याशिवाय आपण दुसरं काही करूच शकत नाही!

संदर्भ

क्र.	पुस्तक/संदर्भ	लेखक	प्रकाशक
1	Mandela : The Authorized Biography	Anthony Sampson	Harper Press
2	South Africa - The Rise and Fall of Apartheid (2nd Edition)	Nancy L Clark and William H Worger	Pearson Education Limited
3	The Rise and Fall of Apartheid: From Racial Domination to Majority Rule	David Welsh	Jonathan Ball Publishers
4	Long Walk to Freedom	Nelson Mandela	Abacus
5	गुलाम	अच्युत गोडबोले, अतुल कहाते	मनोविकास प्रकाशन
6	Slavery : A world history	Milton Meltzer	Da Capo Press
7	Inhuman bondage	David Brion Davis	Oxford University Press
8	www.wikipedia.org	--	--

संदर्भ

क्र.	पुस्तक/संदर्भ	लेखक	प्रकाशक
1	Mandela : The Authorized Biography	Anthony Sampson	Harper Press
2	South Africa - The Rise and Fall of Apartheid (2nd Edition)	Nancy L Clark and William H Worger	Pearson Education Limited
3	The Rise and Fall of Apartheid: From Racial Domination to Majority Rule	David Welsh	Jonathan Ball Publishers
4	Long Walk to Freedom	Nelson Mandela	Abacus
5	गुलाम	अच्युत गोडबोले, अतुल कहाते	मनोविकास प्रकाशन
6	Slavery : A world history	Milton Meltzer	Da Capo Press
7	Inhuman bondage	David Brion Davis	Oxford University Press
8	www.wikipedia.org	--	--

संदर्भ

क्र.	पुस्तक/संदर्भ	लेखक	प्रकाशक
1	Mandela : The Authorized Biography	Anthony Sampson	Harper Press
2	South Africa - The Rise and Fall of Apartheid (2nd Edition)	Nancy L Clark and William H Worger	Pearson Education Limited
3	The Rise and Fall of Apartheid: From Racial Domination to Majority Rule	David Welsh	Jonathan Ball Publishers
4	Long Walk to Freedom	Nelson Mandela	Abacus
5	गुलाम	अच्युत गोडबोले, अतुल कहाते	मनोविकास प्रकाशन
6	Slavery : A world history	Milton Meltzer	Da Capo Press
7	Inhuman bondage	David Brion Davis	Oxford University Press
8	www.wikipedia.org	--	--